# ताई, मी कलेक्टर व्हयनू

राजेश पाटील



प्र ति क्रि या

खरंतर हे पुस्तक केवळ आजच्या विद्यार्थ्यांसाठीच नव्हे, तर जीवनाच्या या स्पर्धेतील प्रत्येकासाठीच 'दीपस्तंभ' ठरेल!

- लोकसत्ता

एक उत्तम माणूस आणि म्हणूनच एक उत्तम प्रशासकीय अधिकारी असलेल्या श्री. राजेश पाटील यांचं हे अनुभवकथन विलक्षण आहेच, पण परिशिष्टात असलेली श्रीमती इंदुताई पाटील (राजेशच्या मातु:श्री) व श्रीमती अलका पाध्ये (राजेशच्या शिक्षिका) यांची मनोगतेही तितकीच हृद्य आहेत.

- चिनूक्स : www.maayaboli.com

आयुष्यातल्या कुठच्याही कठीण वळणावर असणाऱ्या तरुणांना उमेद वाटावी, असेच हे अनुभवकथन आहे.

- महाराष्ट्र टाईम्स

'ताई, मी कलेक्टर व्हयनू', मधील हृदय पिघळवणारी कथा व लेखकाचा खडतर प्रवास माझ्या जीवनाला वेगळी दिशा देणारा ठरला. पुस्तक वाचताना अनेकदा भावुक झालो.

- अरविंद वोरा, तरुण विद्यार्थी

'ताई, मी कलेक्टर व्हयनू' एक असे प्रेरणादायी व उद्बोधक लिखाण आहे, जे प्रत्येक तरुणाला आपल्या जीवनाची दिशा ठरवायला मदत करू शकते.

- प्रो. संजय पगारे, अकोले (नगर)

'ताई, मी कलेक्टर व्हयनू' वाचायला घेतले व तहान-भूक विसरून एका बैठकीत ते वाचून काढले. वाचताना कधी हसलो तर कधी रडलो. एकेका पानातून उर्जा मिळत गेल्याचा भास झाला. या जिवंत लिखाणामुळे माझ्यात निश्चित बदल झालेला मी अनुभवतो आहे.

- संदिप सोनवणे, ज्युनिअर सायंटिस्ट, मुंबई

प्रचंड इच्छाशक्ती आणि चिकार मेहनत, जे आपल्याजवळ नाही ते मिळवण्याचा ध्यास आणि त्यासाठीची धडपड. मग सगळ्याच प्रकारचा संघर्ष पार करून मिळवलेले यश! खरंच, एक अद्भुत जीवनप्रवाह.

- पल्लवी, एक वाचक.

राजेश पाटलांच्या ओघवत्या लेखनशैलीमुळे असे जाणवते जणू काही मला समजावण्यासाठी ते स्वत: समोर बसून मला त्यांची कथा सांगत आहेत.

- कु. वीणा नारखेडे, विद्यार्थिनी

शून्याकडून आकाशाकडे झेपावणाऱ्या लेखकाचा संघर्ष हा सर्व तरुणांसाठी प्रेरणेचा एक अखंड वाहणारा झरा ठरलेला आहे. प्रतिकूल परिस्थितीसमोर हात न टेकता, परिस्थितीला आव्हान

देऊन संघर्ष करण्याचे बळ या आत्मकथनाने मिळते.

- गौरव साळुंखे, शिक्षक

# ताई, मी कलेक्टर व्हयनू

## शून्यातून विशाल अवकाशाकडे झेपावणारा संघर्षमय प्रवास

राजेश पाटील

मनोविकास
प्रकाशन

मनोविकास
प्रकाशन

Tai, Mi Collector Vainu | Rajesh Patil
ताई, मी कलेक्टर व्हयनू। राजेश पाटील

प्रकाशक। अरविंद घन:श्याम पाटकर
मनोविकास प्रकाशन
फ्लॅट नं. 3-ए/4,शक्ती टॉवर,
672, नारायण पेठ, पुणे 411 030.
फोन : 020-65262950

Website : www.manovikasprakashan.com

Email : manovikaspublication@gmail.com

© स्मिता राजेश पाटील
मु.पो. ताडे, ता. एरंडोल, जि. जळगाव
Email : rajeshpatilias@gmail.com
ISBN -978-93-82468-12-7

मूल्य। 150 रुपये

माझे हे
लेखनपुष्प
माझ्या स्वप्नांना बळ देणाऱ्या
ताई व अण्णा
यांच्या चरणी अर्पण

# प्र स्ता व ना

शून्यातून विशाल अवकाशाकडे झेपणारा संघर्षमय प्रवास ''ताई, मी कलेक्टर व्हयनू'' या आत्मकथनातून राजेश पाटील यांनी चित्रित केला आहे. राजेश पाटील या आत्मकथनाचा नायक असला तरी तो असंख्य अभावग्रस्त तरुणांच्या समूहाचा प्रतिनिधी म्हणून समोर येतो. सामान्य वाटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमध्ये एक अंगभूत गुणवत्ता असते. त्या गुणवत्तेचा शोध घेऊन अथकपणे वाटचाल केली तर कर्तृत्वाची शिखरे साद घालतात, आव्हानांना सामोरे जाऊनच आपली मुद्रा उमटवता येते, हे वास्तव या आत्मकथनातून अधोरेखित झाले आहे. सामाजिक विषमता आणि आर्थिक विवंचनेमुळे हजारो तरुणांची सृजनशीलता नष्ट झाली. मात्र यावर मात करून अनेकांनी आपल्या सामर्थ्याचा प्रत्यय आणून दिला आहे आणि त्यांच्या रूपाने समाजात चांगुलपणाची एक भावना निर्माण झालेली दिसते. सामान्यातूनच असामान्यत्वाचा जन्म होतो आणि तो भोवतालच्या समाजाला जगण्याची उर्मी प्रदान करतो.

राजेश पाटील हा निम्नस्तरीय कष्टकरी समाजातून आणि कर्जबाजारी शेतकऱ्याच्या कुटुंबातून आलेला तरुण आहे. शेतमजुरीचे मिळेल ते काम करून, पाव-भाजीपाला विकून, ट्रॅक्टरवर मजुरी करून, विहिरी खोदून त्याने शिक्षण संपादन केले. बऱ्या वाईट मित्रांच्या संगतीत राहून उनाडक्या केल्या, घरी भांडणं आणली, आई-बापाला मनस्ताप दिला, बेदम मार खाल्ला, भुरट्या चोऱ्या, लबाड्या केल्या आणि एक 'वाया गेलेली केस' या टप्प्यापर्यंत आलेला राजेश पुन्हा भल्या मित्रांच्या सान्निध्यामुळे आयुष्याच्या एका निर्णायक वळणावर येऊन उभा राहिला आणि पुढे त्याला त्याची निश्चित दिशा गवसत गेली. एक व्रात्य आणि खोडकर मुलगा प्रचंड परिश्रमाच्या आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर आय.ए.एस. झाला. ही थक्क करणारी त्याची संघर्ष कहाणी शेकडो मुलांना आत्मशोध घेण्यास प्रवृत्त करणार आहे. जीवनात अपयशाचे अनेक कडू प्रसंग येतात, हातातोंडातून यशाचा घास निघून जातो, पाहता पाहता यश हुलकावणी देते. मात्र काही माणसे न खचता, न डगमगता खंबीरपणे यशाचा पाठलाग करून ते खेचून आणतात आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाचा विचार करतात याचे एक ठळक उदाहरण म्हणूनही राजेश पाटील यांचा निर्देश करता येईल.

जीवनाकडे आणि समाजाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे हे राजेश पाटील यांचे बलस्थान आहे. ही सकारात्मक दृष्टी त्यांना त्यांच्या जीवनानुभवातून मिळाली आहे. प्रतिकूल सामाजिक परिस्थितीमुळेच ते अंतर्मुख झाले, प्रतिकूलते-मुळेच अनुकूलतेचे मोल त्यांच्या लक्षात आले. परिस्थितीच्या झळा माणसाला खूप काही शिकवून जातात. या झळांमुळे माणूस पोळतो, होरपळतो आणि 'शेकून' निघतो. हे 'शेकून' निघणे म्हणजे एका अर्थाने प्राप्त परिस्थितीशी झगडण्याचे बळ मिळवणे असते. मात्र असे बळ मिळविण्यासाठी सजगता आणि संवेदनशीलता असावी लागते, ती राजेश पाटील यांच्याकडे असल्याने त्यांनी संघर्षातून आपली वाट 'घडवली'.

म. फुले, विवेकानंद आणि इतर विचारवंतांच्या लेखनामुळे पाटलांच्या सामाजिक दृष्टीला एक दृढ संस्कार मिळाला, ही महत्त्वाची गोष्ट आहे. ग्रामीण भागातील सर्वस्तरीय विद्यार्थ्यांना आपले प्रश्न समजावून घेण्यासाठी फुले-आंबेडकरांचे विचारविश्व दिशादिग्दर्शन करू शकते आणि त्या विचारांमधूनच त्यांची जडणघडण होऊ शकते. ग्रंथवाचनाबरोबरच समाजस्थितीचे वाचन कसे

करावे, हे राजेश पाटलांनी जी 'पुढची दिशा' सूचित केली आहे, त्यात समाजातील सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील परिवर्तन हा केंद्रबिंदू आहे. या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे पाटील भावनिक होऊन लिहीत नाहीत, आपली व्यक्तिगत आणि कौटुंबिक फरफट ते सामाजिक परिप्रेक्ष्यात पाहतात, त्यामुळे त्रागा करण्यापेक्षा आपल्या समस्येवरील उपाय शोधण्याचा प्रयत्न करतात. प्रयत्नांमुळेच त्यांना दिशा गवसत जातात. स्पर्धा परीक्षांसंबंधीचा त्यांचा प्रदीर्घ अनुभव चिंतनाच्या पातळीवर व्यक्त होतो तेव्हा एक लक्षात येते की, अपयशातूनच माणसाला यशाचा मार्ग सापडत जातो पण त्यासाठी डोळस दृष्टी आणि आत्मभानाची गरज असते, हे आत्मभान मानसिक आणि सामाजिक संघर्षातून मिळवावे लागते.

"जीवनातील माझ्या अनुभवामुळे व आकलनामुळे काही गोष्टी मनात ठाम झाल्या होत्या. माझा देवावरील व भाग्यावरील विश्वास नाहीसा झाला होता." हे एक महत्त्वाचे विधान राजेश पाटील यांनी या आत्मकथनात केले आहे. भ्रामक समजुती, अनाठायी उदासीकरण, दिशाहीन वाटचालीपेक्षा जीवनाचे वस्तुनिष्ठ आकलन महत्त्वाचे असते, त्याशिवाय प्रगतीपथ सापडत नाही आणि त्यावरून नीट चालताही येत नाही. रचनात्मक विचारांची स्पष्टता हा पाटलांच्या व्यक्तिमत्वाचा आणखी एक विशेष आहे आणि त्याला अनुभवविश्वाची पार्श्वभूमी आहे, ही समाधानाची बाब आहे. खानदेशातील ताडे या एका लहानशा खेड्यातील सामान्य विद्यार्थी परिस्थितीशी झुंज घेत, वाटा-वळणांशी झगडत, पुणे विद्यापीठात संख्याशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेऊन, पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात बसून अभ्यास करतो आणि आय.ए.एस. होतो ही आमच्याही दृष्टीने आनंदाची बाब आहे. आज आमचे असंख्य विद्यार्थी या दिशेने प्रयत्नशील आहेत, त्यांनाही यश मिळो अशी कामना करतो आणि यापुढेदेखील आमच्या विद्यार्थ्यांच्या यशोगाथा चित्रित करणाऱ्या आत्मकथनांना प्रस्तावना लिहिण्याचा योग येईल अशी आशा बाळगून राजेश पाटील यांच्या पुढील कारकिर्दीला शुभेच्छा व्यक्त करतो.

डॉ. नरेंद्र जाधव<br>
माजी कुलगुरू, पुणे विद्यापीठ

## दु स ऱ्या आ वृ त्ती च्या नि मि त्ता ने

30 नोव्हेंबर 2008 ला प्रकाशित झालेले 'ताई, मी कलेक्टर व्हयनू' अवघ्या तीन वर्षांत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचले. समाजाच्या सर्व स्तरातून असंख्य वाचकांनी या पुस्तकाला दाद दिली. अनेकांनी माझ्यापर्यंत वेगवेगळ्या माध्यमातून आपल्या भावना पोहोचवल्या. कुणी एकाच बैठकीत पुस्तक संपवले होते, कुणी वाचतांना भावुक झाले होते तर, बऱ्याच लोकांनी त्याचे कुटुंबामध्ये व वेगवेगळ्या गटांमध्ये सामूहिक वाचन केले होते. काही लोकांनी अधिक प्रती घेऊन त्या वाटल्या होत्या. 'दीपस्तंभ'ने राबवलेल्या अभिनव 'आत्मविश्वास व प्रेरणा' अभियान अंतर्गत जळगाव जिल्ह्यात जवळजवळ प्रत्येक शाळेत पुस्तकाचे वाचन करण्यात आले होते. या दरम्यान पुस्तकाचे बऱ्याचदा पुनर्मुद्रण झाले. आजसुद्धा अनुमानिक तीन-चार दिवसांत एकतरी प्रतिक्रियात्मक संदेश माझ्या मेल बॉक्सवर किंवा फेसबुकवर हमखास अवतरतो. पुस्तकाचे हे अभूतपूर्व यश व तरुणांनी त्याला दिलेला प्रतिसाद निश्चितच सुखावणारा आहे. वेगवेगळ्या उद्देशांसाठी धडपडणाऱ्या हजारो तरुण-तरुणींना त्यामुळे मिळालेला भावनिक दिलासा पुस्तकाच्या निर्मितीमागच्या उद्देशाला साध्य करणारा ठरला.

एवढे असतानाही पुस्तकाकडे पुन्हा बघण्याची गरज भासते आहे आणि तेच दुसऱ्या आवृत्तीचे प्रयोजन. 'ताई, मी कलेक्टर व्हयनू' हे माझे पहिलेच लिखाण, त्याबरोबर ते खूपच व्यस्ततेत व अनियोजितपणे लिहीले गेल्यामुळे पुस्तकामध्ये कधी एकसंधपणा तर कधी प्रवाह विस्कटल्याची जाणीव होते. काही प्रसंग, व्यक्तिरेखा व संदर्भ पाहिजे तेवढे ठळक व वाचकाची भूक शमविण्यास अपूर्ण पडलेले दिसून येतात. पुस्तकातील काही संदर्भ विस्तृत न झाल्यास वाचकांची त्याकडे डोळेझाक होण्याची व पुस्तकातील त्यांच्या असण्याला योग्य न्याय न मिळण्याची शक्यता आहे. या सर्व कारणांमुळे व पुस्तकाला एक भरीव रूप देण्याच्या उद्देशाने दुसऱ्या आवृत्तीचा प्रपंच मांडत आहे.

माझ्या या प्रयत्नात महत्त्वाचा वाटा उचलणाऱ्या संजय आवटेंचा मी सदैव ऋणी राहीन. त्यांच्या मार्गदर्शनामुळे दुसऱ्या आवृत्तीतील प्रसंग, व्यक्तिरेखा व संदर्भ अजून उठावदार व पूर्णत्वाकडे नेणारे ठरले आहेत. दुसरी आवृत्ती नव्या ढंगात काढण्याची जबाबदारी स्वीकारणाऱ्या 'मनोविकास'च्या अरविंद पाटकरांमुळे व आशिषमुळे हे पुस्तक आकर्षक स्वरूपात वाचकांसमोर येत आहे. या व्यतिरिक्त माझी अर्धांगिनी स्मिता, संग्राम-नुपूर, यजुर्वेद महाजन, अशोक पिंगळे या मित्रांच्या सततच्या तगाद्यामुळे व नवीन आवृत्तीची आतुरतेने वाट पहाणाऱ्या असंख्य वाचकांच्या प्रेमामुळे दुसरी आवृत्ती लवकर साकारू शकली याचे समाधान आहे.

वाचकांच्या पदरात टाकलेल्या या नवीन फुलाला ते निश्चित दाद देतील यात शंका नाही.

- राजेश पाटील

कंधमाळ, ओडिशा

अ नु क्र म णि का

गावगाडा
लहानपण देगा देवा
जर का तू नापास झाया...!
‘ए ताजा पाववाले...!’
कोणत्याही कामाची लाज नसली पाहिजे...
बापू, अण्णाले पैसा देवाले लाव...!
ताडे ते पुणे
आणि वाटचाल सुरू झाली...!
जीवघेणी शेवटची लढाई
ताई, मी कलेक्टर व्हयनू
पुढची दिशा

कुणीही जळगाव जिल्ह्यातल्या एरंडोलहून एसटीने निघाला, की गचके खात, रस्त्याला शिव्या देत, माझ्या गावी अर्ध्या तासात पोचू शकतो. पद्मालय डोंगराच्या पायथ्याशी असलेले ताडे, हे माझे लहानसे गाव.

गाव झाडांनी वेढलेले आहे. त्यामुळे खूप जवळ पोचल्यावरही, आपण एका गावाजवळ येऊन पोचलो याचा भास होत नाही. गाव पहुडलेल्या सुस्त अजगरासारखे सदासर्वदा शांत असते. क्वचित कधीतरी भांडणतंटा, मारामाऱ्या ऐकू येतात, पण त्या उगाच काही वेळ; मग पुन्हा शांतता! दुपारी कुणी गावात चक्कर मारली तर त्याला पेंगणारी दोन-चार कुत्री, पारावर गुळचट गप्पा मारणारे चार-दोन म्हातारे आणि काही माऊली दिसतील. तेवढे वगळले तर संपूर्ण गावात स्मशानशांतता असते. अशा वेळेला बाहेरगावहून कोणी पाहुणा आला तर किंवा सरकारी मुलाजिम चुकून फिरकला तर त्याला संध्याकाळपर्यंत तंबाखूचे विडे चघळत टाइमपास करावा लागतो.

गाव लहान असले तरी ऐसपैस पसलेले आहे. पूर्व सीमेला लागून गावाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत धनगरांची गल्ली पसरली आहे. दक्षिण भागाला मारुतीचा पार व त्याला लागून पंचायत, दूध डेअरी व हरिजनांची वस्ती आहे. उत्तर टोकाला भिलवाडा व त्यामागे शाळा आहे. गावामध्ये ओळीने गल्ल्या आहेत त्यामध्ये एखादद्सरे घर गावाच्या रेखीव रूपाला छेद देत मुरूमासारखे उभारलेले दिसते. गावाच्या दक्षिणेला व पश्चिमेला  रिकामी जागा आहे, ज्यामध्ये काही गावकऱ्यांनी मळणीसाठी खळे उभारलेले आहेत तर काहींनी उकिरडे केले आहेत. आधी मळणीसाठी वापरण्यात येणारी ही खळे सध्या पैतृक संपत्ती समजून काही लोकांनी बळकावलेली दिसतात. गावाला उत्तर-दक्षिण नैसर्गिक उतार आहे. त्यामुळे पावसाचे पाणी व गटारीचे पाणी कुठलाही अडथळा न येता पंचायत ऑफिसमागील डबक्यात जाऊन साचते. पंचायतीसमोरील ऐसपैस जागेवर कधी डोंबाऱ्याचा खेळ तर कधी कीर्तन सप्ताह तर कधी लोहाराचे वा गारूड्याचे बिऱ्हाड हमखास नजरेला पडते. बाहेरगावाहून आलेल्या पाहुण्याला गावाचे रूप नेहमी भावते. गावाच्या सुरुवातीलाच रूबाबात बसलेला पार, पारावरील मंदिरांची ठेवण व त्यामधील रेखीव मूर्त्या कुणालाही आकर्षित करतील अशा आहेत.

गावात हरिजनांची मोजून चार घरे आहेत. सर्व एकमेकांच्या भावकीतली. इनामात मिळालेल्या निपजाऊ जमिनी सोडल्या तर कपाशीच्या काड्यांपासून टोपले करणे, बाजा वाजवणे व बकऱ्या-कोंबड्या पाळणे यावर त्यांची गुजराण चालते. तशी एका घरातील काही मंडळी थोडेफार शिकून दूर कुठेतरी कामाला आहेत. ती कधीकधी सुटाबुटात गावाला आल्यावर इतरांच्याही छात्या फुगलेल्या असतात. गावामध्ये त्यांच्याविषयी जास्त भेदभाव नसला तरी खूपसा संबंधही कुणाचा नाही.

भिलवाडा तसा गावाला लागूनच पण तुटल्यासारखा. भिल्लांची घरं म्हणजे एका खोलीचं छपरांचं बिऱ्हाड. बारा विश्वे दारिद्र्य. तरीही जीवन जगण्याची शैली बेभान. हे बहाद्दर आजसाठी फक्त जगतात, त्यांना उद्याची चिंता नाही. मोलमजुरी करणे, शेताची राखण करणे वा हातभट्टीची दारू पाडून ती विकणे यावर त्यांची गुजराण चालते. आठवड्याचे सहा दिवस काम करायचे व रविवारी, बाजाराच्या दिवशी एरंडोलला जाऊन, जोडीने सिनेमा बघायचा; मटन - मासे घरी

आणून रविवार साजरा करायचा. रविवारी मग मालकाचे कितीही मोठे काम असले तरी बहाद्दर घरी राहील तर शपथ. त्यांच्यातले बरेच नेमके कसे जगत असावेत याचे मला कोडे पडलेले असे. भिल्लांची लग्नेही मोठ्या उत्साहात होतात. नाचगाणे, मद्य यांची खूपच रेलचेल असते. शरीराने कणखर व दणकट असलेले भिल्ल मात्र कमालीचे अशिक्षित आहेत. कुठेतरी - एखाददुसरा - थोडाफार शिकलेला सापडतो, पण तरीही नोकरी मिळवणे त्यांच्यापासून मैलभर दूरच आहे. एवढे सारे असूनही भिल्ल समाज कमालीचा स्वाभिमानी आहे.

या सर्वापेक्षा धनगर समाज खूप वेगळा आहे. खान्देशात काही गावात धनगर आहेत. माझ्या गावात धनगर मोठ्या संख्येने आहेत. शेती व पशुपालन हे त्यांचे मुख्य व्यवसाय. शिक्षणाचा फारसा गंध नसलेला धनगर मात्र उत्तम शेतकरी व व्यावसायिक आहे. त्यांच्या कष्टाळू स्वभावामुळे ते आर्थिकदृष्ट्या सधन आहेत. निर्व्यसनी, मेहनती व काटकसरीने जीवन जगणारा धनगर खूप कमी काळात आश्चर्यजनक प्रगती करताना दिसतो. त्यांचा हा स्वभावधर्म इतरांसाठी कधी कुतूहल, उपहास तर कधी ईर्षेचा विषय ठरतो.

या व्यतिरिक्त गावात न्हाव्याची चार घरे व ब्राह्मणाचे एक घर आहे. सर्व जातींमध्ये बंधुभाव असला व खेळीमेळीचे वातावरण असले तरी निवडणुका वा काही वाद उदभवल्यास आपापसात कितीही कलह असला तरी एका जातीचे लोक एकत्र येतात व समोरच्याला भुईसपाट करतात.

गावातील स्त्रिया पुरुषांच्या तुलनेने जास्त कष्टाळू आहेत. घर सांभाळून घरधन्याला शेतीत हातभार लावणे हा तिचा धर्म. काही सधन घरातील स्त्रिया सोडल्यास इतर सर्व बाया शेतीवर राबताना हमखास दिसणार. कीर्तन, लग्न, पोथीवाचन वगैरे गोष्टीतून स्त्रिया एकत्र येतात, परंतु त्यांची खरी सरमिसळ होते ती शेतावरच. घरचा पुरुष निकमाऊ असलेल्या घरात सर्व जबाबदारी घरातील माऊलीवर पडते. अशा परिस्थितीत कित्येक माता लहान-मोठ्या लेकरांना घेऊन शेतात राबताना दिसतात काही घरे तर फक्त या माऊलींच्या मर्दुमकीवर चालतात. सहसा घरातील सर्व कारभारांवर स्त्रियांची घट्ट पकड असते. काही घरांमध्ये सुनेचा तर काही घरामध्ये दारुड्या नवऱ्यापासून होणारा छळ बघायला मिळतो.

गावात हरिजनवस्ती, भिलवाडा व धनगरवाडा वगळला, तर इनमिन चार भावक्या आहेत; प्रत्येक भावकी स्वत:ला ब्रह्मदेवाच्या खानदानामधील समजते! त्यामुळे आजपर्यंत गावातल्या गावात एकही लग्न झालेले नाही. ‘आमनपेक्षा त्या निच्चा सेतस!’ असे प्रत्येक जण स्वत:ला श्रेष्ठ व दुसऱ्याला कनिष्ठ समजत असतो. गाव उद्योगी आहे. एवढे कष्ट करून गावात खूप समृद्धी नांदते अशातला भाग नाही. सिमेंटची चार-दोन घरे सोडली तर बरेचसे बापडे बारमाही कर्जबाजारी आहेत. नाही म्हणायला गावात दोन-चार ट्रॅक्टर, मोटारसायकली, बऱ्याचशा ‘टिव्ह्या’ यांचे आगमन झालेले आहे. मात्र, गावाची पंचायत, शाळा, पार आणि बऱ्याच जणांच्या डोक्यावरील छपरे ‘जसाना तसा’ आहेत.

सकारात्मक गोष्ट म्हणजे गावात दाखल होणाऱ्या प्रत्येकाला गाव भावते. नवीन आलेले मास्तर, धोपटीवाले डॉक्टर, वायरमन, तलाठी, ग्रामसेवक हे गावाकडून चांगली कमाई करून जातात. आजकाल सावकारी धंद्यात चांगल्यापैकी बरकत आहे आणि बाहेरच्या लोकांवर असीम श्रद्धा ठेवणारे माझे गाववासी त्या लोकांच्या तुंबड्या यथास्थित भरून त्यांना रवाना करत असतात! एक शिक्षक महोदय तर रिटायर झाल्यानंतरही गावात चार-पाच वर्षे ठिय्या मांडून होते.

‘जाऊ दे रे भों, आपलं काय करणं शे’ असे म्हणून, सर्व गोष्टींकडे कानाडोळा करून

गावकरी मात्र गुण्यागोविंदाने जगताना मी लहानपणापासून पाहात आहे. आपली परिस्थिती बदलू शकत नाही व आपले लोक एखादी गोष्ट करू शकत नाहीत, याचा ठाम विश्वास! मात्र एवढे असूनही, सर्वजण मरणधरण, सार्वजनिक सप्ताह, कीर्तन यांसाठी एकत्र येतात. कर्जबाजारी असूनही मुलांना शिकवतात आणि याचा परिणाम म्हणून पैसे देऊन का होईना, आजमितीस आठ-दहा मुले मिलिटरीच्या व एखाददुसरा इकडेतिकडे नोकरीला आहेत. ताडे तसे आजूबाजूच्या गावांपेक्षा उठून दिसते. धरणामुळे विस्थापित झालेल्यांची वस्ती असल्याने सुटसुटीत; तसेच, नजरेला भरेल असा मंदिराचा पार व कोठेही अध्यात-मध्यात नसल्यामुळे ताड्याची विशिष्ट अशी प्रतिमा लोकांच्या मनात तयार झालेली आहे.

गावात भिल्लांना सोडले तर सर्वांकडे कमी-अधिक प्रमाणात शेती आहे व त्यावरच त्यांची गुजराण चालते. गावाच्या पूर्वेकडची जमीन डोंगराळ आहे तर उत्तर व पश्चिम बाजूची जमीन बऱ्यापैकी सुपीक आहे. पाच ते सात शेतकरी सोडले तर जवळजवळ सर्वांकडे पाच एकराच्या खाली शेती आहे. मी लहान असताना गावशिवारात कमी विहिरी होत्या. आता मात्र प्रत्येक शेतात विहीर आहे तरीही सर्व खेळ मात्र वरुणराजाच्या मर्जीने चालतो. पाऊस चांगला झाला तर पिके चांगली येतात व विहिरींनाही थोडेफार पाणी राहते. नाहीतर सारे शिवार विधवेच्या कपाळासारखे ओस व भकास दिसते. काही शेतकऱ्यांनी पाच-सहा मैल पाईपलाईन करून गिरणा नदीवरून पाणी आणले आहे, त्यांची शेते मात्र उन्हाळ्यातही हिरवीगार असतात.

रब्बीमध्ये कापसाच्या लांब पानाच्या हाईब्रीड वाणाने संपूर्ण शिवार भरलेले असते. वेगवेगळ्या शेतामंध्ये भिन्न उंचीचे, ओळीने लागलेले, कापसाचे सुंदर गालीचे पावसाळ्यात मन मोहून टाकतात. कापूस तसे खूप फसवे पीक. एखाद्या वर्षी सर्व ठीक जमून आले की शेतकरी मालामाल होतो. तर एखाद्या वर्षी विष खायची वेळ येते. या जुगारीपणामुळे शेतकरी प्रत्येकवर्षी मोठ्या आशेने कापसावर दाव लावतो व ते पीक कसे चांगल्यात चांगले येईल याची काळजी घेतो. या आशेपोटी मग कुणी जे बियाणे चांगले सांगेल वा ऐकण्यात येईल ते लावतो, जे औषध इतर फवारत असतील ते फवारतो. प्रत्येक वर्षी जमिनीची कुवत असो वा नसो, कापूसच लावतो त्यामुळे जमिनीची उत्पादन क्षमता व रोगप्रतिकारक शक्ती कमी झालेली असते. त्यात हाईब्रीड बियाणे रोगाला लवकर बळी पडते. प्रत्येक शेतात कापूस असल्यामुळे कीड या शेतातून त्या शेतात खूप लवकर पसरते. मग किडीला कंट्रोल करण्यासाठी धांदल सुरू होते. एकमेकांच्या सांगण्यावरून वा अनुभवावरून किंवा कृषि केंद्रात जे औषध शिल्लक असेल ते फवारले जाते. साधारणत: बियाणे घेण्यासह कृषी केंद्रात खाते उघडले जाते, ते पुढे औषधांबरोबर खतापर्यंत कायम राहते; तर कधी कधी कापूस विकण्यापर्यन्त कृषि केंद्रे शेतकऱ्याला गोचिडाप्रमाणे चिपकलेली असतात. यामुळे कृषि केंद्रवाले त्यांच्या इच्छेप्रमाणे भाव लावतात व बऱ्याचदा अडाणी शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीनुसार खोटेनाटे सांगून व एखाद्या वाणाची उगाच स्तुती करून न खपणारा माल खपवतात. काहीजण तर याच्याही पुढे जाऊन भेसळ करून चांगल्या वाणाच्या नावावर शेतकऱ्यांच्या जिवाशी खेळतात. या व्यापाऱ्यांच्या संघटना असतात. त्यामुळे त्यांच्या मर्जीने भाव व बाजारातील मालाचा पुरवठा अवलंबून असतो. बऱ्याचदा ही मंडळी शेतकऱ्यांना पावती न देताच बियाणे देतात तर काही वेळेला पावतीच्या किमतीपेक्षा जास्त पटीने किंमत वसूल करतात. शेतकरी आधीच हवालदिल झाल्यामुळे व कुठूनतरी बियाणे मिळावे या आशेने सर्व अटींना निमूटपणे सहन करतो. बऱ्याचदा यात काही वाईट आहे, हा विचारही त्याच्या मनाला

शिवत नाही.

या सर्व धावपळीनंतर लागलेल्या कापसाचे भविष्य पावसावर अवलंबून राहाते. पण बऱ्याचदा पाऊसही हुलकावणी देतो. कधीकधी अचानक कापसाच्या कैऱ्या तयार होण्याच्या मार्गावर असतानाच पाऊस गुडूप होतो व शेतकऱ्याच्या डोळ्यादेखत फुले झडून झाडाखाली गालिचा तयार होतो. अशावेळी ज्यांच्याकडे पाणी देण्याची व्यवस्था आहे ते कापूस वाचवतात व इतर फक्त रोज शेतात जाऊन पडलेल्या फुलांकडे व कैऱ्यांकडे बघत नशिबाला कोसतात. बऱ्याचदा कापसाचे वेगवेगळे वाण वेगवेगळ्या प्रकारे उत्पन्न देतात. प्रत्येक वर्षी मोठ्या आशेने शेतकरी गेल्या वर्षीचे जास्तीत जास्त उत्पन्न देणारे वाण निवडतो. बहुतेक सारे शेतकरी एकाच वाणावर तुटून पडतात. नेमके तेच वाण बाजारातून गायब होते व अधिक पैसे देऊन शेतकऱ्याला घेणे भाग पडते. कृषी केंद्रवाले शेतकऱ्यांचा कल आधीच जाणून घेतात व त्याप्रमाणे शेतकऱ्याला लुबाडतात. बियाणे विक्री व उत्पादन पूर्णत: खाजगी क्षेत्राच्या ताब्यात असल्यामुळे शेतकरी बियाणे कंपन्यांच्या हवाली असतो. बऱ्याचदा या कंपन्यांचे काम संशय येईल अशाच पद्धतीने चाललेले असते.

दसऱ्यानंतर कापसाचे पीक घरात यायला सुरुवात होते लगेचच दलाल गावांगावांमध्ये गिधाडासारखे घिरट्या घालतात. गंमत म्हणजे शेतकऱ्याला नेमका बाजारभाव काय आहे याचीही कल्पना कधीच नसते. हे व्यापारी जेवढा भाव सांगतील तोच बाजारभाव अशी शेतकऱ्याची धारणा होते. घरी कापूस येण्यापूर्वीच कृषि केंद्रवाले व इतर सावकार शेतकऱ्यावर दबाव आणायला सुरुवात करतात. मग अशावेळी घरी बसल्या, ज्या भावात कापूस मागितला जातो त्या भावात व्यापाऱ्याला तो विकला जातो. बऱ्याचदा हे चतुर लोक शेतकऱ्यांपासून कापूस घेतात. पंधरा दिवसानंतर पैसे देण्याच्या हमीवर परप्रांतात जाऊन माल विकतात व त्यानंतरच शेतकऱ्याला पैसे मिळतात. अशाप्रकारे कापूस घेऊन पैसे  न देताही लंपास झालेले महाभाग भरपूर असतात.  व्यापारी बऱ्याचदा बाजारभाव कृत्रिमरीत्या कंट्रोल करतात. प्रत्येक वर्षी कापूस पणन महासंघ कापूस खरेदी करते. परंतु त्यांचा कारभारही खूप विचित्र पद्धतीने चालतो. कापूस लावणीच्या आधी हमीचा भाव घोषित न होता कापूस तोडायला आल्यावर कधीतरी भाव घोषित केला जातो. बऱ्याचदा व्यापारी या भावापेक्षा कमी भावाने कापूस मागतात. महासंघाचे खरेदी केंद्र म्हणजे शेतकऱ्याला पिळणारा एक घाणा आहे. सुरुवातीला शेतकऱ्याला गाडीजोडीने केंद्रांवर कापूस आणावा लागतो. त्यानंतर सर्व कामे सोडून किती दिवस केंद्रांवर रहावे लागेल याचा भरवसा नाही. पुढे काटेवाल्याला पैसे, हमालांना अव्वाच्या सव्वा पैसे, विशिष्ट ग्रेडमध्ये कापूस आणण्यासाठी पैसे व शेवटी चेक हातात घेतानाही पैसे मोजावे लागतात. या अशा सर्व कटकटींपेक्षा गावात थोडे कमी पैसे मिळाले तरी चालेल असा विचार करून वर्षानुवर्षे शेतकरी गावातच व्यापाऱ्याला कापूस विकतात. कापसाच्या बेभरवशामुळे बऱ्याचदा शेतकरी कर्जबाजारी होतात. परंतु कापसाचा नाद काही सोडत नाहीत; कारण ह्या समस्येचे समाधानही कापसाच्या चांगल्या पिकामध्येच असते. अलीकडे ठिबक सिंचनामुळे व बी. टी. वाणामुळे परिस्थिती थोडीफार सुधारते आहे परंतु तरीही अनिश्चिततेचा खेळ कायमच आहे.

मी लहान असताना माझ्या गावाजवळ एक साखर कारखाना होता. सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या त्या कारखान्यामुळे सगळीकडे भरभराट होती. हमीच्या भावामुळे भरपूर शेतकरी ऊस लावीत. शिवाय गावातील बऱ्याच लोकांना कारखान्यावर काम मिळत असे. हळूहळू कारखाना

डबघाईला आला. प्रमाणापेक्षा जास्त नोकरभरती, भ्रष्टाचार, प्रशासनिक बेशिस्त यामुळे या कारखान्याला कीड लागली. जे पदाधिकारी आले त्यांनी वेश्येसारखा त्याचा उपयोग केला. पर्यायाने पुढच्या दहा वर्षात कारखाना लिलावात काढण्यात आला. कारखाना बंद पडल्यामुळे खूप संसार उघड्यावर आले. संपूर्ण कार्यक्षेत्राला भकासपणा आला. हमीचे उत्पन्न देणारे उसाचे पीक दुर्मीळ झाले. नेत्यांनी मात्र त्यावर चांगलाच मलिदा कमावला. कधी स्वत:च्या स्वार्थापोटी, तर कधी प्रतिस्पर्ध्यावर कुरघोडी करण्यासाठी कारखान्याला नाचवणाऱ्या या कृषिसम्राटांनी शेवटी गरीब शेतकऱ्यांच्या चेहऱ्याचे हसू पळवले.

नाना रामोश्यापासून अरुण धनगरापर्यंत सर्व जण एका पद्धतीने शेती करतात. ते सारे मे पंधरापासून आकाशाकडे अधाशासारखे बघणार, चांगला पाऊस होण्यासाठी नवस करणार! नाना रामोश्यापासून अरुण धनगरापर्यंत कुणाकडेही बी-बियाण्यासाठी पैसे नसल्यामुळे दुकानदार जे बियाणे देईल ते तो वर्षानुवर्षे घेत असतो. जास्तीत जास्त, शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे चौकशी होणार, ''काय अण्णा, कोणता डब्बा लाई रायना मग यंदा;'' म्हणत शेवटी, मेंढीचालीप्रमाणे सर्वजण एका वाणावर तुटून पडणार. पैकी काही जण आळीपाळीने वेगवेगळ्या कंपन्यांच्या कापसाचे महागडे बी शेतात रोपणार. प्रत्येक जण आपला निर्णय दुसऱ्याच्या निर्णयावरून घेतो. या सर्वांत कृषी केंद्राच्या 'मोठाभू' चा सहभाग मोठा असतो. तो शाळा-कॉलेजमध्ये एकाच वर्गात पाच वर्षे गटांगळ्या खाणारा, मख्ख माणूस असला तरी अशा वेळी त्याला मोठा मान असतो. कारण तो उधारीने बियाणे देणार असतो. त्याचा मौलिक सल्ला घेणे भाग असते.

वर्षागणिक, एखाद-दुसऱ्याचे शेत ग्रामपंचायतीचे शिपायाला किंवा मास्तराला किंवा गावातल्या एखाद्या बागायतदाराला, कधी परत न मिळण्या-साठी लिहून दिले जाते. मी स्वत:च्या डोळ्यांनी त्या घरातला रडबोंबल आणि घरातील प्रत्येकाच्या डोळ्यांतील करुण आकांत बऱ्याचदा पाहिला आहे. पाहताना ओघळणारी आसवे फाटलेल्या सदऱ्याला चोरून पुसत, मुठी आवळत व दातमिठ्या खात घराचा रस्ता धरलेला आहे.

गावातील जवळजवळ सर्व अल्पभूधारक शेतकरी वर्षानुवर्षे अघोरी अशा दुष्टचक्रामध्ये भरडले जात आहेत. तुटपुंज्या आर्थिक परिस्थितीमुळे शेतीसाठी योग्य वेळी लागणाऱ्या भांडवलाचा त्यांच्याकडे नेहमीच अभाव असतो. अशा काळी त्याला पीक घरात पडण्यापूर्वी, ते एखाद्या व्यापाऱ्याला - बियाण्यापासून मशागतीपासून सर्व कामांसाठी झालेल्या खर्चापोटी केलेल्या उचलीपोटी - मिळेल त्या किंमतीला विकावे लागते.शेतकऱ्याचे पीक जेव्हा शेतात डोलत असते तेव्हा त्याच्या मालाला भरपूर भाव असतो, परंतु तो जेव्हा शेतमाल विकायला निघतो, तेव्हा नेहमीच भाव गडगडलेले असतात, कारण त्याच्यामागे कोल्हे नेहमीच कुईकुई करत असतात.

मुलामुलींच्या लग्नामुळे, आजारांमुळे वा आईवडिलांच्या दहाव्याच्या खर्चामुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्याचे डोळे शेतमालाला लागलेल्या खर्चाचा व आलेल्या उत्पन्नाचा जमाखर्च करता करता पांढरेफटक होतात. अशा परिस्थितीत त्याला शेत किंवा घर गहाण ठेवावे न लागले तरच नवल!

पुढे कधीतरी आपल्याला चांगले उत्पन्न येईल या आशेवर शेतकरी पुन्हा कष्टाने कामाला लागतो, परंतु दुर्दैवाने या चक्रातून फार थोड्यांची सुटका होते.

अजूनही स्पष्ट आठवते, की हरी विठ्ठल, पुंडलीक दामू व युवराज हरी यांची शेते कशा प्रकारे

हडपली गेली! सुरुवातीला कुटुंबातील आजारपणासाठी किंवा लग्न-अकरावे यासारख्या कार्यासाठी व्याजाने पैसे घेतले जातात. कोरडवाहू शेतीमुळे व जेमतेम उत्पन्नामुळे घेतलेले पैसे वेळेवर दिले जात नाहीत. मग सुरू होते व्याजावर व्याज. तीन-चार वर्षांनी ह्या अजगराचा विळखा शेतकऱ्याच्या मानेशी घट्ट होतो. त्यातून त्याची सुटका नसते. पुढे, व्याजावरचे व्याज व मुद्दल त्याच्या वार्षिक उत्पन्नाच्या व परतफेड करण्याच्या क्षमतेपेक्षा अधिक होते. अशा वेळी त्याच्यावरील सावकाराचा दाब वाढतो व त्याला शेत लिहून देण्यापलीकडे पर्याय राहत नाही. सुरुवातीला पैसे परत केल्यावर मिळण्याच्या अटीवर सावकाराच्या नावावर शेत तीन वर्षांसाठी केले जाते. शेत नावावर करण्यासाठी होणाऱ्या रजिस्टरीचा खर्चही शेतकऱ्याला करावा लागतो. तीन वर्षांत व्याज-मुद्दल एवढे वाढते, की शेतकऱ्याला जमिनीचा ताबा देण्याशिवाय पर्याय राहत नाही. आधीच शेतीचा मालकी हक्क सावकाराकडे गेल्यामुळे बाजारभावापेक्षा कमी किमतीमध्ये शेतीचा सौदा होतो आणि व्याज-मुद्दलानंतर राहिलेले अल्पसे पैसे देऊन जमीन हडप केली जाते. अशा वेळी सावकाराचे वर्चस्व असल्यामुळे, गावात त्याची प्रतिष्ठा असल्याने व इतरांना त्याच्याशी देणेघेणे असल्यामुळे सर्व त्याच्या बाजूने बोलतात. त्यामुळे तो म्हणेल त्या किमतीवर सौदा होतो.

शेतकऱ्यांमधील कर्जबाजारीपणा म्हणजे सुदृढ माणसाला लागलेल्या कॅन्सरसारखा असतो. फारच थोडे या कॅन्सरपासून सुखरूप वाचतात. कर्जामुळे रामरावाच्या संसाराची झालेली वाताहत आठवली की, मन खिन्न तर होतेच पण मानसिक उद्रेकाने मस्तकही गरम होते. मला आजही आठवते, मी खूप लहान असताना रामरावाचे लग्न झाले. नव्या नवरीसह मोठ्या भावापासून वेगळे होऊन त्याने स्वतंत्र बिऱ्हाड मांडले. बाप लहानपणी मेलेल्या या लेकरांनी मग मायला वाटून घेतले. दोघांना पाच एकर शेती वाट्याला आली. सुरुवातीला काही वर्षे नव्यानेच वेगळी शेती करणाऱ्या रामरावाच्या उत्पन्नाचा व खर्चाचा काही ताळमेळ बसत नव्हता. शेवटी त्याने गावातच एका सावकाराकडून व्याजाने थोडे पैसे घेतले. प्रत्येक वर्षी ती कर्जाची रक्कम वाढत होती. रामराव जीवतोड मेहनत करत होता परंतु त्याच्या कोरडवाहू जमिनीतून त्याला पाहिजे तसे उत्पन्न काही मिळत नव्हते. पुढे आई वारली. तिच्या दहाव्याचा खर्च अफाट झाला. आधीच कर्जबाजारी असलेल्या रामरावचा बोजा अजूनच वाढला. कर्जाच्या चिंतेने तो खंगू लागला. सावकार गावातलेच असल्यामुळे ते भुतासारखे त्याच्यामागे लागलेले असत. दरम्यान रामरावाने बँकेकडून कर्ज घेण्याचा प्रयत्न केला, नातेवाईकांकडे हात पसरला. परंतु कुणीही मदत केली नाही. शेवटी त्याला तीन एकर शेती सावकाराकडे गहाण ठेवावी लागली. गहाण ठेवलेली शेती सोडवणे म्हणजे वाघाच्या तोंडातून शेळी सोडवण्यासारखे होते. एकदा सावकाराच्या नावावर जमीन लिहिल्यावर तो म्हणेल तसे वागणे भाग असते. अपेक्षेप्रमाणे रामरावाची शेती सावकाराने गिळंकृत केली. उत्साहात, गाणे म्हणत शेतावर राबणारा रामराव शेतमजूर झाला. त्या एकंदर प्रक्रियेने त्याला किती मानसिक क्लेश झाले असतील याची कल्पना करवत नाही. त्याच्या बोलण्यातील धार कमी झाली, डोळ्यातील चमक नाहीशी झाली व अकाली प्रौढत्व आल्याची जाणीव होऊ लागली. माझ्या गावात अशा रामरावांची कमी नव्हती. बऱ्याचदा त्यांच्याविषयी मनात विचार येई व हा कॅन्सर कसा रोकता येईल याचा विचार मी करत असे.

शेतकऱ्याला वडिलोपार्जित जमीन आपण सांभाळू शकलो नाही याचे शल्य बोचत राहते. त्यामुळे त्याच्या हृदयातील असाहाय्यतेची भावना त्याच्या चेहऱ्यावर झळकते. भकास चेहऱ्याने वावरणाऱ्या या लोकांच्या मनात काय कालवाकालव चाललेली असावी याचा अंदाज न करणेच

बरे!

शेतकऱ्यासाठी त्याचे शेत म्हणजे फक्त जमिनीचा एक तुकडा नसतो, तर त्याचे जीवन असते. पोटच्या पोराला जपावे तसे शेतकरी त्याच्या शेताला जपत असतो. अशावेळी वडिलोपार्जित शेती विकायची पाळी येते तेव्हा त्याची अवस्था आई मेलेल्या वासरासारखी होते. कारण त्याचे सर्व सुख-दु:ख शेतीशी जुळलेले असते .मीही माझ्या शेतावर लहानपणापासून प्रेम करायचो. पावसाळ्यात शेतं फुललेली असतात.  प्रत्येक शेतात वेगवेगळी पिके आनंदाने डोलत असतात. त्यामध्ये बागडण्याची मजा काही औरच असते. साधारणत: पीक निसायच्या आधीची अवस्था मला जास्त आवडते. अशावेळी प्रत्येक शेत नव्या नवरीसारखे सजलेले असते. घरातून निघून पाऊलवाटेने चिखल तुडवत तुडवत, पिकावर हात फिरवत शेतात जाणे म्हणजे माझ्यासाठी अनन्य अनुभव.

हिवाळ्यात त्यामानाने जास्त धांदल असते. एक पीक निघालेले असते व दुसऱ्या पिकाच्या मळणीची तयारी चालू असते. अशावेळी शेतात पिकांना पाणी देण्यात येणारी मजा काही वेगळीच. कांदे, गहू किंवा भाजीपाल्याला विहिरीवर मोटारीने पाणी देण्यात मी दंग होऊन जात असे. दुपारी जेवणामध्ये ज्वारीच्या भाकरीबरोबर हिरव्या मिरचीचा ठेचा व त्यात कांदे किंवा लसणाच्या पातीचा चुरा खाण्याची मजा काही औरच. त्याचबरोबर खिरे(काकडी), मुळा, गाजर, तूर, मूग, चवळीच्या शेंगाची शेतात रेलचेल असे. शेतात काम करताना घालवलेला वेळ खूपच आनंदमय असायचा.

उन्हाळ्यात पिकं त्यामानाने कमी असतात व दुपार उन्हाळलेली असली तरी संध्याकाळ मात्र रम्य असते. संध्याकाळी पश्चिमेला सूर्य मावळताना सगळीकडे चाललेली धावपळ विलोभनीय असते. पक्ष्यांचे थवे चिवचिवाट करत घराकडे निघालेले असतात. बायाबापड्या अंधार व्हायच्या आत गावात शिरण्यासाठी लगबगीने शेतांमधून गावाच्या पायवाटेला लागलेल्या असतात. दुसरीकडे गाई, बैलं मालकांसह घराच्या रस्त्याला लागलेल्या असतात. त्यांच्या घंटांच्या आवाजाने व त्यांच्या चालण्याने उडणाऱ्या धुळीने वातावरण बेधुंद होऊन जाते. अजूनही घरी गेल्यावर, संध्याकाळ व्हायला लागल्यावर, नकळत माझे पाय शेताकडे वळू लागतात.  तो अनुभव परत परत घ्यायची उत्कट इच्छा मनाचा ताबा घेते.

माझ्या गावाच्या स्वभावातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे गावातील प्रत्येक सोम्यागोम्याला पाहिजे असलेले महत्त्व. निवडणूक ग्रामपंचायतीची असो, ठेंगा सोसायटीची असो वा दूध डेअरीची असो, प्रत्येकाला आपण योग्य उमेदवार आहोत असे वाटते. मग भावकीवर गणितं सुरू होणार. आदल्या पंचवार्षिकेला ज्या घरातला उमेदवार असेल त्या घराला त्या वर्षी वगळण्यात येणार, याप्रमाणे ‘ढ ढगाचा’ माहीत नसलेला बापू, तात्या व जिभू याला यात खिरापतीचा वाटा पाहिजे असतो. सहसा हे प्रश्न भावकीत सुटतात व एक ‘बहाद्दर’ उमेदवार भावकीतून रिंगणात येतो. या प्रकारे झालेल्या निवडणुकीत गावामधून कधी तरी लायक उमेदवार निवडून येईल, याची मला अजिबात खात्री वाटत नाही. निवडणुकीनंतर फक्त मेवा खायचा असतो व तो प्रत्येक निवडून आलेल्या सरपंचाचा हक्क असतो, असा सर्वतोपरी समज आहे.

गावात एक महत्त्वाचा लघुउद्योग जोरात चालू असतो, तो म्हणजे ‘ढ’ किंवा  जुगार लावण्याचा. लहानपणी सट्टा म्हणजे काय याचे मला कोडे असायचे. दररोज काही महाभाग आम्हा शाळेत जाणाऱ्या पोरांबरोबर एरंडोलला येणार आणि संध्याकाळी उद्योग आटोपून ते परत

आमच्याबरोबर जाणार असा त्यांचा क्रम असायचा - खूप दिवसांनंतर कळले, ही मंडळी कशासाठी येत होती ते!

मात्र काही बाबतीत गाव वाखाणण्याजोगे आहे. शिक्षण, कुटुंबनियोजन, पाणीपुरवठ्याची सोय या बाबतीत गाव अग्रेसर आहे. गेल्या तीस वर्षांपासून गावची लोकसंख्या जशास तशी आहे. मुलींच्या शिक्षणाबाबत कमालीची अनास्था दिसते. सध्या गावात हायस्कूल झाल्यामुळे परिस्थितीत थोडा बदल घडून आला आहे; परंतु पुढील शिक्षणाची आबाळ आहे. शेतीची कामे करून, लहान भावंडांना सांभाळून वेळ उरलाच तर शिक्षण, असा हिशेब आहे. मायबापही मुलगी दहावी कधी फेल होते याकडे लक्ष ठेवून असतात, शेवटी, दहावीच्या कचाट्यातून सुटल्यास बारावी आहेच! आणि बारावी म्हणजे लग्न करण्यापूर्वीचे भरपूर शिक्षण आहे, असे मायबाप समजतात. चुकून एखादी मुलगी अठरा वर्षे वय ओलांडलेली दिसते. त्या आधीच ती लग्नाच्या बाजारात येते. मुलींच्या शिक्षणाविषयी गावात कमालीची उदासीनता. घरात मुलगा व मुलगी असल्यावर व शिकवण्याची खूप हौस नसल्यावर, निश्चित फक्त मुलालाच शिकवले जाते. मी लहान असताना पाचवीच्या पुढे शिकवणे म्हणजे एरंडोलला पंधरा किलोमीटर पाठवावे लागे. त्यामुळे फारच थोडे लोक मुलींच्या शिक्षणाबद्दल रस घेत. ‘आम्हतापा भराले पैसा नाहीत मग शिकाडीसन काय करून, शेवट दुसरानं धन से का नाही?’ असे म्हणत मुलीला घरी ठेवले जाते. मुलीसुद्धा जीवनाचा प्रवास असाच असतो असे समजून चकार शब्द न काढता गुपचूप घरी राहतात. त्यांना आजूबाजूच्या सर्व मुली दहावी-बारावीनंतर लग्न झालेल्या दिसतात.

सध्या परिस्थिती थोडी बदलली आहे. गावातच हायस्कूल झाल्यामुळे किमान दहावीपर्यंन्त मुली शिकू लागल्या आहेत. कितीही शिकली तरी ‘मुलगी शेवटी परक्याचे धन’ अशा कानपिचक्या लहानपणापासून ऐकणाऱ्या माझ्या गावातील मुलींमध्ये पुढे काही वर्षे तरी स्वत:च्या पायावर उभे राहाणे वगैरे जरा दुरापास्त वाटते. काही श्रीमंत मंडळी वेगळ्या कारणासाठी मुलीला शिकवत असत. कौतिकची परिस्थिती सुद्दढ होती व त्याची मोठी मुलगी मीरा दिसायलाही ठिकठाक होती. तरीही तिचे लग्न जमवायला खूप परिश्रम करावे लागले, कारण मीरा फक्त दुसरीपर्यन्त शिकलेली होती. कौतिकचा हट्ट मात्र चांगल्या नोकरीवाल्या मुलासाठी होता व सर्वच नोकरीवाले नवरे मुल कमी शिक्षणामुळे मीराला नापसंत करत होते. त्यावरून धडा घेऊन कौतिकने त्याच्या लहान मुलीला शिकवण्याचे ठरवले.

गावाच्या पंचायतीची कार्यपद्धत मजेदार आहे. हेव्यादाव्याच्या भावकीतून निवडून आलेले पंच बऱ्याचदा अंगुठाबहाद्दर असतात. पंच झाल्यावर शेंडी ताठ होते व साहेब दिमाखात गावात फिरू लागतात. महाशयांना ग्रामपंचायतीच्या कारभारातला क किंवा ढ सुद्धा समजत नाही. ग्रामपंचायतीचा शिपाई ग्रामसेवकाच्या संगनमताने कारभार पाहत असतो. यामुळे गावात येणारा ग्रामसेवक खूश असतो, कारण सरपंचाची कटकट नसते आणि शिपाई असताना त्याची गरजही नसते.

गाव धार्मिक आहे. मला कळते तेव्हापासून गावात सात दिवसांचा कीर्तनसप्ताह असतो. त्या सात दिवसांत वेगवेगळे कीर्तनकार कीर्तन, प्रवचन देण्यासाठी येतात. कीर्तन ऐकल्याने पुण्य मिळते असा गोड समज! इतर वेळीही एकादशीला गावात भजनाची फेरी निघते. भजनी मंडळींतील सर्वांबद्दल माझ्या मनात आदरयुक्त भावना नेहमी असायची; परंतु मध्यंतरी कळले, की कीर्तनात उभे राहणे ही एक गोष्ट आहे; परंतु जीवनात चांगुलपणा जोपासणे हे खरेच कठीण आहे.

जुगार, खोटेपणा यांपासून ही मंडळीही दूर राहिलेली दिसत नाहीत.

सुगीच्या दिवसांत गावात नेहमी गजबज असते. कुणाला कुणाकडे बघायला वेळ नसतो. प्रत्येक जण लगबगीने इकडून तिकडे धावपळ करत असतो. सुगीचे दिवस निघून गेल्यावर, गाव परत थकलेल्या गायीसारखे शांतपणे रवंथ करताना दिसते. गावाजवळच नदी ओलांडून माहिजी म्हणून गाव आहे. तेथील देवीची यात्रा म्हणजे गावकऱ्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा महत्त्वाचा भाग. यात्रा साधारणत: आठ दिवस चालते. तेथे कंगव्याफणीपासून तर गृहोपयोगाच्या मोठ्यातल्या मोठ्या सामानापर्यंत सर्व मिळते. जत्रेतील जिलेबी विशेष प्रसिद्ध. मी लहान असताना रोज जत्रेत जात असे. जत्रा बघायला म्हणून लांबून लांबून पाहुणे येतात. त्यांचा मुक्काम गावात कोणाकडे ना कोणाकडे असतो. जत्रेत जवळजवळ सर्व रात्री तमाशाचा कार्यक्रम होतो. आजूबाजूच्या दहा गावांतून लोक बैलगाड्या, मोटरसायकली व सायकलींनी तमाशाला गर्दी करतात. मीही बऱ्याचदा बैलगाडीने जाऊन बळजबरीने घुसून, तमाशे बघितले आहेत.

गावात साजरे होणारे सण म्हणजे लोकांच्या सांस्कृतिक जीवनाचा एक अविभाज्य भाग होय. जीवनाचा वेग जरी वाढलेला असला आणि शहरी भागात सण-सणावारांना महत्त्व राहिलेले नसले तरी ग्रामीण भागात अजूनही सण, उत्सव लोकांच्या भावविश्वावर आरूढ आहेत.

माझ्या गावात पोळा, दसरा, कानबाई, गवराई, दिवाळी व आखाजी (अक्षय्य तृतीया) या सणांची मौज काही और आहे. बऱ्याचदा, त्या सणांना गावाबाहेर राहणारी मंडळी गावावर येतात आणि गावात वेगळेच वातावरण तयार होते.

मला लहानपणापासून पोळ्याचे आकर्षण आहे. पावसाळा सुरू झाल्यापासून पोळ्याची प्रतीक्षा सुरू होत असे. पोळ्याच्या दिवशी स्वत:ला नवरदेवासारखे सजवून झाल्यावर गाई व बैल धुण्याचा कार्यक्रम असे. सकाळी सकाळी आम्ही मुले दोन-चार नारळ घेऊन व वडे-भजे याचा प्रसाद खाऊन गणपती, मुंजोबा, खंडोबा, मरीआई यांच्या देवळांवर जाऊन नारळ फोडत असू व नंतर गावभर फिरत असू. दिवसभर पुरणपोळीचा खमखमीत सुगंध घरभर दौडत असे. जेवणानंतर बैलांना बांधायचे दोरखंड, गोंडे व सजवायच्या इतर वस्तूंच्या अवतीभवती आम्ही घुटमळत असू. कुणी कोणता बैल किंवा गोऱ्हा पोळ्यात मिरवायचा याबद्दल संध्याकाळपर्यंत खलबते चालत. आमच्या घरात मोठे बैल नसल्यामुळे माझी डूक अवतीभवती राहत असे. नाहीच कुणाचा बैल मिळाला तर मी घरच्या गोऱ्ह्याला घेऊन मिरवी.

सजलेले बैल संध्याकाळी गावातील दाराजवळ जमत. पोळा फोडण्यासाठी तयार असलेले बैल एका रांगेत उभे राहत व इतर बैल त्यांच्या मागे दाटीवाटीने उभे राहात. बरेचसे बैल भेदरलेले व गोंधळलेले असत. त्यांच्यातले काही विचित्र वागत. एकदा का डफावर थाप पडली की सर्व बैल जोरात पळत. सर्वांत पुढे जो बैल असे त्याने पोळा जिंकलेला असे. त्यानंतर बैल गावभर घरोघरी फिरत व प्रत्येक घरासमोर ओवाळणी स्वीकारत.

पोळ्यानंतर मोठा सण म्हणजे दसरा. दसरा खूप शांतपणे येई. दसऱ्याच्या दिवशी सकाळीच सर्व गुरे-गाडे-सायकली यांची आंघोळ होई, घरासमोर सडा टाकला जाई व शेणाच्या एका राक्षसाची प्रतिष्ठापना केली जाई. त्यानंतर दिवसभर खास असा काही कार्यक्रम राहत नसे. दसरा सुगीच्या दिवसांत येत असल्याने जो तो न्याहारीनंतर शेतात गेलेला असे.

संध्याकाळ मात्र गजबजलेली असे. शेतातून नागली वा ऊसाचे उपटलेले धांडे आणले जात व ते हनुमानाला वा महादेवाला वाहिले जात. त्या बरोबर देवाला चांगल्या हंगामाचे साकडे घातले

जाई. आपट्यांच्या पानांना विशेष महत्त्व येई. गावातील लहानमोठे आपट्याची पाने घेऊन एकमेकाला वाटत व घरोघरी फिरत. पानांना सोने म्हटले जाई. हातात पाने टेकल्यावर व नमस्कार केल्यावर आम्हा मुलांना साखर, गूळ किंवा गोळ्या मिळत. आम्ही ज्या घरात गोळ्या मिळत अशा घरांत सोने वाटायला परत परत जात असू. बैलगाड्यांवर बसून सीमोल्लंघनाला जाण्याची मजा काही औरच असे.

कानबाई व गवराई हे फक्त खानदेशात साजरे होणारे मुलींचे सण. कानबाई म्हणजे पार्वती. तिची प्रतिष्ठापना गावातील एखाद्या घरी केली जाई तर गवराईच्या लहान लहान मूर्ती मात्र प्रत्येक घरात मांडल्या जात. मुलींचा एक घोळका हातात टिपऱ्या घेऊन रोज संध्याकाळी घरात गवराईचे गाणे म्हणत असे. त्यावेळीही प्रत्येक दिवशी प्रत्येक घरात प्रसाद वाटला जाई. आम्ही मुले प्रसाद खाण्यासाठी मुलींमध्ये उगाच लुडबुड करत असू. एका विशिष्ट दिवशी कानबाई व गवराई यांचे विसर्जन होत असे. कानबाई विसर्जनाच्या मिरवणुकीत दोन मुलींना राधा, कृष्ण म्हणून सजवले जाई.

भर उन्हाळ्यात येणारी आखाजी म्हणजे अक्षय्य तृतीया हा खानदेशातील सर्वात मोठा सण. त्या सणाला सासुरवासिनी माहेरी येतात व बाहेर राहणारी घरातील मंडळी घरी येतात. सगळीकडे चैतन्याचे वातावरण पसरते. जवळजवळ प्रत्येक घरी पुरणाची पोळी बनवली जाते. कामकरी माणसांचे वर्ष सुरू होते. शेतीचे व्यवहार त्या दिवसापासून कार्यान्वित होतात. प्रत्येक घरासमोर झोके बांधले जातात. माहेरी आलेल्या माहेरवासिनी, तरुण मुली झोक्यावर बसून गाणी म्हणतात. आम्ही मुले मात्र त्या दिवशी तहानभूक विसरून पत्ते खेळत असू.

त्याशिवाय गणपती उत्सव व दिवाळी. आमच्या संपूर्ण गावात फक्त एक गणपती बसत असे. गावात प्रत्येक घरातून वर्गणी जमा करून गणपतीवर खर्च होत असे. सात दिवसांतील एक-दोन दिवस, आजूबाजूच्या एखाद्या गावातून आलेल्या मंडळींचे नाटक होत असे. गावातील मुलेही कधीकधी नाटक बसवत असू. नाटकात स्त्रीचे काम करणाऱ्या मुलाला पुढे आम्ही कित्येक दिवस त्या नावाने चिडवत असू. एक दिवस कीर्तन, एक दिवस भजन व उरलेल्या दिवशी व्हिडिओ आणला जाऊन सिनेमे! अशा प्रकारे, सात दिवस गणपतीची करमणूक झाल्यावर वाजत-गाजत त्याला पाराजवळच्या विहिरीत विसर्जित केले जाई.

लहानपणी एकदा, मी चिखलापासून गणपती तयार केला होता. त्याला सुकवून व रंगवून घरात एका कोपऱ्यात बसवला होता. त्याच्या आजूबाजूची जागाही मी छान सजवली आणि रोज स्वत: आरती करू लागलो. माझा उपद्व्याप बघून घरातील मंडळीही सहभागी होऊ लागली. पुढच्या वर्षी, मला मातीचा गणपती करावा लागला नाही; वडिलांनी गणपती विकतच आणला व पुढे ती परंपरा अखंड चालू राहिली.

दिवाळीची तीव्रता हंगामावर अवलंबून राहत असे. ज्या घरात चांगले उत्पन्न झालेले असे अशा घरात जास्त फटाके वाजत. ज्या घरातील उत्पन्न जेमतेम असे अशा घरातील मुले लहान तोंडे करून फटाके फोडणाऱ्या मुलांची गंमत बघत.

सणांव्यतिरिक्त गावकऱ्यांना करमणुकीचे साधन म्हणजे अधूनमधून होणारे डोंबाऱ्याचे खेळ वा गावाला भेट देणारी नाटक कंपनी. आम्ही लहान मुले त्या संधीचा पुरेपूर उपभोग घेत असू. गावात होणारे लग्न, साखरपुडा म्हणजे सर्व गावाच्या सामाजिक जीवनाचा महत्त्वाचा भाग. लग्न होण्याच्या आठ दिवस आधी गावात चर्चा होत असे व लग्न झाल्यावरही काही दिवस ते घर चर्चेचा

केंद्रबिंदू राही. यामुळे कुणाचे लग्न होत आहे, कुणाचे होत नाही, कोणत्या सासू-सुनेचे जमत नाही, कुणाच्या घरात भांडण चालते यांसारख्या गोष्टी वाऱ्याप्रमाणे गावात पसरत व रिकाम्या वेळेत शेतात, हगणवटीवर, पारावर त्यांचा चघळून चघळून चोथा केला जाई. त्यामुळे एखादी लहान गोष्टही गावकऱ्यांपासून लपवणे अवघड होई.

मला आठवते तसे गावात एक भगत घुमायचा. कार्तिक महिन्यात सात दिवसासाठी घुमण्याचा विशेष उत्सव होत असे. या सात दिवसांत उंच बांबूची एक काठी भगताच्या घरासमोर उभारलेली असे. काठीला वेगवेगळ्या रंगाचे कापडं गुंडाळलेली असत व काठीच्या एका टोकाला मोरपिसांचा जुडा व एक लाल दोन त्रिकोणाचा झेंडा बांधलेला असे. सप्ताहातील प्रत्येक दिवशी संध्याकाळी भगताच्या अंगात देव संचारे व तो किंचाळून नाचायला लागे. विशिष्ट वाद्यांच्या तालावर भगत ठेका घेई व विशिष्ट गाण्याच्या चालीवर नाची. मग आजारी माणसांना त्याच्यासमोर आणले जाई. काही मंत्र पुटपुटत तो आजारी माणसांच्या कपाळावर राख लावी व त्याच्या अंगावर मोरपिसांनी बनलेल्या झाडूसारख्या खोच्याने स्पर्श करी. बऱ्याचदा कुणाच्या घरात चोरी झालेली असली तर ते भगतासमोर गुढी ठेवत असत. भगत मंत्र उच्चारून कुणी चोरी केली याविषयी काही निर्देशक खाणाखुणा सांगत असे. सातव्या दिवशी शेवटी गावात मोठी मिरवणुक निघे. देवाला एका बोकडाचा बळी दिला जाई व त्याची मेजवानी होई. भगताच्या मंत्रांनी काहींची प्रकृती बरी झाल्याचे किस्से गावात नेहमी चघळले जात. या भगताच्या अंगात येणाऱ्या देवाचे नाव चांग्यापांग्या असे होते. पुढे मी कधीच असल्या देवाचे नाव ऐकले नाही. भगताबरोबर घुमण्याचा प्रकार गावातून तात्पुरता नाहीसा झाला.

माझ्या आजोळी असेच एक पिरोबाचे स्थान होते. त्याला बाबादेव असे म्हणत. तेथेही एक भगतिन प्रत्येक रविवारी घुमत असे. खूप लांबून आजार व इतर समस्या घेऊन लोक चारचाकीने किंवा बैलगाडीने त्याठिकाणी गर्दी करत. माझी एक जवळची आजारी आजी बाबादेवपुढे गुढी म्हणून बसली होती. भगतिणेच्या म्हणण्याप्रमाणे आजी लवकरच बरी होणार होती. परंतु पुढे एका आठवड्याच्या आतच आजी वारली. त्या घटनेचा पडसाद माझ्या मनावर कायमचा कोरला गेला. त्यामुळे पुढे कधीही भगतांवर माझा विश्वास बसला नाही.

माझे गाव डॉक्टरांसाठीही वरदान आहे. ज्या कुणा डॉक्टराचा दवाखाना इतर कुठे चालत नसला तर त्याचा दवाखाना माझ्या गावात निश्चित चालतो. डॉक्टर होण्यासाठी पदवीचीही गरज नसते. एखाद्या डॉक्टरच्या हाताखाली कंपांऊण्डर म्हणून जरी काम केले तरी तो गावात डॉक्टरकी करायला पात्र ठरतो. त्या डॉक्टराकडून बरे होण्याऐवजी निश्चितच दुखणे वाढले म्हणून समजा. एक डॉक्टर सलाईन देण्यासाठी नावाजलेला होता. त्याचे नावच लोकांनी सलाईन डॉक्टर म्हणून ठेवलेले होते. डॉक्टर कितीही वाईट अवस्थेत दवाखाना सुरू करत असला तरी वर्षभरात तो मोटरसायकल उडवत असणार हे निश्चित.

असे माझे गाव पंचक्रोशीत असून नसल्यासारखे. चांगल्या कामासाठी तर नाहीच; परंतु वाईट कामासाठीसुद्धा ते कधी लोकांच्या नजरेसमोर येत नसे. गावाचा हा स्वभाव गावातील प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वात पूर्णपणे भिनलेला आहे.

## लहानपणा देगा देवा

जसे माझे गाव तसे माझे घर. कधी-कुणाच्या अध्यात नाही की मध्यात नाही. आमचा परिवार दोन बिघ्यांत कसा उदरनिर्वाह भागवतो, याचे गावाला कुतूहल. माझी माऊली म्हणजे आई, जिला आम्ही ‘ताई’ म्हणतो - तिचा गावभर दरारा. सरळमार्गी, प्रामाणिक, सोज्वळ स्त्री. तिला खोटे बोलणे, चुगली करणे, आळस या गोष्टींची अतिशय चीड. तिच्या रगारगात स्वाभिमान भरलेला. त्यामुळे तिच्याबद्दल गल्लीतल्या स्त्रियांमध्ये आदरयुक्त भीती, मी नेहमी पाहिली आहे.

ताईचा जन्म भुसावळमध्ये एका मजूर कुटुंबात झाला. आजोबा रेल्वेमध्ये कामाला जात होते. ताई तशी एकटीच बहिण व तिला तीन मोठे व एक लहान भाऊ. घरातील सर्वजण मजूर म्हणून काम करत. ताईची माय म्हणजे माझी आजी रोज दगड फोडायला जाई. तिला मोठे दोघे मुलं मदत करत. ताई लहान असल्यामुळे शाळेत जाई व लहान भावाला सांभाळी. पुढे लहान भावाला सांभाळण्यासाठी तिला तिची शाळा कायमची सोडावी लागली. शाळा सोडताना ती हुशार असल्यामुळे शिक्षकांनी आजोबांजवळ कसा हट्ट धरला होता याविषयी ताई कधीकधी आम्हाला सांगते. तापी नदीला आलेल्या पुरात आजोबांचे बिऱ्हाड वाहून गेले व त्यांनी भुसावळ सोडले. पोटासाठी वणवण भटकल्यावर ते कुरंगी नावाच्या गावात स्थिरावले. पुढे वयाच्या पंधराव्या वर्षीच ताईचे लग्न तिच्या मामांनी ठरवून दिले. दरम्यान ताईचे सारे भाऊ घराचे ओझे पेलण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी कामधंद्यासाठी निघून गेले. खूप लहानपणीच त्यांनी घर सोडल्यामुळे व पैसा बघितल्यामुळे भावाभावांमध्ये कधीच एकमेकांविषयी प्रेम राहिले नाही. मोठा भाऊ पुण्याजवळ स्थायिक झाला व त्याच्याच विश्वात रममाण झाला. मधलाही भाऊ पुण्यात वेगळा राहू लागला. पुढे काही कारणाने त्याने घर सोडले व बायको-परिवाराला पूर्णत: सोडून कुठेतरी निघून गेला. अजूनही त्याचा पत्ता लागलेला नाही. इतर दोघेही भाऊ छोटेमोठे काम करू लागले. पुढे आजोबांचे डोळे गेले तसे आजीने घराची सूत्रे स्वत:कडे घेतली. मोठ्या हिमतीने मोलमजुरी करून, शेती करून स्वाभिमानाने व हिमतीने संसार केला. आजीचे हे सारे गुण जसेच्या तसे ताईमध्ये बघायला मिळतात. इतर मुले घराबद्दल थोडे बेफिकीर असल्यामुळे ताई व आजी एकमेकांच्या खूप जवळच्या होत्या.

ताईच्या लग्नाचा किस्सा खूप विचित्र आहे. आजोबांचे घोंगडे फाटके असले तरी ताईच्या मामाची परिस्थिती चांगली होती. ताईच्या लग्नाची सर्व जबाबदारी त्यांनी घेतली. कुठूनतरी अण्णांचे स्थळ त्यांच्याकडे आले. मुलगा एकटा आहे, भरपूर शिकत आहे व भरपूर जमीन आहे या हिशोबाने स्थळ पसंत झाले होते. मामा बघायला गेले असताना जमिनीविषयीचा खोटा आकडा त्यांना सांगण्यात आला. त्याला भुरळ पडून स्थळ पास करण्यात आले होते. ताई बऱ्याचदा बोलताना या गोष्टीचा उल्लेख करी. आपली शाळा सुटली नसती व संपत्तीचे खोटे गणित लग्नामध्ये दाखवले गेले नसते, तर आयुष्य वेगळ्या वळणावर असते असे तिला वाटे.

पुढे आजोबा वारल्यानंतर आजी एकटीच राहू लागली. ताई जवळच्याच गावात राहात असल्यामुळे दोघींना एकमेकींचा आधार होता. ताईचे लग्न झाल्यावर खरी परिस्थिती उजेडात आली. घरात काही नाही. कमी शेती, त्यातली काही विकलेली तर काही गहाण, राहिलेल्या संपत्तीवर काही लोकांचा डोळा. या सर्व प्रकारामुळे ताईवर खूप लहान वयातच खूप मोठी जबाबदारी पडली. ताईने आजीच्या मदतीने सर्वांना तोंड देत स्वत:चा संसार उभा केला. पुढे

दहावीनंतर अण्णांना लांब नोकरी लागली. अशावेळी नोकरीचे ठिकाण व घर यामध्ये ताईची कसरत चालू राहिली.

ताईच्या व आजीच्या सलगीमुळे भावाभावांमध्ये वितुष्ट निर्माण झाले. आई मुलीला घबाड देते असा आरोप करून मोठे दोन मामा आजीशी भांडू लागले. आजीच्या स्वाभिमानाला यामुळे ठेच पोहोचली व ती मुलांपासून कायमची दूर झाली. ताईचेही याच कारणांमुळे मोठ्या भावांशी बिनसले. आजही त्यांच्यातील बहीणभावाचे नाते तुटल्यासारखे आहे.

जेव्हापासून मला कळू लागले तेव्हापासून मी ताई-अण्णांची कुटुंबासाठी चाललेली धडपड जवळून पाहिली आहे. आजोबा वारल्यानंतर वडील लांबची नोकरी सोडून घरी आले आणि त्यांच्या संसाराला ग्रहण लागले; पण कोरडवाहू शेती, दागिने विकून विहिरीवर मोटार बसवण्यात आली. ताई-अण्णा, दोघे शिंप्याचे काम शिकले आणि कुटुंबात आम्हाला दोन वेळची भाकरी व्यवस्थित मिळू लागली.

आमचे अण्णा, म्हणजे माझे वडील. खूपच सरळ स्वभावाचे; शीघ्रकोपी, देवावर विश्वास ठेवणारे; पण गावात ते लोकांसाठी नसल्यासारखे असतात. लहान वयात त्यांची आई गेल्याने त्यांची जडणघडण वेगळ्या पद्धतीने झाल्याची जाणीव होते. ‘तो अण्णा का हो भलता देवमाणूस से हो!’ अशी त्यांच्याबद्दलची प्रतिक्रिया. घरात मात्र वातावरण वेगळे असायचे. अण्णा शब्दाशब्दाला चिडणार. त्यामुळे घरातील तापमान नेहमी जास्त; मात्र आई तेवढीच शांत.

माझी आजी, म्हणजे अण्णांची आई, खूप आजारी असे. त्यांना बरीच मुलं होऊन मेली होती. फक्त नवसाचा एक मुलगा व मुलगी काय ते वाचले. तिच्या आजारपणामुळे अण्णांना लहानपणापासून आत्याकडे गिरडला ठेवलेले होते. अशातच अण्णा आठवीत असतांना आजी वारली. आजीच्या आजारपणात बराच पैसा खर्च झाला. त्यामुळे बरीच शेती विकावी लागली. आजोबा खूपच भोळसट असल्यामुळे त्यांना जेव्हा पाहिजे तेव्हा थोडी मदत करण्यात आली व शेवटी काही हिशोब न लावता त्यांच्या जमिनीचा ताबा घेण्यात आला. लग्नाच्या निमित्ताने बघायला आलेल्या पाहुण्यांना सुरुवातीला जेवढी जमीन होती तेवढी दाखवण्यात आली.

आण्णांच्या बालपणातील एकदंर वाताहतीचा परिणाम त्यांच्या स्वभावावर स्पष्ट दिसून येतो. मनातील नेहमी असुरक्षिततेची भावना, स्वत:च्या क्षमतेविषयी उगाच अविश्वास, जवळच्या नातेवाईकांविषयी थोडे बेफिकीर वागणे यासारख्या त्यांच्या काही स्वभावगुणांमध्ये बालपणीच्या जडणघडीचा पडसाद दिसतो. दहावीनंतर आय टी आय चा कोर्स करून ते कोयना पॉवरहाऊसला फिटर म्हणून लागले होते. आजोबा असेपर्यंत काही वर्षे त्यांनी तिथे संसार थाटला. परंतु आजोबा गावाला, मामा पुण्याला अशा परिस्थितित पुण्यात टेल्कोमध्ये काम मिळेल या आशेवर मामाच्या सांगण्यावरून त्यांनी नोकरी सोडली व पुण्यात टेल्कोत नोकरी पत्करली. या दरम्यान पंचाहत्तरच्या आणीबाणीत टेल्कोने बऱ्याच लोकांना कामावरून काढले. त्यात आण्णांचाही नंबर लागला. पुणे नवीन, त्यात चांगली नोकरी सोडून पुण्याला आले व लगेचच विचित्र परिस्थितीचा सामना करावा लागला यामुळे त्यांचा आत्मविश्वास डळमळला. काही दिवस वेगवेगळ्या कंपन्यामध्ये त्यांनी अर्ज केले पण काही उपयोग झाला नाही. पुढे मामांनाही त्यांची अडचण होऊ लागली. शेवटी कंटाळून त्यांनी गावाचा रस्ता धरला.

त्यांच्या स्वभावात एक विचित्र गोष्ट आहे. कोणत्याही नवीन गोष्टीला सामोरे जाताना त्यांना नेहमी भीती वाटते. हिंमत, चातुर्य, झोकून द्यायची त्यांची प्रवृत्ती नाही. त्यामुळे पुण्यासारख्या

भरभराटीच्या जागेला सोडून, गावात काही संपत्ती नसताना व त्यांच्या क्षमतेला कोणताही वाव नसताना त्यांनी गावाकडे यायचा निर्णय घेतला. त्यांच्या या स्वभावगुणांना लहानपणापासून पाहिल्याने व त्याच्या झळा संपूर्ण परिवाराला भोगाव्या लागल्यामुळे मी जास्तच धीट झालो व त्या प्रवृत्तीचा शत्रू बनलो. ते परिस्थितीपुढे नतमस्तक होत राहिले तर मी परिस्थितीला आपले वाहन करून त्यावर आरूढ व्हायला शिकलो.

प्रत्येक कामाविषयी अण्णांची प्रतिक्रिया नकारात्मक असे. ताई म्हणजे आई. तिला जगाकडे सकारात्मक बघण्यात स्वारस्य होते. त्यामुळे बऱ्याचदा, तिच्या म्हणण्याप्रमाणे घडायचे. आर्थिक अडचणींमुळे ताई-अण्णांच्या आयुष्यात नेहमी तणाव असायचा. अण्णा नेहमी पैशांविषयी विचार करणार. त्यामुळे त्यांना रात्र-रात्र झोप नसायची. ताई-अण्णांच्या संस्कारामुळे आम्हा चौघा भावंडांना कष्ट करण्याची सवय लागली. ताईने आयुष्यात कधी स्वत:चा बांध ओलांडून दुसऱ्याच्या बांधावरील वस्तू घेतली नाही. तिचे ‘अंथरूण तेवढे पाय पसरा’ म्हणणे आमच्या हृदयावर शिलालेखासारखे कोरले गेले.

मी अगदी लहान असल्यापासून ताई, माझी अक्का (म्हणजे मोठी बहीण) मोलमजुरी करायच्या. रात्री बसून ताई उशिरापर्यंत कपडे शिवायची आणि अण्णा शेताकडे बघायचे. त्यामुळे तसे बघता, आम्ही खाऊनपिऊन सुखी होतो. शाळेतून आल्यावर कोंबड्या आणि बकऱ्यांकडे बघण्याचे काम माझ्याकडे असायचे. माझा दिनक्रम शिवून झालेले कपडे देणे, छोट्यामोठ्या कामात अण्णांना मदत करणे, असा असायचा. मीच माझ्या पाठीवरच्या दोघी बहिणी उषा व प्रतिभा यांना सांभाळायचे कामही करायचो. आजही आठवते, की लग्नसराईत ताईकडे शिवण्याचे काम खूप असायचे. गावात फक्त ताई चोळी शिवत असल्यामुळे सर्व म्हाताऱ्या ताईकडे यायच्या. अक्का ही ताईची डुप्लिकेट कॉपी होती. ती अगदी लहानपणापासून शाळा करतानाच दुसऱ्याच्या शेतात कामाला जायला लागली. ती सर्वांसाठी रांधायची. त्यामुळे तिचा आई-वडिलांना मोठा आधार होता. पुढे, ती शेतातील भाजीपाला शेजारच्या भातखेडे गावात विकायला जायची. प्रत्येक पैशाचा हिशोब चोख ठेवायची; वेळ मिळालाच तर कपडेही शिवायची. या सर्व गुणांमुळे ती सर्वांची लाडकी होती. सर्वजण तिच्या कामाची तारीफ करायचे.

माझे मात्र उलटे होते. मी ताई-अण्णांच्या उपयोगाला येण्याऐवजी त्यांच्या डोक्याची ब्याद जास्त ठरलो. लहानपणापासून भरपूर खेळायचो, हुंदडायचो, भिल्लांच्या पोरांमध्ये मासे धरायला जायचो तर महारांच्या पोरात ‘बधीटाक’ खेळायचो. माझे घरातील कोणत्याही गोष्टीकडे लक्ष नसायचे. दिवसभर खेळून दमल्यावर घर गाठायचे. असे प्रत्येक दिवशी चालायचे. मीही तसाच काम करायला मागे नव्हतो; किंबहुना, घरात काम करणे खूप गरजेचे होते.

माझे पहिले काम मला स्पष्ट आठवते. मी आठ-नऊ वर्षांचा असेन. दिवाळीच्या आसपास कापूस वेचणीची गडबड चालत असे. अशावेळी मजूर मिळणे दुरापास्त होई. अशावेळी शाळेतल्या मुलांनाही कामावर लावले जाई. आक्का खूप लहान असल्यापासून कापूस वेचीत असे. त्यावर्षी मजुराची एका दिवसाची मजुरी चार रुपये होती. नुकतीच दिवाळीची सुटी लागली होती. आपणही कापूस वेचू शकतो याची मला खात्री होती व कामावर जाऊन दोन रुपये कमवण्याची इच्छा झाली होती. माधवजि भाऊच्या घरचा वखा सर्वप्रथम आला. माझ्या काम करण्याला त्यांनी रजामंदी दाखवली व माझ्या कामाचा श्रीगणेशा झाला. कापूस वेचण्याची गंमत काही औरच होती. कापसामध्ये बऱ्याचदा ओळीने तूर लावलेली असे, शेतभर खिऱ्याचे वेल पसलेले असत किंवा

बांधावर बोरांची झाडे असत. त्यामुळे दिवसभर तुरीच्या शेंगा, बोरे यावर ताव मारणे चालू राहत असे. मोठ्या माणसांना दोन ओळी, लहान मुलांना एक ओळ याप्रमाणे हिशोब होता. त्यामुळे आपल्या ओळीचा कापूस भराभर वेचून उरलेल्या वेळात हा उपद्व्याप चालत असे. बऱ्याचदा बरोबरची मुलेही वेचायला असल्यावर त्यांच्याबरोबर गाणे, गोष्टी व कधीकधी भांडणामध्ये वेळ कुठे निघून जाई याचा पत्ताही लागत नसे.

शेतात दिवसभर वेगवेगळ्या विषयांवर गप्पा चालत. सासुरवाशिणीला शेताचे काम म्हणजे घरातील जाचापासून तात्पुरती सुटका वाटत असे. काही सुना त्यांना सासूकडून होणाऱ्या जाचाविषयी मन मोकळे करत. नणंद, नवरा व इतर यांच्यामुळे होणाऱ्या त्रासाविषयी सांगत. खाण्यापिण्यापासून देण्याघेण्यापर्यंत होणारा दुजाभाव,माहेरच्यांची सासरी होणारी हेटाळणी, हुंड्यावरून टोचून बोलणे इत्यादी अनेक विषय चर्चेचा भाग होई. कधीकधी माहेरी असलेल्या समस्येविषयी सासुरवाशिणी चिंता व्यक्त करत. लग्नाला एक दोन वर्षे झालेल्या सासुरवाशिणीत या प्रकारच्या समस्या जास्त असत. कधीतरी सासऱ्याच्या किंवा दिराच्या वाईट नजरेपासून ते रात्री एकत्र येण्यासाठी होणाऱ्या विघ्नांविषयी त्या बोलत. असे विषय असल्यावर बाया हळू आवाजात एकमेकांजवळ पुटपुटत. शेतातही ज्या बायकांच्या माहेरची परिस्थिती बरी असे, त्या नेहमी माहेरचे गुणगाण करत व नेहमी तोऱ्यात राहात.

मला आठवते माझी एक लांबची वहिनी. बऱ्याचदा आमच्या घोळक्याबरोबर कामाला येत असे. तिचा नवरा जवळजवळ रोजच तिला मारीत असे. कधी स्वयंपाक चांगला झाला नाही म्हणून तर, कधी उगाच तिच्यावर संशय घेऊन तिला मनसोक्त मारीत असे. बऱ्याचदा ती सुजलेल्या ओठाने, किंवा रक्तबंबाळ डोक्याने कामावर येत असे. शेतात सर्वांसमोर तिला खूप रडू येई. पुढेपुढे तिने रडणेही बंद केले. तिचा नवरा उद्धट व दांडकट असल्यामुळे कुणी त्याच्या नादी लागत नसे. आता तिची मुले मोठी झाली आहेत. बापाने गुरगुर करताच, मुले आईच्या रक्षणासाठी त्याच्यावर धावून जातात.

घोळक्यात कधीकधी म्हाताऱ्याही असत. त्यांची तक्रार त्यांच्या सुनांविषयी असे. खायचा दुजाभाव, म्हातारीच्या आजाराकडे केलेले दुर्लक्ष, आडवेतिडवे बोलणे यामुळे दुखावलेल्या म्हाताऱ्या बऱ्याचदा रडून आपले मन मोकळे करीत. त्याचबरोबर आपापसातील वाद शेतात चव्हाट्यावर येत व परिस्थिती हमरीतुमरीवर येई. अशा सर्व गमतीजमतींमुळे शेतात काम करणे खूप सुखकर वाटे.

या कामांच्या पैशातून दिवाळीच्या सुट्टीत कपडे आणि आखाजीच्या (अक्षय तृतीया) सुट्टीत पुस्तकांची व्यवस्था होत असे. मधल्या काळात अक्काबरोबर तिला भाजीपाला विकण्यासाठी मी सकाळी सामील होत असे. रात्री कधीतरी अण्णांबरोबर पाणी द्यायला शेतात जात असे. शिवाय, शेतातले काही महत्त्वाचे काम असले की, आम्हाला शाळा बुडवून शेताचा रस्ता धरावा लागे.

मी बऱ्याचदा सकाळी उठून अक्काबरोबर भाजीपाला विकायला जाई. मला त्या गोष्टीचा खूप कंटाळा येत असे. सकाळच्या गाढ झोपेतून मला दामटावून उठवले जाई. सूर्य उगवायच्या आत, आम्ही भातखेड्यात पोचत असू. एखाद्या दिवशी उशीर झाल्यास आमच्या विक्रीवर त्याचा परिणाम होत असे, कारण सकाळी सकाळीच लोकांचा कालवणाबद्दल निर्णय झालेला असे. न जाण्याचा बहाणा मी नेहमी शोधत असे. थंडीच्या दिवसांत तर बऱ्याचदा नकोसे होई. मी रडकुंडीला येत असे. परंतु मला त्या कामापासून कधी सुटका मिळाली नाही.

असेच काहीसे अण्णांबरोबर रात्री शेतात जाण्याबद्दल होत असे. विहिरीला जास्त पाणी नसल्यामुळे आणि भरपूर भागीदार असल्यामुळे बऱ्याचदा पिकाला रात्री पाणी द्यावे लागे. अशा वेळी फक्त मला अण्णांबरोबर जावे लागे. शेतात पोचल्यावर मी लागलीच गोधडीवर आडवा होई. मध्यरात्री कधीतरी जेव्हा विहिरीचे पाणी संपे तेव्हा अण्णा मला उठवत व आम्ही घरी येत असू, पण माझी पुन्हा झोपमोड होई. मला या सर्व उपद्व्यापाचा भारी कंटाळा येई, पण अण्णांपुढे बोलायची हिंमत होत नसे.

गावात मी एक उनाड, बंड मुलगा म्हणून प्रसिद्ध होतो. नेहमी काहीतरी खोड्या करणार, घरी भांडण आणणार. अनेकदा, सर्वजण शेतात गेल्याने संध्याकाळी कोंबड्या-बकऱ्यांची व्यवस्था माझ्याकडे असायची; परंतु बऱ्याचदा, मी खेळण्यात दंग राहायचो किंवा गावातील एकच अशा टीव्हीवर शनिवारी किंवा रविवारचा सिनेमा बघत बसलेला असायचो. अशीच एकदा शेतात ज्वारी कापली जात होती. शनिवारची शाळा असल्याने, मी शाळेतून लवकर घरी आलो होतो. त्या दिवशी कोंबड्या- बकऱ्यांची जबाबदारी माझ्यावर होती आणि मी मात्र अशोकतात्याच्या घरात टीव्हीवर सिनेमा बघण्यात गर्क होतो. साडेसात वाजता जेव्हा मी घरात आलो तेव्हा अंधार झालेला होता. कोंबड्या दाराजवळ जमा होऊन चिवचिवाट करत होत्या, त्या संधीचा फायदा घेऊन मांजराने दोन कोंबड्या फस्त केल्या. त्यानंतर आई घरी आल्यानंतर माझी काय बडवणूक झाली म्हणून सांगता!

मला खेळण्याचा नाद होता. क्रिकेट, कबड्डी, गोट्या, विटीदांडू, सूरपारंब्या, पत्ते हे सारे माझे आवडते खेळ होते.

क्रिकेटमध्ये मी चांगलाच रमत असे. माझ्या गावात माझ्या मित्रांबरोबर क्रिकेट चाले. आम्ही तासन् तास क्रिकेट खेळत असू. प्रत्येकाच्या घरातील लोकांच्या डोक्याला हा ताप होता. खेळून आयुष्यात काहीच मिळू शकत नाही असा सर्वसाधारण समज होता. आम्ही लाकडाच्या फळीने खेळत असू. ती आमची बॅट, हा ताईचा रागाचा विषय असे. चुकून बॅट घरात आलीच तर मला नकळत, ती चुलीत जात असे. त्यामुळे चुकूनही, कोणी बॅट माझ्या घरी ठेवत नसे.

चिलीपाटी हा कबड्डी, हुतूतू या प्रकारचा खानदेशातील ग्रामीण भागात खेळला जाणारा खेळ आहे. त्यात एका पक्षातील सर्व मुले सरळ रेखाटलेल्या एका रेषेत उभी राहतात. विरुद्ध पक्षाची मुले रेषेच्या दुसऱ्या बाजूला असतात. त्यांच्यातला चुणचुणीत व चपळ मुलगा चिली बनलेला असतो. त्यांचा पूर्ण खटाटोप चिलीला एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे नेण्याचा असतो. चिलीने साईड बदलली म्हणजे डाव संपतो.

कधीकधी मलाही चिली होण्याची संधी मिळे, परंतु मी चिली म्हणून तेवढा यशस्वी होत नसे. विलास नावाचा आमचा सवंगडी चिली होण्यासाठी प्रसिद्ध होता. तो बुटका व चपळ असल्याने प्रतिस्पर्ध्यांची झुंज चालू असताना नकळत चपळाईने रेषा पार करत असे. त्याची चपळता वाखाणण्याजोगी होती. खेळता खेळता, बऱ्याचदा भांडणही होई. कारण प्रतिस्पर्ध्याला रेषेवरून हलवण्यासाठी एखाद्याला हात धरून किंवा पाय धरून ओढावे लागे, उभ्या असलेल्या प्रतिस्पर्ध्याला जोरात ढकलावे लागे. त्यामुळे कधीकधी, काही महाभागांचा हातपाय दुखावला जाई व त्यावरून शिवीगाळ सुरू होई. सध्या क्रिकेटसारखे खेळ पुढे आल्याने चिलीपाटी खेड्यापाड्यात आपले अस्तित्व टिकवण्यासाठी झगडताना दिसतो.

विटीदांडू व गोट्या हे प्रामुख्याने सर्व थरात खेळले जाणारे खेळ, कारण यात काही फारसा

खर्च नसतो व कमीतकमी गड्यांमध्ये हे खेळ खेळले जातात. खूप लहानपणापासून मी या दोन्ही खेळात पटाईत होतो. विटीदांडूमध्ये जेवढे खेळाडू असायचे तेवढ्यांना दोन गटात विभागण्यात येई. मग एक गट गुण करणार, यात त्या गटाचा प्रत्येक सदस्य बधिमधून विटी कोलणार, जर कोललेली विटी वरच्या वर झेलली गेली किंवा पडलेल्या ठिकाणावरून मारल्यावर दांडूला लागली तर तो सदस्य बाद होत असे. परत फेकलेल्या विटीला खेळणारा सदस्य हळूच उंचावून मारत असे. जेवढ्या दूर अंतरावर विटी जाईल ते आंतर दांडूच्या स्वरूपात अनुमानाने मोजले जाई. अशाप्रकारे जर सर्व खेळांडूचे मिळून दांडूचे गुण, निर्धारित गुणांपेक्षा जास्त झाले तर तो संघ विजयी होई. हरलेला संघ मग डाव चुकवत असे. विजयी संघातील खेळाडू, एका पाठोपाठ एक खेळाडू, एकेकदा करून विटीला मारत व शक्य तेवढ्या दूर पाठवत. हरलेल्या संघातील एकेक खेळाडू कबड्डी कबड्डी म्हणत एका दमात एकानंतर एक मिळून बधिपर्यंत येण्याचा प्रयत्न करीत. जर बधीपर्यंत येण्यापूर्वीच त्यांचा दम संपल्यास परत डाव द्यावा लागत असे. अन्यथा परत खेळ सुरू होत असे. या खेळात बऱ्याच ठिकाणी खोटे बोलायला व संशय घ्यायला जागा आहे. साधारणत: कबड्डी कबड्डी म्हणताना श्वास सोडला किंवा नाही यावरून बऱ्याचदा वाद होत असे. कधीकधी दोन गटात मारामाऱ्या, शिवीगाळ होई व प्रकरण घरापर्यंतही जाई. बऱ्याचदा खेळता खेळता, काही धुरंधर डाव आपल्याविरुद्ध जायला लागला की कोणत्याही कारणाने पोबारा करत आणि मग वाद निर्माण होई. माझ्या घरी मात्र मार्शल लॉ लागलेला असे. चुकून जर विटीदांडू कुठे घरात आढळला तर चुलीत तो एखाद्या भाकरीच्या नावाने शहीद होत असे.

विटीदांडूच्या मानाने गोट्यांचा खेळ तसा खूप किचकट. त्यातही माझा नेम चांगला होता. यामुळे माझ्याकडे गोट्यांचा खूप संग्रह होई व त्यांना सांभाळणे दुरापास्त होई. लहानपणी मला आठवते, गावात काही विशिष्ट मुलेच खेळत. इतर बरीच मुले कधीही घराचा दरवाजा ओलांडत नसत. अशा मुलांबद्दल त्यांचे आई-वडिल व इतरही लोक खूप कौतुक करत. पुढे ही मुले जशी होती तशीच राहिली. कुठेही म्हणण्यासारखे काहीच करु शकली नाहीत. लहानपणी कधीकधी मला त्यांचा हेवा वाटत असे.

'बधिटाक' हा खेळ कमी व जुगार जास्त आहे. त्यात जमिनीवर एक लहानसा खड्डा केलेला असतो. जेवढे खेळणारे असतात तेवढी नाणी या खेळात वापरली जातात. क्रमाक्रमाने खेळाडू एका विशिष्ट जागेवरून एकत्र केलेली ही नाणी त्या खड्ड्यात म्हणजेच बधीत फेकतो. त्यातली काही नाणी बधीत पडतात तर काही इतरत्र विखुरली जातात. यानंतर त्या खेळाडूला विशिष्ट एका नाण्याला एका दगडाने मारण्याविषयी सांगितले जाते. जर तो नाण्याला अचूक टिपू शकला तर तो सर्व नाणी जिंकत असतो. त्याचा नेम चुकल्यास तो बधीत पडलेली सर्व नाणी गमावतो आणि जर चुकून त्याचा दगड इतर कोणत्या नाण्याला लागला तर त्याला खिशातून अजून एक नाणे गल्ल्यात टाकावे लागते. नेम धरण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या दगडाला 'डाव' असे म्हटले जाते.

या खेळात वयाला फारसे महत्त्व नाही. त्यामुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व तो खेळतात. बधिटाक जुगार असल्याने त्याकडे तुच्छ भावनेने बघितले जाते. प्रतिष्ठित घरातला पुरुष किंवा मुले तो खेळायचे टाळतात. मी मात्र देहभान हरपून तो खेळ मनसोक्त खेळत असे. मी बऱ्याचदा त्यात जिंके. मी काही विशिष्ट भांडवलावर खेळ खेळी; हरल्यावर पुन्हा हातात पैसे लागेपर्यंत हात चोळत बसण्याशिवाय व इतरांची गंमत बघत बसण्याशिवाय गत्यंतर नसे.

याबाबतीत एका टप्प्यावर बेजबाबदारपणाच्या सर्व हद्दी मी पार केलेल्या होत्या व त्याचा परिणाम माझ्या सर्व वर्तनावर झाला होता. ताई, अण्णा व अक्का सर्वजण शेतात जात असल्यामुळे कधीकधी माझ्यावर कोंबड्या, बकऱ्या घरात घालणे, सरपण चुलीजवळ ठेवणे, दिवाबत्ती करणे, दळण दळून आणणे इत्यादी कामे सोपवली जात, पण मी ही कामे क्वचितच पूर्ण करी. कुत्र्याच्या शेपटीसारखी माझी गत होती. हातात धरल्यावर ताठ; हात सोडल्यावर परत वाकलेली. सुट्टीच्या दिवशी मात्र बऱ्याचदा शेतीची कामे करावीच लागत. अशा वेळी मला खेळाला अंतर देऊन खूप मोठा त्याग करावा लागे!

माझे सर्व सवंगडी उडाणटप्पू असल्याने सर्वांनाच घरच्यांचा रोष सहन करावा लागे. यामुळे आम्हाला बऱ्याचदा योग्य वेळी एकत्र जमणेही दुरापास्त होई. यावर तोडगा म्हणजे आम्ही इशाऱ्याचा किंवा कोडवर्डचा वापर करून एकमेकांना बोलावत असू. घरासमोरून ओरडत जाणे किंवा घरासमोर येऊन काहीतरी चाळे करणे वा शिट्या मारणे यांद्वारे आम्ही एकमेकांशी संवाद साधत असू. दुर्दैवाची बाब म्हणजे ताई-अण्णांनाही यातले काही कोडवर्ड माहीत झाले होते!

सुगीच्या दिवसात एकदा ज्वारी कापण्याचे ठरलेले होते. मोठ्या मुश्किलीने, ताईला दोन-तीन मजूर मिळाले होते. शेतकऱ्यांसाठी पेरणी व मळणी हे काम खूप महत्त्वाचे मानले जाते, कारण अनंत कालापासून या दोन गोष्टींवरच त्यांची वर्षभराची गुजराण अवलंबून असते. लहानपणापासून ताई मला नेहमी एक म्हण ऐकवत असे. तिचा अर्थ - घरातील एखादी व्यक्ती मेलेली असली तरी तिचे प्रेत झाकून पेरणी करावी!

त्या दिवशी सकाळी उठल्या उठल्या, ताईने मला कंडे घेऊन मजूर येण्यापूर्वी शेतात जाण्याविषयी फर्मावले. साधारणत: त्याच वेळी मला निरोप मिळाला होता, की त्या दिवशी भातखेड्याच्या मुलांबरोबर आमची क्रिकेट मॅच आहे. मला मोठे संकट पडले. ताईने तो इशारा ओळखला व मला बजावून धमकी दिली की, जर का 'तू खेवाले गया त तुनं तंगडं मोडसुं, गुपचूप वावरमा जाय.' मी काही न बोलता गुपचूप खात राहिलो.

परंतु माझे विचारचक्र सुरू झाले. मी शेताची वाट धरली पण मन मसणवटीवर, जेथे मॅच होणार होती तेथे रेंगाळत होते. क्षणाला मॅचचा विचार तर क्षणाला ताईचा चेहरा माझ्या डोळ्यांसमोर येऊ लागला. ताईचे रागावणे व मारणे मला नवे नव्हते. मी पुन्हा एकदा त्यासाठी मनाची तयारी करु लागलो. आपल्यावाचून - मुख्य गोलंदाजावाचून - मॅच होणार ही कल्पनाच मला सहन होत नव्हती. शेवटी, पुन्हा एकदा ताईचा प्रसाद खाण्याची मानसिक तयारी केली व कंडे शेतात फेकून मसणवटीकडे बेभान पळत सुटलो. संध्याकाळी, आपल्याबरोबर काय व्यवहार होणार हा विचार मी पुरता बाजूला ठेवला.

मी पोचण्यापूर्वी मॅच सुरू झाली होती. आमच्या संघाची फलंदाजी होती. एव्हाना आमचा एक गडी बादही झाला होता. मला लांबून बघूनच मुलांनी गलका केला. आपला संघ मजबूत झाला म्हणून ते जोरजोरात ओरडू लागले. पुढे, तीन गडी बाद झाल्यावर, मी फलंदाजीला उतरलो.

इकडे, ताई शेतात पोचल्यावर तिला क्षणात काय झाले ते कळले. आपण एवढे बोलल्यावरही व घरचे एवढे महत्त्वाचे काम असतानाही हा गेला हे बघून तिच्या तळपायाची आग मस्तकात गेली. मजुरांना कामाला लावून माझी कायमची खोड मोडण्यासाठी ती हातात लांब काठी घेऊन, रणचंडीचे रूप धारण करून 'देखस हाऊ कसा मॅच खेस तें' अशी गर्जना करून मसणवटीच्या मार्गाने निघाली.

तिला स्मशानवटीच्या पन्नास हात लांबीवर असतानाच कुणीतरी बघितले. क्षणात कुजबूज सुरू झाली. मला काय झाले ते कळेना. काही क्षणांत, तिने मैदानात प्रवेश केला. नेमके तेव्हाच कुणीतरी ओरडले, 'बापू तुनी माय तुला माराले उनी'. मी काय समजायचे ते समजलो व ताई माझ्या अंगावर चालून यायच्या अगोदर बॅट भिरकावून विरुद्ध दिशेने बेभान पळत सुटलो. मी पळालेला बघून काठी घेऊन तीही माझ्या मागे पळू लागली. साधारणत: शंभर मीटर पळाल्यावर तिने शिव्या देऊन माझा पाठलाग बंद केला. मी तिचे ते उग्र रूप पहिल्यांदाच पाहात होतो. तो सर्व प्रकार बाहेरगावाहून आलेली मुले व जमलेली गावातील इतर मंडळी बघतच राहिली. त्या दिवशी संध्याकाळी माझी चपलेने अशी काही पूजा झाली की त्या आठवणीने अंगावर काटा उभा राहतो. त्यानंतर काही दिवस, त्यावर चर्चा करून मुले मला चिडवत राहिली.

ताई स्वभावाने प्रामाणिक होती. त्यामुळे तिला कोणी आडवेतिडवे बोललेले सहन होत नसे. अर्थात, ती स्वत:सुद्धा तिला कोणी कधी तसे बोलावे अशी वागत नसे; परंतु मी मात्र नेमका उलटा वागत असे. खोटे बोलणे, वेळेवर काम न करणे, अभ्यास न करणे, घराकडे लक्ष न देणे या माझ्या उद्योगांमुळे तिला मनस्ताप होई. माझ्यामुळे तिला लोकांचे बोलणे ऐकावे लागे. अण्णांचे बोचरे शब्द ऐकावे लागत. एकदा, मी असाच काहीतरी उपद्व्याप केल्यामुळे अण्णांनी मला तांब्या फेकून मारला होता. सुदैवाने, तो मला लागला नाही; परंतु त्यावरून ताई-अण्णांमध्ये भांडण झाले. त्या दिवसापासून, अण्णांनी तिला स्पष्ट शब्दांत बजावले, की 'तुना पोरग्या आणि तुले काय करान ते कर.'

त्यामुळे मला ठिकाणावर आणण्याची सर्व जबाबदारी तिच्यावर आली. मी मात्र रोज काहीतरी उपद्व्याप करत असे. संध्याकाळी शेतावरून आल्यावर माझा पराक्रम तिला माहीत व्हायचा, तेव्हा कामाचा सर्व शीण ती माझ्यावर काढत असे. त्यामुळे जवळजवळ रोज माझी चपलेने, काठीने किंवा हाताने पूजा होत असे. बऱ्याचदा, ती माझे संध्याकाळचे जेवण बंद ठेवत असे. ती मला त्याविषयी सकाळी जाताना बजावत असे. - 'आज जर का तू खेवाले गयास तर तुल सध्याकायन जेवनच देणार नाही.' एवढ्या बजावणीनंतरही माझ्या कार्यक्रमात क्वचित बदल होत असे. असे काहीतरी केल्यानंतर मला सहसा घरात प्रवेश नसे. मग मी संध्याकाळी घरासमोरील निंबाच्या झाडाजवळ जाऊन बसे. मला बघून आजुबाजूच्या शेजाऱ्यांमध्ये मिश्किली चर्चा होई, की मी निश्चितच काही तरी पराक्रम केलेला आहे! येणारा-जाणारा 'काय मग बापू, आज ताईना हातना प्रसाद का?' असे म्हणून चिडवत असे. अशा परिस्थितीत, सर्वांची जेवणे आटोपल्यावर ताईला दया आलीच तर ती अक्काला मला वाढायला सांगत असे. नाही तर, कधी कधी रागात मला काहीही न देण्याविषयी तिला बजावले जाई. मग मी सर्वजण झोपल्यावर हळूच माझ्या अंथरुणावर जाऊन झोपत असे. बऱ्याचदा, असा गुपचूप झोपल्यावरही तिच्या लाथा पडत असत. एवढे मारूनही किंवा सांगूनही हा मुलगा ऐकत का नाही व आपण ज्या गोष्टीला विरोध करतो तीच हा का करत असतो, याचे तिला कोडे पडलेले असायचे.

आईने कधीही कुणाशी भांडण न केल्यामुळे जेव्हा काही बायका माझ्याविषयी तक्रार घेऊन तिच्याकडे येत, तेव्हा ती माझ्यावर खूप संतापत असे. तिने मला स्पष्ट शब्दांत बजावले होते, की 'कोणतीबी भानगड मना लोग आणू नको. काय करान ते तू स्वत: कर.' यामुळे मी सहसा कोणी मारल्यावर घरी तक्रार आणत नसे. जर भांडण करणारा, मारणारा माझ्यापेक्षा मोठा असला तर मी गुपचूप मार खाऊन, रडून घेत असे. त्यानंतर अश्रूंचे ओघळ पुसून घरी जात असे. मात्र, भांडणारा

चुकून माझ्या बरोबरीचा किंवा माझ्यापेक्षा लहान असला तर मी त्याच्या अंगावर आपला हात साफ करत असे.

लहानपणापासून आतापर्यंत ताईसारखे स्वभावगुण व विचार असलेली व्यक्ती मी बघितलेली आठवत नाही. मजुराच्या घरात जन्म, पुढे हसायच्या, हिंदळायच्या वयात संसाराचा पडलेला भार, गरीबीने होरपळलेले आयुष्य, शीघ्रकोपी व स्वभावाविरुद्ध नवरा, त्यात माहेरून किंवा कोणत्याही नातेवाईकांकडून नसलेला मदतीचा हात - अशा परिस्थितीत विचारातील आणि आचरणातील साधेपणा व शुद्धपणा, कणखरपणा, विवेकबुद्धी, सचोटी व सकारात्मक दृष्टिकोन यासारखे तिच्या स्वभावधर्मातील गुण थक्क करणारे आहेत.

ताईच्या स्वभावातील स्वाभिमानी वृत्तीमुळे उगाच कुणाचा तोरा किंवा मोठेपणा तिने खपवून घेतला नाही. शिवाय खरे काय ते स्पष्ट बोलण्याच्या स्वभावामुळे, स्त्रियांना कमी लेखून त्यांच्या शालीनतेचा फायदा घेणाऱ्या ज्येष्ठ व्यक्तींचे तिच्याशी कधी जमले नाही. त्यांनी नेहमी तिला नमविण्याचा प्रयत्न केला, पण ते कधीही शक्य झाले नाही.

सहसा मृदू स्वभावाच्या ग्रामीण बायकांमध्ये तासनतास वेगवेगळ्या विषयांवर गप्पा मारून पूर्ण गावाच्या चुगल्या व भानगडीत तोंड खुपसण्याची सवय दिसून येते. पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुषांच्या विचारांबरोबर ‘मम’ म्हणणाऱ्या बायकांपेक्षा ताई वेगळी आहे. कुणाला राग आला तरी स्पष्टपणे एखाद्या विषयावर आपले परखड मत द्यायला ती मागेपुढे पाहात नाही. उगाच चुगली करणे, खोटेनाटे सांगणे, नकळत हो ला हो मिळवणे या गोष्टी क्वचितच तिच्याकडून झाल्या असाव्यात. तिच्या या स्वभावामुळे बऱ्याच बायका तिच्याशी सांभाळूनच वागत व उगाचच इकडच्या-तिकडच्या गप्पा मारत नसत.

गरीबीचे तीव्र चटके बसत असताना व सदासर्वदा सर्व बाबतीत ठिगळं बसवणे गरजेचे असतांना तिने आपले इमान राखले आहे. उगाच योग्यता नसताना एखाद्या गोष्टीची ईर्षा धरलेली नाही. मेहनतीचे, आपले जेवढे आहे, जसे आहे त्यावरच नेहमी ती समाधानी असते. या तिच्या आत्यंतिक खरेपणामुळे बऱ्याचदा बायका आचंबित होत, कधी ईर्षा करीत तर कधी द्वेष करीत. बऱ्याचदा, काही बायका तिच्यापुढे तोंडघशी पडत तर काही युक्तीवादामध्ये सपशेल चीतपट होत. त्यामुळे बऱ्याच बायकांना तिच्याबरोबर आरामाचे वाटत नसे.

एखाद्या क्षुद्र जागेत खूपच सामान्य माणसांबरोबर राहून, शिक्षणाचा अभाव असतानाही एखादी व्यक्ती इतका उदात्त विचार कशी करु शकते व तिच्या आवाक्यात न वाटणाऱ्या गोष्टी खूप सुंदरपणे कशी समजू शकते याचे मला नेहमी नवल वाटे. माझ्या पुढच्या प्रवासातील अनंत अडचणींना तोंड देताना तिच्या वैचारिक पाठबळाने खूप मोठी भूमिका बजावली. परीक्षांना सामोरे जायचा प्रसंग असो किंवा परीक्षेच्या निकालानंतरचे अपयश असो, तिच्या एकेका शब्दाने मन खूप हलके होत असे.

आम्ही चार भावंडे, म्हणजे तीन बहिणी व एक भाऊ असे आहोत. परंतु ताई-अण्णांनी आमच्यात कधीही भेदभाव केलेला नाही. किंबहुना, मला माझ्या वर्तनामुळे नेहमी बहिणींपेक्षा जास्त वाईट वागणूक मिळाली. प्रतिभाच्या जन्मानंतर मात्र, अण्णांनी ताईला बराच त्रास दिला होता, कारण त्यांना मुलगा हवा होता. आमच्या आजीलाही माझ्यासाठी ‘जोडबय’ म्हणजे मुलगा पाहिजे होता. त्यामुळे प्रतिभाकडे कमी लक्ष देण्यात आले; परंतु ती लहानपणापासून गोरीगोमटी, सुदृढ होती व तिला कधीही कोणता आजार वा त्रास झाला नाही आणि त्यामुळे पालकांचे दुर्लक्ष

झाले तरी खपून गेले.

आईच्या कणखरपणा संदर्भात व माझ्या विचित्रपणामुळे उद्भवलेल्या काही घटना माझ्या स्मृतिपटलावर कायमच्या कोरल्या गेल्या आहेत. मी दहा-बारा वर्षांचा असताना मला जुगार खेळण्याची वाईट सवय लागली. मी चोरून जुगार खेळत असे. सहसा, मी जुगारातले पैसे जुगारात वापरत असे. एकदा, गावातल्या एका बाईने तिच्या मुलाला औषध आणण्यासाठी मला काही पैसे दिले. आम्ही काही मुले हायस्कूलच्या शिक्षणासाठी आमच्या तालुक्याला, म्हणजे एरंडोलला, जात असल्याने अशा प्रकारची छोटी-मोठी कामे आम्ही करत असू. माझ्या दुर्दैवाने मी ते पैसे जुगारात हरलो. औषध आणण्यासाठी मी दोन-तीन दिवस बहाणेबाजी केली. ताईच्या लक्षात आल्यावर तिने खरे काय ते ओळखले व त्या बाईसमोरच माझी ‘पूजा’ करून पैसे कुठे गेले याची शहानिशा करून घेतली आणि शाळेतून घरी राहायची ऑर्डर दिली! त्यानंतर मी शेतात मजुरीवर जाऊन जेव्हा त्या बाईचे पैसे परत केले, तेव्हाच मला शाळेत परत जायची परवानगी मिळाली.

असाच एक प्रसंग आजही आठवला तरी अंगावर रोमांच उभे राहतात. थंडीचे दिवस होते. सहामाही परीक्षा तोंडावर आली होती. राजकपूरच्या स्मृतिदिनानिमित्त दूरदर्शनवर रात्री उशिरा त्याच्या चित्रपटाची मालिका सुरू होती. रोज एक सिनेमा दाखवण्यात येत होता. मी सिनेमाचा शौकिन नसलो तरी मला सिनेमाबद्दल आकर्षण होते. त्या दिवशी ‘बॉबी’ हा बहुचर्चित सिनेमा दाखवला जाणार होता. संध्याकाळीच आम्हा मुलांमध्ये खलबत होऊन तो सिनेमा बघायचाच यावर शिक्कामोर्तब झाले. सर्वांनी आठ वाजता पारावर जमावे व साडेदहापर्यंत कोपरा-कोपरी खेळून सर्वांनी टीव्हीवाल्या अशोक-तात्याकडे जावे असे ठरले.

मी जेवण करत असतानाच कुणीतरी दारासमोरून शिटी वाजवून गेले. ताईला कळून चुकले की, रात्री काहीतरी कार्यक्रम आहे! मी मात्र आपला काही संबंध नाही असा आव आणून, खाली मान घालून जेवत होतो. तिने दमटावून मला बजावले, ‘कालदी परीक्षा से जर का तु बाहेर गया भडवा तुले घरमा लेनारच नाही.’

दुसऱ्या दिवशी, सहामाहीचा पेपर होता. परंतु माझे मन कधीच त्या गोष्टीपासून दूर गेले होते. परीक्षेविषयी मला फार चिंता नव्हती. नापास होण्याची भीती नव्हती व अभ्यास करून पहिला नंबर मिळवण्याची उत्सुकताही नव्हती. मनात अस्वस्थता सुरू झाली. मी पुस्तक धरून बसलो होतो, पण माझे मन पुस्तकात रमत नव्हते. काय करावे ते कळेना. एवढ्यात एक युक्ती सुचली. मी संडासाचे डबडे भरले आणि संडासाला निघण्याचा खोटा बहाणा करून घरातून बाहेर पडलो. डबडे उलटे करून मी पोबारा केला व पारावर सवंगड्यांना गाठले.

त्या दिवशी सिनेमा सुरू होईपर्यंत आम्ही पारावर खेळत राहिलो व नंतर टीव्हीसमोर जाऊन बसलो. पेंगत पेंगत दोन वाजेपर्यंत सिनेमा बघितला व संपल्यावर घरचा रस्ता धरला. सिनेमा संपल्यावर मला वास्तवाचे भान आले. एव्हाना थंडी वाढली होती. घराकडे पाय वळले तेव्हा मला ताईचा चेहरा आठवू लागला. ताई घरात शिरू देणार नाही हे माहीत असल्यामुळे माझा एक सवंगडी, विलास त्याच्या घरी मला झोपायला येण्याविषयी विनवत होता, परंतु माझे स्वाभिमानी मन त्याला राजी होत नव्हते.

मी कसातरी घराजवळ येऊन पोचलो. घरात शिरण्यासाठी दार ठोठावण्याची माझी हिंमत होत नव्हती. झोप दाटून आली होती. कुणी तरी हळूच दार उघडावे व बोचऱ्या थंडीपासून आपली

सुटका करून घरातल्या उबेत आश्रय द्यावा असे वाटत होते. मी स्वत:ला दोष देत होतो. आपण ताईचे म्हणणे ऐकले असते तर आरामात पांघरूण घेऊन झोपलो असतो असा विचार मनाला शिवून गेला.

पण माझी दार ठोठावण्याची हिंमत झाली नाही. मी तेथेच, ओसरीत रात्र घालवण्याचे ठरवले. माझ्या दुर्दैवाने ओसरीची अवस्था भयंकर होती. ओसरी खोदून तिला नुकताच गिलावा दिलेला होता. ओलाव्यामुळे ती कमालीची थंड झालेली होती. स्वेटर वगैरे प्रकार माहीत नसल्यामुळे फाटक्या सदऱ्यातून हवा शिरून सर्व अंगाला झोंबत होती.

ओसरीवर एका कोपऱ्यात नवीनच घेतलेली मसाला दळायची छोटी चक्की ठेवलेली होती. वडे व कुरड्या, डाळ व मिरची दळल्यामुळे चक्कीचा उग्र दर्प सगळीकडे पसरलेला होता. चक्की एका छोट्या ताडपत्रीने झाकलेली होती. शेवटी ती ताडपत्री काढून, तिचा अर्धाभाग जमिनीवर अंथरून आणि अर्धा पांघरून मी एका कोपऱ्यात पहुडलो. मिरचीच्या उग्र दर्पामुळे जीव गुदमरत होता. शेवटी मी तोंड उघडे ठेवून झोपलो.

माझा त्रास तेवढ्यावर संपलेला नव्हता. उघड्या तोंडावर डास बसू लागले. त्यामुळे क्षणाक्षणाला तोंड आतबाहेर करत होतो. डासांबरोबर माझा हा लपंडाव सकाळपर्यंत चालू असावा. मी या काणीवरून त्या काणीवर होऊन वेळ कसा तरी घालवत होतो. मला माझ्या चुकीचा पश्चात्ताप होत होता. शेवटी कुठेतरी पाच वाजता डोळ्याला डोळा लागला. एवढ्यात कमरेवर जोराची लाथ पडली. दुसरी लाथ पडण्याआधी मी खडबडून उठलो व बेभान पळत सुटलो. आईच्या आवाजातील कणखर सुनावणीमुळे गल्लीतील लोकांचे कान टवकारले होते. सकाळी सकाळी बापूने काहीतरी पराक्रम केला असेल, म्हणून ते दुर्लक्ष करून ते त्यांच्या कामाला लागले. मला मात्र ते सिनेमापुराण चांगले भोवले.

ताईच्या स्वभावातील वाखाणण्यायोग्य गुणांमध्ये धैर्य, धाडस व खंबीरपणा जास्त उठून दिसतात. एखादी गोष्ट तिने ठरवली किंवा ती योग्य आहे अशी तिची खात्री झाली तर ती पूर्ण करण्यासाठी ती कसलीही तमा बाळगत नाही. करताना कुणी आपल्याला काय म्हणेल, याचा ती यत्किंचितही विचार करत नाही.

तिच्या या गुणांची ओळख मला लहानपणीच झाली होती. सूर्यकिरणे तिरपी झालेली होती. घरातले काम करण्यासाठी ताई त्या दिवशी शेतातून लवकर आलेली होती. ताई पीठ दळण्यासाठी सुपड्याने धान्य निसत होती. मी, माझी मधली बहीण, उषाबरोबर खेळत होतो. आमच्यामध्ये क्षणाक्षणाला वाद होत होते व उषा ओरडून ताईकडे माझ्याविषयी तक्रार करत होती. एव्हाना, ताईने एक तीक्ष्ण कटाक्ष टाकून मला गोंधळ बंद करण्याविषयी खुणावले होते. शेतातून थकून आल्यावर साहजिकच माझ्या उपद्व्यापाने ती वैतागली होती. अचानक, आमचा वाद विकोपाला गेला व मी उषाला जोराची चापट मारून ताईपासून बचावासाठी सर्रकन निंबाच्या झाडावर चढलो.

सहसा, भांडणात चूक कोणाचीही असली तरी दोष माझ्यावर येई. कारण माझ्या विचित्रपणामुळे मीच चूक केली असेल असा सर्वांचा समज होई. सर्व काही ताईसमोर घडत होते. मी झाडावर चढल्यामुळे मला शिक्षा होणार नाही याची जाणीव झाल्यावर उषा जास्तच रडू लागली. माझा समाचार नंतर घेण्याविषयी तिला आईने आश्वासन दिले, परंतु तरीही ती मानत नव्हती. तिचा आवाज वाढत होता. त्यामुळे ताईचा पारा चढला. मी बिनधास्त होतो कारण निंबावर कुणी काही करु शकणार नाही याची खात्री मला होती.

ताईने मला खाली उतरण्याविषयी बजावले. मी खाली उतरल्यावर माझे काय होईल याची मला चांगलीच जाणीव होती. शिव्यांची लाखोली ऐकून व एवढे बजावले जाऊनही मी उतरत नाही असे बघून ताईने एका घराला लावलेली उंच शिडी आणली व निंबाला लावली. ती शिडीने सरसर निंबावर चढून व हातात एक ओली काठी घेऊन माझ्याकडे सरसावली. मी वर चढून निंबाच्या शेंड्यावर जाऊन बसलो. तेथपर्यंत ताई येऊ शकणार नाही असे मला वाटले, परंतु माझी खोड पूर्ण मोडायची असा तिचा निर्धार दिसत होता. आश्चर्य म्हणजे माझ्या मागोमाग ती शेंड्यावर येऊन पोचली व संतापात तिने तिथेच मला काठीने बडवण्याचा कार्यक्रम सुरू केला. एव्हाना, आमचा गोंधळ ऐकून बरीच बायामाणसे झाडाखाली जमा झाली होती. ताईला कुणाचीच पर्वा नव्हती. जोपर्यंत तिच्या संपूर्ण रागाचे शमन होत नाही तोपर्यंत ती मला मारत होती.

ही बाईच असे काहीतरी करु शकते यात लोकांना शंका नव्हती. काही ताईच्या बाजूने तर काही ताईच्या कठोरपणाबद्दल तिला दोष देऊन निघून गेले. सहसा, ताईच्या बरोबर युक्तिवाद करण्याच्या भानगडीत ती मंडळी पडत नसे. कारण बऱ्याचदा, ताई त्यांचे दात त्यांच्या घशात घाली व त्यांच्या चुका त्यांना दाखवून देई.

आपल्या अशा विचित्र वागण्याने घरातील मंडळीना खूप त्रास होतो याची मला कधीकधी जाणीव होत असे. आपल्या वागण्याने त्यांना आनंद झाला पाहिजे असेही वाटे, परंतु माझ्याकडून असलेल्या त्यांच्या अपेक्षा व माझी रुची यांचा ताळमेळ बसत नसे. मला खूप खेळावेसे वाटे, मित्रांबरोबर हिंदळावेसे वाटे, घरातील काही कामांचा मला कंटाळा येई, शिवाय मला सारखा अभ्यास करावासा वाटत नसे; मात्र, घरातील मंडळींना मी या सर्व गोष्टी कराव्यात असा अट्टाहास असे. त्यामुळे मला त्यांच्या इच्छेविरुद्ध जावे लागे.

या कारणांमुळे घरी कितीही महत्त्वाचे काम असले तरी माझे पाय नकळत खेळाच्या मैदानाकडे वळत. ताई-अण्णा रात्रंदिवस कष्ट करत असल्यामुळे त्यांना माझ्याकडे लक्ष द्यायला वेळ नसे. मला एखादी गोष्ट एकदा सांगितल्यावर मी ती निमूटपणे केली पाहिजे अशी त्यांची अपेक्षा असे. मी मात्र माझ्याच तंद्रीत असे.

मला जेवढे आठवते, त्या दरम्यान मी ताई-अण्णांना खूप त्रास दिला होता. जेव्हापासून मला कळायला लागले तेव्हापासून क्वचितच, ताईने मला कधी जवळ घेतले वा प्रेमाने कुरवाळले असेल किंवा दोन शब्द समाधानाचे बोलली असेल. यावरून माझ्या उपद्व्यापांची कल्पना यावी. मला मात्र कधी-कधी खूप राग येत असे, की काही असले तरी आपण ताई-अण्णांचे एकुलते पुत्ररत्न आहोत, वंशाचा दिवा आहोत. तेव्हा तिने कधीतरी आपल्याला जवळ घ्यावे, आपले लाड करावे. अशी माझी अपेक्षा होती. मी जेव्हा इतरांना त्यांच्या एकुलत्या मुलाचे लाड करताना बघत असे, तेव्हा ती भावना अधिकच तीव्र होत असे.

मी ताई-अण्णांच्या माझ्याबरोबरच्या वर्तनाचा विचार करतो तेव्हा माझा त्यांच्याबद्दलचा आदर द्विगुणित होतो. त्यांनी वेळेवर माझ्या अवगुणांवर बोट ठेवले व त्यांचा कठोरपणाने बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे वेळोवेळी माझे अवगुण माझा पाठलाग करु लागले, त्यादरम्यान जर त्यांनी माझ्यावर माया दाखवली असती व माझ्या अवगुणांना पाठीशी घातले असते तर नक्कीच आयुष्याला वेगळी दिशा मिळाली असती.

ताई-अण्णांनी माझ्या लहानपणापासून वाईट अशी लहानातली लहान गोष्टसुद्धा खपवून घेतली नाही. त्यांनी मला कधीही जाणीव होऊ दिली नाही, की मी एकुलता एक मुलगा आहे व

माझी त्यांना खूप गरज आहे. बऱ्याचदा, मी जेव्हा इतर घरांतल्या एकुलत्या एक मुलांचे लाडकोड बघत असे तेव्हा मला ताई-अण्णांचा राग येई. आपण एकटे असूनही आपले लाडकोड न करता ते आपल्याशी कठोर वगतात म्हणून मी त्यांना दोष देई.

मी पहिलीत वा दुसरीत असतानाची गोष्ट आहे. मला अंघोळीचा व खास करून हिवाळ्यात अंघोळीचा खूप कंटाळा येई. त्यामुळे माझा ताईशी रोज सकाळी वाद होई. तिचे अनुशासन असतानाही मी बऱ्याचदा तिला चुकवून बिनाअंघोळीचा शाळा गाठी. माझ्या उपद्व्यापाला कंटाळून ताईने माझी तक्रार घराजवळच राहणाऱ्या वडिले गुरुजींकडे केली. त्यांनी मला धमकावल्यावर मी काही दिवस अंघोळ करून जात होतो.

गुरुजी रोज माझा करगोटा तपासत असत. तो ओला असला म्हणजे मी अंघोळ केली आहे याची त्यांना शाश्वती मिळे. मला त्या दरम्यान एक नवी युक्ती सुचली. मी फक्त करगोटा ओला करून, अंघोळ न करता जाऊ लागलो. गुरुजी मला चांगली सवय लागल्यामुळे खूश झाले!

माझा हा उपद्व्याप ताईच्या कानावर गेला. माझी खोड मोडण्यासाठी सर्व मुलांसमोर माझी अंघोळ करण्याचे फर्मान तिने गुरुजींसाठी जारी केले. मी मात्र सर्वांना कसे फसवले या आविर्भावात खूश होतो. एक दिवस असाच करगोट्याला पाणी लावून शाळेत आलेला होतो. त्या दिवशी वर्गातील सर्व मुलांना गुरुजींनी शाळेसमोरील पटांगणात जमायला सांगितले. आम्ही सर्व उड्या मारत पटांगणावर आलो. गुरुजी क्वचितच पटांगणावर नेत असल्याने आम्ही पटांगणावर जाण्यासाठी आसुसलेले असायचो.

सर्व मुले रांगेत उभी राहिल्यावर एक पाट, बादली व गडू मागवण्यात आला. मुलांमध्ये कुजबूज सुरू झाली. कुणालाही नेमके काय घडत आहे ते कळत नव्हते. शेवटी, त्यांनी सर्व मुलांमधून मला बाहेर बोलावले. त्यानंतर गुरुजी माझा प्रताप सर्वांना सांगू लागले. मला खूपच अवघडल्यासारखे होत होते. कधी असा दिवसही येईल असे मला वाटले नव्हते. नंतर माझे कपडे काढण्यात आले व मला सर्वांच्या समोर काळी माती लावून आंघोळ घालण्यात आली. क्षणाक्षणाला गलका होत होता. सर्व मुलांसाठी चांगली करमणूक झाली होती. मी मनातून तो प्रसंग कसातरी संपावा या विचाराने, खाली मान घालून सर्व सहन करत होतो. माझी कुणाकडे मान वर करून पाहण्याची हिंमत होत नव्हती.

पुढे कित्येक दिवस, मुले मला त्या प्रसंगावरून चिडवत राहिली. त्यामुळे माझी अंघोळ न करण्याची सवय मात्र कायमची मोडली. त्यापुढे मी बिनाअंघोळीचा कधी शाळेत गेल्याचे आठवत नाही. नंतर मला कळले की, त्या सगळ्या पाठीमागे ताईचे फर्मान होते. तिच्या कठोर धोरणामुळे माझी ती सवय गेली होती.

माझ्या वाचनाच्या नादामुळे माझी शाळेच्या ग्रंथपालाशी चांगली गट्टी जमली होती. त्यामुळे बऱ्याचदा मी एकापेक्षा जास्त पुस्तके घरी घेऊन येत असे. ताईला हे चांगले माहीत होते, की शाळेतून आठवड्याला फक्त एक पुस्तक मिळते. त्यामुळे जेव्हा तिच्या लक्षात आले, की माझ्याकडे एक छोटे ग्रंथालय तयार झाले आहे, तेव्हा तिला माझा हा व्यवहार संशयास्पद वाटला व दुसऱ्याच दिवशी, तिने मला सर्व पुस्तके परत करायला सांगितले.

ताईला ज्या गोष्टींची खूप चीड येत असे, त्यातली एक गोष्ट म्हणजे चोरी व दुसरी लबाडी. आम्ही मुले लहान असताना दुसऱ्याच्या शेतात काम करायला जात असू. बऱ्याचदा, मी व अक्का भुईमूग पिळायला किंवा ऊस लावायला जात असू. आम्हा मुलांना भुईमूग पिळता पिळता काही

शेंगा डब्यात भरून आणायला किंवा खिशात भरून आणायला खूप मजा येई. त्या वयात चोरी वगैरे करण्याच्या भावनेपेक्षा अशा गोष्टींची गंमत जास्त वाटत असे. मात्र, ताईला त्या गोष्टी अजिबात आवडत नसत. चुकून तिला 'आमची चोरी' कळलीच किंवा तिच्याकडे कोणी तक्रार केली तर ती आमची गय करत नसे.

अशा माझ्या एकंदर विचित्र स्वभावामुळे ताई-अण्णा व इतर आप्तजन चिंतेत होते. हा मुलगा पुढे नेमका काय करेल याविषयी त्यांना खूप चिंता वाटायची. ताईचे सर्व उपाय करून झाले होते. मारणे, बोलणे हा रोजचाच कार्यक्रम होता. कधी कधी मारताना ताई स्वत: रडत असे. अशा वेळेला मला तेवढ्यापुरते खूप वाईट वाटत असे. त्याचा परिणाम तेवढ्या दिवसापुरता असायचा. बऱ्याचदा, मी काही उपद्व्याप करत असलो की गल्लीतल्या माझ्यापेक्षा मोठ्या व्यक्तीही मला रागावत असत. वेळप्रसंगी त्या मला मारायलाही कमी करत नसत. मला मात्र त्याविरुद्ध बोलण्याची सोय नव्हती. शेवटचा उपाय म्हणून ताईने भरपूर उपासतापास, धागेदोरे व मांत्रिक यांचा सहारा घेतला होता; परंतु त्या साऱ्याचा माझ्यावर काहीही परिणाम झाला नाही!

लहान मुलांच्या रक्षणासाठी मुंजोबा नावाच्या देवाला प्रसन्न करणे गरजेचे असते असा गावात सर्वांचा समज होता. गावातील पारावर त्याचे एक मंदिरही आहे. प्रत्येक वर्षी साधारणत: तिथीनुसार मुंजोबा जेवायचा कार्यक्रम घरोघरी होत असे. घरच्या मुलांबरोबर बाहेरच्या काही मुलांना ऐपतीप्रमाणे जेवायचे आमंत्रण असे. मग मुंजोबाला नैवद्य दिल्यानंतर सर्वांना दूध-भात व गुळाचे जेवण मिळे. जेवतांना एका पंगतीत पाटावर बसवून, टोपी घालून घरातील सुवासिनी त्यांची पूजा करीत व दंडवत घालत असत. अशाप्रकरे मुंजोबा जेवत. मला मुंजोबा म्हणजे मुंज्या म्हणून जायला खूप आवडे. मी नेहमी आमंत्रणाची वाट पाहात असे. काही वेळेला मात्र मला वगळून इतर मुलांना आमंत्रण गेल्यावर माझी घोर निराशा होई.

मुंजोबा जेवणाव्यतिरिक्त वीर काढण्याची, लहान मुलांचे जावळ काढण्याची व नवस फेडण्याची प्रथा खानदेशातील ग्रामीण भागात बघायला मिळते. घरातील एखाद्या ज्येष्ठ व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या आत्म्याला शांती मिळण्यासाठी त्यांच्या प्रतीकात्मक मूर्तीची वीर काढून एका मंदिरात स्थापना करण्यात येई. साधारणत: चार ते पाच व्यक्तींना जुन्या काळात युद्धाला जाताना जसे वीर सजून जात, तशा काहीतरी पेहरावात, हातात तलवार धरून, तिच्या टोकाला लिंबू लावून नाचवले जाई व शेवटी एखाद्या बोकडाचा बळी देऊन गावाला मटण भाकरीचे जेवण दिले जाई. वीर नाचवण्यासाठी हरिजनांच्या पिपाणीचा बाजा लावला जाई.

वीराप्रमाणे जावळ काढण्याची प्रथा सर्रास पाळली जाते. मुलगा किंवा मुलगी जन्मल्यावर साधारणत: सहा महिने किंवा एक वर्ष त्याचे केस तसेच ठेवले जातात. पुढे ब्राह्मणाकडे मुहूर्त बघून, आईच्या आसरा, म्हणजे देवीचे स्थान शोधले जाते. काही मातांसाठी ते नदीत, तर काहींसाठी ते विहिरीत असते. त्यानुसार जावळाचा कार्यक्रम ठरवला जातो व मुलांचे केस कापून नदीत किंवा विहिरीत वाहिले जातात.

हे सारे कार्यक्रम सहसा ब्राह्मणांच्या सल्ल्याने होत. घरात कुणी सारखे आजारी पडत असले, वा कुणाला विचित्र स्वप्न दिसत असले किंवा लहान मूल खूप रडत असले तर डॉक्टरकडे नेण्याबरोबरच आजूबाजूच्या एखाद्या म्हातारीचा सल्ला घेतला जात असे किंवा ब्राह्मणाच्या शरणी जाणे होत असे. मग कुठला राहिलेला नवस, कुणाच्या आसरा, तर कुणाचे वीर काढायचा सल्ला मिळत असे. वरून तसे न केल्यास भयंकर परिस्थिती उद्भवू शकते असा इशाराही मिळे. सहसा

ब्राह्मणांच्या आजूबाजूला फिरणाऱ्या काही व्यक्तींच्या घरात या भानगडी जरा जास्तच असत.यामुळे त्यांच्या समस्यांचे समाधान तर होतच नसे. परंतु त्यातले बरेच कर्जाच्या खाईत ढकलले जात.

मला आठवते तसे गावात एक भगत घुमायचा. कार्तिक महिन्यात सात दिवसासाठी घुमण्याचा विशेष उत्सव होत असे. या सात दिवसात उंच बांबूची एक काठी भगताच्या घरासमोर उभारलेली असे. काठीला वेगवेगळ्या रंगांची कपडे गुंडाळलेली असत व काठीच्या एका टोकाला मोरपिसांचा जुडा व एक लाल, दोन त्रिकोणाचा, झेंडा बांधलेला असे. सप्ताहातील प्रत्येक दिवशी संध्याकाळी भगताच्या अंगात देव संचारे व तो किंचाळून नाचायला लागे. विशिष्ट वाद्यांच्या तालावर भगत ठेका घेई व विशिष्ट गाण्याच्या चालीवर नाची. मग आजारी माणसांना त्याच्यासमोर आणले जाई. काही मंत्र पुटपुटत तो आजारी माणसांच्या कपाळावर राख लावी व त्याच्या अंगावर मोरपिसांनी बनलेल्या झाडूसारख्या खोच्याने स्पर्श करी. बऱ्याचदा कुणाच्या घरात चोरी झालेली असली तर ते भगतासमोर गुढी ठेवत असत. भगत मंत्र उच्चारून कुणी चोरी केली याविषयी काही निर्देशक खाणाखुणा सांगत असे. सातव्या दिवशी शेवटी गावात मोठी मिरवणूक निघे. देवाला एका बोकडाचा बळी दिला जाई व त्याची मेजवानी होई. भगताच्या मंत्रांनी काहींची प्रकृती बरी झाल्याचे किस्से गावात नेहमी चघळले जात. या भगताच्या अंगात येणाऱ्या देवाचे नाव चांग्यापांग्या असे होते. पुढे मी कधीच असल्या देवाचे नाव ऐकले नाही. भगताबरोबरच घुमण्याचा प्रकार गावातून तात्पुरता नाहीसा झाला.

माझ्या आजोळी असेच एक पिरोबाचे स्थान होते. त्याला बाबादेव असे म्हणत. तेथेही एक भगतिण प्रत्येक रविवारी घुमत असे. खूप लांबून आजारी व इतर समस्या घेऊन लोक चारचाकीने किंवा बैलगाडीने त्याठिकाणी गर्दी करत. माझी एक जवळची आजारी आजी बाबादेवपुढे गुढी म्हणून बसली होती. भगतिणीच्या म्हणण्याप्रमाणे आजी लवकरच बरी होणार होती. परंतु पुढे एका आठवड्याच्या आतच आजी वारली. त्या घटनेचा पडसाद माझ्या मनावर कायमचा कोरला गेला. त्यामुळे पुढे कधीही भगतांवर माझा विश्वास बसला नाही.

माझे आजोळ चार मैलावरील कुरंगी या गावचे. लहान असताना अक्षय्य तृतीयेला व दिवाळीला आम्ही भावंडं मामाच्या गावाला जात असू. कुरंगीला जाण्याचे मुख्य आकर्षण म्हणजे अक्षय्य तृतीयेला निघणारी सोंगे. साधारणत: पाच ते सहा दिवस, प्रत्येक दिवशी, रात्री रामायणावर आधारित नाटक प्रदर्शित होत असे - ज्याला सोंगे म्हटले जाई. सोंगे पहिल्या दिवसाच्या रामजन्मापासून ते शेवटच्या दिवसातील सीतेच्या अग्निपरीक्षेपर्यंत ओळीने प्रत्येक दिवशी कहाणी पुढे सरकत असे. चमकदार वेशभूषेत हुबेहूब वाटणाऱ्या सोंगाना बघतांना खूप मजा येई. प्रत्येक पात्राची एन्ट्री खूप मजेदार असे. दारूच्या बंदुकीतून गोळीचा बार वाजल्यावर पडदा उघडे व हनुमान किंवा रामाचा प्रवेश होई. मग ही मंडळी विशिष्ट हावभाव करत लांब अशा स्टेजवर नाचत. या सोंगासाठी खास असा हरिजनांचा तुतारीबाजा असे. त्याच्या चालीवर सोंगं थिरकत. संध्याकाळीच आम्ही मुले घरून खाट घेऊन मैदानात टाकत असू व रात्री त्यावर घरातील सारे बसत व सोंग बघत. सोंगांना दिवसा खऱ्या अवतारात बघितल्यावर खूप मजा येई. पुढेपुढे मामाशी जसा संबंध कमी झाला तसा सोंगांशीही संपर्क संपला पण त्यांच्याशी जुळलेले नाते भावविश्वाचा भाग बनून कायमचे राहून गेले.

प्रत्येक भाऊबीजेच्या दिवशी माझ्या गावात अखंड हरिनाम सप्ताह सुरू होतो. सकाळी व

संध्याकाळी प्रवचन, रात्री कीर्तन व उरलेल्या वेळी रामाचा जप असा कार्यक्रम असतो. सहा दिवसाचे सहा कीर्तनकार ठरलेले असतात, शेवटच्या दिवशी सकाळी गोपाळकाल्याचे कीर्तन होते. कीर्तनात सहसा संसार व परमार्थ या विषयावर लोकांना उद्बोधन देण्याचा प्रयत्न असतो. या सात दिवसात गावात वेगळेच वातावरण निर्माण झालेले असते. मला लहानपणी कीर्तनाचे खूप आकर्षण होते. मी सर्वात पुढे बसून कीर्तन ऐकत असे. बऱ्याचदा कीर्तन सुरू होण्यापूर्वीच माझे डोळे बंद व्हायला सुरुवात होई. नियमित कीर्तनासाठी येणाऱ्यांबद्दल जरा कौतुकाने बोलले जाई. शिवाय या सात दिवसात घरातील कटकटींपासून व रागवण्यापासून थोडी सुटका मिळे म्हणून मी कीर्तन टाळत नसे. सात दिवसाचे सात कीर्तनकार वाटलेले असत, ते जेवणासाठी वेगवेगळ्या यजमानांकडे जात. त्यांच्याबद्दल मनात वेगळाच आदर राहात असे. कीर्तनाच्या काही संस्कारांमुळे पापपुण्याची गणितं माझ्या डोक्यात बसली होती. नाही म्हटले तरी कीर्तनाचा परिणाम थोड्या प्रमाणात गावात झालेला दिसतो. मांस खाणे, दारू यावर थोड्याफार प्रमाणावर लगाम बसलेला आढळतो.

लहानपणी खोडकर, विचित्र स्वभावाच्या मुलाचा पुढे, एका यशस्वी, आत्मविश्वासू तरुणामध्ये झालेला कायापालट निश्चितच आश्चर्यकारक आहे. ही जादू कशामुळे झाली असावी हा वाचणाऱ्याला कोड्यात टाकणारा प्रश्न आहे. जर हा चमत्कार असेल तर त्यात खूप रस घेण्याची गरज नाही. परंतु हा प्रवास जर माणसात असलेल्या दुर्दम्य क्षमतेचा वा त्याच्या योग्य विकासाचा किंवा पालकांनी दिलेल्या योग्य दिशेचा असेल तर त्याबद्दल थोडे चिकित्सक होण्याची निश्चित गरज आहे.

माझ्या परिवर्तनाची पार्श्वभूमी माझे आई-वडील, मी ज्या परिस्थितीत वाढत होतो तिचा सामाजिक व आर्थिक परिवेश, माझे सोबती-सवंगडी व माझ्या आयुष्याला वळण देणाऱ्या घटना यांनी तयार झालेली आहे.

माझे आईवडील चांगुलपणाचे पुतळे होते. मी लहानपणी कधीही त्यांना खोटे बोलताना व कुणाला फसवताना बघितलेले नाही. त्यांच्यामधील ते गुण नकळत माझ्यात बिंबले, पण तेवढ्या शुद्धतेने नाही. म्हणजे मी परिस्थितीनुरूप व माझ्या सहकाऱ्यांच्या संगतीत कधीकधी खोटे बोलत असे. पण इतरांना जसे खोटे बोलल्यावर मजा आल्यासारखे किंवा बहादुरी दाखवल्यासारखे वाटते तसे मला न वाटता अपराध्यासारखे वाटे व मी अशा वेळी मनाशी पुढे कधीही खोटे न बोलण्याचा निर्धार करी. म्हणजे माझा मूळ स्वभावधर्म चांगुलपणाचा होता.

माझ्या सवंगड्यांचा माझ्यावर खूप प्रभाव पडत गेला. मी शिकायला एरंडोल आणि त्यानंतर धुळे व नाशिकला जाण्यापूर्वी असलेले माझे सर्व सोबती मजुरांची, भिल्लांची, हरिजनांची अशिक्षित घरांतून आलेली मुले होती. मी त्यांच्या सवयी, त्यांचे विचार-आचार आत्मसात केले व त्यांच्यासारखेच आचरण माझ्याकडून घडत राहिले. घरातल्या लोकांचा माझ्यावर असलेला रोष त्या कारणाने अधिक होता, कारण घरात इतर कोणी विचारसुद्धा करु न शकणाऱ्या चोरी, लबाडी व जुगारासारख्या गोष्टी मी बाहेरूनच आणलेल्या होत्या. कधी कधी, मी त्या गोष्टी खूपच यांत्रिक पद्धतीने करत असे. त्यामुळे त्या माझ्या अंतरंगात सामावण्याचा प्रश्नच उठत नाही. बऱ्याचदा, एका खोट्यासाठी अनेक खोटी बोलावी लागतात. त्या सर्व गोष्टी माझ्या बालसुलभ मनाला आकर्षित करत. त्याशिवाय माझ्या बरोबरची इतर मंडळी तसे बिनबोभाटपणे करत असल्याने मला त्यात काही वावगे वाटत नसे. त्यामुळे शाळेतील निरुत्साही वातावरण,

बीजगणित-भूमितीच्या निर्जीव आकृती आणि घरातील नेहमीचे चिंतामय वातावरण यापेक्षा मला मित्रमंडळींत सामील होऊन त्यांच्यातलाच एक होऊन जाण्यात आत्यंतिक आनंद मिळत असे.

माझ्यात व इतर मुलांमध्ये फक्त एक फरक होता आणि तो म्हणजे माझी अभ्यासातली थोडीफार प्रगती. त्यामुळेच कदाचित माझे शिक्षण पुढे चालू राहिले, अन्यथा मीही शिक्षणाअभावी त्यांच्यासारखा शेतमजूर झालो असतो किंवा तसाच व्यवसाय माझ्या वाट्याला आला असता. असे असतानाही माझ्या मनात एक वेगळी उर्मी वास करत होती. मला बऱ्याचदा काहीतरी मोठे व भव्यदिव्य करावेसे वाटे. आपण आयुष्यात अयशस्वी होऊ व आपल्यालाही शेवटी इतरांप्रमाणे क्षुल्लक कामे करावी लागतील असे चुकूनही माझ्या बालमनात येत नसे.

मी तेव्हा आठवीत होतो. मला कुठूनतरी वाटायला लागले, की आपण एक चांगला खेळाडू होऊ शकतो. मी त्यासाठी काय करता येईल याचा विचार करु लागलो. मला इतर खेळांबरोबर बॉक्सिंग, हॉकी इत्यादी खेळांबद्दल आकर्षण होते. मी घरीच एका गोणीमध्ये कापड, दगड, वाळू भरून व ती ओसरीत टांगून तिचा बॉक्सिंगसाठी वापर करत होतो. मी लांब उडी मारण्यासाठी शेतात एका ठिकाणी खोदून जागा तयार केलेली होती. तेथे कुणी नसताना मी उड्या मारत बसे. एकंदरीत कुठेही काही मार्ग सापडत नाही हे बघून मी त्यावेळी सरळ केंद्रीय क्रीडामंत्री ममता बॅनर्जी यांना पत्र लिहिले होते. त्याचबरोबर मला कुठूनतरी कळले, की ग्वाल्हेर व पतियाळा या ठिकाणी खेळांसाठी प्रशिक्षण अकादमी आहेत. मी त्यांनाही पत्रे लिहून माझी खेळाडू होण्याची व विशिष्ट खेळासाठी प्रशिक्षण मिळवण्याची इच्छा असल्याची भावना कळवली होती.

माझे हे सर्व उपद्व्याप माझ्याबरोबरच्या सवंगड्यांच्या आकलनाबाहेरचे होते. अशा प्रकारे अनेक विचार माझ्या मनात अविरत चालू असत.

पुढे माझ्या वैचारिक कक्षा वाचनाने रुंदावत गेल्या. सुरुवातीला, मी करमणूक म्हणून व ज्याच्यात रस आहे अशा संदर्भातील गोष्टी वाचू लागलो. म्हणजे रामायण, महाभारत या बरोबर वर्तमानपत्रांतील सिनेमा, खेळ याविषयी वाचायला मला खूप आवडे. हळूहळू भव्यदिव्याकडे असलेल्या माझ्या कलामुळे मला टारझन, पृथ्वीराज चौहान, शिवाजी महाराज, महाराणा प्रताप, भगतसिंग यांच्यासारख्या व्यक्तिरेखा आकर्षित करु लागल्या. महाभारतातील कर्ण, अभिमन्यू, शिवचरित्रातील मुरारबाजी, बाजीप्रभू यांसारख्या व्यक्तींविषयी मी परत परत वाचत असे. त्याबरोबर, मला प्रतिकूल परिस्थितीत असाध्य गोष्ट साध्य करणाऱ्या वीरांचे विशेष कौतुक होते.

माझ्या वाचनाच्या वेडाने व मुळातच काहीतरी अद्भुत करण्याची नशा चढल्यामुळे माझी एक वैचारिक तथा भावनिक ओढ तयार झाली. त्या पार्श्वभूमीवर माझी संग्रामशी झालेली ओळख आयुष्याला वेगळ्याच दिशेने घेऊन गेली. दहावीत असताना सुरुवातीच्या काही दिवसांत माझी त्याच्याशी ओळख झाली. वाचनामुळे विकसित झालेल्या माझ्या काही क्षमतांचे व वैचारिक जाणीवजागृतीचे त्याला कौतुक वाटत असे. काही गोष्टी सूत्रबद्ध पद्धतीने केल्यास मी अभ्यासामध्ये प्रगती करु शकतो अशा प्रकारचे काहीसे विचार तो पुन्हापुन्हा माझ्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करु लागला.

बऱ्याचदा, आपल्याहून मोठ्या व्यक्तीपेक्षा आपण आपल्या समवयस्क व्यक्तीकडून जास्त प्रभावित होतो, कारण समवयस्क व्यक्तीकडून प्रोत्साहन मिळणे बऱ्याचदा अवघड असते. मी संग्रामचे कौतुक करत असे आणि मला त्याच्याबद्दल आदरही वाटत असे. त्याच्या बोलण्याचा परिणाम माझ्या मनावर तुलनेने अधिक झाला.

संग्रामच्या संपर्कामुळे सुरू झालेल्या परिवर्तनाबरोबर माझ्यात असलेले इतर अवगुण हळूहळू पळू लागले. कारण त्यांच्यात विरोधाभास तयार होऊ लागला. अभ्यासात लक्ष केंद्रित झाल्यामुळे व दहावीत असताना शिकवण्या वगैरे गोष्टींमुळे, तुलनेने इतर उपद्व्यापांसाठी व इतर मित्रांसाठी वेळ कमी मिळू लागला. त्यानंतर अभ्यासात सुरू झालेली माझी घोडदौड अखंड चालू राहिली.

त्यानंतरचा लढा हा वेगळ्या पद्धतीचा होता. आर्थिक अडचणी व शैक्षणिक दृष्ट्या योग्य वेळेवर घेतलेले योग्य निर्णय निर्णायक ठरले. त्या लांब अथक प्रवासात मी एवढा महत्त्वाकांक्षी कसा झालो? मोठ-मोठी स्वप्ने कशी बघितली?

मला भव्यदिव्य काहीतरी करण्याची उर्मी लहानपणापासून होती. जेव्हा मी एकेक पायरी चढत होतो, एकेका अडचणीवर मात करत होतो, तेव्हा माझ्या आत्मविश्वासात कमालीची वृद्धी होत होती. मी करत असलेल्या प्रयत्नांतून मला बऱ्याच अंशी यश मिळत होते. पुढे, सामाजिक बांधिलकीशी नाळ जोडली गेल्यामुळे व लोकसेवेची नशा चढल्यामुळे मी त्या क्षेत्रातील अत्युच्च ध्येयाकडे अग्रेसर होत गेलो.

मी तीन कारणांनी मोठा विचार करायला शिकलो. एक म्हणजे सामाजिक जीवनात मिळालेल्या वागणुकीमुळे व अनुभवांमुळे समाजासाठी काहीतरी मोठे व प्रत्यक्ष करण्याची चढलेली नशा. दोन, हातून सुटलेल्या काही गोष्टींमुळे, जसे एकतर्फी प्रेम, पैशाअभावी मित्रांबरोबर न केलेले काही कोर्सेस - मनात वाढलेल्या शून्य भावनेला शमवण्यासाठी व स्वत:ला सिद्ध करण्यासाठी काहीतरी मोठे व वेगळे करून दाखवण्याची जागृत झालेली उर्मी; आणि तिसरे व मूलभूत कारण म्हणजे लहानपणापासून काहीतरी भव्यदिव्य करण्याची लागलेली ओढ.

माझ्यासारख्या, घरात चोरी करणाऱ्या बेडर पोराला समाजाची चिंता कशी व का वाटू लागली? आश्चर्य आहे, नाही?

शाळेतून बाहेर पडल्यावर व कृत्रिम प्रभावाचा कोट फेकल्यावर माझा खऱ्या अर्थाने मानसिक विकास सुरू झाला. गांधी, फुले, विवेकानंद यांनी माझ्या डोळ्यांची झापडे फाडकन उघडली. अचानक मला सगळीकडे सामाजिक अव्यवस्था दिसू लागली. लहानपणी असमंजसपणाचा कळस असलेला मी अचानक वैचारिक दृष्ट्या प्रौढ झालो. या वैचारिक चर्वणाचा परिणाम असा झाला, की आर्थिक गुलामगिरीतून बाहेर पडण्यासाठी चाललेल्या माझ्या प्रयत्नांना सामाजिक बांधिलकीचा नवा आयाम आला व पुढे जाऊन तो मध्यवर्ती, महत्त्वाचा बनला. त्यापुढे इतर गोष्टी दुय्यम झाल्या.

थोडक्यात काहीतरी अद्भुत करायला निघालेल्या ‘मी’ला वाचनातून झालेल्या संस्कारांनी व गांधीजी, फुले, विवेकानंदांच्या विचारांनी योग्य दिशा दाखवली तर आईवडिलांपासून संक्रमित झालेल्या व परिस्थितीनुरूप शिकलेल्या जीवनमूल्यांनी ध्येय साध्य करण्यामध्ये मोलाचा वाटा उचलला. यामध्ये खडतर कौटुंबिक परिस्थिती ही मार्गातील बाधा न ठरता अपयश पचवून घ्यायला, वयापेक्षा जास्त शहाणपण शिकवायला कारणीभूत ठरली. योग्य वेळेला मिळत गेलेल्या कष्टाचे फळही अपेक्षा उंचावणारे व नवनवीन क्षितिजे काबीज करण्याची प्रेरणा देणारे ठरले.

जसे माझे गाव तसे माझे घर. कधी-कुणाच्या अध्यात नाही की मध्यात नाही. आमचा परिवार दोन बिघ्यांत कसा उदरनिर्वाह भागवतो, याचे गावाला कुतूहल. माझी माऊली म्हणजे आई, जिला आम्ही ‘ताई’ म्हणतो - तिचा गावभर दरारा. सरळमार्गी, प्रामाणिक, सोज्वळ स्त्री. तिला खोटे बोलणे, चुगली करणे, आळस या गोष्टींची अतिशय चीड. तिच्या रगारगात स्वाभिमान भरलेला. त्यामुळे तिच्याबद्दल गल्लीतल्या स्त्रियांमध्ये आदरयुक्त भीती, मी नेहमी पाहिली आहे.

ताईचा जन्म भुसावळमध्ये एका मजूर कुटुंबात झाला. आजोबा रेल्वेमध्ये कामाला जात होते. ताई तशी एकटीच बहिण व तिला तीन मोठे व एक लहान भाऊ. घरातील सर्वजण मजूर म्हणून काम करत. ताईची माय म्हणजे माझी आजी रोज दगड फोडायला जाई. तिला मोठे दोघे मुलं मदत करत. ताई लहान असल्यामुळे शाळेत जाई व लहान भावाला सांभाळी. पुढे लहान भावाला सांभाळण्यासाठी तिला तिची शाळा कायमची सोडावी लागली. शाळा सोडताना ती हुशार असल्यामुळे शिक्षकांनी आजोबांजवळ कसा हट्ट धरला होता याविषयी ताई कधीकधी आम्हाला सांगते. तापी नदीला आलेल्या पुरात आजोबांचे बिऱ्हाड वाहून गेले व त्यांनी भुसावळ सोडले. पोटासाठी वणवण भटकल्यावर ते कुरंगी नावाच्या गावात स्थिरावले. पुढे वयाच्या पंधराव्या वर्षीच ताईचे लग्न तिच्या मामांनी ठरवून दिले. दरम्यान ताईचे सारे भाऊ घराचे ओझे पेलण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी कामधंद्यासाठी निघून गेले. खूप लहानपणीच त्यांनी घर सोडल्यामुळे व पैसा बघितल्यामुळे भावाभावांमध्ये कधीच एकमेकांविषयी प्रेम राहिले नाही. मोठा भाऊ पुण्याजवळ स्थायिक झाला व त्याच्याच विश्वात रममाण झाला. मधलाही भाऊ पुण्यात वेगळा राहू लागला. पुढे काही कारणाने त्याने घर सोडले व बायको-परिवाराला पूर्णत: सोडून कुठेतरी निघून गेला. अजूनही त्याचा पत्ता लागलेला नाही. इतर दोघेही भाऊ छोटेमोठे काम करू लागले. पुढे आजोबांचे डोळे गेले तसे आजीने घराची सूत्रे स्वत:कडे घेतली. मोठ्या हिमतीने मोलमजुरी करून, शेती करून स्वाभिमानाने व हिमतीने संसार केला. आजीचे हे सारे गुण जसेच्या तसे ताईमध्ये बघायला मिळतात. इतर मुले घराबद्दल थोडे बेफिकीर असल्यामुळे ताई व आजी एकमेकांच्या खूप जवळच्या होत्या.

ताईच्या लग्नाचा किस्सा खूप विचित्र आहे. आजोबांचे घोंगडे फाटके असले तरी ताईच्या मामाची परिस्थिती चांगली होती. ताईच्या लग्नाची सर्व जबाबदारी त्यांनी घेतली. कुठूनतरी अण्णांचे स्थळ त्यांच्याकडे आले. मुलगा एकटा आहे, भरपूर शिकत आहे व भरपूर जमीन आहे या हिशोबाने स्थळ पसंत झाले होते. मामा बघायला गेले असताना जमिनीविषयीचा खोटा आकडा त्यांना सांगण्यात आला. त्याला भुरळ पडून स्थळ पास करण्यात आले होते. ताई बऱ्याचदा बोलताना या गोष्टीचा उल्लेख करी. आपली शाळा सुटली नसती व संपत्तीचे खोटे गणित लग्नामध्ये दाखवले गेले नसते, तर आयुष्य वेगळ्या वळणावर असते असे तिला वाटे.

पुढे आजोबा वारल्यानंतर आजी एकटीच राहू लागली. ताई जवळच्याच गावात राहात

असल्यामुळे दोघींना एकमेकींचा आधार होता. ताईचे लग्न झाल्यावर खरी परिस्थिती उजेडात आली. घरात काही नाही. कमी शेती, त्यातली काही विकलेली तर काही गहाण, राहिलेल्या संपत्तीवर काही लोकांचा डोळा. या सर्व प्रकारामुळे ताईवर खूप लहान वयातच खूप मोठी जबाबदारी पडली. ताईने आजीच्या मदतीने सर्वांना तोंड देत स्वत:चा संसार उभा केला. पुढे दहावीनंतर अण्णांना लांब नोकरी लागली. अशावेळी नोकरीचे ठिकाण व घर यामध्ये ताईची कसरत चालू राहिली.

ताईच्या व आजीच्या सलगीमुळे भावाभावांमध्ये वितुष्ट निर्माण झाले. आई मुलीला घबाड देते असा आरोप करून मोठे दोन मामा आजीशी भांडू लागले. आजीच्या स्वाभिमानाला यामुळे ठेच पोहोचली व ती मुलांपासून कायमची दूर झाली. ताईचेही याच कारणांमुळे मोठ्या भावांशी बिनसले. आजही त्यांच्यातील बहीणभावाचे नाते तुटल्यासारखे आहे.

जेव्हापासून मला कळू लागले तेव्हापासून मी ताई-अण्णांची कुटुंबासाठी चाललेली धडपड जवळून पाहिली आहे. आजोबा वारल्यानंतर वडील लांबची नोकरी सोडून घरी आले आणि त्यांच्या संसाराला ग्रहण लागले; पण कोरडवाहू शेती, दागिने विकून विहिरीवर मोटार बसवण्यात आली. ताई-अण्णा, दोघे शिंप्याचे काम शिकले आणि कुटुंबात आम्हाला दोन वेळची भाकरी व्यवस्थित मिळू लागली.

आमचे अण्णा, म्हणजे माझे वडील. खूपच सरळ स्वभावाचे; शीघ्रकोपी, देवावर विश्वास ठेवणारे; पण गावात ते लोकांसाठी नसल्यासारखे असतात. लहान वयात त्यांची आई गेल्याने त्यांची जडणघडण वेगळ्या पद्धतीने झाल्याची जाणीव होते. 'तो अण्णा का हो भलता देवमाणूस से हो!' अशी त्यांच्याबद्दलची प्रतिक्रिया. घरात मात्र वातावरण वेगळे असायचे. अण्णा शब्दाशब्दाला चिडणार. त्यामुळे घरातील तापमान नेहमी जास्त; मात्र आई तेवढीच शांत.

माझी आजी, म्हणजे अण्णांची आई, खूप आजारी असे. त्यांना बरीच मुलं होऊन मेली होती. फक्त नवसाचा एक मुलगा व मुलगी काय ते वाचले. तिच्या आजारपणामुळे अण्णांना लहानपणापासून आत्याकडे गिरडला ठेवलेले होते. अशातच अण्णा आठवीत असतांना आजी वारली. आजीच्या आजारपणात बराच पैसा खर्च झाला. त्यामुळे बरीच शेती विकावी लागली. आजोबा खूपच भोळसट असल्यामुळे त्यांना जेव्हा पाहिजे तेव्हा थोडी मदत करण्यात आली व शेवटी काही हिशोब न लावता त्यांच्या जमिनीचा ताबा घेण्यात आला. लग्नाच्या निमित्ताने बघायला आलेल्या पाहुण्यांना सुरुवातीला जेवढी जमीन होती तेवढी दाखवण्यात आली.

आण्णांच्या बालपणातील एकदंर वाताहतीचा परिणाम त्यांच्या स्वभावावर स्पष्ट दिसून येतो. मनातील नेहमी असुरक्षिततेची भावना, स्वत:च्या क्षमतेविषयी उगाच अविश्वास, जवळच्या नातेवाईकांविषयी थोडे बेफिकीर वागणे यासारख्या त्यांच्या काही स्वभावगुणांमध्ये बालपणीच्या जडणघडीचा पडसाद दिसतो. दहावीनंतर आय टी आय चा कोर्स करून ते कोयना पॉवरहाऊसला फिटर म्हणून लागले होते. आजोबा असेपर्यंत काही वर्षे त्यांनी तिथे संसार थाटला. परंतु आजोबा गावाला, मामा पुण्याला अशा परिस्थितित पुण्यात टेल्कोमध्ये काम मिळेल या आशेवर मामाच्या सांगण्यावरून त्यांनी नोकरी सोडली व पुण्यात टेल्कोत नोकरी पत्करली. या दरम्यान पंचाहत्तरच्या आणीबाणीत टेल्कोने बऱ्याच लोकांना कामावरून काढले. त्यात आण्णांचाही नंबर लागला. पुणे नवीन, त्यात चांगली नोकरी सोडून पुण्याला आले व लगेचच विचित्र परिस्थितीचा सामना करावा लागला यामुळे त्यांचा आत्मविश्वास डळमळला. काही दिवस वेगवेगळ्या

कंपन्यामध्ये त्यांनी अर्ज केले पण काही उपयोग झाला नाही. पुढे मामांनाही त्यांची अडचण होऊ लागली. शेवटी कंटाळून त्यांनी गावाचा रस्ता धरला.

त्यांच्या स्वभावात एक विचित्र गोष्ट आहे. कोणत्याही नवीन गोष्टीला सामोरे जाताना त्यांना नेहमी भीती वाटते. हिंमत, चातुर्य, झोकून द्यायची त्यांची प्रवृत्ती नाही. त्यामुळे पुण्यासारख्या भरभराटीच्या जागेला सोडून, गावात काही संपत्ती नसताना व त्यांच्या क्षमतेला कोणताही वाव नसताना त्यांनी गावाकडे यायचा निर्णय घेतला. त्यांच्या या स्वभावगुणांना लहानपणापासून पाहिल्याने व त्याच्या झळा संपूर्ण परिवाराला भोगाव्या लागल्यामुळे मी जास्तच धीट झालो व त्या प्रवृत्तीचा शत्रू बनलो. ते परिस्थितीपुढे नतमस्तक होत राहिले तर मी परिस्थितीला आपले वाहन करून त्यावर आरूढ व्हायला शिकलो.

प्रत्येक कामाविषयी अण्णांची प्रतिक्रिया नकारात्मक असे. ताई म्हणजे आई. तिला जगाकडे सकारात्मक बघण्यात स्वारस्य होते. त्यामुळे बऱ्याचदा, तिच्या म्हणण्याप्रमाणे घडायचे. आर्थिक अडचणींमुळे ताई-अण्णांच्या आयुष्यात नेहमी तणाव असायचा. अण्णा नेहमी पैशांविषयी विचार करणार. त्यामुळे त्यांना रात्र-रात्र झोप नसायची. ताई-अण्णांच्या संस्कारामुळे आम्हा चौघा भावंडांना कष्ट करण्याची सवय लागली. ताईने आयुष्यात कधी स्वत:चा बांध ओलांडून दुसऱ्याच्या बांधावरील वस्तू घेतली नाही. तिचे ‘अंथरूण तेवढे पाय पसरा’ म्हणणे आमच्या हृदयावर शिलालेखासारखे कोरले गेले.

मी अगदी लहान असल्यापासून ताई, माझी अक्का (म्हणजे मोठी बहीण) मोलमजुरी करायच्या. रात्री बसून ताई उशिरापर्यंत कपडे शिवायची आणि अण्णा शेताकडे बघायचे. त्यामुळे तसे बघता, आम्ही खाऊनपिऊन सुखी होतो. शाळेतून आल्यावर कोंबड्या आणि बकऱ्यांकडे बघण्याचे काम माझ्याकडे असायचे. माझा दिनक्रम शिवून झालेले कपडे देणे, छोट्यामोठ्या कामात अण्णांना मदत करणे, असा असायचा. मीच माझ्या पाठीवरच्या दोघी बहिणी उषा व प्रतिभा यांना सांभाळायचे कामही करायचो. आजही आठवते, की लग्नसराईत ताईकडे शिवण्याचे काम खूप असायचे. गावात फक्त ताई चोळी शिवत असल्यामुळे सर्व म्हाताऱ्या ताईकडे यायच्या. अक्का ही ताईची डुप्लिकेट कॉपी होती. ती अगदी लहानपणापासून शाळा करतानाच दुसऱ्याच्या शेतात कामाला जायला लागली. ती सर्वांसाठी रांधायची. त्यामुळे तिचा आई-वडिलांना मोठा आधार होता. पुढे, ती शेतातील भाजीपाला शेजारच्या भातखेडे गावात विकायला जायची. प्रत्येक पैशाचा हिशोब चोख ठेवायची; वेळ मिळालाच तर कपडेही शिवायची. या सर्व गुणांमुळे ती सर्वांची लाडकी होती. सर्वजण तिच्या कामाची तारीफ करायचे.

माझे मात्र उलटे होते. मी ताई-अण्णांच्या उपयोगाला येण्याऐवजी त्यांच्या डोक्याची ब्याद जास्त ठरलो. लहानपणापासून भरपूर खेळायचो, हुंदडायचो, भिल्लांच्या पोरांमध्ये मासे धरायला जायचो तर महारांच्या पोरात ‘बधीटाक’ खेळायचो. माझे घरातील कोणत्याही गोष्टीकडे लक्ष नसायचे. दिवसभर खेळून दमल्यावर घर गाठायचे. असे प्रत्येक दिवशी चालायचे. मीही तसाच काम करायला मागे नव्हतो; किंबहुना, घरात काम करणे खूप गरजेचे होते.

माझे पहिले काम मला स्पष्ट आठवते. मी आठ-नऊ वर्षांचा असेन. दिवाळीच्या आसपास कापूस वेचणीची गडबड चालत असे. अशावेळी मजूर मिळणे दुरापास्त होई. अशावेळी शाळेतल्या मुलांनाही कामावर लावले जाई. आक्का खूप लहान असल्यापासून कापूस वेचीत असे. त्यावर्षी मजुराची एका दिवसाची मजुरी चार रुपये होती. नुकतीच दिवाळीची सुटी लागली होती. आपणही

कापूस वेचू शकतो याची मला खात्री होती व कामावर जाऊन दोन रुपये कमवण्याची इच्छा झाली होती. माधवजि भाऊच्या घरचा वखा सर्वप्रथम आला. माझ्या काम करण्याला त्यांनी रजामंदी दाखवली व माझ्या कामाचा श्रीगणेशा झाला. कापूस वेचण्याची गंमत काही औरच होती. कापसामध्ये बऱ्याचदा ओळीने तूर लावलेली असे, शेतभर खिऱ्याचे वेल पसलेले असत किंवा बांधावर बोरांची झाडे असत. त्यामुळे दिवसभर तुरीच्या शेंगा, बोरे यावर ताव मारणे चालू राहत असे. मोठ्या माणसांना दोन ओळी, लहान मुलांना एक ओळ याप्रमाणे हिशोब होता. त्यामुळे आपल्या ओळीचा कापूस भराभर वेचून उरलेल्या वेळात हा उपद्व्याप चालत असे. बऱ्याचदा बरोबरची मुलेही वेचायला असल्यावर त्यांच्याबरोबर गाणे, गोष्टी व कधीकधी भांडणामध्ये वेळ कुठे निघून जाई याचा पत्ताही लागत नसे.

शेतात दिवसभर वेगवेगळ्या विषयांवर गप्पा चालत. सासुरवाशिणीला शेताचे काम म्हणजे घरातील जाचापासून तात्पुरती सुटका वाटत असे. काही सुना त्यांना सासूकडून होणाऱ्या जाचाविषयी मन मोकळे करत. नणंद, नवरा व इतर यांच्यामुळे होणाऱ्या त्रासाविषयी सांगत. खाण्यापिण्यापासून देण्याघेण्यापर्यंत होणारा दुजाभाव,माहेरच्यांची सासरी होणारी हेटाळणी, हुंड्यावरून टोचून बोलणे इत्यादी अनेक विषय चर्चेचा भाग होई. कधीकधी माहेरी असलेल्या समस्येविषयी सासुरवाशिणी चिंता व्यक्त करत. लग्नाला एक दोन वर्षे झालेल्या सासुरवाशिणीत या प्रकारच्या समस्या जास्त असत. कधीतरी सासऱ्याच्या किंवा दिराच्या वाईट नजरेपासून ते रात्री एकत्र येण्यासाठी होणाऱ्या विघ्नांविषयी त्या बोलत. असे विषय असल्यावर बाया हळू आवाजात एकमेकांजवळ पुटपुटत. शेतातही ज्या बायकांच्या माहेरची परिस्थिती बरी असे, त्या नेहमी माहेरचे गुणगाण करत व नेहमी तोऱ्यात राहात.

मला आठवते माझी एक लांबची वहिनी. बऱ्याचदा आमच्या घोळक्याबरोबर कामाला येत असे. तिचा नवरा जवळजवळ रोजच तिला मारीत असे. कधी स्वयंपाक चांगला झाला नाही म्हणून तर, कधी उगाच तिच्यावर संशय घेऊन तिला मनसोक्त मारीत असे. बऱ्याचदा ती सुजलेल्या ओठाने, किंवा रक्तबंबाळ डोक्याने कामावर येत असे. शेतात सर्वांसमोर तिला खूप रडू येई. पुढेपुढे तिने रडणेही बंद केले. तिचा नवरा उद्धट व दांडकट असल्यामुळे कुणी त्याच्या नादी लागत नसे. आता तिची मुले मोठी झाली आहेत. बापाने गुरगुर करताच, मुले आईच्या रक्षणासाठी त्याच्यावर धावून जातात.

घोळक्यात कधीकधी म्हाताऱ्याही असत. त्यांची तक्रार त्यांच्या सुनांविषयी असे. खायचा दुजाभाव, म्हातारीच्या आजाराकडे केलेले दुर्लक्ष, आडवेतिडवे बोलणे यामुळे दुखावलेल्या म्हाताऱ्या बऱ्याचदा रडून आपले मन मोकळे करीत. त्याचबरोबर आपापसातील वाद शेतात चव्हाट्यावर येत व परिस्थिती हमरीतुमरीवर येई. अशा सर्व गमतीजमतींमुळे शेतात काम करणे खूप सुखकर वाटे.

या कामांच्या पैशातून दिवाळीच्या सुट्टीत कपडे आणि आखाजीच्या (अक्षय तृतीया) सुट्टीत पुस्तकांची व्यवस्था होत असे. मधल्या काळात अक्काबरोबर तिला भाजीपाला विकण्यासाठी मी सकाळी सामील होत असे. रात्री कधीतरी अण्णांबरोबर पाणी द्यायला शेतात जात असे. शिवाय, शेतातले काही महत्त्वाचे काम असले की, आम्हाला शाळा बुडवून शेताचा रस्ता धरावा लागे.

मी बऱ्याचदा सकाळी उठून अक्काबरोबर भाजीपाला विकायला जाई. मला त्या गोष्टीचा खूप कंटाळा येत असे. सकाळच्या गाढ झोपेतून मला दामटावून उठवले जाई. सूर्य उगवायच्या आत,

आम्ही भातखेड्यात पोचत असू. एखाद्या दिवशी उशीर झाल्यास आमच्या विक्रीवर त्याचा परिणाम होत असे, कारण सकाळी सकाळीच लोकांचा कालवणाबद्दल निर्णय झालेला असे. न जाण्याचा बहाणा मी नेहमी शोधत असे. थंडीच्या दिवसांत तर बऱ्याचदा नकोसे होई. मी रडकुंडीला येत असे. परंतु मला त्या कामापासून कधी सुटका मिळाली नाही.

असेच काहीसे अण्णांबरोबर रात्री शेतात जाण्याबद्दल होत असे. विहिरीला जास्त पाणी नसल्यामुळे आणि भरपूर भागीदार असल्यामुळे बऱ्याचदा पिकाला रात्री पाणी द्यावे लागे. अशा वेळी फक्त मला अण्णांबरोबर जावे लागे. शेतात पोचल्यावर मी लागलीच गोधडीवर आडवा होई. मध्यरात्री कधीतरी जेव्हा विहिरीचे पाणी संपे तेव्हा अण्णा मला उठवत व आम्ही घरी येत असू, पण माझी पुन्हा झोपमोड होई. मला या सर्व उपद्व्यापाचा भारी कंटाळा येई, पण अण्णांपुढे बोलायची हिंमत होत नसे.

गावात मी एक उनाड, बंड मुलगा म्हणून प्रसिद्ध होतो. नेहमी काहीतरी खोड्या करणार, घरी भांडण आणणार. अनेकदा, सर्वजण शेतात गेल्याने संध्याकाळी कोंबड्या-बकऱ्यांची व्यवस्था माझ्याकडे असायची; परंतु बऱ्याचदा, मी खेळण्यात दंग राहायचो किंवा गावातील एकच अशा टीव्हीवर शनिवारी किंवा रविवारचा सिनेमा बघत बसलेला असायचो. अशीच एकदा शेतात ज्वारी कापली जात होती. शनिवारची शाळा असल्याने, मी शाळेतून लवकर घरी आलो होतो. त्या दिवशी कोंबड्या- बकऱ्यांची जबाबदारी माझ्यावर होती आणि मी मात्र अशोकतात्याच्या घरात टीव्हीवर सिनेमा बघण्यात गर्क होतो. साडेसात वाजता जेव्हा मी घरात आलो तेव्हा अंधार झालेला होता. कोंबड्या दाराजवळ जमा होऊन चिवचिवाट करत होत्या, त्या संधीचा फायदा घेऊन मांजराने दोन कोंबड्या फस्त केल्या. त्यानंतर आई घरी आल्यानंतर माझी काय बडवणूक झाली म्हणून सांगता!

मला खेळण्याचा नाद होता. क्रिकेट, कबड्डी, गोट्या, विटीदांडू, सूरपारंब्या, पत्ते हे सारे माझे आवडते खेळ होते.

क्रिकेटमध्ये मी चांगलाच रमत असे. माझ्या गावात माझ्या मित्रांबरोबर क्रिकेट चाले. आम्ही तासन् तास क्रिकेट खेळत असू. प्रत्येकाच्या घरातील लोकांच्या डोक्याला हा ताप होता. खेळून आयुष्यात काहीच मिळू शकत नाही असा सर्वसाधारण समज होता. आम्ही लाकडाच्या फळीने खेळत असू. ती आमची बॅट, हा ताईचा रागाचा विषय असे. चुकून बॅट घरात आलीच तर मला नकळत, ती चुलीत जात असे. त्यामुळे चुकूनही, कोणी बॅट माझ्या घरी ठेवत नसे.

चिलीपाटी हा कबड्डी, हुतूतू या प्रकारचा खानदेशातील ग्रामीण भागात खेळला जाणारा खेळ आहे. त्यात एका पक्षातील सर्व मुले सरळ रेखाटलेल्या एका रेषेत उभी राहतात. विरुद्ध पक्षाची मुले रेषेच्या दुसऱ्या बाजूला असतात. त्यांच्यातला चुणचुणीत व चपळ मुलगा चिली बनलेला असतो. त्यांचा पूर्ण खटाटोप चिलीला एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे नेण्याचा असतो. चिलीने साईड बदलली म्हणजे डाव संपतो.

कधीकधी मलाही चिली होण्याची संधी मिळे, परंतु मी चिली म्हणून तेवढा यशस्वी होत नसे. विलास नावाचा आमचा सवंगडी चिली होण्यासाठी प्रसिद्ध होता. तो बुटका व चपळ असल्याने प्रतिस्पर्ध्यांची झुंज चालू असताना नकळत चपळाईने रेषा पार करत असे. त्याची चपळता वाखाणण्याजोगी होती. खेळता खेळता, बऱ्याचदा भांडणही होई. कारण प्रतिस्पर्ध्याला रेषेवरून हलवण्यासाठी एखाद्याला हात धरून किंवा पाय धरून ओढावे लागे, उभ्या असलेल्या

प्रतिस्पर्ध्याला जोरात ढकलावे लागे. त्यामुळे कधीकधी, काही महाभागांचा हातपाय दुखावला जाई व त्यावरून शिवीगाळ सुरू होई. सध्या क्रिकेटसारखे खेळ पुढे आल्याने चिलीपाटी खेड्यापाड्यात आपले अस्तित्व टिकवण्यासाठी झगडताना दिसतो.

विटीदांडू व गोट्या हे प्रामुख्याने सर्व थरात खेळले जाणारे खेळ, कारण यात काही फारसा खर्च नसतो व कमीतकमी गड्यांमध्ये हे खेळ खेळले जातात. खूप लहानपणापासून मी या दोन्ही खेळात पटाईत होतो. विटीदांडूमध्ये जेवढे खेळाडू असायचे तेवढ्यांना दोन गटात विभागण्यात येई. मग एक गट गुण करणार, यात त्या गटाचा प्रत्येक सदस्य बधिमधून विटी कोलणार, जर कोललेली विटी वरच्या वर झेलली गेली किंवा पडलेल्या ठिकाणावरून मारल्यावर दांडूला लागली तर तो सदस्य बाद होत असे. परत फेकलेल्या विटीला खेळणारा सदस्य हळूच उंचावून मारत असे. जेवढ्या दूर अंतरावर विटी जाईल ते आंतर दांडूच्या स्वरूपात अनुमानाने मोजले जाई. अशाप्रकारे जर सर्व खेळांडूचे मिळून दांडूचे गुण, निर्धारित गुणांपेक्षा जास्त  झाले तर तो संघ विजयी होई. हरलेला संघ मग डाव चुकवत असे. विजयी संघातील खेळाडू, एका पाठोपाठ एक खेळाडू, एकेकदा करून विटीला मारत व शक्य तेवढ्या दूर पाठवत. हरलेल्या संघातील एकेक खेळाडू कबड्डी कबड्डी म्हणत एका दमात एकानंतर एक मिळून बधिपर्यंत येण्याचा प्रयत्न करीत. जर बधीपर्यंत येण्यापूर्वीच त्यांचा दम संपल्यास परत डाव द्यावा लागत असे. अन्यथा परत खेळ सुरू होत असे. या खेळात बऱ्याच ठिकाणी खोटे बोलायला व संशय घ्यायला जागा आहे. साधारणत: कबड्डी कबड्डी म्हणताना श्वास सोडला किंवा नाही यावरून  बऱ्याचदा वाद होत असे. कधीकधी दोन गटात मारामाऱ्या, शिवीगाळ होई व प्रकरण घरापर्यंतही जाई. बऱ्याचदा खेळता खेळता, काही धुरंधर डाव आपल्याविरुद्ध जायला लागला की कोणत्याही कारणाने पोबारा करत आणि मग वाद निर्माण होई. माझ्या घरी मात्र मार्शल लॉ लागलेला असे. चुकून जर विटीदांडू कुठे घरात आढळला तर चुलीत तो एखाद्या भाकरीच्या नावाने शहीद होत असे.

विटीदांडूच्या मानाने गोट्यांचा खेळ तसा खूप किचकट. त्यातही माझा नेम चांगला होता. यामुळे माझ्याकडे गोट्यांचा खूप संग्रह होई व त्यांना सांभाळणे दुरापास्त होई. लहानपणी मला आठवते, गावात काही विशिष्ट मुलेच खेळत. इतर बरीच मुले कधीही घराचा दरवाजा ओलांडत नसत. अशा मुलांबद्दल त्यांचे आई-वडिल व इतरही लोक खूप कौतुक करत. पुढे ही मुले जशी होती तशीच राहिली. कुठेही म्हणण्यासारखे काहीच करु शकली नाहीत. लहानपणी कधीकधी मला त्यांचा हेवा वाटत असे.

'बधिटाक' हा खेळ कमी व जुगार जास्त आहे. त्यात जमिनीवर एक लहानसा खड्डा केलेला असतो. जेवढे खेळणारे असतात तेवढी नाणी या खेळात वापरली जातात. क्रमाक्रमाने खेळाडू एका विशिष्ट जागेवरून एकत्र केलेली ही नाणी त्या खड्ड्यात म्हणजेच बधीत फेकतो. त्यातली काही नाणी बधीत पडतात तर काही इतरत्र विखुरली जातात. यानंतर त्या खेळाडूला विशिष्ट एका नाण्याला एका दगडाने मारण्याविषयी सांगितले जाते. जर तो नाण्याला अचूक टिपू शकला तर तो सर्व नाणी जिंकत असतो. त्याचा नेम चुकल्यास तो बधीत पडलेली सर्व नाणी गमावतो आणि जर चुकून त्याचा दगड इतर कोणत्या नाण्याला लागला तर त्याला खिशातून अजून एक नाणे गल्ल्यात टाकावे लागते. नेम धरण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या दगडाला 'डाव' असे म्हटले जाते.

या खेळात वयाला फारसे महत्त्व नाही. त्यामुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व तो खेळतात.

बधिटाक जुगार असल्याने त्याकडे तुच्छ भावनेने बघितले जाते. प्रतिष्ठित घरातला पुरुष किंवा मुले तो खेळायचे टाळतात. मी मात्र देहभान हरपून तो खेळ मनसोक्त खेळत असे. मी बऱ्याचदा त्यात जिंके. मी काही विशिष्ट भांडवलावर खेळ खेळी; हरल्यावर पुन्हा हातात पैसे लागेपर्यंत हात चोळत बसण्याशिवाय व इतरांची गंमत बघत बसण्याशिवाय गत्यंतर नसे.

याबाबतीत एका टप्प्यावर बेजबाबदारपणाच्या सर्व हद्दी मी पार केलेल्या होत्या व त्याचा परिणाम माझ्या सर्व वर्तनावर झाला होता. ताई, अण्णा व अक्का सर्वजण शेतात जात असल्यामुळे कधीकधी माझ्यावर कोंबड्या, बकऱ्या घरात घालणे, सरपण चुलीजवळ ठेवणे, दिवाबत्ती करणे, दळण दळून आणणे इत्यादी कामे सोपवली जात, पण मी ही कामे क्वचितच पूर्ण करी. कुत्र्याच्या शेपटीसारखी माझी गत होती. हातात धरल्यावर ताठ; हात सोडल्यावर परत वाकलेली. सुट्टीच्या दिवशी मात्र बऱ्याचदा शेतीची कामे करावीच लागत. अशा वेळी मला खेळाला अंतर देऊन खूप मोठा त्याग करावा लागे!

माझे सर्व सवंगडी उडाणटप्पू असल्याने सर्वांनाच घरच्यांचा रोष सहन करावा लागे. यामुळे आम्हाला बऱ्याचदा योग्य वेळी एकत्र जमणेही दुरापास्त होई. यावर तोडगा म्हणजे आम्ही इशाऱ्याचा किंवा कोडवर्डचा वापर करून एकमेकांना बोलावत असू. घरासमोरून ओरडत जाणे किंवा घरासमोर येऊन काहीतरी चाळे करणे वा शिट्या मारणे यांद्वारे आम्ही एकमेकांशी संवाद साधत असू. दुर्दैवाची बाब म्हणजे ताई-अण्णांनाही यातले काही कोडवर्ड माहीत झाले होते!

सुगीच्या दिवसात एकदा ज्वारी कापण्याचे ठरलेले होते. मोठ्या मुश्किलीने, ताईला दोन-तीन मजूर मिळाले होते. शेतकऱ्यांसाठी पेरणी व मळणी हे काम खूप महत्त्वाचे मानले जाते, कारण अनंत कालापासून या दोन गोष्टींवरच त्याची वर्षभराची गुजराण अवलंबून असते. लहानपणापासून ताई मला नेहमी एक म्हण ऐकवत असे. तिचा अर्थ - घरातील एखादी व्यक्ती मेलेली असली तरी तिचे प्रेत झाकून पेरणी करावी!

त्या दिवशी सकाळी उठल्या उठल्या, ताईने मला कंडे घेऊन मजूर येण्यापूर्वी शेतात जाण्याविषयी फर्मावले. साधारणत: त्याच वेळी मला निरोप मिळाला होता, की त्या दिवशी भातखेड्याच्या मुलांबरोबर आमची क्रिकेट मॅच आहे. मला मोठे संकट पडले. ताईने तो इशारा ओळखला व मला बजावून धमकी दिली की, जर का ‘तू खेवाले गया त तुनं तंगडं मोडसुं, गुपचूप वावरमा जाय.’ मी काही न बोलता गुपचूप खात राहिलो.

परंतु माझे विचारचक्र सुरू झाले. मी शेताची वाट धरली पण मन मसणवटीवर, जेथे मॅच होणार होती तेथे रेंगाळत होते. क्षणाला मॅचचा विचार तर क्षणाला ताईचा चेहरा माझ्या डोळ्यांसमोर येऊ लागला. ताईचे रागावणे व मारणे मला नवे नव्हते. मी पुन्हा एकदा त्यासाठी मनाची तयारी करु लागलो. आपल्यावाचून - मुख्य गोलंदाजावाचून - मॅच होणार ही कल्पनाच मला सहन होत नव्हती. शेवटी, पुन्हा एकदा ताईचा प्रसाद खाण्याची मानसिक तयारी केली व कंडे शेतात फेकून मसणवटीकडे बेभान पळत सुटलो. संध्याकाळी, आपल्याबरोबर काय व्यवहार होणार हा विचार मी पुरता बाजूला ठेवला.

मी पोचण्यापूर्वी मॅच सुरू झाली होती. आमच्या संघाची फलंदाजी होती. एव्हाना आमचा एक गडी बादही झाला होता. मला लांबून बघूनच मुलांनी गलका केला. आपला संघ मजबूत झाला म्हणून ते जोरजोरात ओरडू लागले. पुढे, तीन गडी बाद झाल्यावर, मी फलंदाजीला उतरलो.

इकडे, ताई शेतात पोचल्यावर तिला क्षणात काय झाले ते कळले. आपण एवढे बोलल्यावरही

व घरचे एवढे महत्त्वाचे काम असतानाही हा गेला हे बघून तिच्या तळपायाची आग मस्तकात गेली. मजुरांना कामाला लावून माझी कायमची खोड मोडण्यासाठी ती हातात लांब काठी घेऊन, रणचंडीचे रूप धारण करून 'देखस हाऊ कसा मॅच खेस तें' अशी गर्जना करून मसणवटीच्या मार्गाने निघाली.

तिला स्मशानवटीच्या पन्नास हात लांबीवर असतानाच कुणीतरी बघितले. क्षणात कुजबूज सुरू झाली. मला काय झाले ते कळेना. काही क्षणांत, तिने मैदानात प्रवेश केला. नेमके तेव्हाच कुणीतरी ओरडले, 'बापू तुनी माय तुला माराले उनी'. मी काय समजायचे ते समजलो व ताई माझ्या अंगावर चालून यायच्या अगोदर बॅट भिरकावून विरुद्ध दिशेने बेभान पळत सुटलो. मी पळालेला बघून काठी घेऊन तीही माझ्या मागे पळू लागली. साधारणत: शंभर मीटर पळाल्यावर तिने शिव्या देऊन माझा पाठलाग बंद केला. मी तिचे ते उग्र रूप पहिल्यांदाच पाहात होतो. तो सर्व प्रकार बाहेरगावाहून आलेली मुले व जमलेली गावातील इतर मंडळी बघतच राहिली. त्या दिवशी संध्याकाळी माझी चपलेने अशी काही पूजा झाली की त्या आठवणीने अंगावर काटा उभा राहतो. त्यानंतर काही दिवस, त्यावर चर्चा करून मुले मला चिडवत राहिली.

ताई स्वभावाने प्रामाणिक होती. त्यामुळे तिला कोणी आडवेतिडवे बोललेले सहन होत नसे. अर्थात, ती स्वत:सुद्धा तिला कोणी कधी तसे बोलावे अशी वागत नसे; परंतु मी मात्र नेमका उलटा वागत असे. खोटे बोलणे, वेळेवर काम न करणे, अभ्यास न करणे, घराकडे लक्ष न देणे या माझ्या उद्योगांमुळे तिला मनस्ताप होई. माझ्यामुळे तिला लोकांचे बोलणे ऐकावे लागे. अण्णांचे बोचरे शब्द ऐकावे लागत. एकदा, मी असाच काहीतरी उपद्व्याप केल्यामुळे अण्णांनी मला तांब्या फेकून मारला होता. सुदैवाने, तो मला लागला नाही; परंतु त्यावरून ताई-अण्णांमध्ये भांडण झाले. त्या दिवसापासून, अण्णांनी तिला स्पष्ट शब्दांत बजावले, की 'तुना पोरग्या आणि तुले काय करान ते कर.'

त्यामुळे मला ठिकाणावर आणण्याची सर्व जबाबदारी तिच्यावर आली. मी मात्र रोज काहीतरी उपद्व्याप करत असे. संध्याकाळी शेतावरून आल्यावर माझा पराक्रम तिला माहीत व्हायचा, तेव्हा कामाचा सर्व शीण ती माझ्यावर काढत असे. त्यामुळे जवळजवळ रोज माझी चपलेने, काठीने किंवा हाताने पूजा होत असे. बऱ्याचदा, ती माझे संध्याकाळचे जेवण बंद ठेवत असे. ती मला त्याविषयी सकाळी जाताना बजावत असे. - 'आज जर का तू खेवाले गयास तर तुल सध्याकायन जेवनच देणार नाही.' एवढ्या बजावणीनंतरही माझ्या कार्यक्रमात क्वचित बदल होत असे. असे काहीतरी केल्यानंतर मला सहसा घरात प्रवेश नसे. मग मी संध्याकाळी घरासमोरील निंबाच्या झाडाजवळ जाऊन बसे. मला बघून आजुबाजूच्या शेजाऱ्यांमध्ये मिश्किली चर्चा होई, की मी निश्चितच काही तरी पराक्रम केलेला आहे! येणारा-जाणारा 'काय मग बापू, आज ताईना हातना प्रसाद का?' असे म्हणून चिडवत असे. अशा परिस्थितीत, सर्वांची जेवणे आटोपल्यावर ताईला दया आलीच तर ती अक्काला मला वाढायला सांगत असे. नाही तर, कधी कधी रागात मला काहीही न देण्याविषयी तिला बजावले जाई. मग मी सर्वजण झोपल्यावर हळूच माझ्या अंथरुणावर जाऊन झोपत असे. बऱ्याचदा, असा गुपचूप झोपल्यावरही तिच्या लाथा पडत असत. एवढे मारूनही किंवा सांगूनही हा मुलगा ऐकत का नाही व आपण ज्या गोष्टीला विरोध करतो तीच हा का करत असतो, याचे तिला कोडे पडलेले असायचे.

आईने कधीही कुणाशी भांडण न केल्यामुळे जेव्हा काही बायका माझ्याविषयी तक्रार घेऊन

तिच्याकडे येत, तेव्हा ती माझ्यावर खूप संतापत असे. तिने मला स्पष्ट शब्दांत बजावले होते, की 'कोणतीबी भानगड मना लोग आणू नको. काय करान ते तू स्वत: कर.' यामुळे मी सहसा कोणी मारल्यावर घरी तक्रार आणत नसे. जर भांडण करणारा, मारणारा माझ्यापेक्षा मोठा असला तर मी गुपचूप मार खाऊन, रडून घेत असे. त्यानंतर अश्रूंचे ओघळ पुसून घरी जात असे. मात्र, भांडणारा चुकून माझ्या बरोबरीचा किंवा माझ्यापेक्षा लहान असला तर मी त्याच्या अंगावर आपला हात साफ करत असे.

लहानपणापासून आतापर्यंत ताईसारखे स्वभावगुण व विचार असलेली व्यक्ती मी बघितलेली आठवत नाही. मजुराच्या घरात जन्म, पुढे हसायच्या, हिंदळायच्या वयात संसाराचा पडलेला भार, गरीबीने होरपळलेले आयुष्य, शीघ्रकोपी व स्वभावाविरुद्ध नवरा, त्यात माहेरून किंवा कोणत्याही नातेवाईकांकडून नसलेला मदतीचा हात - अशा परिस्थितीत विचारातील आणि आचरणातील साधेपणा व शुद्धपणा, कणखरपणा, विवेकबुद्धी, सचोटी व सकारात्मक दृष्टिकोन यासारखे तिच्या स्वभावधर्मातील गुण थक्क करणारे आहेत.

ताईच्या स्वभावातील स्वाभिमानी वृत्तीमुळे उगाच कुणाचा तोरा किंवा मोठेपणा तिने खपवून घेतला नाही. शिवाय खरे काय ते स्पष्ट बोलण्याच्या स्वभावामुळे, स्त्रियांना कमी लेखून त्यांच्या शालीनतेचा फायदा घेणाऱ्या ज्येष्ठ व्यक्तींचे तिच्याशी कधी जमले नाही. त्यांनी नेहमी तिला नमविण्याचा प्रयत्न केला, पण ते कधीही शक्य झाले नाही.

सहसा मृदू स्वभावाच्या ग्रामीण बायकांमध्ये तासनतास वेगवेगळ्या विषयांवर गप्पा मारून पूर्ण गावाच्या चुगल्या व भानगडीत तोंड खुपसण्याची सवय दिसून येते. पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुषांच्या विचारांबरोबर 'मम' म्हणणाऱ्या बायकांपेक्षा ताई वेगळी आहे. कुणाला राग आला तरी स्पष्टपणे एखाद्या विषयावर आपले परखड मत द्यायला ती मागेपुढे पाहात नाही. उगाच चुगली करणे, खोटेनाटे सांगणे, नकळत हो ला हो मिळवणे या गोष्टी क्वचितच तिच्याकडून झाल्या असाव्यात. तिच्या या स्वभावामुळे बऱ्याच बायका तिच्याशी सांभाळूनच वागत व उगाचच इकडच्या-तिकडच्या गप्पा मारत नसत.

गरीबीचे तीव्र चटके बसत असताना व सदासर्वदा सर्व बाबतीत ठिगळं बसवणे गरजेचे असतांना तिने आपले इमान राखले आहे. उगाच योग्यता नसताना एखाद्या गोष्टीची ईर्षा धरलेली नाही. मेहनतीचे, आपले जेवढे आहे, जसे आहे त्यावरच नेहमी ती समाधानी असते. या तिच्या आत्यंतिक खरेपणामुळे बऱ्याचदा बायका आचंबित होत, कधी ईर्षा करीत तर कधी द्वेष करीत. बऱ्याचदा, काही बायका तिच्यापुढे तोंडघशी पडत तर काही युक्तीवादामध्ये सपशेल चीतपट होत. त्यामुळे बऱ्याच बायकांना तिच्याबरोबर आरामाचे वाटत नसे.

एखाद्या क्षुद्र जागेत खूपच सामान्य माणसांबरोबर राहून, शिक्षणाचा अभाव असतानाही एखादी व्यक्ती इतका उदात्त विचार कशी करु शकते व तिच्या आवाक्यात न वाटणाऱ्या गोष्टी खूप सुंदरपणे कशी समजू शकते याचे मला नेहमी नवल वाटे. माझ्या पुढच्या प्रवासातील अनंत अडचणींना तोंड देताना तिच्या वैचारिक पाठबळाने खूप मोठी भूमिका बजावली. परीक्षांना सामोरे जायचा प्रसंग असो किंवा परीक्षेच्या निकालानंतरचे अपयश असो, तिच्या एकेका शब्दाने मन खूप हलके होत असे.

आम्ही चार भावंडे, म्हणजे तीन बहिणी व एक भाऊ असे आहोत. परंतु ताई-अण्णांनी आमच्यात कधीही भेदभाव केलेला नाही. किंबहुना, मला माझ्या वर्तनामुळे नेहमी बहिणींपेक्षा

जास्त वाईट वागणूक मिळाली. प्रतिभाच्या जन्मानंतर मात्र, अण्णांनी ताईला बराच त्रास दिला होता, कारण त्यांना मुलगा हवा होता. आमच्या आजीलाही माझ्यासाठी 'जोडबय' म्हणजे मुलगा पाहिजे होता. त्यामुळे प्रतिभाकडे कमी लक्ष देण्यात आले; परंतु ती लहानपणापासून गोरीगोमटी, सुदृढ होती व तिला कधीही कोणता आजार वा त्रास झाला नाही आणि त्यामुळे पालकांचे दुर्लक्ष झाले तरी खपून गेले.

आईच्या कणखरपणा संदर्भात व माझ्या विचित्रपणामुळे उद्भवलेल्या काही घटना माझ्या स्मृतिपटलावर कायमच्या कोरल्या गेल्या आहेत. मी दहा-बारा वर्षांचा असताना मला जुगार खेळण्याची वाईट सवय लागली. मी चोरून जुगार खेळत असे. सहसा, मी जुगारातले पैसे जुगारात वापरत असे. एकदा, गावातल्या एका बाईने तिच्या मुलाला औषध आणण्यासाठी मला काही पैसे दिले. आम्ही काही मुले हायस्कूलच्या शिक्षणासाठी आमच्या तालुक्याला, म्हणजे एरंडोलला, जात असल्याने अशा प्रकारची छोटी-मोठी कामे आम्ही करत असू. माझ्या दुर्दैवाने मी ते पैसे जुगारात हरलो. औषध आणण्यासाठी मी दोन-तीन दिवस बहाणेबाजी केली. ताईच्या लक्षात आल्यावर तिने खरे काय ते ओळखले व त्या बाईसमोरच माझी 'पूजा' करून पैसे कुठे गेले याची शहानिशा करून घेतली आणि शाळेतून घरी राहायची ऑर्डर दिली! त्यानंतर मी शेतात मजुरीवर जाऊन जेव्हा त्या बाईचे पैसे परत केले, तेव्हाच मला शाळेत परत जायची परवानगी मिळाली.

असाच एक प्रसंग आजही आठवला तरी अंगावर रोमांच उभे राहतात. थंडीचे दिवस होते. सहामाही परीक्षा तोंडावर आली होती. राजकपूरच्या स्मृतिदिनानिमित्त दूरदर्शनवर रात्री उशिरा त्याच्या चित्रपटाची मालिका सुरू होती. रोज एक सिनेमा दाखवण्यात येत होता. मी सिनेमाचा शौकिन नसलो तरी मला सिनेमाबद्दल आकर्षण होते. त्या दिवशी 'बॉबी' हा बहुचर्चित सिनेमा दाखवला जाणार होता. संध्याकाळीच आम्हा मुलांमध्ये खलबत होऊन तो सिनेमा बघायचाच यावर शिक्कामोर्तब झाले. सर्वांनी आठ वाजता पारावर जमावे व साडेदहापर्यंत कोपरा-कोपरी खेळून सर्वांनी टीव्हीवाल्या अशोक-तात्याकडे जावे असे ठरले.

मी जेवण करत असतानाच कुणीतरी दारासमोरून शिटी वाजवून गेले. ताईला कळून चुकले की, रात्री काहीतरी कार्यक्रम आहे! मी मात्र आपला काही संबंध नाही असा आव आणून, खाली मान घालून जेवत होतो. तिने दमटावून मला बजावले, 'कालदी परीक्षा से जर का तु बाहेर गया भडवा तुले घरमा लेनारच नाही.'

दुसऱ्या दिवशी, सहामाहीचा पेपर होता. परंतु माझे मन कधीच त्या गोष्टीपासून दूर गेले होते. परीक्षेविषयी मला फार चिंता नव्हती. नापास होण्याची भीती नव्हती व अभ्यास करून पहिला नंबर मिळवण्याची उत्सुकताही नव्हती. मनात अस्वस्थता सुरू झाली. मी पुस्तक धरून बसलो होतो, पण माझे मन पुस्तकात रमत नव्हते. काय करावे ते कळेना. एवढ्यात एक युक्ती सुचली. मी संडासाचे डबडे भरले आणि संडासाला निघण्याचा खोटा बहाणा करून घरातून बाहेर पडलो. डबडे उलटे करून मी पोबारा केला व पारावर सवंगड्यांना गाठले.

त्या दिवशी सिनेमा सुरू होईपर्यंत आम्ही पारावर खेळत राहिलो व नंतर टीव्हीसमोर जाऊन बसलो. पेंगत पेंगत दोन वाजेपर्यंत सिनेमा बघितला व संपल्यावर घरचा रस्ता धरला. सिनेमा संपल्यावर मला वास्तवाचे भान आले. एव्हाना थंडी वाढली होती. घराकडे पाय वळले तेव्हा मला ताईचा चेहरा आठवू लागला. ताई घरात शिरू देणार नाही हे माहीत असल्यामुळे माझा एक

सवंगडी, विलास त्याच्या घरी मला झोपायला येण्याविषयी विनवत होता, परंतु माझे स्वाभिमानी मन त्याला राजी होत नव्हते.

मी कसातरी घराजवळ येऊन पोचलो. घरात शिरण्यासाठी दार ठोठावण्याची माझी हिंमत होत नव्हती. झोप दाटून आली होती. कुणी तरी हळूच दार उघडावे व बोचऱ्या थंडीपासून आपली सुटका करून घरातल्या उबेत आश्रय द्यावा असे वाटत होते. मी स्वत:ला दोष देत होतो. आपण ताईचे म्हणणे ऐकले असते तर आरामात पांघरूण घेऊन झोपलो असतो असा विचार मनाला शिवून गेला.

पण माझी दार ठोठावण्याची हिंमत झाली नाही. मी तेथेच, ओसरीत रात्र घालवण्याचे ठरवले. माझ्या दुर्दैवाने ओसरीची अवस्था भयंकर होती. ओसरी खोदून तिला नुकताच गिलावा दिलेला होता. ओलाव्यामुळे ती कमालीची थंड झालेली होती. स्वेटर वगैरे प्रकार माहीत नसल्यामुळे फाटक्या सदऱ्यातून हवा शिरून सर्व अंगाला झोंबत होती.

ओसरीवर एका कोपऱ्यात नवीनच घेतलेली मसाला दळायची छोटी चक्की ठेवलेली होती. वडे व कुरड्या, डाळ व मिरची दळल्यामुळे चक्कीचा उग्र दर्प सगळीकडे पसरलेला होता. चक्की एका छोट्या ताडपत्रीने झाकलेली होती. शेवटी ती ताडपत्री काढून, तिचा अर्धाभाग जमिनीवर अंथरून आणि अर्धा पांघरून मी एका कोपऱ्यात पहुडलो. मिरचीच्या उग्र दर्पामुळे जीव गुदमरत होता. शेवटी मी तोंड उघडे ठेवून झोपलो.

माझा त्रास तेवढ्यावर संपलेला नव्हता. उघड्या तोंडावर डास बसू लागले. त्यामुळे क्षणाक्षणाला तोंड आतबाहेर करत होतो. डासांबरोबर माझा हा लपंडाव सकाळपर्यंत चालू असावा. मी या काणीवरून त्या काणीवर होऊन वेळ कसा तरी घालवत होतो. मला माझ्या चुकीचा पश्चात्ताप होत होता. शेवटी कुठेतरी पाच वाजता डोळ्याला डोळा लागला. एवढ्यात कमरेवर जोराची लाथ पडली. दुसरी लाथ पडण्याआधी मी खडबडून उठलो व बेभान पळत सुटलो. आईच्या आवाजातील कणखर सुनावणीमुळे गल्लीतील लोकांचे कान टवकारले होते. सकाळी सकाळी बापूने काहीतरी पराक्रम केला असेल, म्हणून ते दुर्लक्ष करून ते त्यांच्या कामाला लागले. मला मात्र ते सिनेमापुराण चांगले भोवले.

ताईच्या स्वभावातील वाखाणण्यायोग्य गुणांमध्ये धैर्य, धाडस व खंबीरपणा जास्त उठून दिसतात. एखादी गोष्ट तिने ठरवली किंवा ती योग्य आहे अशी तिची खात्री झाली तर ती पूर्ण करण्यासाठी ती कसलीही तमा बाळगत नाही. करताना कुणी आपल्याला काय म्हणेल, याचा ती यत्किंचितही विचार करत नाही.

तिच्या या गुणांची ओळख मला लहानपणीच झाली होती. सूर्यकिरणे तिरपी झालेली होती. घरातले काम करण्यासाठी ताई त्या दिवशी शेतातून लवकर आलेली होती. ताई पीठ दळण्यासाठी सुपड्याने धान्य निसत होती. मी, माझी मधली बहीण, उषाबरोबर खेळत होतो. आमच्यामध्ये क्षणाक्षणाला वाद होत होते व उषा ओरडून ताईकडे माझ्याविषयी तक्रार करत होती. एव्हाना, ताईने एक तीक्ष्ण कटाक्ष टाकून मला गोंधळ बंद करण्याविषयी खुणावले होते. शेतातून थकून आल्यावर साहजिकच माझ्या उपद्व्यापाने ती वैतागली होती. अचानक, आमचा वाद विकोपाला गेला व मी उषाला जोराची चापट मारून ताईपासून बचावासाठी सर्रकन निंबाच्या झाडावर चढलो.

सहसा, भांडणात चूक कोणाचीही असली तरी दोष माझ्यावर येई. कारण माझ्या विचित्रपणामुळे मीच चूक केली असेल असा सर्वांचा समज होई. सर्व काही ताईसमोर घडत होते.

मी झाडावर चढल्यामुळे मला शिक्षा होणार नाही याची जाणीव झाल्यावर उषा जास्तच रडू लागली. माझा समाचार नंतर घेण्याविषयी तिला आईने आश्वासन दिले, परंतु तरीही ती मानत नव्हती. तिचा आवाज वाढत होता. त्यामुळे ताईचा पारा चढला. मी बिनधास्त होतो कारण निंबावर कुणी काही करु शकणार नाही याची खात्री मला होती.

ताईने मला खाली उतरण्याविषयी बजावले. मी खाली उतरल्यावर माझे काय होईल याची मला चांगलीच जाणीव होती. शिव्यांची लाखोली ऐकून व एवढे बजावले जाऊनही मी उतरत नाही असे बघून ताईने एका घराला लावलेली उंच शिडी आणली व निंबाला लावली. ती शिडीने सरसर निंबावर चढून व हातात एक ओली काठी घेऊन माझ्याकडे सरसावली. मी वर चढून निंबाच्या शेंड्यावर जाऊन बसलो. तेथपर्यंत ताई येऊ शकणार नाही असे मला वाटले, परंतु माझी खोड पूर्ण मोडायची असा तिचा निर्धार दिसत होता. आश्चर्य म्हणजे माझ्या मागोमाग ती शेंड्यावर येऊन पोचली व संतापात तिने तिथेच मला काठीने बडवण्याचा कार्यक्रम सुरू केला. एव्हाना, आमचा गोंधळ ऐकून बरीच बायामाणसे झाडाखाली जमा झाली होती. ताईला कुणाचीच पर्वा नव्हती. जोपर्यंत तिच्या संपूर्ण रागाचे शमन होत नाही तोपर्यंत ती मला मारत होती.

ही बाईच असे काहीतरी करु शकते यात लोकांना शंका नव्हती. काही ताईच्या बाजूने तर काही ताईच्या कठोरपणाबद्दल तिला दोष देऊन निघून गेले. सहसा, ताईच्या बरोबर युक्तिवाद करण्याच्या भानगडीत ती मंडळी पडत नसे. कारण बऱ्याचदा, ताई त्यांचे दात त्यांच्या घशात घाली व त्यांच्या चुका त्यांना दाखवून देई.

आपल्या अशा विचित्र वागण्याने घरातील मंडळीना खूप त्रास होतो याची मला कधीकधी जाणीव होत असे. आपल्या वागण्याने त्यांना आनंद झाला पाहिजे असेही वाटे, परंतु माझ्याकडून असलेल्या त्यांच्या अपेक्षा व माझी रुची यांचा ताळमेळ बसत नसे. मला खूप खेळावेसे वाटे, मित्रांबरोबर हिंदळावेसे वाटे, घरातील काही कामांचा मला कंटाळा येई, शिवाय मला सारखा अभ्यास करावासा वाटत नसे; मात्र, घरातील मंडळींना मी या सर्व गोष्टी कराव्यात असा अट्टाहास असे. त्यामुळे मला त्यांच्या इच्छेविरुद्ध जावे लागे.

या कारणांमुळे घरी कितीही महत्त्वाचे काम असले तरी माझे पाय नकळत खेळाच्या मैदानाकडे वळत. ताई-अण्णा रात्रंदिवस कष्ट करत असल्यामुळे त्यांना माझ्याकडे लक्ष द्यायला वेळ नसे. मला एखादी गोष्ट एकदा सांगितल्यावर मी ती निमूटपणे केली पाहिजे अशी त्यांची अपेक्षा असे. मी मात्र माझ्याच तंद्रीत असे.

मला जेवढे आठवते, त्या दरम्यान मी ताई-अण्णांना खूप त्रास दिला होता. जेव्हापासून मला कळायला लागले तेव्हापासून क्वचितच, ताईने मला कधी जवळ घेतले वा प्रेमाने कुरवाळले असेल किंवा दोन शब्द समाधानाचे बोलली असेल. यावरून माझ्या उपद्व्यापांची कल्पना यावी. मला मात्र कधी-कधी खूप राग येत असे, की काही असले तरी आपण ताई-अण्णांचे एकुलते पुत्ररत्न आहोत, वंशाचा दिवा आहोत. तेव्हा तिने कधीतरी आपल्याला जवळ घ्यावे, आपले लाड करावे. अशी माझी अपेक्षा होती. मी जेव्हा इतरांना त्यांच्या एकुलत्या मुलाचे लाड करताना बघत असे, तेव्हा ती भावना अधिकच तीव्र होत असे.

मी ताई-अण्णांच्या माझ्याबरोबरच्या वर्तनाचा विचार करतो तेव्हा माझा त्यांच्याबद्दलचा आदर द्विगुणित होतो. त्यांनी वेळेवर माझ्या अवगुणांवर बोट ठेवले व त्यांचा कठोरपणाने बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे वेळोवेळी माझे अवगुण माझा पाठलाग करु लागले, त्यादरम्यान

जर त्यांनी माझ्यावर माया दाखवली असती व माझ्या अवगुणांना पाठीशी घातले असते तर नक्कीच आयुष्याला वेगळी दिशा मिळाली असती.

ताई-अण्णांनी माझ्या लहानपणापासून वाईट अशी लहानातली लहान गोष्टसुद्धा खपवून घेतली नाही. त्यांनी मला कधीही जाणीव होऊ दिली नाही, की मी एकुलता एक मुलगा आहे व माझी त्यांना खूप गरज आहे. बऱ्याचदा, मी जेव्हा इतर घरांतल्या एकुलत्या एक मुलांचे लाडकोड बघत असे तेव्हा मला ताई-अण्णांचा राग येई. आपण एकटे असूनही आपले लाडकोड न करता ते आपल्याशी कठोर वगतात म्हणून मी त्यांना दोष देई.

मी पहिलीत वा दुसरीत असतानाची गोष्ट आहे. मला अंघोळीचा व खास करून हिवाळ्यात अंघोळीचा खूप कंटाळा येई. त्यामुळे माझा ताईशी रोज सकाळी वाद होई. तिचे अनुशासन असतानाही मी बऱ्याचदा तिला चुकवून बिनाअंघोळीचा शाळा गाठी. माझ्या उपद्व्यापाला कंटाळून ताईने माझी तक्रार घराजवळच राहणाऱ्या वडिले गुरुजींकडे केली. त्यांनी मला धमकावल्यावर मी काही दिवस अंघोळ करून जात होतो.

गुरुजी रोज माझा करगोटा तपासत असत. तो ओला असला म्हणजे मी अंघोळ केली आहे याची त्यांना शाश्वती मिळे. मला त्या दरम्यान एक नवी युक्ती सुचली. मी फक्त करगोटा ओला करून, अंघोळ न करता जाऊ लागलो. गुरुजी मला चांगली सवय लागल्यामुळे खूश झाले!

माझा हा उपद्व्याप ताईच्या कानावर गेला. माझी खोड मोडण्यासाठी सर्व मुलांसमोर माझी अंघोळ करण्याचे फर्मान तिने गुरुजींसाठी जारी केले. मी मात्र सर्वांना कसे फसवले या आविर्भावात खूश होतो. एक दिवस असाच करगोट्याला पाणी लावून शाळेत आलेला होतो. त्या दिवशी वर्गातील सर्व मुलांना गुरुजींनी शाळेसमोरील पटांगणात जमायला सांगितले. आम्ही सर्व उड्या मारत पटांगणावर आलो. गुरुजी क्वचितच पटांगणावर नेत असल्याने आम्ही पटांगणावर जाण्यासाठी आसुसलेले असायचो.

सर्व मुले रांगेत उभी राहिल्यावर एक पाट, बादली व गडू मागवण्यात आला. मुलांमध्ये कुजबूज सुरू झाली. कुणालाही नेमके काय घडत आहे ते कळत नव्हते. शेवटी, त्यांनी सर्व मुलांमधून मला बाहेर बोलावले. त्यानंतर गुरुजी माझा प्रताप सर्वांना सांगू लागले. मला खूपच अवघडल्यासारखे होत होते. कधी असा दिवसही येईल असे मला वाटले नव्हते. नंतर माझे कपडे काढण्यात आले व मला सर्वांच्या समोर काळी माती लावून आंघोळ घालण्यात आली. क्षणाक्षणाला गलका होत होता. सर्व मुलांसाठी चांगली करमणूक झाली होती. मी मनातून तो प्रसंग कसातरी संपावा या विचाराने, खाली मान घालून सर्व सहन करत होतो. माझी कुणाकडे मान वर करून पाहण्याची हिंमत होत नव्हती.

पुढे कित्येक दिवस, मुले मला त्या प्रसंगावरून चिडवत राहिली. त्यामुळे माझी अंघोळ न करण्याची सवय मात्र कायमची मोडली. त्यापुढे मी बिनाअंघोळीचा कधी शाळेत गेल्याचे आठवत नाही. नंतर मला कळले की, त्या सगळ्या पाठीमागे ताईचे फर्मान होते. तिच्या कठोर धोरणामुळे माझी ती सवय गेली होती.

माझ्या वाचनाच्या नादामुळे माझी शाळेच्या ग्रंथपालाशी चांगली गट्टी जमली होती. त्यामुळे बऱ्याचदा मी एकापेक्षा जास्त पुस्तके घरी घेऊन येत असे. ताईला हे चांगले माहीत होते, की शाळेतून आठवड्याला फक्त एक पुस्तक मिळते. त्यामुळे जेव्हा तिच्या लक्षात आले, की माझ्याकडे एक छोटे ग्रंथालय तयार झाले आहे, तेव्हा तिला माझा हा व्यवहार संशयास्पद वाटला

व दुसऱ्याच दिवशी, तिने मला सर्व पुस्तके परत करायला सांगितले.

ताईला ज्या गोष्टींची खूप चीड येत असे, त्यातली एक गोष्ट म्हणजे चोरी व दुसरी लबाडी. आम्ही मुले लहान असताना दुसऱ्याच्या शेतात काम करायला जात असू. बऱ्याचदा, मी व अक्का भुईमूग पिळायला किंवा ऊस लावायला जात असू. आम्हा मुलांना भुईमूग पिळता पिळता काही शेंगा डब्यात भरून आणायला किंवा खिशात भरून आणायला खूप मजा येई. त्या वयात चोरी वगैरे करण्याच्या भावनेपेक्षा अशा गोष्टींची गंमत जास्त वाटत असे. मात्र, ताईला त्या गोष्टी अजिबात आवडत नसत. चुकून तिला 'आमची चोरी' कळलीच किंवा तिच्याकडे कोणी तक्रार केली तर ती आमची गय करत नसे.

अशा माझ्या एकंदर विचित्र स्वभावामुळे ताई-अण्णा व इतर आप्तजन चिंतेत होते. हा मुलगा पुढे नेमका काय करेल याविषयी त्यांना खूप चिंता वाटायची. ताईचे सर्व उपाय करून झाले होते. मारणे, बोलणे हा रोजचाच कार्यक्रम होता. कधी कधी मारताना ताई स्वत: रडत असे. अशा वेळेला मला तेवढ्यापुरते खूप वाईट वाटत असे. त्याचा परिणाम तेवढ्या दिवसापुरता असायचा. बऱ्याचदा, मी काही उपद्व्याप करत असलो की गल्लीतल्या माझ्यापेक्षा मोठ्या व्यक्तीही मला रागावत असत. वेळप्रसंगी त्या मला मारायलाही कमी करत नसत. मला मात्र त्याविरुद्ध बोलण्याची सोय नव्हती. शेवटचा उपाय म्हणून ताईने भरपूर उपासतापास, धागेदोरे व मांत्रिक यांचा सहारा घेतला होता; परंतु त्या साऱ्याचा माझ्यावर काहीही परिणाम झाला नाही!

लहान मुलांच्या रक्षणासाठी मुंजोबा नावाच्या देवाला प्रसन्न करणे गरजेचे असते असा गावात सर्वांचा समज होता. गावातील पारावर त्याचे एक मंदिरही आहे. प्रत्येक वर्षी साधारणत: तिथीनुसार मुंजोबा जेवायचा कार्यक्रम घरोघरी होत असे. घरच्या मुलांबरोबर बाहेरच्या काही मुलांना ऐपतीप्रमाणे जेवायचे आमंत्रण असे. मग मुंजोबाला नैवद्य दिल्यानंतर सर्वांना दूध-भात व गुळाचे जेवण मिळे. जेवतांना एका पंगतीत पाटावर बसवून, टोपी घालून घरातील सुवासिनी त्यांची पूजा करीत व दंडवत घालत असत. अशाप्रकरे मुंजोबा जेवत. मला मुंजोबा म्हणजे मुंज्या म्हणून जायला खूप आवडे. मी नेहमी आमंत्रणाची वाट पाहात असे. काही वेळेला मात्र मला वगळून इतर मुलांना आमंत्रण गेल्यावर माझी घोर निराशा होई.

मुंजोबा जेवणाव्यतिरिक्त वीर काढण्याची, लहान मुलांचे जावळ काढण्याची व नवस फेडण्याची प्रथा खानदेशातील ग्रामीण भागात बघायला मिळते. घरातील एखाद्या ज्येष्ठ व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या आत्म्याला शांती मिळण्यासाठी त्यांच्या प्रतीकात्मक मूर्तीची वीर काढून एका मंदिरात स्थापना करण्यात येई. साधारणत: चार ते पाच व्यक्तींना जुन्या काळात युद्धाला जाताना जसे वीर सजून जात, तशा काहीतरी पेहरावात, हातात तलवार धरून, तिच्या टोकाला लिंबू लावून नाचवले जाई व शेवटी एखाद्या बोकडाचा बळी देऊन गावाला मटण भाकरीचे जेवण दिले जाई. वीर नाचवण्यासाठी हरिजनांच्या पिपाणीचा बाजा लावला जाई.

वीराप्रमाणे जावळ काढण्याची प्रथा सर्रास पाळली जाते. मुलगा किंवा मुलगी जन्मल्यावर साधारणत: सहा महिने किंवा एक वर्ष त्याचे केस तसेच ठेवले जातात. पुढे ब्राह्मणाकडे मुहूर्त बघून, आईच्या आसरा, म्हणजे देवीचे स्थान शोधले जाते. काही मातांसाठी ते नदीत, तर काहींसाठी ते विहिरीत असते. त्यानुसार जावळाचा कार्यक्रम ठरवला जातो व मुलांचे केस कापून नदीत किंवा विहिरीत वाहिले जातात.

हे सारे कार्यक्रम सहसा ब्राह्मणांच्या सल्ल्याने होत. घरात कुणी सारखे आजारी पडत असले,

वा कुणाला विचित्र स्वप्न दिसत असले किंवा लहान मूल खूप रडत असले तर डॉक्टरकडे नेण्याबरोबरच आजूबाजूच्या एखाद्या म्हातारीचा सल्ला घेतला जात असे किंवा ब्राह्मणाच्या शरणी जाणे होत असे. मग कुठला राहिलेला नवस, कुणाच्या आसरा, तर कुणाचे वीर काढायचा सल्ला मिळत असे. वरून तसे न केल्यास भयंकर परिस्थिती उद्भवू शकते असा इशाराही मिळे. सहसा ब्राह्मणांच्या आजूबाजूला फिरणाऱ्या काही व्यक्तींच्या घरात या भानगडी जरा जास्तच असत.यामुळे त्यांच्या समस्यांचे समाधान तर होतच नसे. परंतु त्यातले बरेच कर्जाच्या खाईत ढकलले जात.

मला आठवते तसे गावात एक भगत घुमायचा. कार्तिक महिन्यात सात दिवसासाठी घुमण्याचा विशेष उत्सव होत असे. या सात दिवसात उंच बांबूची एक काठी भगताच्या घरासमोर उभारलेली असे. काठीला वेगवेगळ्या रंगांची कपडे गुंडाळलेली असत व काठीच्या एका टोकाला मोरपिसांचा जुडा व एक लाल, दोन त्रिकोणाचा, झेंडा बांधलेला असे. सप्ताहातील प्रत्येक दिवशी संध्याकाळी भगताच्या अंगात देव संचारे व तो किंचाळून नाचायला लागे. विशिष्ट वाद्यांच्या तालावर भगत ठेका घेई व विशिष्ट गाण्याच्या चालीवर नाची. मग आजारी माणसांना त्याच्यासमोर आणले जाई. काही मंत्र पुटपुटत तो आजारी माणसांच्या कपाळावर राख लावी व त्याच्या अंगावर मोरपिसांनी बनलेल्या झाडूसारख्या खोच्याने स्पर्श करी. बऱ्याचदा कुणाच्या घरात चोरी झालेली असली तर ते भगतासमोर गुढी ठेवत असत. भगत मंत्र उच्चारून कुणी चोरी केली याविषयी काही निर्देशक खाणाखुणा सांगत असे. सातव्या दिवशी शेवटी गावात मोठी मिरवणूक निघे. देवाला एका बोकडाचा बळी दिला जाई व त्याची मेजवानी होई. भगताच्या मंत्रांनी काहींची प्रकृती बरी झाल्याचे किस्से गावात नेहमी चघळले जात. या भगताच्या अंगात येणाऱ्या देवाचे नाव चांग्यापांग्या असे होते. पुढे मी कधीच असल्या देवाचे नाव ऐकले नाही. भगताबरोबरच घुमण्याचा प्रकार गावातून तात्पुरता नाहीसा झाला.

माझ्या आजोळी असेच एक पिरोबाचे स्थान होते. त्याला बाबादेव असे म्हणत. तेथेही एक भगतिण प्रत्येक रविवारी घुमत असे. खूप लांबून आजारी व इतर समस्या घेऊन लोक चारचाकीने किंवा बैलगाडीने त्याठिकाणी गर्दी करत. माझी एक जवळची आजारी आजी बाबादेवपुढे गुढी म्हणून बसली होती. भगतिणीच्या म्हणण्याप्रमाणे आजी लवकरच बरी होणार होती. परंतु पुढे एका आठवड्याच्या आतच आजी वारली. त्या घटनेचा पडसाद माझ्या मनावर कायमचा कोरला गेला. त्यामुळे पुढे कधीही भगतांवर माझा विश्वास बसला नाही.

माझे आजोळ चार मैलावरील कुरंगी या गावचे. लहान असताना अक्षय्य तृतीयेला व दिवाळीला आम्ही भावंडं मामाच्या गावाला जात असू. कुरंगीला जाण्याचे मुख्य आकर्षण म्हणजे अक्षय्य तृतीयेला निघणारी सोंगे. साधारणत: पाच ते सहा दिवस, प्रत्येक दिवशी, रात्री रामायणावर आधारित नाटक प्रदर्शित होत असे - ज्याला सोंगे म्हटले जाई. सोंगे पहिल्या दिवसाच्या रामजन्मापासून ते शेवटच्या दिवसातील सीतेच्या अग्निपरीक्षेपर्यंत ओळीने प्रत्येक दिवशी कहाणी पुढे सरकत असे. चमकदार वेशभूषेत हुबेहूब वाटणाऱ्या सोंगाना बघतांना खूप मजा येई. प्रत्येक पात्राची एन्ट्री खूप मजेदार असे. दारूच्या बंदुकीतून गोळीचा बार वाजल्यावर पडदा उघडे व हनुमान किंवा रामाचा प्रवेश होई. मग ही मंडळी विशिष्ट हावभाव करत लांब अशा स्टेजवर नाचत. या सोंगासाठी खास असा हरिजनांचा तुतारीबाजा असे. त्याच्या चालीवर सोंगं थिरकत. संध्याकाळीच आम्ही मुले घरून खाट घेऊन मैदानात टाकत असू व रात्री त्यावर

घरातील सारे बसत व सोंग बघत. सोंगांना दिवसा खऱ्या अवतारात बघितल्यावर खूप मजा येई. पुढेपुढे मामाशी जसा संबंध कमी झाला तसा सोंगांशीही संपर्क संपला पण त्यांच्याशी जुळलेले नाते भावविश्वाचा भाग बनून कायमचे राहून गेले.

प्रत्येक भाऊबीजेच्या दिवशी माझ्या गावात अखंड हरिनाम सप्ताह सुरू होतो. सकाळी व संध्याकाळी प्रवचन, रात्री कीर्तन व उरलेल्या वेळी रामाचा जप असा कार्यक्रम असतो. सहा दिवसाचे सहा कीर्तनकार ठरलेले असतात, शेवटच्या दिवशी सकाळी गोपाळकाल्याचे कीर्तन होते. कीर्तनात सहसा संसार व परमार्थ या विषयावर लोकांना उद्बोधन देण्याचा प्रयत्न असतो. या सात दिवसात गावात वेगळेच वातावरण निर्माण झालेले असते. मला लहानपणी कीर्तनाचे खूप आकर्षण होते. मी सर्वात पुढे बसून कीर्तन ऐकत असे. बऱ्याचदा कीर्तन सुरू होण्यापूर्वीच माझे डोळे बंद व्हायला सुरुवात होई. नियमित कीर्तनासाठी येणाऱ्यांबद्दल जरा कौतुकाने बोलले जाई. शिवाय या सात दिवसात घरातील कटकटींपासून व रागवण्यापासून थोडी सुटका मिळे म्हणून मी कीर्तन टाळत नसे. सात दिवसाचे सात कीर्तनकार वाटलेले असत, ते जेवणासाठी वेगवेगळ्या यजमानांकडे जात. त्यांच्याबद्दल मनात वेगळाच आदर राहात असे. कीर्तनाच्या काही संस्कारांमुळे पापपुण्याची गणितं माझ्या डोक्यात बसली होती. नाही म्हटले तरी कीर्तनाचा परिणाम थोड्या प्रमाणात गावात झालेला दिसतो. मांस खाणे, दारू यावर थोड्याफार प्रमाणावर लगाम बसलेला आढळतो.

लहानपणी खोडकर, विचित्र स्वभावाच्या मुलाचा पुढे, एका यशस्वी, आत्मविश्वासू तरुणामध्ये झालेला कायापालट निश्चितच आश्चर्यकारक आहे. ही जादू कशामुळे झाली असावी हा वाचणाऱ्याला कोड्यात टाकणारा प्रश्न आहे. जर हा चमत्कार असेल तर त्यात खूप रस घेण्याची गरज नाही. परंतु हा प्रवास जर माणसात असलेल्या दुर्दम्य क्षमतेचा वा त्याच्या योग्य विकासाचा किंवा पालकांनी दिलेल्या योग्य दिशेचा असेल तर त्याबद्दल थोडे चिकित्सक होण्याची निश्चित गरज आहे.

माझ्या परिवर्तनाची पार्श्वभूमी माझे आई-वडील, मी ज्या परिस्थितीत वाढत होतो तिचा सामाजिक व आर्थिक परिवेश, माझे सोबती-सवंगडी व माझ्या आयुष्याला वळण देणाऱ्या घटना यांनी तयार झालेली आहे.

माझे आईवडील चांगुलपणाचे पुतळे होते. मी लहानपणी कधीही त्यांना खोटे बोलताना व कुणाला फसवताना बघितलेले नाही. त्यांच्यामधील ते गुण नकळत माझ्यात बिंबले, पण तेवढ्या शुद्धतेने नाही. म्हणजे मी परिस्थितीनुरूप व माझ्या सहकाऱ्यांच्या संगतीत कधीकधी खोटे बोलत असे. पण इतरांना जसे खोटे बोलल्यावर मजा आल्यासारखे किंवा बहादुरी दाखवल्यासारखे वाटते तसे मला न वाटता अपराध्यासारखे वाटे व मी अशा वेळी मनाशी पुढे कधीही खोटे न बोलण्याचा निर्धार करी. म्हणजे माझा मूळ स्वभावधर्म चांगुलपणाचा होता.

माझ्या सवंगड्यांचा माझ्यावर खूप प्रभाव पडत गेला. मी शिकायला एरंडोल आणि त्यानंतर धुळे व नाशिकला जाण्यापूर्वी असलेले माझे सर्व सोबती मजुरांची, भिल्लांची, हरिजनांची अशिक्षित घरांतून आलेली मुले होती. मी त्यांच्या सवयी, त्यांचे विचार-आचार आत्मसात केले व त्यांच्यासारखेच आचरण माझ्याकडून घडत राहिले. घरातल्या लोकांचा माझ्यावर असलेला रोष त्या कारणाने अधिक होता, कारण घरात इतर कोणी विचारसुद्धा करु न शकणाऱ्या चोरी, लबाडी व जुगारासारख्या गोष्टी मी बाहेरूनच आणलेल्या होत्या. कधी कधी, मी त्या गोष्टी

खूपच यांत्रिक पद्धतीने करत असे. त्यामुळे त्या माझ्या अंतरंगात सामावण्याचा प्रश्नच उठत नाही. बऱ्याचदा, एका खोट्यासाठी अनेक खोटी बोलावी लागतात. त्या सर्व गोष्टी माझ्या बालसुलभ मनाला आकर्षित करत. त्याशिवाय माझ्या बरोबरची इतर मंडळी तसे बिनबोभाटपणे करत असल्याने मला त्यात काही वावगे वाटत नसे. त्यामुळे शाळेतील निरुत्साही वातावरण, बीजगणित-भूमितीच्या निर्जीव आकृती आणि घरातील नेहमीचे चिंतामय वातावरण यापेक्षा मला मित्रमंडळींत सामील होऊन त्यांच्यातलाच एक होऊन जाण्यात आत्यंतिक आनंद मिळत असे.

माझ्यात व इतर मुलांमध्ये फक्त एक फरक होता आणि तो म्हणजे माझी अभ्यासातली थोडीफार प्रगती. त्यामुळेच कदाचित माझे शिक्षण पुढे चालू राहिले, अन्यथा मीही शिक्षणाअभावी त्यांच्यासारखा शेतमजूर झालो असतो किंवा तसाच व्यवसाय माझ्या वाट्याला आला असता. असे असतानाही माझ्या मनात एक वेगळी उर्मी वास करत होती. मला बऱ्याचदा काहीतरी मोठे व भव्यदिव्य करावेसे वाटे. आपण आयुष्यात अयशस्वी होऊ व आपल्यालाही शेवटी इतरांप्रमाणे क्षुल्लक कामे करावी लागतील असे चुकूनही माझ्या बालमनात येत नसे.

मी तेव्हा आठवीत होतो. मला कुठूनतरी वाटायला लागले, की आपण एक चांगला खेळाडू होऊ शकतो. मी त्यासाठी काय करता येईल याचा विचार करु लागलो. मला इतर खेळांबरोबर बॉक्सिंग, हॉकी इत्यादी खेळांबद्दल आकर्षण होते. मी घरीच एका गोणीमध्ये कापड, दगड, वाळू भरून व ती ओसरीत टांगून तिचा बॉक्सिंगसाठी वापर करत होतो. मी लांब उडी मारण्यासाठी शेतात एका ठिकाणी खोदून जागा तयार केलेली होती. तेथे कुणी नसताना मी उड्या मारत बसे. एकंदरीत कुठेही काही मार्ग सापडत नाही हे बघून मी त्यावेळी सरळ केंद्रीय क्रीडामंत्री ममता बॅनर्जी यांना पत्र लिहिले होते. त्याचबरोबर मला कुठूनतरी कळले, की ग्वाल्हेर व पतियाळा या ठिकाणी खेळांसाठी प्रशिक्षण अकादमी आहेत. मी त्यांनाही पत्रे लिहून माझी खेळाडू होण्याची व विशिष्ट खेळासाठी प्रशिक्षण मिळवण्याची इच्छा असल्याची भावना कळवली होती.

माझे हे सर्व उपद्व्याप माझ्याबरोबरच्या सवंगड्यांच्या आकलनाबाहेरचे होते. अशा प्रकारे अनेक विचार माझ्या मनात अविरत चालू असत.

पुढे माझ्या वैचारिक कक्षा वाचनाने रुंदावत गेल्या. सुरुवातीला, मी करमणूक म्हणून व ज्याच्यात रस आहे अशा संदर्भातील गोष्टी वाचू लागलो. म्हणजे रामायण, महाभारत या बरोबर वर्तमानपत्रांतील सिनेमा, खेळ याविषयी वाचायला मला खूप आवडे. हळूहळू भव्यदिव्याकडे असलेल्या माझ्या कलामुळे मला टारझन, पृथ्वीराज चौहान, शिवाजी महाराज, महाराणा प्रताप, भगतसिंग यांच्यासारख्या व्यक्तिरेखा आकर्षित करु लागल्या. महाभारतातील कर्ण, अभिमन्यू, शिवचरित्रातील मुरारबाजी, बाजीप्रभू यांसारख्या व्यक्तींविषयी मी परत परत वाचत असे. त्याबरोबर, मला प्रतिकूल परिस्थितीत असाध्य गोष्ट साध्य करणाऱ्या वीरांचे विशेष कौतुक होते.

माझ्या वाचनाच्या वेडाने व मुळातच काहीतरी अद्भुत करण्याची नशा चढल्यामुळे माझी एक वैचारिक तथा भावनिक ओढ तयार झाली. त्या पार्श्वभूमीवर माझी संग्रामशी झालेली ओळख आयुष्याला वेगळ्याच दिशेने घेऊन गेली. दहावीत असताना सुरुवातीच्या काही दिवसांत माझी त्याच्याशी ओळख झाली. वाचनामुळे विकसित झालेल्या माझ्या काही क्षमतांचे व वैचारिक जाणीवजागृतीचे त्याला कौतुक वाटत असे. काही गोष्टी सूत्रबद्ध पद्धतीने केल्यास मी अभ्यासामध्ये प्रगती करु शकतो अशा प्रकारचे काहीसे विचार तो पुन्हापुन्हा माझ्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करु लागला.

बऱ्याचदा, आपल्याहून मोठ्या व्यक्तीपेक्षा आपण आपल्या समवयस्क व्यक्तीकडून जास्त प्रभावित होतो, कारण समवयस्क व्यक्तीकडून प्रोत्साहन मिळणे बऱ्याचदा अवघड असते. मी संग्रामचे कौतुक करत असे आणि मला त्याच्याबद्दल आदरही वाटत असे. त्याच्या बोलण्याचा परिणाम माझ्या मनावर तुलनेने अधिक झाला.

संग्रामच्या संपर्कामुळे सुरू झालेल्या परिवर्तनाबरोबर माझ्यात असलेले इतर अवगुण हळूहळू पळू लागले. कारण त्यांच्यात विरोधाभास तयार होऊ लागला. अभ्यासात लक्ष केंद्रित झाल्यामुळे व दहावीत असताना शिकवण्या वगैरे गोष्टींमुळे, तुलनेने इतर उपद्व्यापांसाठी व इतर मित्रांसाठी वेळ कमी मिळू लागला. त्यानंतर अभ्यासात सुरू झालेली माझी घोडदौड अखंड चालू राहिली.

त्यानंतरचा लढा हा वेगळ्या पद्धतीचा होता. आर्थिक अडचणी व शैक्षणिक दृष्ट्या योग्य वेळेवर घेतलेले योग्य निर्णय निर्णायक ठरले. त्या लांब अथक प्रवासात मी एवढा महत्त्वाकांक्षी कसा झालो? मोठ-मोठी स्वप्ने कशी बघितली?

मला भव्यदिव्य काहीतरी करण्याची उर्मी लहानपणापासून होती. जेव्हा मी एकेक पायरी चढत होतो, एकेका अडचणीवर मात करत होतो, तेव्हा माझ्या आत्मविश्वासात कमालीची वृद्धी होत होती. मी करत असलेल्या प्रयत्नांतून मला बऱ्याच अंशी यश मिळत होते. पुढे, सामाजिक बांधिलकीशी नाळ जोडली गेल्यामुळे व लोकसेवेची नशा चढल्यामुळे मी त्या क्षेत्रातील अत्युच्च ध्येयाकडे अग्रेसर होत गेलो.

मी तीन कारणांनी मोठा विचार करायला शिकलो. एक म्हणजे सामाजिक जीवनात मिळालेल्या वागणुकीमुळे व अनुभवांमुळे समाजासाठी काहीतरी मोठे व प्रत्यक्ष करण्याची चढलेली नशा. दोन, हातून सुटलेल्या काही गोष्टींमुळे, जसे एकतर्फी प्रेम, पैशाअभावी मित्रांबरोबर न केलेले काही कोर्सेस - मनात वाढलेल्या शून्य भावनेला शमवण्यासाठी व स्वत:ला सिद्ध करण्यासाठी काहीतरी मोठे व वेगळे करून दाखवण्याची जागृत झालेली उर्मी; आणि तिसरे व मूलभूत कारण म्हणजे लहानपणापासून काहीतरी भव्यदिव्य करण्याची लागलेली ओढ.

माझ्यासारख्या, घरात चोरी करणाऱ्या बेडर पोराला समाजाची चिंता कशी व का वाटू लागली? आश्चर्य आहे, नाही?

शाळेतून बाहेर पडल्यावर व कृत्रिम प्रभावाचा कोट फेकल्यावर माझा खऱ्या अर्थाने मानसिक विकास सुरू झाला. गांधी, फुले, विवेकानंद यांनी माझ्या डोळ्यांची झापडे फाडकन उघडली. अचानक मला सगळीकडे सामाजिक अव्यवस्था दिसू लागली. लहानपणी असमंजसपणाचा कळस असलेला मी अचानक वैचारिक दृष्ट्या प्रौढ झालो. या वैचारिक चर्वणाचा परिणाम असा झाला, की आर्थिक गुलामगिरीतून बाहेर पडण्यासाठी चाललेल्या माझ्या प्रयत्नांना सामाजिक बांधिलकीचा नवा आयाम आला व पुढे जाऊन तो मध्यवर्ती, महत्त्वाचा बनला. त्यापुढे इतर गोष्टी दुय्यम झाल्या.

थोडक्यात काहीतरी अद्भुत करायला निघालेल्या 'मी'ला वाचनातून झालेल्या संस्कारांनी व गांधीजी, फुले, विवेकानंदांच्या विचारांनी योग्य दिशा दाखवली तर आईवडिलांपासून संक्रमित झालेल्या व परिस्थितीनुरूप शिकलेल्या जीवनमूल्यांनी ध्येय साध्य करण्यामध्ये मोलाचा वाटा उचलला. यामध्ये खडतर कौटुंबिक परिस्थिती ही मार्गातील बाधा न ठरता अपयश पचवून घ्यायला, वयापेक्षा जास्त शहाणपण शिकवायला कारणीभूत ठरली. योग्य वेळेला मिळत गेलेल्या कष्टाचे फळही अपेक्षा उंचावणारे व नवनवीन क्षितिजे काबीज करण्याची प्रेरणा देणारे ठरले.

## जर का तू नापास झाया...!

ताई-अण्णा खूप शिकलेले नाहीत; परंतु त्यांना शिक्षणाचे महत्त्व चांगले माहीत आहे. त्यांनी आम्हा भावंडांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे यथोचित शिकवण्याचा प्रयत्न केला. पाचवीपर्यंतचे शिक्षण गावात उपलब्ध होते व त्यानंतर जवळच्या निपाणे गावात हायस्कूल होते; परंतु त्यांनी मला व अक्काला एरंडोलच्या शाळेत टाकले. आम्ही दोघे पास काढून एसटीने शाळेत जात असू. माझ्या विचित्र वागण्यापासून त्यांना एकाच गोष्टीबद्दल थोडे बरे वाटत असे आणि ते म्हणजे, माझे प्रत्येक वर्षी चांगल्या मार्कांनी पास होणे. अभ्यास न करता, खोड्या करून देखील मी पहिल्या श्रेणीत पास होत होतो, याचे सर्वांनाच कुतूहल वाटे.

आम्ही दोघे एसटीने शाळेत जात असलो तरी ताई-अण्णांना ते भाडे परवडण्यासारखे नव्हते. अक्का प्रत्येक रविवारी मजुरीला जात असे व मी रोज एरंडोलहून पाव आणून गावात सकाळी विकत असे. मला दोन डझन पावांचे साधारणत: तीन रुपये मिळत असत. बऱ्याचदा, शाळेत जायच्या आधी, आम्ही भाजीपाल्याचे टोपलेही फिरवत असू. एवढे करूनही, शेवटी, अक्काला नववीत शाळा सोडावी लागली, कारण वाढणारा खर्च. शिवाय, उषा-प्रतिभाला सांभाळणे ताईला खूप जड जात होते. अक्काच्या घरी राहण्यामुळे पैशांची मिळकत लगेच सुरू झाली. शाळेतून काढताना, शिक्षक तिचा दाखलाही देत नव्हते; परंतु ताई-अण्णांकडे त्या वेळी दुसरा पर्याय नव्हता.

आक्काची सुटलेली शाळा त्यावेळी माझ्या कोवळ्या मनावर खूप आघात करून गेलेली होती. आमच्या काही खेड्यांमधून एरंडोलला जाणाऱ्या सर्व मुलींमध्ये आक्का चुणचुणीत व हुशार होती. तिचा माझ्यावर खूप धाक होता. सर्व कामे करूनही ती अभ्यासाकडे लक्ष देई. तिच्याकडे बघून आपणही अभ्यास केला पाहिजे असे कधीकधी वाटे. अचानक तिची शाळा जेव्हा सुटली तेव्हा मला थोडेसे असुरक्षित वाटू लागले. एखाद्या ओंडक्याच्या आधाराने पोहत असताना अचानक ओंडके दुरावल्यावर पोहता येत असतानाही ओंडक्याची कमी जशी खलावी तशी कमी आक्काच्या घरी राहण्याने मला खलत होती.

आमच्या शाळेत त्या वेळेस ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'इ' तुकडी होती. मी पाचवीत त्या तुकडीत दाखल झालो. माझ्या वर्गात माझ्यासारखी अहिराणी बोलणारी, अंगावर ओघळ पडलेली, पायात चप्पल नसलेली व ठिगळ लावलेले कपडे असणारी मुले होती. सुरुवातीला, सर्व काही नवीन होते. मोठी शाळा, ग्रंथालय, प्रयोगशाळा, शहरातील मुलांचे इस्त्री केलेले पांढरेशुभ्र कपडे, पाठीवर टांगायला सुंदर बॅगा. माझे रूप मात्र वेगळे होते. ठिगळ दिलेली चड्डी, पुस्तके ठेवायला नायलॉनची पिशवी, पांढरा सदरा, फडक्यात बांधलेली चटणीभाकरी. मला पहिल्या दिवसाची प्रार्थना आठवते. खूप मोठ्या संख्येने जमलेली मुले एका आवाजात प्रार्थना म्हणत होती. शिक्षक सावधान-विश्रामचा आदेश देत होते. दायने-बायेचा होणारा गोंधळ; मी टकमक इतरांकडे बघून त्यांना अनुसरण्याचा प्रयत्न करत होतो. मनात एक वेगळीच भीती भरलेली होती. हळूहळू मी शाळेत रुळलो व माझे रंग शाळेला दिसू लागले.

गावातून फार कमी मुले एरंडोलला येत. साधारणत: ज्यांच्याकडे पैसा आहे व ज्यांना शिकण्याची तळमळ आहे अशाच कुटुंबातील मुले एरंडोलला येत. उरलीसुरली मुले पाच किलोमीटर पायपीट करून रोज निपाण्याला जात असत. सकाळी साडेनऊच्या बसने आलेले

आम्ही संध्याकाळी सातच्या बसने घरी परतत असू.

शाळा बारा ते पाच असल्यामुळे, आम्हाला मोकळा वेळ भरपूर मिळत असे. त्या वेळात एकतर शहरभर हुंदडणे, टोळक्या-टोळक्याने बसून गप्पा मारणे किंवा क्रिकेट, विटीदांडू, गोट्या खेळणे असा उद्योग असे. साडेसहाला बस लागल्यावर एका रूटवर असणारी सर्व मुले मधमाश्यांसारखी बसवर तुटून पडत व पाणी जसे जो मार्ग सापडेल त्या मार्गाने आत शिरते तशी सर्व मुले बसमध्ये गर्दी करत. क्षणात बस भरत असे. बऱ्याचदा, बसण्यावरून मुलांमध्ये वाद होई व कधीकधी एका गावाच्या मुलांविरुद्ध दुसऱ्या गावची मुले असे भांडण सुरू होत असे.

स्टँडच्या आजूबाजूला टोळके करून बसलेल्या मुलांच्या जागाही गावाप्रमाणे निश्चित होत्या. काही दिवसांच्या निरीक्षणाने कोणत्या गावची मुले कुठे बसतात हे कुणालाही अचूक सांगता यावे एवढा त्यांचा एकोपा असायचा. ही मंडळी मग तासन् तास गावातील वेगवेगळ्या विषयांवर दात विचकत गप्पा ठोकत. शाळेत गायीसारखा वागणाराही गावाच्या घोळक्यात गदकून हसत असे. या घोळक्याचे म्होरके साधारणत: बऱ्याच वर्षांपासून ये-जा करणारी मंडळी असत. एखाद्या वर्गात जेवढ्या जास्त वाऱ्या होणार तेवढी, त्याला या घोळक्यात जास्त इज्जत होती. नवीन येणारा वर्षे-दोन वर्षे चाचपूनच वागत असे.

वरच्या वर्गाची मुले खालच्या वर्गांच्या मुलांमध्ये कुस्ती लावत, त्यांना भांडण करण्यास भाग पाडत व नंतर दात विचकत त्याचा आनंद घेत. भातखेड्याची मुले एका विचित्र प्रकारे इतर मुलांना फसवत असत. एक खेळ शिकवण्याच्या अभिलाषेखाली दोन मुले विरुद्ध दिशेने एकमेकांच्या अंगावर झोपत व एखाद्या बिचाऱ्या मुलाला त्यांच्यावर सरळ झोपायला सांगत. नंतर, झोपलेले दोघे त्याचे हात व पाय घट्ट ताणून धरत आणि उरलेली मंडळी त्याची चड्डी ताणून त्याच्या गुप्तांगावर माती टाकत व जोरजोराने हसत-खिदळत त्याची अवहेलना करत. असाहाय्य बिचाऱ्याला ओरडण्याशिवाय व सोडवणूक करण्यासाठी याचना करण्याशिवाय गत्यंतर नसे. शाळेबाहेर अॅक्टिव्ह असणारी ही मंडळी शाळेत गरीब गायीसारखी मागच्या बाकांवर बसत. न्यूनगंडाने आणि आत्मविश्वासाच्या अभावाने ग्रासलेल्या या मुलांपुढे भविष्याविषयी एक मोठे प्रश्नचिन्ह असे.

आमचे लक्ष अभ्यासापेक्षा इतर गोष्टींकडे जास्त असे. ताईच्या कडक शिस्तीमुळे माझ्याकडे पैसे नसायचे; परंतु माझ्याबरोबरच्या इतर सर्वांकडे पैसे असायचे. आमच्यातले काही घरातले फक्त ते शिकलेले असल्यामुळे शेतीचा माल विकायला घेऊन येत व त्यातून काही फालके काढत. मग ती मंडळी शाळा बुडवून व्हिडिओ व थिएटरमध्ये सिनेमा बघत, हॉटेलमध्ये खात. कधीतरी सोबत म्हणून मलाही घेऊन जात. मधल्या सुटीच्या वेळेस दुपारचा शो सुरू होत असल्यामुळे सुटी होताच आम्ही दप्तर घट्ट पकडून गल्लीबोळांतून जोरात पळत असू. मग आमच्यातील एक जण सर्वांची टेहळणी करत असे. जर गावाचा कुणी असलाच तर आम्ही त्याला आधी थिएटरमध्ये शिरू देत असू व नंतर आम्ही शिरत असू. सिनेमा सुटण्याच्या वेळेला, आधीच प्रवेशद्वाराजवळ येत असू व फाटक उघडल्यावर धूम ठोकून पळत असू. नंतर, बसलेल्या घोळक्यात सामील होऊन जसे काही झालेच नाही असा आव आणत असू. बरीच मुले वही-पुस्तकांची नावे सांगून अशिक्षित आई-बापांना लुटत आणि एरंडोलला येऊन मजा करत.

शाळेत माझ्याकडे अभ्यास न करणारा व वाया गेलेला हुशार मुलगा म्हणून बघितले जात असे. घरून येताना माझ्या पिशवीत एखाददुसरे पुस्तक, दोन वह्या, विटीदांडू व एक चेंडू अशी

सामग्री असे. तास कोणतेही असले तरी माझे दप्तर बदलत नसे! सकाळी मिळालेल्या वेळात विटीदांडू व संध्याकाळी क्रिकेट असा माझा उद्योग असे. शाळेच्या तिसऱ्या मजल्यावर असलेल्या तुटलेल्या बाकांच्या फळ्या चोरून आम्ही क्रिकेट खेळत असू. माझ्या दैनंदिनीत गृहपाठ वगैरे कुठे बसत नसायचे. चुकून शिक्षकांनी विचारलेच तर 'आजारी होतो, आई आजारी होती, वडील आजारी होते' असे सांगून, वेळ कसा मारून न्यायचा याचा चांगला सराव झालेला होता. शिक्षक हट्टी असला तर मार खायलाही मी मागे-पुढे बघत नसे. प्रयोगवही, कार्यानुभववही, निबंधवही, सर्व शेवटच्या आठवड्यात पूर्ण होत असत. वर्षाच्या शेवटी प्रत्येक विषयाची तोंडी परीक्षा असे आणि त्यात वहीला मार्क असत. मात्र परीक्षेच्या दिवशी मी नेहमी दुसऱ्या कुणाच्यातरी वहीची शेवटची दोन पाने फाडून त्यावर वही पूर्ण असल्याची स्वाक्षरी घेत असे. मी अशा अनेक युक्त्यांनी वेळ मारून नेत असे.

शाळेतील काही किस्से आठवले की आजही हसू आवरले जात नाही. शाळेत प्रत्येक विद्यार्थ्याला प्रगतिपुस्तक देण्याची प्रथा होती. तिमाही, सहामाही परीक्षेनंतर प्रगतीपुस्तक घरी दिले जाई. त्यावर पालकांची सही आणणे अपेक्षित असे. माझ्या घरी थोडी कडक शिस्त असल्यामुळे ते घरी पोहचत असे. इतर मुले आपल्या अशिक्षित पालकांपासून प्रगतिपुस्तक लपवून ठेवत. मी सुद्धा आणीबाणीसाठी आण्णांची सही शिकून ठेवली होती. त्यामुळे जेव्हा कधी कमी गुण मिळत तेव्हा मी परस्पर सही करून सगळ्यात आधी प्रगतिपुस्तक शाळेत जमा करत असे. माझी ही लबाडी बऱ्याचदा कामाच्या गडबडीत आण्णांच्या लक्षात येत नसे.

माझ्या एकदंर उपद्व्यापांमुळे बऱ्याचदा कोणत्या ना कोणत्या कारणाने हेड सरांकडे भांडणानिमित्त जाणे होई. त्यामुळे माझा चेहरा व नाव त्यांच्या नेहमी लक्षात असे. माझ्या सारख्या काही बहाद्दरांची त्यांनी एक ब्लॅक लिस्ट तयार केलेली होती त्यात माझे नाव खूपच वर होते. त्यामुळे जेव्हा केव्हा माझ्या वर्गाचा मॉनिटर मला त्यांच्याकडे घेऊन जाई तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर दोन प्रकारचे भाव बघायला मिळत. एकतर ते स्मितहास्य करीत व मला फक्त उपदेश देऊन, व काहीतरी शिका, अजूनही वेळ गेलेली नाही वगैरे समजावून माझी रवानगी करीत. तर कधी ते खूप संतापलेले असत. आधीच कोणत्यातरी कारणाने त्यांचा मूड खराब असला तर मग माझ्या दोन कानफटात बसत व शिव्या देत मला खोलीच्या बाहेर हाकलत. या दोनही प्रतिक्रियांचा माझ्यावर फारसा परिणाम होत नसे.

एकदा असाच शाळेच्या मुख्य इमारतीसमोर मधल्या सुटीत आम्ही क्रिकेट खेळत होतो. तुटलेल्या बेंचची फळी कापून बॅट झालेली होती. आम्ही सारे खेळण्यात दंग होतो. मधली सुट्टी संपण्याची वेळ झालेली होती. शिक्षक व इतर मुले शाळेकडे येत होते. मी फलंदाजी करत होतो. अशात बेभान होऊन एक जोरदार फटका मी मारला. काही कळायच्या आत धब्ब असा जोरदार आवाज झाला व कुणीतरी समोर धपकन खाली बसले. क्षणार्धात माझे सारे मित्र इतर मुलांच्या घोळक्यात दिसेनासे झाले. बघतो तर आमच्या हेड सरांच्या पार्श्वभूमीवर माझा फटका जाऊन आदळला होता व ते वेदनेने विव्हळत खाली बसले होते. माझे मित्र एव्हाना पसार झाले होते. पण माझ्या हातात बॅट होती त्यामुळे मी कुठेही जाऊ शकत नव्हतो. नंतर मला सरांच्या खोलीत नेण्यात आले. सुरुवातीला मी थोडा घाबरलो होतो. पण नंतर मनाची तयारी केली. एव्हाना अशा प्रसंगांची सवय झाली होती, पण हे प्रकरण निपटायला मात्र मला थोडे जास्त कष्ट पडले.

इतिहास, भूगोल व मराठी भाषा यांवर माझे प्रभुत्व होते. लहानपणापासूनच शूरवीरांचे,

बुद्धाचे, इतिहासाचे मला आकर्षण होते. आमच्या शाळेत एक छोटेसे ग्रंथालय आहे. त्या ग्रंथालयात आठवड्याला एक या प्रमाणे वाचायला पुस्तक मिळत असे; परंतु ग्रंथपालाला भाजीपाल्याची लाच देऊन मी एकापेक्षा जास्त पुस्तके आणत असे. माझ्याकडे सदैव कोणतेतरी पुस्तक नेहमी असे. कधी-कधी आठवड्यात आठ-दहा पुस्तके वाचून होत. त्यामुळे शिवाजी, राणा प्रताप, पेशवे, रामायण-महाभारत यांवरची उपलब्ध असलेली जवळजवळ सर्व पुस्तके माझ्या डोळ्यांखालून गेलेली होती. त्यामुळे शाळेच्या पुस्तकातील इतिहास माझ्या दृष्टीने क्षुल्लक होता. शिक्षकांनी काही विचारण्याआधीच माझे उत्तर तयार असे. त्यामुळे इतर सर्वांना माझे नवल वाटे. अभ्यास करत नसल्यामुळे मला नकलांचा आधार घ्यावा लागत असे. परीक्षा सुरू होण्याआधी भिंतीवर आकृती काढणे, चिटोऱ्यांवर महत्त्वाचे मुद्दे लिहिणे या प्रकारच्या क्लृप्त्या लढवून मी परीक्षा पास होत असे. इतर मुलांना नकला कशा कराव्यात हेसुद्धा माहीत नसल्यामुळे ते नकला करूनही पास होत नसत; परंतु मी मात्र नकला व इतिहास-भूगोलावरील प्रभुत्व यांच्या जोरावर चांगले गुण संपादन करत असे.

नकला करण्यामुळे उद्भवलेला एक प्रसंग सदैव लक्षात राहील. सहामाही परीक्षा चालू होती. विज्ञानाचा पेपर होता. त्या दिवशी आम्हाला वंजारी सर पर्यवेक्षक म्हणून लाभले होते. वंजारी सर सदासर्वदा झोपेतून उठून आल्यासारखा चेहरा करून सगळीकडे वावरत. त्यांची बोलण्याची विशिष्ट लकब होती. त्यांच्या गरीब स्वभावाचा फायदा घेऊन आम्ही त्यांच्या बोलण्याची नक्कल करत असू.

लांबूनच, वंजारी सर आमच्या वर्गाकडे येताना पाहून आनंदाने टाळ्या दिल्या होत्या. एकदाचा पेपर सुरू झाला. वंजारी सर उंच चौथऱ्यावर ठेवलेल्या खुर्चीवर विराजमान झाले होते. सुदैवाने, स्टेजला लागूनच असलेल्या बाकावर माझा नंबर आलेला होता. मी टेबलाआड बसल्याने सरांच्या दृष्टीपासून लांब होतो. पेपर सुरू झाल्या झाल्या वंजारी सर वर्तमानपत्र काढून वाचू लागले. ती आमच्यासाठी सुवर्णसंधी होती.

मी टेबलाखाली कुणीतरी ठेवलेले गाईड हळूच उचलले व बाकावर ठेवून त्यातून लिहू लागलो. सर्व मुलांचे लक्ष माझ्याकडे वेधले गेले. मी लिहिलेले माझ्या मागचा लिहू लागला. त्याचे त्याच्या मागच्या... अशा रीतीने गाईडमधले उत्तर संपूर्ण वर्गात पसरत होते. सर्व कसे बिनबोभाटपणे शांततेत चालू होते. मध्येच शाळेचे मुख्याध्यापक येऊन गेले, वर्गातील शांतता बघून खूश होऊन परतले.

माझ्या समोरच्या रांगेतच संग्राम, वर्गातील सर्वात हुशार मुलगा, बसलेला होता. आम्हाला नक्कल करताना बघून त्याची तळमळ वाढत होती. तो आपला पहिला नंबर जाणार म्हणून अस्वस्थ झाला होता. शेवटी न राहवून, त्याने पुरत्या झोपलेल्या वंजारी सरांना वर्गात काय घडत आहे याची जाणीव करून दिली. सरांनी सर्वात मोठा अपराधी म्हणून मला धरले. त्यांचा चेहरा संतापाने लाल झाला होता. त्यांनी मला स्टेजवर बोलावून माझे दोन्ही कान पिळून उचलून धरले. मी वंजारीसरांचे हे रूप पहिल्यांदा पाहत होतो. मी घाबरलो. नेमके काय घडेल याची कल्पना करवत नव्हती. संग्रामच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. कशी खोड मोडली या आविर्भावाने तो माझ्याकडे बघत होता.

सुदैवाने, सर ज्या वेगाने लालबुंद झाले त्याच वेगाने मला गालावर दोन-चार थपडा दिल्यानंतर शांत झाले. ते नरमलेले बघून मी त्यांच्याजवळ गयावया करू लागलो. सुरुवातीला,

त्यांनी मला मुख्याध्यापकांकडे सोपविण्याविषयी निर्णय घेतला. नंतर मला पेपर सोडून जाण्याविषयी सांगितले. परंतु शेवटी, सर्वांसमोर पन्नास उठाबश्या व शाळेच्या मैदानावर पाच चकरा मारण्यावर येऊन शिक्षा थांबली. मी भरभर पन्नास उठाबश्या काढून शाळेच्या मैदानाला धावून पाच चकरा मारत होतो. शाळा स्तब्ध असताना, परीक्षेच्या वातावरणात बुडून गेली असताना मीच वेड्यासारखा मैदानावर पळत होतो. रस्त्याने जाणारे पादचारी व वर्गात येरझारा मारणारे पर्यवेक्षक माझ्याकडे विचित्र नजरेने बघत होते. शेवटच्या फेरीनंतर नकळत आपण सुटलो या भावनेने माझ्या चेहऱ्यावर हास्य पसरले होते.

माझ्या प्रतापाची बातमी खूप उशिरा घरच्या मंडळींना कळली. आपला मुलगाच असे दिवे लावू शकतो अशी त्यांची खात्री झाली. शिव्यांची लाखोली वाहून झाल्यावर या घटनेवर पडदा पडला.

मी अभ्यास करावा यासाठी ताई-अण्णांनी खूप प्रयत्न केले; परंतु माझ्या डोक्यात कधी प्रकाश पडला नाही. मला अभ्यासापेक्षा खेळणे जास्त महत्त्वाचे वाटे. शेवटी, वैतागून त्यांनी मला शेवटची वॉर्निंग दिलेली होती. 'जर का तू नापास झाया त तुले शंकरदादाकडे साले लावसू.' शंकरदादा ही गावातील सर्वांत श्रीमंत असामी, त्यांच्याकडे नेहमी दोनचार गडीमाणसे व पन्नास बाया कामाला असत. परंतु मी कधी नापास झालो नाही व त्यांच्या म्हणण्याप्रमाणे काही घडले नाही. माझे गुण बघून कधीतरी हा मुलगा सुधारेल, अभ्यास करील व आपल्याला चांगले दिवस येतील, या आशेवर ते आयुष्याची गाडी पुढे ढकलत होते.

माझ्या अशा वागण्याला बरीच कारणे होती. सर्वजण अभ्यास कर असे म्हणत असले तरी मला अभ्यासाची विशेष रुची नव्हती. बऱ्याचदा गणित, भूमिती आणि विज्ञान हे विषय माझ्या डोक्यावरून जात. या विषयांचे बरेच शिक्षक मन लावून कधी शिकवत नसत, त्यामुळे डोक्याला ताण देऊन गणित समजावून घेण्यापेक्षा त्याकडे दुर्लक्ष करणे सोयिस्कर वाटे.

एखादी गोष्ट समजली नाही तर ती विचारण्याचे धैर्य माझ्याकडे नव्हते. त्या दृष्टीने वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्नही शिक्षकांकडून कधी होत नसे. किंबहुना कधी प्रश्न न विचारणाऱ्याने मध्येच कधी प्रश्न विचारलाच तर त्याची खिल्ली उडवली जाण्याची शक्यता जास्त असे. शिवाय, वर्गात जे शिकवले जाई ते आधीच शिकवणीत शिकवलेले असे. त्यामुळे शिकवणीची मुले बऱ्याचदा वर्गात पुढे पुढे करत. अशा अनेक कारणांनी मूलत: ठोंब्या नसलेला मी दिवसेंदिवस अभ्यासापासून दूर जात राहिलो.

माझ्या विचित्र वागण्याला सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे मला लाभलेले मित्र. शेतकरी-मोलमजुरी करणाऱ्या कुटुंबातून आलेल्या माझ्या सवंगड्यांचा माझ्या वर्तनावर खूप प्रभाव होता. बाहेर, खेळाचा डाव चालू असताना घरात बसून मला रूक्ष गणित-भूमितीच्या पुस्तकात डोके खुपसून वाचत बसायला खूप जिवावर येई. भिल्लांच्या पोरांमध्ये दिवसभर हुंदडणे, मस्ती करणे, खोड्या करणे यांतच मी रमून जाई. अशा परिस्थितीत तेव्हा इतर आई-वडील आपल्या मुलांना काहीही बोलत नसताना, ताई-अण्णा मात्र माझा समाचार घेत तेव्हा मला त्यांचा राग येई.

त्या दरम्यान घरातले वातावरण असे होते, की ताई-अण्णांना माझ्याकडे लक्ष द्यायला वेळ नसे. ते रात्रंदिवस त्यांच्या कामात व्यस्त राहत. त्यांना जेव्हा केव्हा वेळ मिळेल तेव्हा मला अभ्यास करण्याविषयी सुचवत. यामुळे मी नजर चुकवून माझ्या बालमनाला जे सोयिस्कर वाटेल - अर्थातच खेळणे, बागडणे - ते मी करी.

ताई-अण्णा म्हणत असले तरी अभ्यास करून आपण खूप पुढे जाऊ वगैरे गोष्टी मनाला त्या

वयात आकर्षित करत नसत. शाळेतील एकंदरीत माझ्या प्रगतीवरून तसे काही होईल याबद्दलचा आत्मविश्वास कधी मला वाटत नसे. अभ्यासाची संकल्पना म्हणजे पुस्तकातील न समजणाऱ्या गोष्टी बसून, गिरवून, समजावून घेणे वगैरे माझ्या बालमनाला समजत-पटत नसे.

मी एवढा खेळात असलो तरी शाळेच्या संघामध्ये कधी नसायचो. शाळेतले संघ बऱ्याचदा तुकड्या बघून व आई-वडिलांची तोंडे बघून निवडले जात. मी दोन्ही बाबतीत भिकारी होतो. आमच्या शाळेत 'अ' तुकडीच्या मुलांची फुटबॉलच्या टीममध्ये वर्णी लागलेली असायची. आम्ही खेड्यावरची मुले; फुटबॉल मैदानाबाहेर आलाच तर तो मारण्यासाठी आमची गर्दी होत असे. असाच एखादा बॉल मारताना जो आनंद होई तो शब्दांत वर्णन करणे कठीण आहे. तीच गोष्ट शाळेतील इतर उपक्रमांबाबत होती. बऱ्याच शिक्षकांचा 'खेड्यावरची मुले म्हणजे टाकाऊ' असा काहीसा समज होता. मी आठवीत एनसीसी घ्यायची अशी खूणगाठ मनाशी बांधली होती; परंतु ज्या दिवशी निवड त्या दिवशी उंची ठाकठीक असून, धावण्यात पहिल्या पाचामध्ये येऊनही मला घेण्यात आले नाही; कारण निवड झालेल्या मुलांची यादी आधीच तयार होती! त्या दिवसभर माझ्या डोळ्यांतून अश्रू ओघळले.

शाळेत काही शिक्षकांचा माझ्यावर विशेष लोभ होता. 'तू अभ्यास केलास तर खूप पुढे जाऊ शकतोस' असा मोलाचा सल्ला ते मला देत असत. त्यात बडगुजर सर व लखोटेबाई यांची नावे मुद्दाम नमूद करावीशी वाटतात. ते मला प्रोत्साहन म्हणून माझी स्तुती करत; परंतु मला उगाच त्यांची कीव येत असे. कारण तसे काही होईल याची मला स्वत:ला अजिबात खात्री नव्हती.

शाळेत खाजगी शिकवणी नावाचा प्रकार सर्रास चालत असे. त्यामुळे बरेच शिक्षक वर्गात क्वचितच शिकवत. शिक्षकांकडे शिकवणीला जाणाऱ्या मुलांना वर्गात वेगळी वागणूक दिली जाई. त्यांच्याकडे वेगळे लक्ष पुरवले जाई. त्यासाठी ते वेगवेगळ्या क्लृप्त्या करत, की जेणेकरून जास्तीत जास्त मुले शिकवणीला येतील. खेड्यापाड्यावरून मोठ्या कष्टाने येणाऱ्या गरिबांच्या मुलांपुढे अशा वेळी भलामोठा प्रश्न निर्माण होई. असेच एकदा, एक शिक्षक वर्ष सुरू होण्याच्या सुरुवातीला वर्गात येऊन मुलांना शिकवणीला यायला आवाहन करत होते व वरून, सहानुभूती मिळवण्यासाठी गरिबांच्या मुलांना मोफत शिकवणीचे आश्वासन देत होते.

त्यांच्या या क्लृप्तीचा परिणाम चांगला झाला. वर्गातील अर्ध्याहून अधिक मुले त्यांच्याकडे शिकवणीसाठी जाऊ लागली. त्यांच्याबरोबर गरिबांची अशी आम्ही तीन मुले मोफत शिकवणी मिळेल म्हणून जाऊ लागलो; परंतु लवकरच आमच्या लक्षात आले की, मुलांना फसवण्यासाठी महाशयांनी गरिबांवर उपकार करायचे ढोंग केले होते. ते शिकवणी चालू असताना आम्हाला तिघांना घरकाम सांगू लागले. लवकरच, आमच्यापैकी प्रत्येकाला काम समाधानकारक करत नाही म्हणून एकेक करून शिकवणीवरून काढून टाकण्यात आले. त्यांच्या अशा वागणुकीने आमच्या कोवळ्या मनाला काय वाटले असेल ते न सांगणे बरे!

शाळेत काही जुने शिक्षक चांगले होते. ते मन लावून शिकवत असत. त्यांचा दरारा विद्यार्थ्यांमध्ये असे. आमचे मुख्याध्यापकही कडक होते; परंतु हळूहळू परिस्थिती बदलली. व्यवस्थापक मंडळामधील जुनी खोडे, ज्यांनी शिक्षणाची आवड म्हणून शाळा काढलेली होती, ती कलंडली व पैशांसाठी हपापलेले कोल्हे व्यवस्थापन कमिटीवर आले. ज्या ठिकाणी केवळ गुणवत्तेवर शिक्षकांची भरती होत असे, त्या ठिकाणी उपलब्ध जागेचा लिलाव करून शिक्षक भरले जाऊ लागले. अशा प्रकारे, लाखो रुपये भरून आलेला शिक्षक शिकवण्यामध्ये क्वचितच लक्ष

घालत असे. बऱ्याच शिक्षकांबद्दल विचित्र गोष्टी ऐकायला मिळतात. शिक्षणाला लागलेल्या या किडीमुळे झालेली आबाळ बघवत नाही.

माझ्याप्रमाणे, इतर अनेक गरीब आई-वडिलांची मुले गावागावाहून शाळेत येत. मुलगा शिकेल व आपले दिवस पालटवेल अशी आशा त्यांच्या डोळ्यांतून स्पष्ट झळकत असे; परंतु मुलांमध्ये त्या तळमळीचा लवलेशही नसे. न्यूनगंडाने ग्रासलेल्या मुलांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव असे. शाळेत सर्वात सुरुवातीला त्यांचा सामना गणित, भूमिती व इंग्रजी या विषयांबरोबर होतो. भीतीपोटी, आत्मविश्वासाच्या अभावाने व इतर अयशस्वी मुलांच्या सल्ल्यामुळे या विषयाकडे बघण्याची त्यांची दृष्टी वेगळी असते. आपल्याला ते विषय कधीच अवगत होऊ शकत नाहीत, याविषयी त्यांचे ठाम मत होते व ते त्या विषयांना सामोरे न जाता त्यांना टाळण्याचा प्रयत्न करतात. घरातील, समाजातील व शाळेतील वातावरण एकंदरीत प्रतिकूल असल्यामुळे त्यांच्या मनात धाडस, जिद्द जागृत व्हायला काहीही कारण नसते. त्यांचे शिक्षण चाकोरीबद्ध असते. कसेतरी, कुठूनतरी दहावी पास व्हावे व कॉलेजला भरती व्हावे. कॉलेजमध्ये भरती झाल्यावर पाच वर्षे काहीही चिंता करायची गरज नसते. पाच वर्षांनंतर आपण काय करणार आहोत, काय करू शकतो? याचे काहीच सोयरसुतक नसते. सकाळी हातात दोन वह्या घेऊन कॉलेजला येणे, अध्यापक शिकवतील ते वह्यांवर गिरवणे, तेच तोंडपाठ करणे व परीक्षा पास होणे असा ठरलेला प्रवास असतो.

घरातील, गावातील शिक्षित बेरोजगार म्हणजे शिकत असलेल्यांसाठी मोठी अडचण. ‘शिकिसन कोन बरं झायं भो, आम्हणाकडे देख, भराले पैसे नाही म्हणून घर बठेल सेतस’ असा मोलाचा सल्ला देण्यात ते खूपच वाकबगार. पैशांशिवाय, वशिल्याशिवाय नोकरी नाही असा त्यांचा प्रचार असतो. त्या मंडळींची धाव सहसा शिपाई, लिपिक, पोलीस यांच्यासारख्या नोकऱ्यांकडे असते. ते हातात पैशांची बॅग घेऊनच मुलाखतीला किंवा परीक्षेला जातात. अशा वातावरणात विद्यार्थ्यांची मने कलुषित होतात आणि ते अभ्यास न करता अशा गोष्टींवरच जास्त वेळ वाया घालवतात. बऱ्याचदा, पैसे देण्याची गरज नसतानाही मधल्या ठगांना पैसे देतात. एकंदरीत पैसे दिले नाही, तर त्यांना नोकरीची खात्री मिळत नसते. काही ठिकाणी बेरोजगार मुलाच्या लग्नामध्ये हुंड्यामधील रक्कम नोकरीला भरण्यासाठी म्हणून बाजूला काढली जाते. बऱ्याच मध्यमवर्गीय घरात, जेथे एकापेक्षा जास्त मुले आहेत, तेथे घरात भावाभावांमध्ये भांडण नको, म्हणून एकाला बाहेर पाठवण्यासाठी घरातील मंडळी कितीही पैसे मोजायला, प्रसंगी शेत विकायलाही मागेपुढे पाहत नाहीत.

अशा वातावरणात एखाद्या धाडसी मुलाने या परिस्थितीवर मात करायचे ठरवले तर त्याला तीन पातळ्यांवर लढावे लागते. एक म्हणजे कुटुंबातील व्यक्तींना विश्वासात घ्यावे लागते, त्यांच्या मनातील दूषित विचार बाहेर काढावे लागतात. दुसरे म्हणजे समाजातील चुकीच्या विचारपद्धतीला तोंड द्यावे लागते. जेव्हा समोरची प्रत्येक व्यक्ती तिचा आत्मविश्वास, भरारी कुंठित करण्याचा प्रयत्न करणार तेव्हा विचलित न होता मार्गक्रमण करायचे असते आणि तिसरे म्हणजे प्रत्यक्ष स्पर्धेत झोकून यशस्वी होण्यासाठी इतरांएवढीच मेहनत त्याला करावी लागते. म्हणजे एक लढाई मानसिक पातळीवर व दुसरी लढाई प्रत्यक्ष मैदानात, इतरांबरोबर. त्या दोघांमध्ये पहिली लढाई त्रासदायक व जीवघेणी असते. कारण नंतरच्या लढाईत तुमच्यापुढे सरळ तुमचे ध्येय असते व त्यासाठी करावे लागणारे प्रयत्न असतात; परंतु पहिली लढाई गनिमी

काव्याची असते व तिच्यातील विजयावर दुसऱ्या लढाईतील कामगिरी अवलंबून असते.

साधारणत: आठवी-नववीत असताना म्हणजे किशोरावस्थेच्या उंबरठ्यावर पाय ठेवल्यावर माझी मानसिकता बदलत आहे अशी मला जाणीव होत होती. शाळेतील मुली आपल्याबद्दल काय बोलतात, आपल्याकडे बघतात का? याबद्दल मी साशंक झालो होतो. चोरून मुलींकडे बघणे, चुकून त्यांनी काही मागितल्यावर त्यांना तत्परतेने देणे वगैरे गोष्टी खूप सहज होत होत्या. वर्गातील एखादी मुलगी हमखास इतर सर्वांपेक्षा जास्त आवडत असे. तिच्या नकळत तिच्याकडे बघणे व तिच्याबद्दल माहिती काढणे वगैरे उद्योग चालू असत. बऱ्याचदा गावातील आम्ही मुले मुलींविषयी व त्यांच्या शारीरिक अंगांविषयी बोलत असू. अशावेळी कधीकधी जिज्ञासा शिगेला पोहचत असे. बरीच मुले त्यांच्या तथाकथित शारीरिक संबंधाविषयी बोलत. गुप्तांगाविषयी वेगवेगळी माहिती सांगत. मला मात्र बरीचशी माहिती नवीन असे. मीही कधीकधी खोटा आव आणून खोट्या कहाण्या सांगत असे. गावातील काही मुलामुलींच्या घुसफुसविषयी चर्चा करणे आमच्या-साठी महत्वाचा विषय असे. बऱ्याचदा आमच्या गप्पा खोट्या माहितीवर आधारित असत.

दहावीत असताना मला एक मुलगी जरा जास्तच आवडायला लागली होती. आम्ही गणिताच्या शिकवणीला एकत्र जात असू. ती गुबगुबीत, गोरी व स्वच्छ कपड्यात, तर मी मरगळलेल्या कपड्यात. आपले दप्तर व जेवणाचा दोनताली डबा सांभाळत हळूच चोरून तिच्याकडे बघत असे. शाळेत ती तिच्या भावाबरोबर येई. शाळेच्या गेटपासून वर्गापर्यंत बऱ्याचदा मी तिला न्याहाळत असे. एवढे असूनही दहावीच्या पूर्ण वर्षात एकदाही तिच्यासोबत संभाषण करण्याची हिंमत झाली नाही. शेवटी परीक्षा सुरू असताना ती कुठेतरी मला दिसे. मनात कालवाकालव होई. परीक्षेनंतर आपण दूर जाणार याबद्दल थोडे विचित्र वाटे. आम्ही दोघेही चांगल्या मार्कांनी दहावी पास झालो व पुन्हा अकरावीत एरंडोलला एकत्र आलो. आता मात्र माझी खरी परीक्षा होती. आधी भावनिक असलेले माझे मन स्वप्नाळू बनले. अकरावी अशीच निघून जाऊ लागली. दरम्यान या प्रकरणाची कुणकुण माझ्या काही जवळच्या मित्रांना लागली. मी खूप योजना करी, खूप विचार करी पण ती समोर दिसल्यावर सर्व योजना बारगळत. तिला स्वत:कडे आकर्षित करण्यासाठी मी खूप क्लृप्त्या केल्या. पण काहीही उपयोग झाला नाही. नंतर तिच्याबद्दल काही वेगळ्याच अफवा कानावर येऊ लागल्या. ती कुणा दुसऱ्या मुलाकडे आकृष्ट झाली असा प्रचार काही मुले मुद्दाम करीत. एकंदर या सर्व घालमेलीत मी मात्र पूर्णत: धराशायी झालो होतो. अभ्यासावरून लक्ष पूर्णपणे विचलित झाले होते. माझ्या विचारचक्राचा केंद्रबिंदू तिच्याशी एकरूप झाला होता. पुढे बारावीसाठी धुळ्याला गेल्यावर या कहाणीचा अंत झाला. पुढे कधीतरी तिचा संदर्भ आल्यावर मनामध्ये विचित्र चलबिचल होत असे.

शाळेत व पुढे कॉलेजमध्ये काही मुलांचे मुलींबरोबर असलेले संबंध चर्चेचा विषय होत. त्यांच्याविषयी बऱ्याचदा हेवा वाटे. आपणही गोरेगोमटे असतो. आपलेही कपडे झकपक राहिले असते तर आपल्याशी मुली बोलल्या असत्या असे वाटे. अशावेळी फक्त त्याविषयी गप्पा मारणे व स्वप्नं बघणे याशिवाय काही पर्याय नव्हता. बऱ्याचदा अशी मुले व मुली अभ्यासामध्ये ढ असत. गावातही काही मुलामुलींची प्रकरणे होती. यातील बरीच प्रकरणे प्रेम वगैरे चौकटीत बसण्यासारखी नव्हती. लपूनछपून एकमेकांना भेटणे, शरीराची भूक भागवणे व सोयीनुसार एकमेकांपासून दूर होणे असा प्रकार चाले. शाळा-कॉलेजांमध्ये नेहमी पैसे बाळगणाऱ्या, चटपट

बोलणाऱ्या व मोटारसायकलवर फिरणाऱ्या मुलांकडे मुली जास्त आकर्षित होत. मी यापैकी कोणत्याच वर्गात येत नसल्यामुळे कधी पोस्टमनची, कधी हितचिंतकाची तर कधी बघ्याचीच भूमिका माझ्या वाटेला आली. काही बहाद्दर आधी रोमियोची, नंतर त्याच मुलीच्या लग्नात वऱ्हाड्याची व लग्नानंतर तिची मुले खेळवणाऱ्या मामाचीही भूमिका सफाईदारपणे करत!

या सर्वांमध्ये सिनेमाची भूमिका मोठी होती. एरंडोलमध्ये दोन सिनेमा हॉल होते. एखादा मसाला सिनेमा प्रदर्शित झाल्यावर आमची उत्सुकता वाढे. पोस्टरवर झुलणाऱ्या उत्तेजित चित्रांकडे बघून आम्ही कधीकधी शाळेला दांडी मारून हजेरी लावत असू. अशावेळी भीतीही प्रचंड वाटत असे कारण अशा प्रकारचा सिनेमा बघणाऱ्यांचे बिंग फुटल्यास बदनामीही तेवढीच होत असे. सिनेमा बघितल्यावर चघळून चर्चा होत असे. पुढे या सवयी आपोआपच बदलल्या.

## ‘ए ताजा पाववाले...!’

मला नेमके आठवत नाही की, मी पाव विकायला सुरुवात का केली? बहुतेक मी सहावीत असेन, म्हणजे अकरा वर्षांचा. सुरुवातीला, मी थोडे म्हणजे डझनभर पाव एरंडोलवरून आणत असे. सकाळी लवकर उठून गावभर पायपीट करत ‘ए ताजा पाववाला’ असे म्हणून पाव विके. एरंडोलमध्ये दोन बेकऱ्या होत्या. त्यांपैकी एका बेकरीतून मी पाव आणायचो. पाव सकाळी घेतले नाहीत तर ते संपल्याची किंवा लहान पाव विकत घेण्याची नौबत यायची. सकाळी घेतलेले पाव दिवसभर मला वर्गात वागवावे लागत. सुरुवातीला, मी पाव विकतो असे फार क्वचित कोणाला माहीत होते; परंतु लवकरच, ही खबर हळूहळू सर्व वर्गाला कळली. मला मुले ‘पाववाला राजू’ म्हणून चिडवू लागली. वर्गातील सर्वांना माहीत झाल्यावर माझी परिस्थिती अवघड झाली. सर्वांपासून नजर चुकवून पाव सांभाळणे अवघड होऊन बसले. मधल्या सुटीत किंवा पीटीच्या पिरियडमध्ये मुले माझ्या पिशवीतून दोन-चार पाव हळूच पसार करत. एखादा-दुसरा पाव पसार झाल्यास मला त्याचे काही वाटत नसे; पण थोडे जास्त पाव पसार झाल्यास मात्र मी अडचणीत येत असे. घरी अक्काला चोख हिशेब द्यावा लागे. तिच्यापुढे बहाण्यांना किंमत नसे. ती सर्व गोष्टींसाठी मला जबाबदार ठरवी.

पुढे पुढे, मला शाळेत दोन पिशव्या मिरवायची लाज वाटू लागली. कधी कधी, वर्गातील मुली आपापसात, माझ्याकडे बोट दाखवून फिदीफिदी हसतात असे मला वाटे. अशा वेळेला मला नकोसे वाटायचे. त्या सर्वांतून मी एक मार्ग काढला, मी विकत घेतलेले पाव संध्याकाळपर्यंत बेकरीतच ठेवू लागलो. संध्याकाळी शाळा सुटल्यावर धावत जाऊन मी पिशवी घेऊन येई; पण तेथेही बऱ्याच वेळा बेकरी बंद झालेली असे.

शाळेतून संध्याकाळी निघून पाव एसटीने घरापर्यंत सुरक्षित पोचवणे हेही मोठे दिव्य होते. संध्याकाळी शाळा सुटल्यावर दोन्ही पिशव्या पाठीवर लादून मी स्टॅण्डचा रस्ता धरत असे. आमची शाळा संध्याकाळी पाचला सुटायची आणि आमच्या गावाला जाणारी बस साडेसहाच्या आधी नव्हती. मधल्या वेळेत मग आमचे खेळाचे डाव रंगत. माझ्या पिशवीत खेळाचे सामान म्हणजे गोट्या, विटीदांडू व एक रबरी चेंडू निश्चित असायचा. स्टॅण्डच्या आजूबाजूला मुलामुलींची छोटी-छोटी, वेगवेगळ्या गावांची टोळकी गप्पा मारताना बसलेली असत. टोळक्यांमध्ये सहसा मोठ्या व गुंड प्रवृत्तीच्या मुलांचा वरचश्मा असे. त्यांच्या फालतू गप्पा ऐकण्यापेक्षा मी जेथे खेळ चाललेला असे तेथे जाऊन हजेरी लावायचो. खेळताना, आपल्या रूटच्या घोळक्यांवर लक्ष ठेवणे जरुरीचे असायचे; नाहीतर बस हुकण्याचा संभव असे.

एकदा, गोट्यांचा डाव रंगला. पाचचे सहा, सहाचे साडेसहा कधी वाजले याचा थांगपत्ताच लागला नाही. जेव्हा भान आले तेव्हा गावाचा घोळका दिसला नाही. माझी गाडी हुकली होती. नंतर घरी जाईपर्यंत रात्रीचे दहा वाजले. आईला मी सांगितले, की अभ्यासात गाडीचे भान राहिले नाही. ही सबब काही तिला पटली नाही व त्या दिवशी माझी चांगलीच ‘पूजा’ झाली. त्यानंतर मी जरा सावध झालो. बऱ्याचदा, मी खेळण्यात एवढा हरपून जात असे की, मला माझ्या दप्तराचे, पावाच्या पिशवीचे भान राहत नसे. दप्तराच्या ढिगात असलेली माझी पावाची पिशवी लंपास करून व जेवढे हाताला येतील तेवढे पाव काढून पिशवी परत आपल्या जागेवर ठेवली जाई. मला त्या गोष्टींचा थांगपत्ता बऱ्याचदा घरी गेल्यावर लागत असे.

अक्काचे लग्न झालेले नव्हते तोपर्यंत, म्हणजे मी इयत्ता आठवीत जाईतोपर्यंत, माझा पावविक्रीचा व्यवसाय सुरळीत चालला. अक्का प्रत्येक दिवशी किती पाव आले, किती विकले गेले, नफा किती-उधारी किती याचा हिशेब व्यवस्थित ठेवायची व महिन्याच्या शेवटी पास काढायला, पेन-वही-इतर वस्तू घ्यायला पैसे द्यायची. पाव कमी भरल्यावर ती माझी चांगलीच हजेरी घेत असे. शेवटी, आयुष्यात माझे काही होणार नाही, भविष्यात मला बायकोही सांभाळायला येणार नाही इत्यादी ताशेरे ओढल्यानंतर घटनेवर पडदा पडत असे.

थंडी असो वा पाऊस असो, मी रोज सकाळी सहा वाजता एकेका गल्लीचा रस्ता धरी. बिस्किटांच्या डब्यात एकावर एक रचलेले पाव घेऊन मी 'ए ताजा पाववाले' असे म्हणत कामाला लागे. सकाळी उठायला थोडा जरी उशीर झाला तरी माझ्या विक्रीवर परिणाम होत असे.

थंडीच्या दिवसांत सकाळी उठणे जिवावर येई. स्वेटर नावाचा प्रकार माहीत नसल्याने व विनाचप्पल हिंडावे लागत असल्याने त्या दिवसांत खूप त्रास होई. ओरडताना, फाटलेल्या ओठांतून रक्त निघे. गारठलेले हात पावाचा गारगार डबा धरायला नको म्हणत. भुरुभुरु वाहणारा थंड वारा सकाळी अंगाला झोंबे. छोटे छोटे दगड पायाला टोचत व भेगाटलेल्या पायातून कधी कधी रक्त निघे. बऱ्याचदा, उठताना अंगाला काटे येत! उन्हाळ्यात दिवसा जरी खूप तापत असले तरी सकाळी-सकाळी फिरण्यात व थंड-फोफाट्यात पाय ठेवून चालण्यात खूप मजा येई.

मी पाव विकत असताना इतरही मुले पाव विकत. यामुळे कधीकधी आमच्यात स्पर्धा लागे. जो सर्वात आधी गावाला फेरी मारायचा त्याची विक्री जास्त होत असे. बऱ्याचदा माझा प्रतिस्पर्धी एका गल्लीला आरोळी ठोकल्यावर मी दुसऱ्या गल्लीत जाई. पाव विकण्यावरून कधीकधी आमच्यात भांडणेही होत. राखी पौर्णिमेच्या आसपास मी पावांबरोबर राख्याही घेऊन विकत असे. तर कधी पतंगही विकी. पाव विकल्याने पहिल्यांदा माझ्या हातात प्रत्यक्ष पैसा खेळू लागल्याने मोठेमोठे वाटू लागले.यामुळे कुठेतरी आत्मविश्वास रुजला. स्वत:च्या बळावर काहीतरी करू शकू, पायावर उभे राहू शकू असे  वाटू लागले. जीवनाबद्दल विचार सुरू झाला, पैशांचे गणित ध्यानीमनी वसू लागले.

छोट्याशा गावात रोज पाव घेणारी काही ठरावीक घरे होती. कोणत्या घरात लहान मूल आहे, कोणत्या घरातील मुले खूप हट्टी आहेत किंवा कुणाकडे पाहुणे म्हणून लहान मुले आली आहेत, यांवर मला नजर ठेवावी लागे. अशा घरांमध्ये माझी विक्री होई. मी मुद्दाम अशा घरांजवळ रेंगाळत असे व तिथे दोन-तीनदा सर्वांना ऐकू येईल अशा आवाजात ओरडत असे.

बऱ्याचदा, सुट्या पैशांचा वांधा होई. कारण माझा एक पाव पंचवीस पैशाला विकला जाई. काही महाभाग मुद्दाम दहाची, वीसची किंवा शंभराची नोट दाखवत. काही माझी नेहमीची गिऱ्हाईके माझ्याकडून उधारीत घेत. मात्र पैसे देताना ती मंडळी नाकीनऊ आणत. बरेच जण तर बदलून जात व त्यांनी कधी पाव घेतले हेसुद्धा त्यांना आठवत नसे. काही मुद्दाम लबाड बोलत. अशा वेळी माझ्यापुढे काही मार्गच राहात नसे.

बरेच जण माझ्याकडे बोट दाखवून आपल्या मुलांना सांगत, 'देखा तो पोरग्या, पाव ईकिसन, शाया करस.' अशा वेळेला मला आकाश ठेंगणे वाटे. मात्र बरीच उनाड मंडळी माझी टिंगलही करत. पाव विकल्याने माझ्या प्राथमिक गरजा भागू लागल्या. अक्काचे लग्न होईतोपर्यंत ती माझा हिशोब चोख ठेवत असे. नंतर मात्र माझ्यावरील नियंत्रण कमी झाले. प्रत्येक दिवशी मी कितीचे पाव आणतो व कितीचे विकतो, याची चौकशी करण्यास ताई-अण्णांना वेळ नव्हता आणि

मी सर्व व्यवस्थित सांभाळीन असा त्यांना विश्वास वाटत असावा.

परंतु त्या दरम्यान मला जुगाराची सवय लागली. सुरुवातीला, मी उत्सुकतेपोटी जुगार खेळू लागलो. त्यानंतर एका विशिष्ट पैशांमधून मी उलटापालट करून खेळायचो; परंतु शेवटी, मी पावाच्या पैशांमधून जुगार खेळायला लागलो. कधीकधी, तर माझ्याकडे पाव घ्यायलाही पैसे राहत नसत. अशा वेळी माझी फार पंचाईत होई. सुरुवातीला, माझा हा पराक्रम ताई-अण्णांपासून लपून राहिला; पण एकदोनदा, त्यांनीच मला रंगेहाथ पकडल्याने शंका राहिली नाही. जेव्हा जेव्हा मी जुगार खेळल्याची बातमी ताईला लागे, तेव्हा ती माझा चांगलाच समाचार घेई. गावातील जुगारी लोकांच्या संसाराचा कशा प्रकारे नाश झाला याचा दाखला देऊन ती मला समजावण्याचा प्रयत्न करी; परंतु तरीही माझी सवय काही केल्या जाईना. पुढे, माझ्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी जेव्हा माझ्या पावावरील पैशांमधून करण्याचे ठरवले तेव्हा मी जरा सावरलो. तरीही माझे जुगार खेळणे बंद होत नव्हते.

माझा हा उद्योग नववीपर्यंत चालू राहिला. दहावीत गेल्यावर, ताई-अण्णांनी माझे पाव विकणे बंद केले. पैशांची आवक बंद झाल्याने माझे जुगार खेळणे आपोआप संपले.

जुगाराबरोबर मला अजून एक वाईट सवय लागली आणि ती म्हणजे शाळा बुडवून व्हिडिओच्या दुकानात जाऊन व्हिडिओ बघण्याची. मी जेव्हा पाव विकत नसे तेव्हा माझ्याकडे अजिबात पैसे नसत. ताई वर्षाच्या सुरुवातीला एक रुपया द्यायची, त्याचा उपयोग मला अडचणीच्या वेळी करायचा असे. चुकून गाडी पंक्चर झाली किंवा आली नाही, अशा वेळेस मी ते पैसे वापरत असे. वेळोवेळी तो रुपाया मला ताईला दाखववावा लागे.

त्यामुळे जेव्हा माझ्याबरोबरची इतर मोठी मुले शाळा बुडवून सिनेमाला जात, तेव्हा माझी फार घालमेल होई; परंतु मला कधी कधी संधी मिळत असे. जेव्हा त्या मुलांना सोबत मिळत नसे तेव्हा तिकिट काढायच्या अटीवर मी त्यांच्याबरोबर जाई. एकदा तर गंमतच झाली. आम्ही शाळेला बुट्टी मारून गल्लीतून लपतछपत जात सिनेमा हॉल गाठला. चोरट्या मांजरीसारखे आजूबाजूला बघून हळूच हॉलमध्ये प्रवेश केला आणि अंधारात मागच्या बाकड्यावर जाऊन बसलो. थोड्या वेळानंतर आजूबाजूच्या व्यक्ती दिसू लागल्या. माझ्या शेजारी बसलेली व्यक्ती कोण आहे हे कळल्यावर माझे सात गेले आणि पाच राहिले. शेजारी माझा चुलतभाऊ नाना बसलेला होता. त्याने मला दमदाटी करून घरी ताईला सांगण्याविषयी धमकी दिली. माझी तर बोलतीच बंद झाली होती; परंतु नानाने घरी काहीच सांगितले नाही. त्यामुळे नानाचेही बिंग फुटले असते ना! ‘तेरी भी चूप और मेरी भी चूप!’

पाव विकल्यामुळे माझ्या हातात पैसे खेळू लागले. माझी सिनेमा बघण्याची सवय वाढत गेली. दुसऱ्याच्या पैशांनी सिनेमा बघणारा मी, दुसऱ्यांना स्वत:च्या पैशांनी सिनेमा दाखवू लागलो. तो बघून झाल्यावर मात्र अपराध्यासारखे वाटे. मी देवाची आराधना करी, की माझा पराक्रम ताईला माहीत व्हायला नको व मी परत अशी चूक करणार नाही! परंतु हे चक्र कधी थांबत नसे.

पैसे नसताना पैसे मिळवण्यासाठी मला वेगवेगळ्या क्लृप्त्या कराव्या लागत. सहसा, घरात पैसे कुठे ठेवले जातात याची बित्तंबातमी मी ठेवत असे. मग संधी साधून त्यांतले काही पैसे कुणाला कळू न देता लांबवत असे. शेवटी, पैशांचा हिशोब बऱ्याचदा चुकल्याने घरातल्या मंडळींना माझा संशय आला व माझ्यावर नजर ठेवण्यात येऊ लागली.

परंतु मी जास्त चतुराईने चोरी करू लागलो. माझी बहीण अक्का एका छोट्याशा डब्यात तिचे

पैसे साठवत असे. तिचा तो डबा नाण्यांनी भरलेला असे. त्यामधून एखाददुसरे नाणे पसार करणे तेवढे अवघड नव्हते. बऱ्याचदा, आम्ही भातखेड्याला सकाळी भाजीपाला विकण्यासाठी जात असू. चालणे सकाळी सहा वाजता सुरू करून, ओझे घेऊन तीन किलोमीटरवरील भातखेडा गाठावे लागे. अक्काजवळ सहसा कांदा, मेथी, मुळा, पोकळा वा मिरचीचे टोपले असे. भाजी विकून झाल्यावर, आम्ही अक्काच्या एका मैत्रिणीच्या घरी थांबायचो. त्यांच्या गप्पा रंगल्या, की मी हळूच तिच्या डब्यातून पैसे पसार करी, परंतु जर मैत्रिणीच्या घरी जाण्याआधीच पैसे मोजलेले असले तर मात्र माझी डाळ शिजत नसे.

मी जेव्हा अण्णांबरोबर माहिजीच्या आठवडा बाजारात भाजीपाला घेऊन जाई, तेव्हा मी पैसे लंपास करत असे. आमच्या दुकानाची जागा मध्यभागी होती, तेथे बऱ्याचदा खूप गर्दी व्हायची. अण्णा गिऱ्हाईकाला भाजीपाला मोजून देत व मी पैसे घेण्याचे काम करी. गोणीच्या दुमडलेल्या घडीमध्ये दोन कप्प्यांमध्ये पैसे ठेवायची व्यवस्था होती. अण्णा पाचच्या नोटा माझ्या वरच्या खिशात ठेवण्यासाठी देत. शेवटी, एकूण किती नोटा माझ्या खिशात आल्या आहेत हे काही त्यांच्या लक्षात येत नसे. त्यामुळे जेव्हा आमच्या दुकानासमोर गिऱ्हाईकांची गर्दी होत असे तेव्हा अण्णांची नजर चुकवून मी पाचची एक नोट वरच्या खिशातून खालच्या खिशात पसार करत असे. बाजार सुरू व्हायच्या आधी, अण्णा मला शंकराच्या हॉटेलात शेवचिवड्याचा भत्ता खाऊ घालत. तो मला खूप आवडे. या सर्व कारणांमुळे मला माहिजीला जायला खूप आवडे. शाळा बुडत असली तरी मी त्या बाजाराची वाटत पाहत असे.

पैसे लाटण्याच्या माझ्या काही सवयी एवढ्या जगावेगळ्या होत्या, की चुकूनही, कुणाच्या मनात माझ्याविषयी संशय येऊ शकत नव्हता. खानदेशात लग्नामध्ये किंवा तत्सम कार्यक्रमात निमंत्रण देणाऱ्या पार्टीला भेट म्हणून काही पैसे देण्याची प्रथा आहे. इतर ठिकाणीही, पाकिटात काहीतरी पैसे ठेवून देताना मी बघितले आहे. प्रथा कुणीही सुरू केली असली तरी ती मला चांगली वाटते, कारण त्याद्वारे लग्न करणाऱ्या व्यक्तीचा अंशत: का होईना खर्च भरून निघतो. त्या काळात माझ्यासाठी तर ती प्रथा वरदानच ठरली! त्या प्रथेला अहिराणीत ‘पैसे वाजवणे’ असे म्हणतात. ताई-अण्णा जेव्हा केव्हा लग्नाला जाताना माझ्या हातात पैसे वाजवण्यासाठी पाचची किंवा दहाची नोट ठेवत, तेव्हा माझा आनंद गगनात मावत नसे. मी त्या लग्नाला किंवा नवसाला न चुकता उपस्थित राहत असे. किंबहुना जेवण झाल्याविना हलत नसे; परंतु वाजवण्यासाठी दिलेले पैसे गुपचूप खिशात घालत असे व नंतर आनंदात घरी जात असे. खूपच झाले तर पैसे घेणाऱ्या मंडळींजवळ ओळखीच्या काही व्यक्तींना दिसेल अशा आविर्भावात गर्दी करत असे. उद्देश एवढाच, की पैसे वाजवले वा न वाजवले तरी ताई-अण्णांना पडताळणी करायला काही मार्ग नव्हता. माझे हे गुपित मी कधीही कुणाला कळू दिले नाही.

हे सर्व उपद्व्याप करूनही माझ्याकडे पैसे राहत नसत. अशा वेळी मी छोट्या-मोठ्या चोऱ्या करत असे. मी शेतामधून रबरी पाईप गायब करत असे. साधारणत:, कुणालाही संशय येणार नाही अशा रीतीने घडी करून पाईप एरंडोलला नेऊन भंगाराच्या दुकानात विकत असे. त्यात मला बऱ्यापैकी पैसे मिळत. मी ते जुगारासाठी, सिनेमा बघण्यासाठी वापरत असे. ते काम मला खूप सावधानतेने करावे लागे; परंतु नेहमीच्या सवयीने मला चांगली सफाई आली होती.

आई सत्यवादी असल्यामुळे जेव्हा कधी चोरी केल्याची खबर तिला मिळे, तेव्हा तिच्या तळपायाची आग मस्तकाला भिडे. अशा वेळी दुर्दैवाने जर मी तिला सापडलो तर मात्र माझी खैर

राहत नसे. ती हातात येईल त्या वस्तूने माझी मनसोक्त पिटाई करायची व पुन्हा चोरी न करण्याची बोली वदवून घेई. मीही पुन्हा तसे न करण्याविषयी निश्चय करत असे; परंतु माझा हा निर्धार दुसऱ्या दिवसाचा सूर्य क्वचितच बघत असे.

## कोणत्याही कामाची लाज नसली पाहिजे...

मी असाहाय्य लोकांचे, मोलमजुरी करणाऱ्यांचे जीवन खूप जवळून अनुभवले आहे. तुटपुंज्या पैशांत संसाराचे रहाटगाडगे ओढणारी, व्याजाच्या बोजाखाली खंगून गेलेल्या अशिक्षित, गरीब कुटुंबात माझा वावर नेहमी झालेला होता. अशा कुटुंबात ज्याला जेवढी मुले जास्त त्याला तेवढ्या जास्त हातांचा हातभार मिळतो अशी भावना असे. आमच्या अशा या वर्गात, मुले लहान असल्यापासून त्यांना शाळेत जाण्याऐवजी भावंडांच्या व आईवडिलांच्या कामात मदत करण्याची ऊर्मी येत असे. मी त्या सर्वांपासून वेगळा नव्हतो.

मी लहान असतानाच अक्काला व ताईला लोकांच्या शेतात काम करताना पाहिलेले होते. घरात जेव्हा जेव्हा अडचण निर्माण होई किंवा पैशांविषयी काही विषय निघे, तेव्हा मनात काम करण्याची, कुटुंबाला मदत करण्याची तीव्र इच्छा जागृत होई. अशा वेळी मी उगाच ताईच्या किंवा अक्काच्या कामात लुडबूड करत असे. शेवटी, तो दिवस उगवला जेव्हा माझ्या एकट्याच्या कामासाठी मला पैसे मिळू लागले. मी तेव्हा पाचवीत होतो. दिवाळीच्या सुट्टीत मला कापूसवेचणीचा ‘व्हका’ म्हणजे काम करण्याची संधी मिळाली. गावातील काही चतुर लोक फक्त मुलांना कामाला लावत, कारण त्यांना पाहिजे तसे व पाहिजे तितके राबवून घेणे सोपे जात असे. मी अशाच एका शेतकऱ्याकडे अडीच रुपये रोजाने कामावर जायला सुरुवात केली. सुरुवातीला, मी आपले कर्तृत्व दाखवण्यासाठी जरा जास्तच प्रामाणिकपणे काम करत होतो. लवकरच, माझी कामासाठी ‘चांगला मुलगा’ म्हणून गणना होऊ लागली.

उन्हात दिवसभर काम करणे कंटाळवाणे वाटे; परंतु आपल्याला दिवसअखेर पैसे मिळतील या विचाराने सुखावून जाई व गुपचूप काम करी. कापूस वेचताना उरलेल्या वेळेत बांधावरील बोरी किंवा चिंचेच्या झाडावर चढून बोरे किंवा चिंचा खाण्यात मजा येई. बऱ्याचदा, मी माझ्या हिश्श्याचे भरभर वेचून पसार होत असे. कापूस वेचताना सासुरवाशिणी आपल्या दु:खाला, यातनांना वाचा फोडत. त्यांचा घरात चालणारा छळ त्यांना चारचौघींसमोर मांडता येत असे. सर्व बाया आपापले मतप्रदर्शन करत. सांत्वन करत, सल्ला देत. त्यामुळे सासुरवाशिणींसाठी शेताचे काम म्हणजे सासरच्या जाचातून त्यांना मिळालेली तात्पुरती सुटका असे. माझ्यासाठी त्या चर्चा खूप वेगळा अनुभव देऊन जात. एरवी, मी बऱ्याच लोकांचा आदर करी. त्यांच्या अशा दुर्व्यवहारानंतर माझी त्यांच्याकडे बघण्याची दृष्टी बदलत असे. त्या व्यतिरिक्त सर्व स्त्रिया वेगवेगळ्या विषयांवर मनसोक्त गप्पा मारत. मीही कधी कधी माझे मत प्रदर्शित करत असे. मी दिवसभर कापूस वेचल्यानंतर, संध्याकाळी कापसाने भरलेल्या गाड्यांवर येत असे. मला गाडीवर बसून नरम कापसावर डोलत डोलत किंवा गाडी चालवत आणायला खूप मजा येई.

मी जसा मोठा होत गेलो तसे माझे काम करण्याचे स्वरूप बदलत गेले. आमची दिवाळीची सुट्टी पूर्ण कामात जात असे. प्रत्येक दिवसाचा हिशोब घेऊन किती पैसे येतील यावर चर्चा होत असे. साधारणत: दिवाळीत केलेल्या कामामधून एखादा सदरा किंवा चड्डी घेण्यात येई व उन्हाळ्यात केलेल्या कामातून शाळेची जुनी पुस्तके घेण्यात येत.

लहान असताना, मला अर्ध्या माणसाचे पैसे मिळत; परंतु लवकरच मी कामाच्या दृष्टीने मोठा माणूस झालो आणि आठवी-नववीत मला प्रौढ माणसाचा रोजगार मिळू लागला. लहान

असतानासुद्धा माझे काम मोठ्या माणसापेक्षा जास्त होते. सदासर्वदा मोलमजुरी करणाऱ्या बाया नेहमी अंग सांभाळून काम करत. उशिरा येत, नंतर काम करता करता मध्येच तीन-चारदा पाणी प्यायला बसत, न्याहारीला बसत व सर्व मिळून खूप संथ काम करत. माझ्या कामाची पद्धत वेगळी होती. मी घरचे काम समजून त्या रोजाचेही काम करायचो. त्यामुळे मी सुट्टीच्या दिवसांत कधी घरी राहत नसे. सदासर्वदा मला काम करण्यासाठी बोलावणी येत. दिवाळी आणि उन्हाळ्याच्या सुट्टीव्यतिरिक्त जेव्हा खूप गरज असे किंवा स्वत:च्या कामाला मजूर मिळत नसत, अशा वेळी ताई आम्हाला घरी ठेवून घेई. शाळेतून घरी राहायला खूप जिवावर येई, परंतु ताईपुढे बोलण्याची हिंमत नसे.

कापूस वेचण्याबरोबर मी ऊस बांधणे, कांदे लावणे, निंदणे, कोळपणे, विहीर खोदणे, अशी कामे हळूहळू करू लागलो. त्यापैकी काही कामे काही मोठ्यांनाच येत. मजूर बायांबरोबर कांदे लावणे मुलांच्या किंवा माणसांच्या आवाक्याबाहेर होते; परंतु मी ते काम सफाईदारपणे करत असे. कांदे लावायला नेहमीच्या रोजंदारीपेक्षा दोन रुपये जास्त मिळत असत. बऱ्याच कामांमध्ये घरातील आम्ही सर्व कामाला लागत असू. दिवस उगवल्यावर मी व अक्का कांदे उपटण्यासाठी किंवा भुईमूग उपटण्यासाठी जात असू. आई आमची न्याहारी घेऊन उशिरा येई.

वेगवेगळ्या मोसमांत शेतीची वेगवेगळी कामे असतात. पावसाळ्यात कापूस लावणे, पेरणे, कांदे लावणे इत्यादी; हिवाळ्यात ज्वारी-बाजरी कापणे, कापूस वेचणे, ऊस लावणे, बांधणे इत्यादी; व उन्हाळ्यात खूप कमी कामे असत - जसे कचरा वेचणे, बांध खोदणे, विहीर खोदणे वगैरे. या सर्व कामांसाठी प्रशिक्षणाची गरज नसते. शेतकऱ्याच्या पोटी जन्माला आल्यावर ही कामे आपोआप यायला लागतात. शिवाय, गरज ही एक अशी गोष्ट आहे, जी माणसाला काहीही करायला भाग पाडते.

माझ्या लहानपणी दोन कामांनी कधीच पिच्छा सोडला नाही. एक म्हणजे चुलीसाठी करावी लागणारी सरपणाची व्यवस्था आणि सकाळी विकावे लागणारे पाव किंवा भाजीपाला. वेळ ठरवून आमची बालगोपाळांची पलटण सरपण जमा करायला निघत असे. आम्ही उन्हाळ्यात लांब शेतांमधून, माळरानातून सरपण जमा करत असू. सहसा पायात काही नसे. बहुतेक वेळा, आम्ही छोटीमोठी झाडेझुडुपे तोडून ठेवत असू व काही दिवसांनी जाऊन ती घेऊन येत असू. काही वेळा, मी लाकडे जमा करण्यासाठी पद्मालयाच्या जंगलात जात असे. सकाळी गुराख्यांबरोबर गेल्यावर लाकडाची मोळी घरी आणेपर्यंत संध्याकाळ होत असे.

मला भिल्लांच्या पोरांबरोबर हुंदडायला खूप आवडे. मी संधी साधून त्यांच्याबरोबर गुरे चारायला किंवा सरपण जमा करायला जात असे. त्यांचे जंगलात भरपूर उद्योग चालत. उघड्या अंगाने, पायात काहीही न घालता फिरणारी ती काळीबंब पोरे खूपच काटक असत; जंगलात काहीतरी मारून ते तिथल्या तिथे भाजून खात. त्यांच्याकडे घोरपडी व ससे धरण्यासाठी सापळा असे. त्यांचे जीवनच जगावेगळे. कांदाभाकरी खाणारे भटके भिल्ल स्वाभिमानी असतात. दुसऱ्या दिवशी काही नसले तरी ते निवांत जीवन जगतात. आठवडाभर मोलमजुरी करणे, राबराब राबणे आणि आठवडे बाजाराच्या दिवशी एरंडोलला जाऊन आलेल्या पैशांचा बाजार करणे, सिनेमा बघणे असा त्यांचा दिनक्रम असे. शिक्षण, आरोग्य, सरकारच्या सोयीसुविधा यांपासून ती मंडळी खूप लांब. पण ती लग्न वगैरे मात्र खूप धूमधडाक्यात करत. अशा वेळी त्यांचा खर्च श्रीमंत लोकांना लाजवेल असा राहत असे. त्यांच्या अशिक्षितपणामुळे व मागासलेपणामुळे अंधश्रद्धेचा मोठा पगडा

त्यांच्या मनावर आहे. त्यामुळे आजारी पडल्यावर डॉक्टरांकडे जाण्याऐवजी ते भगताकडे जातात. लग्नामध्ये व इतर सामाजिक कार्यामध्ये होणाऱ्या प्रचंड खर्चामुळे त्यांचे कंबरडे नेहमी मोडलेले असते. सगळे कर्जाच्या सापळ्यात. त्यांच्यातली क्वचितच एखादी व्यक्ती विनाकर्जाची सापडे.

सरकारी पातळीवर त्यांच्या कल्याणासाठी चालवण्यात येणाऱ्या बऱ्याच योजना खूपच हास्यास्पद ठरल्या आहेत. त्यांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा या ना त्या मार्गाने इतरांनी लाटल्या आहेत. आय.आर.डी.पी. योजनेमधून त्यांच्यातील बऱ्याच लोकांना कर्जाने गायी देण्यात आल्या होत्या. भटके जीवन जगणाऱ्या लोकांना गायीचे दूध कसे काढावे हेसुद्धा माहीत नव्हते, तेव्हा ते हायब्रीड गायीचे संगोपन कसे करणार? शेवटी व्हायचे तेच झाले. दोन वर्षांत वीसपैकी दोन जणांकडेसुद्धा गायी जिवंत राहिल्या नाहीत. त्यांच्यातला कोणी सालदार म्हणून तर कोणी विटांच्या भट्टीवर तर कोणी सुरतच्या झोपडपट्टीत राबताना दिसतो. सततच्या जंगलातोडीमुळे त्यांच्या उदरनिर्वाहाला पुरतील एवढी जंगलेही शिल्लक राहिलेली नाहीत. या सर्व गडबडीत भिल्लांची संस्कृती लोप होताना दिसते.

साठ वर्षांपूर्वी मिळालेल्या स्वातंत्र्यानंतरही भिल्ल उपेक्षित राहिले आहेत. राजकीय व सामाजिक दृष्ट्या संघटित न झाल्यामुळे, कोणी त्यांच्या समस्यांकडे लक्ष देताना दिसत नाही. आरक्षित असलेल्या जागांवर नावापुरते त्यांच्यातल्या एकाला बसवले जाते व मेवा मात्र इतरांच्या घशात जात राहतो. शिक्षणाचे दरवाजे सर्वांसाठी उघडले असले तरी अजूनही रोजीरोटीचा प्रश्न त्यांच्यासाठी शिक्षणापेक्षा जास्त महत्त्वाचा आहे.

मी केलेल्या सर्व कामांत विहीर खोदणे शारीरिक दृष्ट्या जास्त कष्टदायक होते. टिकाव, पहार किंवा लोखंडाचे मोठमोठे घण घेऊन विहीर खोदण्याचे काम होत असते. दिवसभर खोदलेली दगडमाती एका विशिष्ट प्रकारे बनवण्यात आलेल्या टोपलीतून -‘सिकाई’तून - वर काढली जाई. बऱ्याचदा, ही सिकाई खूप वजनदार असे. दोन माणसे त्यांतील दगडमाती उचलून लांब असलेल्या ढिगाऱ्यावर जाऊन टाकत. सहसा नवशिके सिकाईवर राहत आणि अनुभवी मजूर खाली विहिरीत खोदकाम करत. मला नेहमी विहिरीतले काम आवडे. सुरुवातीला साधारण एक वर्ष मला कुणीही विहिरीत उतरवत नसे. मला सिकाईवरच काम करावे लागे. एके दिवशी, विहिरीत खोदायला माणसे कमी पडल्यावर मला विहिरीत उतरण्याची संधी मिळाली. माझ्या कामाची सर्वांनीच स्तुती केली व त्यानंतर मी कधी मागे वळून बघितले नाही. विहिरीवरील अवजड कामातून साधारणत: पाच रुपये दिवसाला मिळत. त्या वेळी माझे संपूर्ण लक्ष पैशांकडे असे. त्यामुळे काम पेलवत नसले तरी ते मी करत असे.

गावातील एका ट्रॅक्टरवर काही मजूर काम करत. रोज दगड वाहणे, वाळू-विटा वाहणे, खत वाहणे वा मुरूम-माती वाहणे ही कामे ट्रॅक्टर करत असे. ट्रॅक्टरबरोबर मजुरांनाही प्रत्येक ट्रिपसाठी विशिष्ट पैसे मिळत. गावात मजूर सर्वात जास्त कमावत. त्यामुळे मला सुरुवातीपासून त्या कामाचे आकर्षण निर्माण झाले होते. इतर कामांमध्ये मी चुणूक दाखवल्यानंतर साहजिकच पुढची पायरी ट्रॅक्टरवरील कामाची होती. एक दिवस त्यांच्या टोळीतील एक मजूर काही कारणाने घरी राहिला आणि मला ती संधी मिळाली.

मला खत भरायचे काम खूप जिवावर येई. खत भरताना धूळ, माती  नाकातोंडात जाई. शिवाय, खताचा घाण वास असह्य होई. दिवसभराच्या कामानंतर, संध्याकाळी घामामुळे व धुळीमुळे अंगावर एक थर तयार होत असे. उन्हाळ्यात उन्हामुळे भाजून निघाल्यासारखे होई.

बऱ्याचदा, डब्यात आणलेले कालवण खराब होई. काही ठिकाणी खत, दगड भरताना विंचू, साप निघत. मला मात्र लहान असूनही आपण या कसलेल्या मजुरांबरोबर काम करतो याचा अभिमान वाटे. मी सुट्टीच्या दिवशी किंवा संधी मिळाल्यास शाळा बुडवून किंवा कॉलेज बुडवूनही ही सर्व कामे करत असे. त्या दरम्यान घडलेली एक घटना सदैव माझ्या स्मरणात राहील. आम्ही ट्रॅक्टरवर काम करण्यासाठी वेगवेगळ्या गावांना जात असू. असेच एकदा आम्ही खत भरण्याच्या निमित्ताने दहीगावला गेलो होतो. योगायोगाने, आमचे काम संग्रामच्या, माझ्या जवळच्या मित्राच्या काकांकडे होते. गावाच्या एका टोकाला असलेल्या उकिरड्यावरून आम्हाला दिवसभर खत वाहायचे होते. उकिरड्यापासून मला संग्रामचे घर स्पष्ट दिसत होते; पण त्याच्या घरापर्यंत जायला माझे मन धजावत नव्हते. मला माझ्या गरीबीची लाज वाटत होती. संग्राम श्रीमंत घरातील मुलगा होता. मला तो आवडत असे परंतु माझ्या जीवनाचे हे अंग मी त्याच्यापासून लपवू बघत होतो. दुपारी अचानक आम्हाला सर्वांना पंगतीत जेवण्यासाठी बोलावण्यात आले. कुणीतरी म्हातारा मेल्यामुळे त्याच्या तेराव्याला गावजेवणाचा कार्यक्रम होता. आम्हाला नेमके संग्रामच्या घरासमोर जेवायला बसवण्यात आले. मी डोक्याला मोठा रुमाल बांधून जवळजवळ अर्धा चेहरा झाकून टाकला. माझ्या सुदैवाने, वाढायला संग्रामचे वडील असतानाही ते मला ओळखू शकले नाहीत.

मला काम करायला नेहमी आवडे. कारण काम केल्याने पैसे मिळत, कुटुंबाला थोडी मदत होई. घरातील बघाव्या लागणाऱ्या नेहमीच्या आर्थिक अडचणी सोडवण्यासाठी आपला हातभार लागत आहे याचे समाधान वाटे. आपण मोठे झालो, कमावते झालो याचा अभिमान वाटे. त्यामुळे काम मिळत असल्यास मी ती संधी कधीच सोडत नसे. बऱ्याचदा, दिवसाच्या कामानंतर रात्रीही काम करण्याची संधी मिळे. रात्रीचे काम सहसा नदीवरून वाळू भरणे वगैरे असे किंवा अण्णांबरोबर स्वत:च्याच शेतात पाणी देण्यासाठी जावे लागे. वाळूचा सर्व मिळून एक ट्रॅक्टर भरल्यावर वाळू उपसून येईतोपर्यंत आम्हाला झोपायला मिळे. परंतु ट्रॅक्टर परत आल्यावर खडबडून उठावे लागे व ट्रॅक्टर भरावा लागे.

मी ताईच्या शिकवणीप्रमाणे विचार अंगीकारण्याचा पुरेपूर प्रयत्न करत असे. त्यामुळे कामचुकारपणा, आळस, बहाणेबाजी या गोष्टी माझ्यापासून दूर राहिल्या. शाळेत व कॉलेजमध्ये शिकणाऱ्या माझ्याबरोबरच्या मुलांच्या हातावर नसलेले घट्टे बघून, कधी कधी मला स्वत:च्या अभिमान वाटे, तर कधी स्वत:ची दया येई.

लहानपणी कराव्या लागलेल्या शारीरिक श्रमांमुळे मला नंतरच्या आयुष्यात फायदाच जास्त झाला. मी शारीरिकदृष्ट्या कणखर बनलो. मला ऊन, वारा, पाऊस यांपासून क्वचितच त्रास झाला. शिवाय, मनातील कामाबद्दलची भीती निघून गेली. मी कामकरी लोकांच्या, मजुरांच्या समस्यांविषयी - शोषणाविषयी जास्त संवेदनशील झालो. माझ्या शारीरिक व मानसिक जडणघडणीच्या दृष्टीने हे मोलाचे अनुभव माझ्या आयुष्याला वेगळा आयाम देऊन गेले.

## बापू, अण्णाले पैसा देवाले लाव...!

गावात दहावीला असलेल्या मुलांबद्दल बरीच चर्चा होत असे. त्यांचा अभ्यास, त्यांच्यापैकी कोण नापास-पास होईल याबद्दल वारंवार अनुमान काढले जाई. निकालानंतर, पास झालेली मुले शाळेतील गावात पेढे वाटत. काही दिवसांनंतर, त्यांची ऐट बघण्यासारखी असे. माझा, एकंदर पराक्रम बघून गावात कोणालाही हा मुलगा दहावी पास होईल असे वाटत नव्हते. ताई-अण्णांनीही शेवटचा पर्याय म्हणून मला दोन शिकवण्या लावून दिल्या आणि माझे पाव विकणे बंद केले; कारण एवढेच, की मी व्यवस्थित अभ्यास करावा आणि काहीतरी छाप पाडावी. मला मात्र या गोष्टीचे सोयरसुतक नव्हते. दहावी कसे पास होता येईल याबद्दल माझे आराखडे सुरू झाले.

मी नववीत असतानाच्या काळात माझ्या वागण्या-बोलण्यात जे काही परिवर्तन होत गेले, त्या प्रतिक्रियेची नांदी एका घटनेने घडली होती. नेमकेसे आठवत नाही, परंतु मी तेव्हा नववीत असेन. गावात माझ्याकडे वाया गेलेला मुलगा म्हणून बघितले जाई. माझ्याबरोबर जर कुणाचा मुलगा वावरत असला तर तोही नक्की उनाड होईल अशी त्याच्या आईवडिलांना खात्री वाटे. म्हणून माझ्याबरोबर फिरणाऱ्या मुलांना त्यांच्या घरी बोलणी बसत.

यामुळे गावात कुणी काही गैरकृत्य केल्यास, मी त्या कृत्यात नक्की सामील असणार असा सर्वांचा विश्वास होई. कधी-कधी, या विषयाला घेऊन बाया ताईला खूपच उलटसुलट बोलत. ताईचा स्वाभिमान त्यामुळे दुखावला जाई. एकदा, ताई दळण दळण्यासाठी चक्कीवर गेली होती. चक्कीवाल्या बाईने ताईच्या समोर तिच्या मुलाला माझ्याबरोबर खेळायला न जाण्याविषयी ताकीद दिली. ती ताईला आडवेतिडवे बोलू लागली. त्या विषयाला घेऊन त्यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. तिचे काही शब्द ताईच्या जिव्हारी लागले. त्या काळात तिची प्रतिष्ठा, तिचा स्वाभिमान मातीला मिळाला होता.

आपल्या वागणुकीने कौतुकाचा विषय ठरलेल्या ताईला मुलामुळे लाचारी आली होती. आयुष्यात ताठ मानेने चालण्यासाठी तिने खूप कष्ट सहन केले होते. लग्न होऊन सासरी आल्यानंतर संपत्तीवर डोळा ठेवून असलेल्या कोल्ह्यांनी तिला हैराण केले होते. तिने सुरुवातीची काही वर्षे, नवरा लांब असतानाही एकटीने राहून सर्वांना खंबीर तोंड दिले होते.

मी त्या दिवशी घरी आल्यावर तिने मला काही कारण नसताना खूप बदडून काढले. मला मारताना, धैर्याचा महामेरू असलेली माझी ताई बर्फाच्या तुकड्यासारखी वितळलेली वाटत होती. ती हतबल, असाहाय्य वाटत होती. मला तिची कीव येत होती व त्याचबरोबर स्वत:चा तिरस्कारही वाटत होता.

तिचे मारून झाल्यावर, मी बाहेर निघून पारावर जाऊन बसलो होतो. तिचा एकेक शब्द आठवून मी बराच वेळ रडत बसलो होतो. आतापर्यंतचे ताईचे मारणे म्हणजे माझ्यासाठी एक सोपस्कार असायचा. तो मी झेलून घ्यायचो व परत कामाला लागायचो. परंतु त्या दिवशीचा तिचा मार वेगळ्या प्रकारचा होता.

मी खूप उनाडक्या करत होतो, भांडणे करत होतो, परंतु कुणी माझ्यासमोर ताईला काही बोललेले मला सहन होत नसे. त्या पूर्वी मार खाल्ल्यावर, नंतर जेवण कसे सुखरूप मिळेल यावर माझे लक्ष असे, परंतु त्या दिवशी मला जेवायची इच्छा होत नव्हती. राहून राहून, ताईचा तो

असाहाय्य चेहरा डोळ्यांसमोर येत होता. त्या आठवणीनेच मी स्फुंदून-स्फुंदून रडत होतो.

तो दिवस अविस्मरणीय ठरला. त्यानंतर मी त्या चक्कीवालीच्या मुलाला टाळू लागलो, त्याच्या घरी जाणे बंद केले. माझ्या एकंदरीत उडाणटप्पूपणाला थोडा आवर बसला. खेळता खेळता मध्येच मला त्या घटनेची आठवण येई व मी खेळ आवरता घेऊन घराकडे परत फिरे. बरेच दिवस, माझे ताईबरोबरचे संभाषण खूपच त्रोटक होते. तिच्याशी मान वर करून बोलायची हिंमत मला झाली नाही. मी मनाशी पक्का निश्चय केला की, यापुढे ताईला कोणताही त्रास द्यायचा नाही; आपल्यामुळे तिचा त्रास कमी कसा होईल याचा विचार करू लागलो.

अर्थात असा निश्चय मी पहिल्यांदाच करत होतो असे नाही; परंतु त्यानंतर खरोखरीच माझ्या वागण्याबोलण्यात बदल व्हायला सुरुवात झाली. मानसिक पातळीवर झालेले हे बदल वयामुळे झाले वा अजून इतर काही कारणांनी झाले याविषयी तर्क करणे कठीण आहे. दहावीत प्रवेश घेतल्यानंतर तर माझ्या वर्तनात वेगाने बदल होऊ लागला. मी अभ्यासाविषयी काळजी करू लागलो. अचानक झालेल्या या बदलामुळे घरात चर्चा होऊ लागली. त्यापूर्वी मी जेव्हा जेव्हा अभ्यास करत असे, तेव्हा त्यांना माझी शंका येत असे, कारण अभ्यासाच्या पुस्तकामध्ये वाचनालयाचे दुसरे एखादे पुस्तक ठेवून मी वाचत असे. त्यामुळे त्यांनी बऱ्याचदा माझे पुस्तक चाचपून बघितले; परंतु जेव्हा मी खरेच अभ्यासाचे पुस्तक वाचत आहे हे कळल्यानंतर त्यांना हायसे वाटत असे.

त्याच काळात माझ्यात आणखी एक बदल होत गेला. तो म्हणजे मला लाभलेली संग्रामची सोबत. आजही आठवते. पाचवीत एरंडोलला प्रवेश घेतल्यानंतरचा पहिला दिवस, खेड्यावरून आलेल्या आम्हाला ई तुकडीत प्रवेश देण्यात आला होता. जवळजवळ सर्वांच्याच घरची मंडळी शाळा दाखवायला आली होती. आम्ही सर्व उत्सुकतेने एकमेकांकडे बघत होतो. या गडबडीत एक चुणचुणीत गोरा मुलगा सर्वाच्या आकर्षणाचे केंद्र बनला होता, तो दुसरा कुणी नसून संग्राम होता.

सुरुवातीला अभ्यासात त्याचीही विशेष प्रगती नव्हती. मीही त्याच्यापासून लांबच राहत असे. माझ्यासारखेच तोही उपद्व्याप करीत असे. त्याच्या राहणीमानावरून व बोलण्यावरून तो कोणत्याच अर्थाने खेड्यातील मुलगा वाटत नसे. घरी थोडी समृद्धी असल्यामुळे व आईकडचे बरे असल्यामुळे तो इतर शेतकऱ्यांच्या मुलांपेक्षा उजवा वाटे. पुढे सातवीमध्ये आम्ही एकमेकांच्या जास्त जवळ आलो. शाळेत एकाच बेंचवर बसू लागलो. दुर्दैवाने त्यानंतर दोन वर्षांसाठी माझी तुकडी बदलली व पुढे दहावीत पुन्हा आम्ही एकत्र आलो. संग्राम वर्गात पहिल्या नंबरने पास होत असला तरी खूप अभ्यासू नव्हता त्यामुळे माझी त्याच्याशी गट्टी जमली.

दहावीत तो उन्हाळ्याच्या सुट्टीत पुण्याला जाऊन आला व त्याच्या एकंदरीत चालण्याबोलण्यात फरक दिसू लागला. कदाचित एवढ्या मोठ्या ठिकाणी त्याला भरपूर लांबून आलेली हुशार मुलं भेटली असतील त्यामुळे त्याला दिशा मिळाली. तो जास्त प्रगल्भासारखा बोलू लागला. अभ्यासातही जास्त लक्ष घालू लागला. सुदैवाने त्यादम्यान आमचा संपर्क वाढला. त्याला भेटलेल्या इतर मुलांविषयी व त्यांच्या एकंदरीत आचारविचारांविषयी तो मला सांगत असे. यामुळे मीही त्याच्याबरोबर जास्त वेळ घालवत असे.सकाळी ट्यूशन संपल्यावर आम्ही शाळेपासून लांब एका गोडाउनच्या पडदीवर बसून शाळा सुरू होईपर्यंत अभ्यास करीत बसत असू. हळूहळू मी त्याचे अनुकरण करू लागलो. तोही मला मार्गदर्शन करू लागला. प्रत्येक दिवसागणिक मी

त्याच्या सहवासात बदलू लागलो होतो. सुरुवातीला मी त्याच्या काही स्नेह्यांमधील एक सक्ेही होतो. पण नंतर पुढे जवळचा मित्र झालो.

दहावीच्या निकालानंतर मी एरंडोलमध्येच राहिलो व संग्राम धुळ्याला निघून गेला. त्या दरम्यान आमचा संपर्क होत राहिला. आम्ही पत्राच्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात राहिलो. जेव्हा केव्हा तो घरी येत असे तेव्हा मी कधी सायकलवर तर कधी पायीच त्याच्या गावाला म्हणजे दहिगावला त्याला भेटायला जात असे. त्याच्या बोलण्याने, भेटण्याने व लिहिण्याने मला खूप बळ मिळत असे. आपणही काहीतरी करावे अशी उर्मी दाटून येत असे. त्याच्या बोलण्यातून नेहमी माझ्याविषयी काळजी, आत्मीयता व कधीकधी विश्वास झळकत असे.

त्याच्याच प्रोत्साहनामुळे मला धुळ्याला जाण्याची स्फूर्ती मिळाली. घरच्यांची ऐपत नसतानाही मी धुळ्याला जाण्याचा निर्णय घेतला. संग्रामच्या मदतीने आपण तिथे परिस्थिती सांभाळून घेऊ असे कुठेतरी वाटत होते. झालेही तसेच; संग्राम पहिल्या वर्षी दुसऱ्या मित्राबरोबर राहत होता. माझ्या तिथे जाण्यामुळे त्याने माझ्याबरोबर राहण्याचा निर्णय घेतला. माझ्याबरोबर राहण्यात अनंत अडचणी होत्या. मी घरी स्वयंपाक करीत असल्यामुळे धूर, भांडीकुंडी यांचा त्रास, शिवाय इतर खर्चही जवळजवळ त्यालाच करायचा होता. हा एक वर्षाचा काळ आमच्यासाठी निर्णायक ठरला. आम्ही भविष्याचा विचार करायला लागलो होतो. समाजातील इतर घटना, प्रवाह आमच्या किशोरवयीन मनावर परिणाम करित होते. चांगल्या विचारांची बांधणी होत होती. त्या काळात आमच्यातील मित्रत्वाच्या नात्याने काही कठोर परीक्षा पास केल्या. एकमेकांबद्दल वाटणारा द्वेष, हेवादावा यापासून आम्ही लांब राहिलो होतो. दोघांनी एकमेकांच्या गरजांचा, त्रुटींचा, स्वभावामधील कंगोऱ्यांचा व त्याचबरोबर आत्मसन्मानाचा आदर केला होता. त्या दरम्यान आमच्या काही सहकाऱ्यांनी आमची मने कलुषित करण्याचा व आमच्या मनात एकमेकांविषयी भरवण्याचा प्रयत्न केला होता. परंतु तो काही यशस्वी झाला नाही.

बारावीनंतर आमच्या वाटा वेगवेगळ्या झाल्या. संग्रामने पुण्यात वैद्यकीय शाखेत प्रवेश घेतला व मी नाशिकला निघून गेलो. त्या तीन वर्षातही आमचा संपर्क कायम राहिला. संग्रामच्या आयुष्यात व स्वभावात त्या दरम्यान खूप बदल झाले. तिथे तो नुपूरच्या प्रेमात पडला. नुपूर एक साधी, सरळ व प्रामाणिक मुलगी होती. नुपूरच्या सहवासामुळे तो विचारी बनला. तिच्या प्रामाणिक व शुद्ध आचरणामुळे त्याच्यामधील अशुद्धता नाहीशी झाली. समाजसेवा करण्यासाठी आधीच सरसावलेल्या संग्रामला नुपूरमुळे ठोस पाठबळ मिळाले.

पदवीनंतर मी पुण्यात दाखल झालो. माझ्या पुण्यातील वास्तव्यादरम्यान तो बऱ्याचदा नुपूरसह विद्यापीठात येत असे. किंवा मी बी.जे.ला जात असे. त्यांच्या सहवासात वैद्यकीय क्षेत्राची माहिती झाली. आम्ही चतु:श्रृंगीच्या टेकडीवर किंवा विद्यापीठातील ओपन कँटीनवर वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करीत असू. त्या दरम्यानच मी माझा आय. ए. एस. करण्याचा निर्णय पक्का केला.

दरम्यान त्यांच्या आयुष्यात एक मोठे वादळ आले. त्यांच्या आंतरजातीय लग्नाला संग्रामच्या आईवडिलांनी खूप विरोध दर्शविला. नुपूरला सोडण्याविषयी त्यावर दबाव येत होता. पुढे काही अनर्थ होऊ नये म्हणून त्यांनी नोंदणी पद्धतीने विवाह करण्याचा निर्णय घेतला. मीही त्यांना पाठिंबा दिला. मला आजही आठवते ते शनिवार पेठेतील कोर्ट. त्या दिवशी सकाळीच आम्ही तेथे हजर झालो होतो. कोर्टाचा आमचा पहिलाच अनुभव. त्या गर्दीत चुकल्यासारखे वाटत होते. शेवटी

आमची वेळ आली. सह्या झाल्या व ते दोघे नवरा-बायको झाले. त्यानंतरही ती बातमी त्यांनी वर्षभर इतरांपासून लपवून ठेवली. त्याकाळात त्यांच्या भविष्याविषयीच्या चर्चेत मीही एक महत्वाचा भागीदार होतो. अगदी सुरुवातीपासून त्यांना एखाद्या छोट्याश्या ठिकाणी त्यांचे हॉस्पिटल सुरू करून सेवाभावी तत्त्वाने काम करण्याची इच्छा होती. आज त्यांचे स्वप्न एरंडोलमध्ये 'बाबा आमटे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल' या नावाने साकार झालेले बघून मनोमन खूप आनंद होतो.

माझ्या पुण्यानंतरच्या वाटचालीमध्ये संग्रामची खूप महत्त्वाची भूमिका राहिली आहे. वाईटातल्या वाईट अनुभवापासून चांगल्या अनुभवापर्यंत सर्वप्रथम मी त्याच्याशी शेअर केला आहे. माझ्यातील क्षमतांचा व उणिवांचा त्याला चांगला अनुभव असल्यामुळे त्याने नेहमी मला डोळस सल्ला दिला आहे. त्याचे कधी सडेतोड बोलणे, तर कधी माझ्या क्षमतांवर विश्वास दाखवून प्रोत्साहन देण्यामुळे मला पुढे चालत राहण्याची प्रेरणा नेहमी मिळाली. आजही विश्वासाचा, आंतरिक ओलाव्याचा व मित्रत्वाचा झरा आटलेला नाही, अखंड वाहत आहे.

बाबा आमटे व अभय बंग-राणी बंग यांच्या सहवासात काही काळ घालवल्यावर त्याला त्याचा मार्ग स्पष्ट दिसू लागला. दोघांनी इंग्लंडला जाऊन काही वर्षांत पैसा व उच्च शिक्षण घेऊन परत भारतात येण्याचा निर्णय घेतला. चार वर्षांनंतर त्यांच्या विचारातील निर्धार अजून भक्कम झालेला आहे. नुपूर दोन मुलांसह नुकतीच भारतात दाखल झाली आहे, तर संग्रामला कधीच घरचे वेध लागलेले आहेत. खानदेशातील एरंडोल किंवा तत्सम ग्रामीण व दुर्गम भागात अत्यल्प शुल्कात लोकांना विविध प्रकारची अत्याधुनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याचा त्यांचा मानस आहे. संग्रामशी वैचारिक बाबतीत साधल्या गेलेल्या माझ्या एकसंधतेचे मूळ आमच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर चाललेल्या संघर्षात आणि त्यातून झालेल्या वैचारिक व भावनिक देवाणघेवाणीत आहे.

सुरुवातीला, त्याच्या सान्निध्यात माझ्यामध्ये झालेल्या परिवर्तनाचा काळ माझ्यासाठी खूप विचित्र पद्धतीने गेला होता, कारण चोराने चोरी सोडली तरी सर्वजण त्याच्याकडे चोर म्हणूनच बघत. गावातील मंडळी व माझे इतर मित्र मला माझ्या जुन्या रूपामध्येच बघत होते. शेवटी जेव्हा दहावीचा निकाल लागला आणि मी पास झालो व तेही उच्च श्रेणीत पास झालो यावर कोणाचा विश्वास बसला नाही. त्यावेळेस गावात एक विचित्र प्रकार चालू होता. दहावीला असलेली मुले त्यांचे पेपर कोणत्या शिक्षकांकडे तपासायला गेले आहेत याचा तपास लावत व महाराष्ट्रभर कुठेही जाऊन आपले गुण वाढवून आणत. बऱ्याचदा, त्यांची माहिती चुकीची असे व त्यांना हात हलवत परत यावे लागे; परंतु एखाददुसऱ्याच्या बाबतीत तरी, अशा प्रकाराने नापास होणारा मुलगा पास झाल्याचे उदाहरण मी बघितले आहे. माझ्या बाबतीत असा कोणताही प्रकार न होता, मी चांगल्या गुणांनी पास झालो याचे संपूर्ण गावाला आश्चर्य वाटले.

निकालाच्या दिवसाचा प्रसंग माझ्या डोळ्यांपुढे तरळत असतो. निकालाच्या दिवशी तांब्याने इस्त्री केलेले टापटीप कपडे घालून मी सकाळच्या बसने एरंडोलला गेलो होतो. शाळेचे पटांगण विद्यार्थी, त्यांचे पालक यांच्या कोलाहलाने गजबजून केलेले होते. शाळेच्या सूचनाफलकावर प्रथम आल्याबद्दल संग्रामचे नाव लिहिले होते. गर्दीत घुसून मी माझे गुणपत्रक घेतले व त्यावरील मार्क बघून आनंदित झालो; परंतु थोडे आणखी मिळाले असते तर बरे झाले असते असे वाटून गेले.

दिवसभर एरंडोलमध्ये फिरून व ओळखीच्या सर्वांना भेटून संध्याकाळी गावाकडे फिरलो. एसटीत बसल्यावर मला आधीचे सर्व आठवू लागले. दहावीपर्यंतच्या प्रवासात घडलेल्या सर्व

घटनांचा एक चलत् चित्रपट माझ्या डोळ्यांसमोरून सहज येऊन गेला. कुठेतरी ताईचे शब्द मला आठवत होते. 'तुले त्या चक्कीवालीना पोरग्यापेक्षा एक मार्क तरी जास्त भेटाले पाहिजे.' मला खूप बरे वाटले. आपण ताईची एक इच्छा तरी पूर्ण करू शकलो याचे आंतरिक समाधान झाले. गाव जसे जवळ येत होते, तशी माझी अस्वस्थता वाढत होती. हृदयाचे ठोके तीव्र होत होते. मार्कशीट कधी ताईच्या पायावर ठेवतो - कधी नाही, असे मला झाले होते. शेवटी, गाव आले व मी उतरून वेगात घराकडे निघालो. घराजवळ पोचतो तर काय, घराला कुलूप! ताई कुणाच्या तरी शेतात पेरणी करायला गेली होती. माझा उत्साह, उत्कंठा तेथेच मावळून गेली. संध्याकाळी, सूर्य बसल्यावर माऊली थकून घरी आली. मी पास झाल्याचे कळल्यावर तिला खूपच आनंद झाला. देवाला आरती करून गल्लीमध्ये साखर वाटण्यात आली. मी राहून राहून तिला माझे मार्क किती जास्त आहेत ते सांगत होतो; परंतु आपला मुलगा पास झाला याचेच समाधान तिला जास्त होते.

निकालानंतर चांगले गुण मिळालेले विद्यार्थी अमळनेर, धुळे, जळगाव या चांगल्या ठिकाणी निघून गेले. कारण एरंडोलचे महाविद्यालय पुढच्या शिक्षणाच्या दृष्टीने तेवढे ठीक नव्हते. संग्राम धुळ्याला निघून गेला. मलाही आपण कुठेतरी जावे असे वाटू लागले; परंतु ते माझ्यासाठी शक्य नव्हते. ताई-अण्णा महिन्याला शंभर रुपयेही मला देऊ शकत नव्हते. शेवटी, नाइलाजाने मी एरंडोलच्या महाविद्यालयात दाखल झालो. रोजची व एकंदरीत घरातील परिस्थिती माझ्या अभ्यासासाठी बाधक होती. अक्काच्या लग्नानंतर परिस्थिती अजून नाजूक झाली. व्याजाचे पैसे दिवसेंदिवस वाढत होते. अक्काचा आधार नसल्यामुळे ताईची परिस्थिती बिकट झाली होती. मी सुट्टीच्या दिवशी कामाला जाऊन, भाजीपाला विकून थोडीफार मदत करत होतो. ते वर्ष मला अजूनही आठवते, जेव्हा कांद्याचे प्रचंड उत्पादन होऊनही कांदा फक्त वीस पैसे किलोने विकला गेला व जेवढा खर्च कांदा लावण्यासाठी झाला होता त्यापेक्षा फारच कमी पैशांत तो विकला गेला. बऱ्याच पिकांची हीच अवस्था होती. भाजीपाला, मजुरी यांवर घर चालत असे व आलेल्या उत्पन्नातून कर्जाच्या व्याजाची परतफेड होत असे. घरातील वातावरण बऱ्याचदा तणावग्रस्त असे. पैसेवाला कोणी येऊन गेला व काही बोलला तर दोन-तीन दिवस घरात वातावरण तापलेले असे. कधी कधी, तो ताप नकोसा होई. असे वाटे की, आपण घराच्या बाहेर पडावे, काहीतरी काम करावे, पैसे कमवावेत आणि ताई-अण्णांच्या डोक्यावरील भार कमी करावा.

कर्जाने व त्याच्या व्याजाने लोकांची कशी वाताहत होते हे मी जवळून अनुभवले आहे. गावातील बहुतेक अल्पभूधारक कर्जबाजारी आहेत. दर शेकडा दरमहा पाचच्या दराने मिळणारे कर्ज प्रत्येकासाठी खोल खाईत शिरण्याचा मार्ग ठरतो. गरिबांना कुणी कमी व्याजाने किंवा उसनवारीने पैसे देत नाही. पाचच्या किंवा चारच्या दराने घेतलेले पैसे खूप लवकर दुप्पट होतात. ज्या वेगाने देण्याचे पैसे वाढतात त्या वेगाने शेतीतील उत्पन्न वाढत नाही. त्यामुळे शेतकरी कधीही पूर्ण कर्ज फेडू शकत नाही. बऱ्याचदा व्याजसुद्धा देणे त्याच्या आवाक्याबाहेर असते. अशा वेळी सावकार धूर्तपणे शेत किंवा घर लिहून घेतो. शेत किंवा घर लिहून दिल्यावर, ते क्वचितच सोडवले जाते. माझ्या ऐकण्यात असलेले एकही लिहून दिलेले घर किंवा शेत कधी कुणी सोडवू शकलेला नाही. अशा प्रकारे, गावात जमिनींचे एक-दोन तुकडे प्रत्येक वर्षी या सावकार लोकांच्या घशात जात असतात.

शेतमालाला मिळणाऱ्या भावाची तुलना तो पिकवण्यासाठी लागणाऱ्या बियाणे, औषधे, खते यांच्या प्रत्येक वर्षी वाढणाऱ्या किंमतीशी केल्यास जाणवते, की त्यामधील फरक दिवसेंदिवस

वाढत चालला आहे. शिवाय, सर्व काही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे जास्त करून कोरडवाहू जमीन असलेला शेतकरी खूपच हवालदिल झाला आहे.

अशोक - गावातील एक तरुण शेतकरी. पाच वर्षांपूर्वी त्याच्याकडे पाच एकर शेती होती. आज तो दोन एकर कोरडवाहू शेतीवर मोलमजुरी करून पोट भरतो. खूप लहान असतानाच अशोकचे वडील गेले. आईने अल्पशा शेतीवर दोन्ही मुलांना पोसले व त्यांचे लग्न केले. अशोकच्या लग्नानंतर त्यांनी वेगवेगळी बिऱ्हाडे मांडली. दोघा भावांकडे पाच एकर शेती आली. अशोकचा मोठा भाऊ भरत एक जोडधंदाही करी. त्यामुळे त्याचे शेती, जोडधंदा मिळून ठीक चालत होते. अशोक मात्र पूर्णपणे शेतीवर अवलंबून होता. कोरडवाहू शेतीत फारसे उत्पन्न येत नसल्यामुळे त्याने शेतात विहीर खोदायचे ठरविले. बायकोचे दागिने मोडले, नातेवाईकांकडून उसने पैसे आणले, थोडे कर्ज काढले व दीड लाखात विहिरीचे काम केले. पण दुर्दैवाने त्यावर्षी पाऊस खूपच कमी झाला. कापसाचे पीक जेमतेमच झाले व त्यामुळे एका वर्षात अशोकला एक दमडीही परत करता आली नाही. विहिरही अपूर्णच राहिली. पुढच्या वर्षासाठी त्याने भरपूर प्लॅनिंग केले. संपूर्ण पाच एकर शेतीत कापूस लावला. कापसाला भावही चांगला राहण्याची शक्यता वाटत होती. त्यावर्षीही ऐन मोक्यावर लाल्या रोगाने कापसाची नासाडी केली. पाच एकर कापसावर अशोकने मोठ्या आशेने बी बियाणे व औषधांसाठी मुबलक पैसे खर्च केले. त्यावर्षी तो थोडेफारच पैसे परत करू शकला. नंतर मात्र पैसे देणारे त्याच्यामागे कोल्ह्यासारखे लागले. अशोकसाठी कोणताच उपाय उरला नाही व त्याने तीन एकर शेती लिहून एका सावकाराकडून पैसे घेतले व आधीचे देणे चुकते केले. त्याच्या मानेभोवतीचा हा फास पुढे जास्तच घट्ट झाला व त्याला पुढच्या दोन वर्षात ती तीन एकर शेती विकणे भाग पडले. आज अशोकला दोन लहान मुली आहेत. उरलेले आयुष्य शेतमजुरी करणे व दोन एकरात जेवढे पिकेल तेवढ्यावर भागवणे, अशी त्याची गत झाली आहे.

तुकारामचा किस्साही काहीसा अशोक सारखाच आहे. तुकाराम एक कसलेला शेतकरी. लहानपणापासून शेतीत राबलेला. त्याच्या चार एकर बागायती जमिनीत तो भरपूर उत्पन्न काढायचा. मोठ्या मुलीचे लग्न केले, भरपूर हुंडा दिला. म्हातारी आई कॅन्सरने वारली. तिच्या अकराव्याला गावजेवण दिले. नेहमी काहीतरी शिल्लक ठेवणारा तुकाराम कर्जबाजारी झाला. नंतर लागोपाठ दोन वर्षाच्या दुष्काळाने त्याचे कंबरडे मोडले. त्याची उमेद मोठी. सर्व उपाय वापरून, बँकांना फेऱ्या मारून, सरकारी ऑफिसच्या फेऱ्या मारत चप्पल झिजवून बघितली. पण खूपसा फायदा झाला नाही. कर्ज कमी होण्याऐवजी वाढतच गेले. पुढे दुसऱ्या मुलीच्या लग्नासाठी त्याला दोन एकर शेत गहाण ठेवावे लागले.

गावागावांमध्ये अशोक व तुकारामांची कमी नाही. पावसाची अनियमितता, सिंचनाचा अभाव, शेतीमालाला हमीच्या भावाचा अभाव, शेतीविषयक मार्गदर्शनाचा व नियोजनाचा अभाव, शेवटी शेतीतील अनिश्चितता व उतारचढाव जिरवण्यासाठी शेतकऱ्यांची असलेली अक्षमता दिवसेंदिवस हजारो अशोक व तुकारामांना जन्म देते आहे.

माझ्या घरातील परिस्थिती यापेक्षा भिन्न नव्हती. मी ताई-अण्णांना नेहमी कर्जबाजारी पाहिलेले आहे. बऱ्याच लोकांनी त्यांच्याकडून चार-पाच पटीनी पैसे लाटले आहेत. त्यानंतरही, त्यांच्या हिशेबाप्रमाणे ते पैसे काढतच. एका गृहस्थाला त्यांनी दोन हजारांचे आठ हजार दिले. दुसऱ्या एकाला चार हजारांचे वीस हजार दिले होते. व्याजावर व्याज घेण्याचा हा क्रूर प्रकार

शेतकऱ्यासाठी फाशीचा दोरखंड ठरल्यावाचून राहत नाही. गावातले हे महाभाग समोर दिसल्यावर माझ्या तळपायाची आग मस्तकाला जात असे. कधी कधी मला वाटे, हातात पिस्तुल घ्यावे व त्यांना गोळ्या झाडून पसार व्हावे!

ताई-अण्णा रात्रंदिवस छोट्याशा शेतात मेहनत करत, परंतु त्यांचे हात क्वचितच कधी सैल राहत असत. पीक तयार होऊन घरात येत नाही, तोपर्यंत त्यातून कुणाला - किती पैसे द्यायचे याचे त्यांचे गणित तयार असे. बऱ्याचदा, अण्णा माल विकायला जात तेव्हा मंडळी परस्पर त्यांच्याकडून पैसे घेऊन टाकत. आपला माल विकला जाईल व अण्णा आपल्याला गोडधोड खाऊ आणतील असे वाटे; परंतु त्या दिवशी आमची घोर निराशा होई. मी स्वत: बऱ्याचदा शेतमालाच्या उत्पादनाचे गणित मांडी आणि किती पैसे आले व किती गेले याचा हिशोब करी. तर पावसाळ्याच्या दिवसांत परिस्थिती खूप वाईट असे. कारण पावसाळ्यात सर्व शेतकरी अडचणीत असतात, त्यावेळी त्यांच्या हाती उत्पन्नाचे असे काही साधन नसते. त्यामुळे हातात पैसे नसतात. पेरणीनंतर शेतीची कामे फारशी नसतात आणि असलीच तरी वेळेवर कोणी मजुरी देत नाही. त्या काळात आवकीपेक्षा जावक जास्त असते. बियाणे, खते, औषधे यांचा भरपूर खर्च होत असतो. लहानपणापासून पावसाशी असलेला अडचणीचा, असहायतेचा संबंध मला नकोसा होई. म्हणून पुढेही, मी नाशिकमध्ये किंवा पुण्यात राहायला गेल्यावर तेथे जेव्हा संततधार पाऊस पडत असे तेव्हा माझे मन विचलित होत असे. मला पावसाबरोबर भोगलेल्या आर्थिक अडचणींची जाणीव होई. पावसाशी असलेल्या या नात्याने मला नेहमीच सतावले आहे. आजही, केव्हा मुसळधार पाऊस येतो तेव्हा तो मला त्या दुर्दैवी, असहाय भूतकाळात घेऊन जातो.

ताई-अण्णा बऱ्याच क्लृप्त्या लढवून संसाराचा गाडा पुढे ढकलत असत. एकाकडून पैसे घेऊन दुसऱ्याला देणे, दुसऱ्याकडून तिसऱ्याला - असे चाले. नातेवाईकही कोणी विचारत नसत. मी नववीमध्ये असताना अण्णांनी बँकेला भरपूर चकरा मारून गायीसाठी पाच हजारांचे कर्ज घेतले होते; परंतु त्यांच्या हातात तीन हजारच पडले. उरलेले दोन हजार बँक मॅनेजरने घशात घातले. शेवटी, त्यांना त्या तीन हजारांत गायीही घेता आल्या नाहीत. ते पैसे दुसऱ्या एका कर्जाचे खड्डे भरण्यासाठी वापरण्यात आले! लहानपणी, अशा बऱ्याच संकरित गायी गावातील गरीब लोकांना कर्जाने उपलब्ध करून दिलेल्या मला आठवतात. पशुपालनाचा कोणताही अनुभव वा प्रशिक्षण नसलेल्या भिल्लांनासुद्धा त्या गायी वाटण्यात आल्या होत्या. त्यामुळे व्यवस्थित चारा, वैद्यकीय मदत या अभावी त्यांपैकी बऱ्याच गायी एका वर्षातच मेल्या होत्या. काहींनी त्या गायी लगेच विकून पैसे इतर कामासाठी वापरले होते. शेवटी, कर्ज वाढल्याने बऱ्याच लोकांच्या घरातील सामान बँकवाले घेऊन गेल्याचे आठवले.

माझे अकरावीचे वर्ष असेच निघून गेले. किशोरावस्थेमध्ये, मला जीवनाचे इतर रंग दिसू लागले. मी स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाबद्दल थोडा साशंक झालो. आपल्याकडे कोणी बघत आहे का, आपल्याबद्दल कोणी काही म्हणत आहे का याविषयी मी सतर्क झालो. स्वप्नं बघणे, स्वप्नात रंगून जाणे, कविता लिहिणे, त्या कुणापर्यंत तरी पोचतील याची काळजी घेणे अशा गोष्टी घडू लागल्या. या सर्व दैनंदिन कार्यक्रमात आणि त्यातून घडणाऱ्या भावजगतात दिवस कसा उगवत होता व कसा मावळत होता याचे भानही मला राहत नसे. आपल्याला अजून बराच मोठा पल्ला गाठायचा आहे, याची पुसटशीही जाणीव मला त्यावेळी होत नव्हती. मात्र कधीतरी ती जाणीव झाल्यावर मन खिन्न होत असे; परंतु स्वप्नांमध्ये रंगण्यात व स्वत:ला विसरून जाण्यात

मिळणाऱ्या वेगळ्या अनुभवापासून लांब जायला मी तयार नव्हतो.

त्या दरम्यान संग्राम घरी येऊन गेला. माझी एकूण वाटचाल बघून व माझ्याविषयी इतरांजवळ चर्चा करून त्याला माझ्या परिस्थितीची जाणीव झाली. मी जर अजून काही वर्षे एरंडोलला राहिलो तर वाल्मीकीचा परत वाल्या होईल की काय, अशी शंका त्याला आली असावी. त्याने मला धुळ्याला येण्याविषयी सल्ला दिला व इतर कसलाही विचार न करण्याविषयी ताकीद दिली. मोठ्या महाविद्यालयांमध्ये अकरावीला मध्येच प्रवेश मिळणे अवघड होते. अशा वेळी के.बी. पाटील हा देवमाणूस भेटला. त्यांना मी माझी सर्व परिस्थिती कथन केली, भरपूर अभ्यास करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या कृपेने माझा जयहिंद महाविद्यालयात प्रवेश झाला व माझ्या जीवनाला एक नवी दिशा मिळाली.

धुळ्याबद्दल लहानपणापासून एक विचित्र आकर्षण होते. त्याचे कारणही तसेच होते आमच्या गावाजवळ असलेल्या भातखेडे गावाहून धुळ्याला रोज एक बस जात असे. त्यामुळे धुळ्याची चर्चा नेहमी कानावर पडत असे. शिवाय धुळ्याच्या आजूबाजूला आमचे बरेच नातेवाईक राहायचे. एवढे असूनही धुळ्याला जाण्याचा कधी प्रसंग आला नव्हता. आम्ही एका लहान खोलीत, जयहिंद महाविद्यालयाच्या जवळच्या परिसरात राहात होतो. त्यामुळे कॉलेजला जायला दहा मिनिटे लागत असली तरी शिक्षक वर्गात घुसायच्या आत वर्गात पोहोचणे सहज शक्य होत असे. धुळे तसे खूप अविकसित शहर होते. अरुंद रस्ते, उघड्या गटारी, अस्ताव्यस्त पसरलेली घरे यामुळे सकाळी व संध्याकाळी रस्त्यावर नेहमी गर्दी असायची. आम्ही जिथे राहत होतो तो भाग मुख्य शहरापासून वाघूर नदीमुळे विभागलेला होता. त्याला देवपूर म्हणत. तेथेच प्रामुख्याने धुळ्यातील नवीन वस्त्या पसरल्या होत्या. मुख्य शहर व देवपूरला जोडणारे वाघूर नदीवर तीन पूल होते. बऱ्याचदा देवपूर भागात पाण्याची खूप आबाळ असे. नगरपालिकेच्या गचाळ कारभारामुळे बऱ्याच भागात गटारीसुद्धा नव्हत्या. आमच्या आजूबाजूच्या घरांमध्ये मात्र मोठमोठ्या असामी राहात. ज्यांची नावे आम्ही फक्त पेपरात वाचलेली होती.

मी घरीच स्टोव्हवर स्वयंपाक करत असल्यामुळे मला गव्हाचे पीठ, रॉकेलची व्यवस्था करावी लागत असे. आण्णा घरून डाळी, पापड व गहू आदी घेऊन येत. रॉकेल घेण्यासाठी बऱ्याचदा खूप लांब जावे लागे. बाराकंदील या जुन्या धुळ्याच्या गजबजलेल्या भागात जाऊन रॉकेल आणावे लागे. मी आण्णांची जुनी सायकल घेऊन आलो होतो. तिच्यावर मी धुळ्यात फिरत असे. ज्या गिरणीवर दळायला जायचो तिथे एक अंध व्यक्ती काम करीत असे. त्याची बायको मूकबधिर होती. ती कॉलनीत धुणीभांडी करायची. त्यांची दोन मुले मात्र स्वस्थ होती. बऱ्याचदा मी त्यांना कधी आईबरोबर, तर कधी बापाबरोबर आजूबाजूला खेळताना बघायचो. मला त्यांचे खूप कौतुक वाटे. मुलांच्या खोड्या बघून आई तोंडातून विचित्र आवाज काढत असे. त्यांच्यामागे धावत असे. परंतु तिच्या डोळ्यांमधून त्यांच्याबद्दल प्रेम, कौतुक स्पष्ट झळकत असे. त्यांच्याकडे बघून मला नवा हुरूप येई व कधीकधी स्वत:ची लाजही वाटे.

धुळ्याला आल्यावर माझ्या जीवनाचा नवा अभ्यास सुरू झाला. मोठे महाविद्यालय, लांबून आलेली हुशार मुले, मेहनती व कडक शिक्षकवृंद, सदासर्वदा अभ्यासात मग्न असणारा माझा मित्र यांच्या सान्निध्यात जीवनाला वेगळी दिशा मिळाली. संग्रामने मुद्दाम माझ्याबरोबर राहण्यासाठी त्याच्या आधीच्या सहकाऱ्यांपासून फारकत घेतली होती. आम्ही एका लहानशा खोलीत बिऱ्हाड टाकले होते. खोलीचे भाडे, वह्या, पुस्तके... सर्व गोष्टी संग्राम पुरवत होता. मी

खोलीत एका कोपऱ्यातल्या स्टोव्हवर स्वयंपाक बनवत असे आणि संग्राम खानावळीत जाऊन खात असे. संग्रामची जिद्द, चिकाटी पाहून मलाही अभ्यास करावासा वाटे. हळूहळू, मी तेथे रुळलो. संग्रामच्या पावलावर पाऊल ठेवून मीही वाचू लागलो. आम्हाला भूक, तहान, आंघोळ याचेही भान राहत नसे. त्याला डॉक्टर बनायचे होते. माझे भविष्य मात्र अनिश्चित होते; परंतु जीवनात काही बनायचे असेल तर अभ्यासाशिवाय पर्याय नाही, याची जाणीव मला झाली होती.

अण्णा दर पंधरा दिवसांनी माझ्यासाठी गहू, डाळ, तांदूळ घेऊन येत. मी दिवसातून एकदा खिचडी व एकदा भाजी-पोळी रांधत असे. इतर सर्व मित्रांचे डबे होते. कधी एखादा मित्र गैरहजर असल्यास त्याचा डबा मला खायला मिळत असे. त्यामुळे माझे लक्ष नेहमी कोणाच्या तरी गैरहजेरीवर असे! हुशार मुले संग्रामकडे चर्चा करायला येत. ती माझ्याकडे सहसा तुच्छतेने बघत. ती वेगळ्याच वर्गातली आहेत याची जाणीव ती करून देत. संग्रामने मात्र मला कधीही दुखावले नाही. मीसुद्धा त्याच्या सावलीसारखा आपल्या मर्यादेत राहण्याचा प्रयत्न केला. मी जसजसे जग बघत होतो तसतशी माझी वैचारिक क्षमता रुंद होत होती. मी खूप विचार करू लागलो होतो, स्वत:ला अभ्यासात व्यस्त ठेवू लागलो होतो. सर्व अडचणींचे निवारण त्याच एका व्यग्रतेत शोधू लागलो. समाजात घडणाऱ्या काही घटना माझ्या तरुण आणि संवेदनशील मनावर खोल परिणाम करत होत्या. त्या दरम्यान झालेले बाबरी मशिदीचे प्रकरण, त्यानंतर उसळलेले दंगे मी स्वत: बघितले. आम्ही राहत असलेल्या गल्लीच्या कोपऱ्यावर एका मुसलमानाची इस्त्रीची टपरी होती. काही गुंडांनी त्या टपरीला आग लावून त्या इसमाला टपरीसह खाक केले होते. लोकांच्या ओरडण्याचे, रडण्याचे आवाज मनाला अस्वस्थ करत. ती परिस्थिती, कोंडमारा, असाहाय्यता मनाची बांधणी करत होती.

आयुष्याचे एक महत्त्वाचे वर्ष बारावीच्या निकालाबरोबर संपले. आम्हा दोघांना भरपूर गुण मिळाले. निकालाचा दिवस मला आठवतो. रात्रभर, मी ट्रॅक्टरवर कामाला गेलेला होतो. माझ्या घरकामाचे स्वरूप दहावीनंतर बदलले होते. मी मोठ्या माणसाप्रमाणे काम करू लागलो होतो. मी रात्रभर ट्रॅक्टरवर वाळू भरून देण्याचे काम करत होतो. सकाळी घरी आल्यावर पुन्हा मला शेतात कांद्याला पाणी द्यायला जावे लागे. अनिश्चितता होती. मनात भीती, उत्सुकता या भावना दाटून आल्या. मी धुळ्याला पोहोचण्याआधीच निकाल जाहीर झाला होता. मी मित्राच्या घरी जेव्हा पोचलो तेव्हा आनंदी झालेल्या सर्व मित्रांमध्ये पुढे काय करायचे याविषयी चर्चा सुरू होती. कोणता अर्ज भरायचा, कोणते सर्टिफिकेट काढायचे, कोणत्या कॉलेजमध्ये दाखल व्हायचे यावर ते सारे बोलणे होते. मी तसाच-तेथून कॉलेजमध्ये निघालो. जसजसे कॉलेज जवळ येत होते तसतसा माझा घसा कोरडा पडत होता. मी देवाचे नाव पुटपुटत कॉलेजच्या प्रांगणात प्रवेश केला आणि जवळ जवळ पळत जाऊन वऱ्हांड्यात ठेवलेला फळा गाठला. तेथे चांगले गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे लागली होती. त्यांच्यात माझे नाव बघून व मिळालेले गुण बघून मला आभाळ ठेंगणे झाले. मी दुसऱ्या दिवशी गुणपत्रक घेऊन घरी निघालो. प्रवासात मनात विचारांचे प्रचंड कोलाहल चालले होते. पहिली ते अकरावीमध्ये कधीही न मिळालेले गुण मला बारावीत मिळाले! त्यानंतर वैद्यकीय शाखेत किंवा अभियांत्रिकी शाखेत मला सहज प्रवेश मिळू शकत होता. गाडी एरंडोलहून गावाच्या रस्त्याला लागली. गाव जसजसे जवळ येत होते तसतसे ऊर भरून येत होते. एसटी गावाला थांबली आणि मी एका झडपेत घर गाठले. बघतो तर घराला कुलूप! माऊली शंकरदादाच्या शेतात कामाला गेलेली होती. सर्व मंडळी संध्याकाळी घरी येतात तोपर्यंत माझे मन

आनंदाच्या जागी भविष्य-विषयीच्या चिंतेने व्यापून गेलेले होते.

शेवटी, मी पैशांअभावी वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा अजून दुसऱ्या कोणत्याही कोर्सला जाऊ शकलो नाही. नातेवाईक व इतर जवळच्या व्यक्तींनी तोंडभरून स्तुती केली, परंतु कुणीही मदतीसाठी पुढे आले नाही. माझ्यापुढे पुढच्या शिक्षणाविषयी मोठे प्रश्नचिन्ह होते; कारण ताई-अण्णा मला आर्थिक पाठबळ द्यायला पूर्ण असमर्थ होते. शेवटचा उपाय म्हणून मी बँकेकडे कर्ज मागायला गेलो; परंतु अण्णा आय.आर.डी.पी. थकबाकीदार असल्यामुळे बँक मॅनेजरनेही अंगुठा दाखवला. नाइलाज म्हणून मी नाशिकला बी.एससी.ला प्रवेश घेतला; कारण अक्काचे बिऱ्हाड भाऊजींच्या नोकरीमुळे आणि माझ्या भाग्याने त्या दरम्यान नाशिकमध्ये होते.

अशोक या माझ्या मित्राकडून एका शिक्षिकेकडे जुन्या नाशकात माझी राहण्याची आणि तीही विनामूल्य व्यवस्था झाली. माझ्या पाध्ये नावाच्या अध्यापिकेने माझ्या जेवणाचा खर्च देण्याचे कबूल केले. मला त्या दरम्यान शिकवणी घेण्याची संधी मिळाली. तीद्वारे मी माझा मासिक खर्च भागवू लागलो. अशा प्रकारे, मी पदवीची तीन वर्षे वेगवेगळ्या ठिकाणी घालवली. आयुष्याच्या त्या अतिशय महत्त्वाच्या वळणावर वेगवेगळे अनुभव मिळाले. त्यांनी माझ्या व्यक्तिमत्त्वाला, विचारांना वळण दिले. भेटलेल्या लोकांकडून आयुष्यात धडपडायची, ताठ मानेने चालण्याची स्फूर्ती मिळाली. त्या वर्षांमध्ये मिळालेल्या अनुभवांमधून, वैचारिक चर्वणामधून जे बाहेर पडले त्याने माझ्या उर्वरित आयुष्यात मोलाची भूमिका बजावली.

पहिल्या वर्षी, मी अक्काकडे तिच्या दोन लहान पिल्लांसह राहत होतो. मी अक्काचे बरेचसे काम करत असे. दळण आणणे, बाजारात जाणे, मुलांना खेळवणे आणि उरलेल्या वेळात अभ्यास असा माझा दिनक्रम असे. घरापासून कॉलेज लांब असल्यामुळे रोज दहा-बारा किलोमीटर सायकलीवरून जावे लागे. पोलिस चाळीतील वातावरण खूपच वेगळे असायचे. सहसा, पोलिसांच्या मुलांमध्ये अभ्यासाची गोडी नसते. उनाडक्या करणे, गुंडगिरी करणे हे त्यांचे रोजचे उद्योग. चुकून कोणाचा तरी मुलगा दहावी-बारावी पास होतो व पुढे शिकतो. इतर सर्वांच्या नजरा फक्त पोलिसभरतीवर असतात. त्यांतले काही भरती होतात तर काही भरतीची वाट बघत-बघतच अर्धे होतात. मला अभ्यास करताना बघून, चाळीतील बरीच मुले माझ्याकडे बोट दाखवून काहीतरी पुटपुटत, दात विचकत घरावरून जात असत. त्या दरम्यान, मला ज्या काही सवयी लागल्या, त्यांनी मला माझ्या नंतरच्या आयुष्यात खूप मोलाची मदत झाली.

नाशिकला मी आक्काकडे राहात असताना पोलिस चाळीत राहायचो. पोलिस चाळीतले जीवन वेगळेच. दोन रूमच्या घरात कुठे चार जणांचा, तर कुठे दहा जणांचा परिवार एकत्र राहात असे. गडी पोलिस असले तरी महिला कमी शिकलेल्या असत. त्यामुळे बऱ्याचदा छोट्या छोट्या कारणांवरून बऱ्याच परिवारांमध्ये वाद होत. चाळीत मुलांची टोळकी झाकपाक कपडे घालून व केसांचा हिप्पीकट करून रिकाम्या गप्पा मारताना दिसत. शाळा, कॉलेज बुडवून रिकाम्या गोष्टीत वेळ घालविणे, गुंडगिरी करणे यात ही मंडळी पटाईत. पोलिस चाळीत अभ्यासू मुलगा सापडणे खूप कठीण. कुणाची गाडी दहावीत तर कुणाची बारावीतच थांबलेली. त्यांना खेळ, गणपती उत्सव, दांडिया यामध्ये विशेष रस, यामुळे प्रत्येक जण जेवढा वेळ देता येईन तेवढा या कामांसाठी देत.

पोलिस चाळीतील मुलांना शानशौकिची सवय लागलेली. परंतु घरी बापाचे उत्पन्न मर्यादित. बऱ्याचदा परिवार मोठा असल्यावर व गावाकडचीही जबाबदारी असल्यावर बिचाऱ्या

पोलिसमामाची खूप घालमेल होई. महिन्याचा पगार होण्याआधीच तो खर्च होण्याचा हिशोब झालेला असे. उसनवारीने पगाराच्या नावाखाली पैसे आणलेले असत. काही महाभाग दारू वगैरे पीत असले तर त्यांच्या परिवाराची खूपच ओढाताण होई. यामुळे काहीजण वाईट मार्गाने पैसे कमावण्यामागे लागलेले असत. या मार्गाने कमावणारे पोलिस व सरळमार्गी पोलिस यांच्या जीवनमानात कमालीचा फरक जाणवत असे.

वाचनाची, खास करून अवांतर वाचनाची शाळेपासून लागलेली सवय माझ्या एकंदरीत जडणघडणीवर खूप परिणाम करून गेली. पुढे, मी जे हातात मिळेल ते अधाशासारखे वाचू लागलो. त्यामुळे डोक्यात माहितीचा साठा तयार होऊ लागला, विचार करण्याच्या कक्षा रुंदावल्या; जगाकडे बघण्याची - अवलोकन करण्याची एक व्यापक दृष्टी मिळत गेली. वाचनाबरोबर विचार आला, कारणमीमांसा आली, स्वत: आत्मपरीक्षण करता आले. पुढे समाजाविषयी, स्वत:विषयी विचार करू लागलो. वाचनाला प्रत्यक्ष अनुभवाची साथ मिळू लागली. त्यामुळे दृष्टी आत्मकेंद्री न बनता समाजकेंद्री बनली.

ताईने लहानपणापासून माझ्या मनात शारीरिक स्वास्थ्याविषयी आवड निर्माण केली. तिच्या मते, माणसाला शारीरिक अक्षमतेमुळे जीवनात कुठेही अडचण यायला नको. लहानपणी, खेळण्यामुळे व कामामुळे शरीर टणक बनले. पुढे, मी ताईच्या आग्रहाने थोडा थोडा व्यायाम करू लागलो. नंतर मात्र मला स्वत:ला आवड निर्माण झाली. दहावीमध्ये, मी सकाळी धावायला जात असे. त्यानंतर मी शारीरिक व्यायाम कधी सोडला नाही. ओझरला राहत असताना, मामा रोज सकाळी उठून योगासने करत. त्यांचा उतारवयात असलेला उत्साह बघून मला स्वत:ची लाज वाटत असे. त्यांच्याकडूनही मला शारीरिक व्यायामासाठी प्रोत्साहन मिळत असे. शरीर जोपासल्यामुळे मला फायदे होत गेले. मी शरीराचा पुरेपूर वापर करत गेलो. त्यामुळेच दमछाक न होता प्रचंड मेहनत करणे शक्य झाले. मी थकवा, आळस, अशक्तपणा यांवर मात केली. त्याचा फायदा मला कार्यक्षमता वाढवण्यास झाला. वेळोवेळी होत असलेल्या शरीरसाधनेमुळे माझ्या जीवनात असलेल्या अडचणींना एक विरेचन मिळाले आणि मन हलके राहू लागले.

नाशिकला, अनिश्चित आणि परावलंबी आयुष्यामुळेच, मी मनोमनी खूप अस्वस्थ राहत असे; भविष्याविषयी चिंताग्रस्त होत असे. घरी गेल्यावर अस्वस्थता अजून वाढत असे. मी घरी आलेला पाहून कर्जवाले महाभाग मुद्दाम माझ्यासमोर घरी येत किंवा मला गाठून ‘बापू, अण्णाले पैसा देवाले लावना रे भो, कदलोंग पैसा वापरशात आते’ असे म्हणून मला डिवचत असत. ताई-अण्णा मात्र कधीही माझ्यासमोर पैशांविषयी बोलत नसत; परंतु मी त्यांच्या चेहऱ्यावरील काळजी ओळखत असे. ते घरी नसताना त्यांच्या हिशोबाच्या वह्या बघून त्यांच्याभोवतीच्या विळख्याची मला कल्पना येई. घरून नाशिकला परत आल्यावर मला दोन-तीन दिवस झोप लागत नसे.

त्या अवस्थेमधून मला एकच मार्ग दिसत असे आणि तो म्हणजे अभ्यासाने प्रगती साधणे आणि सर्व अडचणींवर मात करणे. ही अस्वस्थता त्यानंतरच्या माझ्या आयुष्यातील एक प्रमुख घटक बनली. मिळणारे अनुभव, लागणाऱ्या ठोकरा व जागोजागी बघावी लागणारी उपेक्षा मला विचार करायला भाग पाडू लागली. प्रत्येक अडचणीला स्वत: तोंड द्यावे लागले, या कारणाने मी डोळस बनत गेलो. समाजातील नेमक्या वाईट गोष्टींशी माझे दोन हात होऊ लागले. भ्रष्टाचार, कामचुकारपणा, वशिलेबाजी खूप जवळून बघायला मिळाली. मी वेळोवेळी हक्कासाठी भांडत होतो, मुठी आवळत होतो, तक्रारी करत होतो; परंतु मनाचे समाधान होत नव्हते. आपण स्वत:ला

काही वेळा न्याय मिळवून देऊ शकत नाही, याची खंत वाटत होती. हे कुठेतरी थांबायला हवे. प्रामाणिकपणा, लायकी यांचा वरचश्मा हवा असे सारखे वाटत होते. आपण यासाठी काही करू शकतो का, याविषयी मंथन सुरू झाले. त्या मंथनामधून समाजासाठी 'समाजामध्ये राहून' काम करण्याची तीव्र इच्छा जागृत झाली.

नाशिकला जीवनाचा नवा अध्याय सुरू झाला. घडलेल्या घटनांनी मनावर खोल परिणाम केला होता. मी स्वत: च्या असहायतेविषयी व असुरक्षिततेविषयी विचार करू लागलो. त्या गर्तेतून बाहेर निघायचे असेल तर लवकरात लवकर नोकरी करण्याची गरज वाटू लागली. घरातील परिस्थिती दिवसेंदिवस नाजूक बनत चालली होती. दुर्दैवाने, एका वर्षातच भाऊजींची बदली झाली आणि मी पुन्हा रस्त्यावर आलो! काही काळानंतर लांबच्या एका मामाकडे, नाशिकजवळ असलेल्या, ओझरला सोय झाली.

ओझर हे नाशिकपासून वीस किमी अंतरावरील एक सधन गाव. विमान कारखान्यामुळे व हवाईदलाच्या छावणीमुळे ते प्रसिद्ध. मी विमान कारखान्याच्या वसाहतीत राहात होतो. मामा कारखान्यात खालच्या पदावर काम करत होते. ओझरच्या आजूबाजूची जमीन खूप सुपीक आहे. त्यामुळे द्राक्षे, कांदे, ऊस यांचे खूप मळे व त्यामुळे असलेली समृद्धी ओझरमध्ये स्पष्ट झळकत असे. या सर्व कारणांमुळे ओझरचे वातावरण निमशहरी भागासारखे होते.

मी राहात असलेली वसाहत सोयीसुविधांनी समृद्ध होती. कारखान्यात ओव्हरटाईम धरून मुबलक पैसे मिळत असल्याने प्रत्येक घरामध्ये सुखसमृद्धी होती. मी मिळालेल्या सुविधांचा पुरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न केला. माझे मामा एक सज्जन गृहस्थ. त्यांचा मला खूप आधार वाटे. त्यांचा दिवस खूप लवकर सुरू होत असे. ते योगासने, प्राणायम करीत. मीही त्यांच्यासोबत लवकर उठून सर्व परिसर स्वच्छ करी. नंतर व्यायामासाठी स्टेडियम गाठत असे. मामांचे उच्च विचार, प्रत्येकाला मदत करण्याची प्रवृत्ती व कष्टावर व स्वत:च्या कर्मावर असलेल्या विश्वासाने मला खूप काही शिकवले. त्यांच्या माझ्याबद्दलच्या प्रेमाने व आपुलकीने मला पुढेही खूप उत्साहित केले. मामी व त्यांची दोन मुले सुनील व मनोज यांनीही मला खूप चांगली वागणुक दिली. मी खूप लवकरच त्यांच्या परिवाराचा एक भाग झालो. आजूबाजूच्या इतर लोकांनाही माझ्याबद्दल खूप सहानुभूती होती. नेहमी ते माझी आपुलकीने विचारपूस करीत. ओझरमधील माझे एक वर्ष कुठे निघून गेले कळलेही नाही. त्यानंतर मला परत नाशिकला येणे भाग पडले.

माझे नाशिकमधील दिवस माझ्या जडणघडणीसाठी खूप महत्त्वाचे ठरले. तेथील सांस्कृतिक घडामोडींमुळे माझ्यावर वेगळे संस्कार झाले. मी कॉलेजची तिन्ही वर्षे भरपूर अभ्यास केला. माझा फावला वेळ सार्वजनिक वाचनालयात किंवा हुतात्मा स्मारकाजवळील वाचनालयात जात असे. ओझरला असताना, रोज संध्याकाळी माझा मोर्चा तेथील कम्युनिटी वाचनालयात वळलेला असे. मी तिसऱ्या वर्षात असताना सुजित कोहक नावाच्या एका अध्यापिकेच्या मुलाची शिकवणी घ्यायचो. दोन वाजेपर्यंत कॉलेज आणि तीन ते पाच शिकवणी असा कार्यक्रम असे. सुजितला शिकवताना मी स्वत:ला हरवून जात असे. त्याचे निरागस वागणे, आदराने बोलणे मला आवडत असे. त्यांच्या घरी गेल्यावर, सुरुवातीला आम्ही शाळेत झालेल्या घटनांवर चर्चा करत असू. नंतर त्याची जेव्हा शिकायची इच्छा होत असे तेव्हा मी त्याला शिकवत असे.

नाशिक शहर हे उत्तर महाराष्ट्राची राजधानी शोभावे असे आहे. ते जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील लोकांच्या आस्थेचे व अभिमानाचे शहर. या जिल्ह्यातील प्रत्येक गावातील एखादा

तरी माणूस किंवा त्यांचे नातेवाईक नाशिकमध्ये निश्चित आहेत. यामुळे नाशकामध्ये येणेजाणे स्वाभाविक. मीही नाशकाबद्दल लहानपणापासून खूप ऐकलेले होते. पण खरा संबंध आला तो माझ्या मेहुण्यांच्या, म्हणजे आक्काच्या नवऱ्याच्या, नोकरी संदर्भात. त्यांचे पोलिस ट्रेनिंग व त्यानंतरचे पहिले पोस्टिंग नाशकातच झाले. माझे शहराचे पहिले दर्शन झाले ते बारावी पास झाल्यानंतर. बारावीत मी धुळ्यात राहात असलो तरी धुळ्यात व नाशकात खूप अंतर होते.

शहरात पाय ठेवल्यावर काही महिने कॉलेज प्रवेशाच्या धावपळीत गेले. वैद्यकीय व अभियांत्रिकीला प्रवेश घेण्याविषयी चाललेल्या तिढ्यामुळे प्रवेशाला उशीर झाला. जेव्हा जाणवले की आपली आर्थिक कुवत हे कोर्सेस करण्यासाठी पूरक नाही, तेव्हा शेवटी विज्ञान शाखेला प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला. उशीर झाल्यामुळे चांगले गुण असूनही खूप फिरावे लागले. शेवटी के टी एच एम महाविद्यालयात एकदाचा प्रवेश मिळाला. मी जेलरोडच्या पोलिस चाळीत राहात होतो. तेथून माझे कॉलेज दहा कि.मी. अंतरावर होते. रोज सायकलवर मी कॉलेजला जात असे.

नाशिकला स्वत:ची एक संस्कृती होती. अगदी आधुनिक, पाश्चिमात्य व पारंपरिक मराठी संस्कृतीचा सुंदर मिलाप या शहरात बघायला मिळत असे. कुसुमाग्रजांच्या व सावरकरांच्या वास्तव्यामुळे शहराला साहित्यिक व देशप्रेमाची सुंदर पार्श्वभूमी होती. शहरात वेगवेगळी साहित्य संमेलने, साहित्य चर्चा, पुस्तक प्रदर्शने व प्रकाशनांची वर्षभर रेलचेल असे. गोदावरी काठावरील पंचवटी, रामकुंड, काळाराम मंदिर, सोमेश्वर, जवळच असलेले त्र्यंबकेश्वर यामुळे शहराच्या स्वभावाला धार्मिकतेची झालर चढलेली होती. सनातन ब्राह्मण संस्कृती व पारंपरिक मराठी संस्कृतीचे अवशेष तिवंधा, भद्रकाली, पंचवटी या भागात हमखास बघायला मिळत, की जे इतर ठिकाणी जवळजवळ लोप पावलेले आहेत. मी तिवंधा या जुन्या नाशकातील एका भागात राहात असे. तिवंधा चौकात एक मोठा हौद आहे. रंगपंचमीला तो रंगाने पूर्ण भरला जाई व संपूर्ण रस्ते त्यामुळे रंगमय होत.

नाशकातील नवीन वसाहतीतील सिडको भागात कसमा(कळवण, सटाणा, मालेगाव)ची खान्देशी छाप होती. नाशिकच्या रस्त्यावर फिरणाऱ्या ऑटोतील ड्रायव्हरच्या संभाषणात नाशिकच्या ग्रामीण व खानदेशी अहिराणीचा ठसका हमखास ऐकायला मिळायचा. नाशकाच्या पारंपरिक मराठी संस्कृतीवर आर्टिलरी सेंटर, एच. ए. एल., देवळाली छावणी व हवाईदलाची वसाहत यामध्ये राहणाऱ्या इतर  प्रातांतील लोकांचा प्रभाव जाणवू लागला आहे. नाशिकच्या एकंदर सांस्कृतिक, शैक्षणिक पुढारलेपणामुळे व आल्हाददायक हवामानामुळे बरेच परप्रांतीय अधिकारी नाशकात स्थायिक होऊ लागले आहेत. माझ्या तीन वर्षातील वास्तव्यात या शहराशी जुळलेला ऋणानुबंध पुढे कायम राहिला.

जुन्या नाशकात ज्या ठिकाणी मी राहत असे, ती जुनी हवेली होती. तिच्या चौथ्या मजल्यावरील मोठ्या हॉलमध्ये माझे बिऱ्हाड होते. कुळकर्णीबाई स्वत: आपल्या म्हाताऱ्या वडिलांसह तिसऱ्या मजल्यावर राहत होत्या. स्वभावाने कडक, परंतु आतून नारळासारख्या गोड होत्या. त्या रोज सकाळी सहा वाजता मला आवाज देऊन चहा देत असत. त्यांच्या हातचा चहा जगावेगळा असे. त्याची चव अजून माझ्या जिभेवर रेंगाळते. त्यांनी दुसऱ्या मजल्यावरील खोली एका प्रिंटिंग प्रेसला भाड्याने दिलेली होती.

मी राहात असलेला हॉल खूप मोठा होता. एवढ्या मोठ्या हॉलमध्ये एका कोपऱ्याला बिछाना व माझी पुस्तकांची पेटी होती. एवढाच माझा संसार! माझ्याबरोबर हॉलमध्ये एक उंदीर व एक

पालही राहत होती. माझे जेवण झाल्यानंतर ताटातले उरलेले अन्न उंदीर फस्त करत असे. ते दोघे प्राणी मला खूप जवळचा समजत असावेत. त्यामुळे ते नेहमी माझ्या अवतीभवती फिरत असत. बाईची एक मोलकरीण शांताबाई माझे जेवण बनवत असे. संध्याकाळी, मी वाचनालयात पेपर वाचायला जात असे. येताना शांताबाईच्या घरून जेवणाचा  डबा आणत असे. शांताबाई गरीब होत्या. त्याचा चौघांचा संसार एका छोट्याशा खोलीत थाटलेला होता. त्यांचे यजमान कुठेतरी दुकानावर कामाला होते, तर त्या स्वत: घरकाम करून आपल्या फाटक्या संसारात ठिगळे लावत असत. कधी कधी वाटे, फक्त आपण या जगात अडचणीत नाही तर जगात खूप दु:ख भरलेले आहे. आपण उगाच आपल्या अडचणींचा बाऊ करत असतो.

दिवस जात असले तरी पुढे काय करायचे हा प्रश्न माझ्यापुढे आ वासून उभा होता. एव्हाना, लोकांसाठी काम करायचा माझा निर्णय पक्का झाला होता; परंतु मी स्वत: त्यावेळेला कुणाला मदत करायच्या स्थितीत नव्हतो. शिवाय माझी लहान बहीण, प्रतिभाचे शिक्षण कसे होईल, उषाचे लग्न कसे होईल हे माझेच प्रश्न माझ्याकडून सोडवले जात नव्हते. दरम्यान, माझी विचारपूस, माझा माहितीचा संग्रह वाढत होता. सुरुवातीला वाटले, काहीतरी छोटीमोठी नोकरी करावी. त्यांनतर आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी. दरम्यान, कॉलेजच्या दुसऱ्या वर्षानंतर माझा संख्याशास्त्राकडे कल वाढला. गणित मला कोरडे वाटायचे. त्यामानाने संख्याशास्त्र जिवंत व तर्कशुद्ध विषय वाटायचा. तो आवडण्याचे अजून एक कारण म्हणजे शिकवणारे माझे शिक्षक. त्यातल्या त्यात पाध्ये मॅडम खूपच जवळच्या वाटायच्या. त्या माझे खाण्याचे पैसे देत असल्यामुळेसुद्धा मला त्या खूप आवडायच्या. माझ्याबद्दलची त्यांची आत्मीयता बघून मला गहिवरून यायचे. दुसरे बालचंद्रन सर केरळहून आलेले व तेवढेच हुशार. त्यांच्या संख्याशास्त्र शिकवण्याच्या पद्धतीमुळे त्या विषयात मला आवड निर्माण झाली. ते ज्या तन्मयतेने व उत्साहाने संख्याशास्त्र शिकवत, तेवढ्या तन्मयतेने मी कधीही कुणाला शिकवताना बघितलेले नाही. त्यांनी वेळोवेळी दिलेले प्रोत्साहन मला हुरूप देत असे.

खेड्यापाड्यातून येणाऱ्या मुलांमध्ये शहरात आल्यावर काही गोष्टींचा अभाव जाणवतो. त्यांच्यात आत्मविश्वास नसतो, न्यूनगंड असतो आणि इंग्रजीची, स्पर्धेची भीती वाटत असते. एवढ्या मोठ्या शहरात आपला निभाव लागेल की नाही, आपल्याकडून काही होईल की नाही अशी धाकधूक त्यांच्या मनात घर करून बसते. ते प्रत्येक पावलागणिक विचार करतात. कोण-काय म्हणेल याविषयी तर्क काढतात. बऱ्याचदा, ते स्वत:ला प्रकाशात ठेवत नाहीत. त्यांना मागे राहून आपले काम करावेसे वाटते. दुसरी महत्त्वाची अडचण म्हणजे इंग्रजी. सगळीकडे जेव्हा इंग्रजीचा बोलबाला आहे, तेव्हा आपला कुठे टिकाव लागेल अशी भीती त्यांच्या मनात सदैव असते. आपल्याला फाडफाड इंग्रजी बोलता येत नाही याची खंत त्यांना जाणवते. बऱ्याचदा, त्यांचे लेखी इंग्रजी इतरांपेक्षा चांगले असते; परंतु बोलण्याचे धाडस होत नाही. या न्यूनगंडामुळे आणि आत्मविश्वासाच्या अभावामुळे त्यांच्या लायकीप्रमाणे व कार्यक्षमतेच्या तुलनेत त्यांना यश मिळत नाही. मलाही त्या चक्रातून जावे लागले. माझी समस्या अजून विचित्र होती, कारण मी दहावीपर्यंत काहीच विशेष प्रगती केली नव्हती. त्यामुळे काही प्राथमिक गोष्टीही मला माहीत नव्हत्या.

गावातील मुलांना अजून एक विचित्र अनुभवाला सामोरे जावे लागते. कॉलेजमध्ये शिकताना नकळत किशोरावस्थेच्या स्वप्नाळू भावना जागृत होतात. नकळत, कुणीतरी आवडू लागते. तिचे

भुरभुर उडणारे केस, तिची चाल मनाला भावून जाते. तिचा प्रत्येक शब्द काळजात साठवून ठेवावासा वाटतो. मन स्वप्न बघू लागते. तिच्याबरोबर मन हिंदकळू लागते; पण तिच्याशी बोलण्याची हिंमत होत नाही. ती काय म्हणेल, आपल्याला हसेल का, आपला अपमान तर करणार नाही अशा नाना शंका मनाला शिवून जातात आणि अचानक वास्तवाचे भान येते. स्वप्न शेवटी स्वप्नच राहते! वाटते, या गोष्टी आपल्यासाठी नाहीतच मुळी. आपल्या जीवनात फक्त संघर्ष आहे आणि तोसुद्धा केवळ जगण्यासाठी. त्यातूनही काही जण पुढे पाऊल उचलतात. काहींना चटके बसतात, काही यशस्वी होतातही; परंतु लवकरच वेगळे घर मांडावे लागते. गावकऱ्यांना विसरावे लागते आणि मारूनमुटकून शहरी व्हावे लागते. काही जण या सर्व भानगडी बघून मांजरासारखे आपल्या मर्यादेत राहायला शिकतात. मीसुद्धा त्यातलाच एक.

माझी कॉलेजची तीन वर्षे संपली. मी पदवीची परीक्षा चांगल्या मार्कांनी पास झालो. एवढेच नाही तर संख्याशास्त्रात विद्यापीठातून प्रथम आलो. एकूण परीक्षेतही पहिला आलो. परंतु त्यामुळे आनंद कमी व भविष्याची काळजी जास्त वाटू लागली. महाविद्यालयातून बाहेर आल्यावर एकदम पोरका झाल्याची भावना निर्माण झाली. जणू माझा आधार संपला होता. सर्वानुमते, पुण्याला विद्यापीठात जायचे ठरले. कारण नुसत्या पदवीवर मला कुणी नोकरी देईल असे वाटत नव्हते. चुकून मिळाली तरी आपला उदरनिर्वाह भागवून, घरच्यांसाठी काही करू शकू असेही वाटत नव्हते. पुण्याला जायचे एवढे तर खरे होते; परंतु त्यासाठी पैसे उपलब्ध कसे होतील याची चिंता होती. शेवटच्या वर्षाला असतानाच, मी पुण्याच्या संख्याशास्त्र विभागातील काळेसरांना आर्जवाचे पत्र लिहून, मला काही मदत मिळू शकेल का, म्हणून विचारणा केली होती. काही ट्रस्टची माहिती मी काढली होती, ज्याद्वारे होतकरू विद्यार्थ्यांना अर्थसाहाय्य मिळू शकते. मला कुठून तरी मदत मिळेल असे वाटत होते, म्हणून मी शिक्षकांजवळून व चुलतभाऊ बापूकडून पैसे जमा करून पुण्याचा रस्ता धरला.

तो माझा लांबचा पहिला प्रवास मला चांगला आठवतो. मी दुपारी न्याहारी बांधून पाचोऱ्याला गेलो. तेथून रेल्वेने, महाराष्ट्र एक्स्प्रेसने संध्याकाळी बसून सकाळपर्यंत पुण्याला पोचता येते. स्टेशनवर गाडीची वाट पाहात बसलो असताना माझ्या डोक्यात अनेक गोष्टींचे थैमान सुरू झाले. चांगले गुण मिळवूनही आपल्याला पैशांसाठी हताश व्हावे लागते याची खंत वाटू लागली; परंतु तेवढेच समाधानही वाटत होते, की आपल्याला पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरात शिकायला मिळणार! मी मनोमन निर्धार केला, की खूप अभ्यास करायचा, खूप पुढे जायचे आणि काहीतरी मोठे व्हायचे. भविष्याबद्दल चिंता आणि भीतीही वाटत होती; परंतु कोणताच मार्ग मला दिसत नव्हता.

सकाळी पुण्यनगरीत पोचलो. तेथील गर्दी बघून मनात धस्स झाले. एवढ्या मोठ्या शहरात आपले काय होईल अशी भीती वाटू लागली. रस्त्याने जाणाऱ्या शाळा-कॉलेजांमधल्या झकपक कपड्यांतील मुलांना बघून व त्यांच्या आपापसातील इंग्रजीमिश्रित मराठी बोलण्याने मी प्रभावित होत होतो. मध्येच, मी स्वत:कडे परत एक कटाक्ष टाकत होतो. आपण खूप गावंढळ तर दिसत नाही ना? आपले कपडे ठीकठाक आहेत ना? याची खात्री करून घेत होतो. शोधत शोधत, संग्राम राहत असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या होस्टेलवर जाऊन पोचलो.

## ताडे ते पुणे

पुणे फक्त स्वप्नातच. खूप लहानपणी साधारणत: चार पाच वर्षाचा असताना मी पुण्याला मामांकडे गेलो होतो. मोठे मामा पुण्यात रास्ता पेठेत तर लहान मामा पुण्याजवळ चिखलीला राहात. त्यावेळी पहिल्यांदाच एवढे मोठे शहर बघितले. माझ्या बोलण्याला व एकदंरीत अज्ञानाला मामाची मुले हसत. घरी आल्यानंतर मी खूप दिवसांपर्यंत पुण्याचे गोडवे माझ्या बालमित्रांना सांगत असे.

परत पुण्याला जाण्याचा योग आल्यावर ते सारे मागचे संदर्भ आठवू लागले. मी मुंबई, औरंगाबाद वगैरे फिरून आलो होतो पण पुण्यापर्यन्त काही पोहोचलो नव्हतो. पुण्याला जाण्यापूर्वी पुण्याबद्दल खूप काही माहीत होते. शिवरायांच्या चरित्रामधून येणारा पुण्याचा संदर्भ ओळखीचा होता. शनिवारवाडा, लालमहाल, रास्तापेठ, कोथरूड, सदाशिव पेठ या ठिकाणांविषयी बऱ्याचदा ऐकले होते. शेवटी मी महाराष्ट्र एक्सप्रेसने पुण्यात येउन धडकलो. पुण्यात जाण्याआधी मनात एक सुप्त भीती होती- इथे आपला निभाव लागेल का?

पुण्यात पहिले सहा महिने माझा वावर विद्यापीठापुरताच मर्यादित होता. पण त्यानंतर मला पुण्यातील एकेका भागाची हळूहळू ओळख होऊ लागली. विद्यापीठाच्या जवळच चतु:श्रृंगीचे मंदिर आहे. जवळजवळ आठवड्यात एकदातरी चतु:श्रृंगीच्या डोंगरावर जाणे होई. तिथून पुणे शहराचा दिसणारा देखावा विलोभनीय दिसायचा. सहसा मन लागत नसले अथवा कंटाळा आला की कुणालातरी सोबत घेऊन चतु:श्रृंगीची वाट धरत असे. चतु:श्रृंगीच्या यात्रेला खूप गर्दी होई. पुण्याच्या आजूबाजूच्या खेड्यांमधून खूप लोक या यात्रेला येत.

सेनापती बापट रोड, डेक्कन जिमखाना, जंगली महाराज रोड, लक्ष्मीरोड इत्यादी भागात कधीतरी आमचे जाणे होई. पुण्याच्या चेहऱ्यात वेगवेगळ्या छटा होत्या. फर्ग्युसन रोडवर फिरणारे चेहरे सहसा पाश्चिमात्य आचार-विचार असलेले दिसत. रस्त्यावर नेहमी इंग्रजी संभाषणाचा वावर असे. कार्पोरेशनचे बसस्टँड व पुणे स्टेशनचे आवार गावाकडच्या मंडळीमुळे थोडे मराठमोळा वाटे तर सदाशिवपेठेत अस्सल पुणेरी स्वभावधर्माची ओळख होई. पुण्यात राहात असलो तरी पुणे वर्तमानपत्रातच जास्त भेटे. कुणाचा वाढदिवस असला की मग आमची डेक्कनला किंवा जंगली महाराज रोडला वारी होई. त्यानंतर आम्ही सारे पायी चालत विद्यापीठात येत असू. पुणे डोळ्यादेखत खूप वेगाने बदलत होते. इकॉनॉमिक बूमचा वारा पुण्याला लागला होता. कुठेतरी पुण्याचे मराठमोळेपण लोप पावत असल्याचे अनुभवाला येत होते. आजही पुण्यात फेरफटका मारताना दिसणारे बदल आश्चर्यजनक वाटतात.

विद्यापीठाच्या नयनरम्य, मनोहारी वातावरणात जीवनाचे नवे पर्व सुरू झाले. अभ्यासास स्फूर्ती मिळावी असे वातावरण विद्यापीठाच्या आवारात होते. सुरुवातीचे काही दिवस झाडाझुडपांमधून आपला विभाग, मुख्य इमारत व भोजनालय शोधण्यातच गेले. राष्ट्रीय ख्यातीप्राप्त, डोळे दिपून जावेत असे दिग्गज संख्याशास्त्र विभागात होते. त्यांची नावे तोपर्यंत मी फक्त कानाने ऐकलेली होती. तेथे आपला खरा कस लागणार याची काही दिवसांतच खात्री झाली.

एकेक गोष्ट माझ्यासाठी हळूहळू सुकर होत गेली. वसतिगृहात प्रवेश मिळाला. ‘कमवा व शिका’ या योजनेसाठी निवड झाली आणि दोन महिन्यांनंतर ‘नॅशनल बोर्ड ऑफ हायर

मॅथेमॅटिक्स' द्वारा अणुशक्ती विभागातर्फे देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी माझी निवड झाली. त्या शिष्यवृत्तीमुळे मला महिन्याला हजार रुपये मिळण्याची व्यवस्था झाली. माझा स्वत:चा या घटनांवर विश्वास बसेना. शिक्षणाविषयीच्या आर्थिक समस्यांचा अंत अचानक झाला. मात्र, ही शिष्यवृत्ती प्रत्येक सेमिस्टरमध्ये मुलाची प्रगती पाहून चालू राहणार होती. त्यामुळे मला अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे होते.

पुण्यात आपल्याला काहीच माहीत नाही, आपण खूप मागे आहोत याची तीव्र जाणीव होत असे; परंतु मी त्याचवेळेस ती उणीव भरून काढण्याचा मन लावून प्रयत्न करत असे. वसतिगृहातील जीवन, तेथील समस्या, मुलांचे आपापसातील वागणे, मुलामुलींचे संबंध याविषयी मी जाणकार होत होतो. विद्यापीठात खूप कमी विद्यार्थ्यांना वसतिगृह मिळते. राहिलेले विद्यार्थी इतरांमध्ये परजीवी म्हणून राहतात. साधारणत: एकूण संख्येच्या तीन पट विद्यार्थी पॅरासाइट म्हणून राहतात. मला पण असाच एक पॅरासाइट लाभला होता. त्याला आम्ही प्रेमाने 'पॅरा' म्हणत असू. बऱ्याचदा, यजमानापेक्षा पॅरासाइट जास्त कार्यक्षम व हुशार असत. वसतिगृहात एका विभागाची सर्व मुले जिव्हाळ्याने राहात. सुरुवातीला मला जुनेद नावाच्या माझ्या सिनिअरचा फायदा झाला होता. तो मदतीसाठी नेहमी तयार असे. मी त्याची सायकल, त्याची खोली, कपडे; एवढेच नव्हे तर त्याचे डोक्याला लावायचे तेलही वापरत असे.

विद्यापीठात तसे वसतीगृह खूप कमी विद्यार्थ्यांच्या नशिबी असते. प्रत्येक विभागातील तीन किंवा चार मुलांनाच वसतिगृहात खोली मिळत असे. सुदैवाने मला अशीच एक खोली मिळाली होती. उरलेली इतर मुलेही शेवटी वसतिगृहातच रहात पण पॅरासाईट म्हणून. वसतिगृह नावावर असलेल्याच्या नशिबी पलंग असायचा तर पॅरासाईटला जमिनीवरच झोपावे लागे. एकेका खोलीत जेवढ्यांना झोपणे शक्य होई तेवढे पॅरासाईट दाटीवाटीने राहात. त्यातले बरेच वर्षानुवर्षे तेथे पडीक असत. माझ्या रूमशेजारी असलेल्या खोलीत माझ्याच विभागातील सतिश कुलकर्णी नामक विद्यार्थी चार वर्षांपासून राहात होता. प्रत्येक वर्षी रूमचा मालक बदलला पण बहाद्दर मात्र रूमला चिपकून राहिला. काही पॅरासाईट पुण्यात नोकरी करत, काही युपीएससी-एमपीएससी च्या तयारीसाठी आलेले असत, तर इतर काही गावावरून, एखाद्याची ओळख काढून, नोकरीच्या शोधार्थ आलेले असत. बऱ्याचदा पॅरासाईट व रूम मालकात करार झालेला असे. कुणी चहाचे पैसे देणार तर कुणी हॉटेलचे, तर कुणी दारूचे सुद्धा!

वसतिगृह म्हणजे अजब ठिकाण होते. तिथे दिवसातील चोवीस तास गजबजलेले असत. येणाऱ्या जाणाऱ्यांवर कुठलीही पाबंदी नसल्याने भेटायला, खेळायला बरेच जण चकरा मारत. काही खोल्यांमध्ये रात्रभर जागरण होई तर काही रूममध्ये सकाळी लवकर उठणे होई. पहिल्या वर्षी दोन किंवा तीन वेगवेगळ्या विभागातील विद्यार्थ्यांना एकाच खोलीत दिले जाई. यामुळे खूपच गंमत होई. वेगवेगळ्या विभागातील गमतीजमती इकडून तिकडे सहज पास होत. रोज रात्री उशीरापर्यंत गप्पा रंगत - अशावेळी थट्टा-मस्करी याला उधाण येई.

सकाळी उठल्यावर आंघोळीसाठी झुंबड होई. प्रत्येक मजल्यावर दोनच हीटर असल्याने गरम पाण्यासाठी बादल्यांचे नंबर लागत. काही महाभाग रात्री झोपतानाच गिझर सुरू करून व बादली ठेवून आपल्या नंबरचा हक्क सांगत. अशावेळी शाब्दिक चकमकीही उडत. काही आडदांड मुले सर्वांच्या बादल्या सरकवून स्वत:ची बादली लावत व आंघोळ करत.

मी एक नंबर वसतिगृहात राहात होतो. मुलींच्या वसतिगृहाला जाण्याचा मार्ग आमच्या

वसतिगृहावरूनच जाई. मुलींच्या वसतिगृहासमोर घुटमळणारी मुले व मुलांच्या वसतिगृहासमोरील मुली नेहमी सर्वांचा चर्चेचा विषय असत. मुलींच्या वसतीगृहात खूप कडक शिस्त होती. सेक्युरिटी गार्डला सांगूनच एखाद्या मुलीला बाहेर बोलावता येत असे. बरीचशी प्रेमी युगुले वसतिगृहाच्या आजूबाजूला कुठेतरी बसलेली दिसत. या व्यतिरिक्त फसलेल्या प्रेमप्रकरणातून उद्भवलेल्या गोष्टी नेहमी वसतीगृहात चर्चेचा विषय असत. ओपन कॅन्टिन, अॅलिस गार्डन किंवा इतर झाडाझुडपांमध्ये बसताना आढळलेल्या द्वयींना वसतिगृहात नेहमी खोचून विचारले जाई.

नवीन वर्ष, ख्रिसमस, होळी, गणेशोत्सव अशावेळी वसतिगृहात धूम राहात असे. टीव्हीवर भारत-पाकिस्तानच्या सामन्यांसाठीही खूप मुले गर्दी करत. अशावेळी प्रत्येक चौकार-षटकाराला व विकेटच्या वेळी असा काही कल्लोळ होई की सारा परिसर दणाणून जाई. एकदा असेच आम्ही सारे भारत-पाकिस्तानची मॅच बघत होतो. माझ्याच विभागातील देवेन्द्र म्हणून एक आडदांड मुलगा एका बेंचवर बसलेला होता. मध्येच तो उठून गेल्यावर मी त्याच्या जागेवर जाऊन बसलो. थोड्यावेळाने तो तिथे आल्यावर मला तिथून उठण्यासाठी दामटावू लागला. आधीच आमची काही दिवसापासून एकमेकांवर खुन्नस होती. नेहमी काहीही खोटेनाटे सांगून लोकांना इंप्रेस करण्याची त्याला सवय होती. आम्ही मात्र मुद्दाम त्याच्या बढायांचा पाठपुरावा करून त्याला तोंडघाशी पाडत असू. यामुळे तो खास करून माझ्यावर नाराज होता. त्याला आता हिशोब चुकता करण्याची चांगली संधी चालून आली होती. त्याने माझी कॉलर पकडली व माझ्या श्रीमुखात लगावली. मीही काही कमी नव्हतो. मीही त्याला दोनचार वाजवून दिल्या. आधीच तापलेले वातावरण जास्तच तापून गेले. या घटनेची विभागातही खूप चर्चा झाली. यामुळे आमच्यात जे बिनसले ते आमचा कोर्स पूर्ण होईपर्यन्त तसेच राहिले.

वसतिगृहात अधूनमधून तपासणी होई. अशावेळी पॅरासाईट मुलांची खूपच तारांबळ उडत असे. बऱ्याचदा तपासणी होण्याची बातमी आधीच वसतिगृहात पोचलेली असे. त्यामुळे तपासणीला येण्याअगोदरच सारे नीटनेटके असे. कधीकधी तर अफवाही पसरत. अशावेळी पॅरासाईट मुलांचा उगाच दिवस वाया जाई. कधीकधी खूपच गुप्तपणे धरपकड होई व खोलीच्या मालकावर दंड आकारला जाई. वसतिगृहातील ते दिवस म्हणजे सोनेरी स्वप्नांसारखे होते. त्यातील एकेक दिवस परत फिरून यावा असे बऱ्याचदा मनाला वाटून जाते.

मी नोकरी लागेपर्यंत एकदाही कधी शर्ट व पॅण्ट एकत्र विकत घेतले नाहीत. ते माझ्यासाठी शक्यच नव्हते. बऱ्याचदा मित्रांचे, नातेवाईकांचे कपडे घालण्याचा प्रसंग आला; पण मी ते आनंदाने घालत असे. मी धुळ्याला संग्रामचे, ओझरला मामाच्या मुलांचे, तर पुण्यात जुनेदचे कपडे घालत असे. कधी कधी खूप वाईट वाटे; परंतु आपले दिवसच असे आहेत, आपण चोरून तर घालत नाही ना असे म्हणून मनाची समजूत काढत असे.

लवकरच, आमचा एक ग्रुप तयार झाला. त्यात नाशिकहून आलेल्या स्मिता, भावना, इंदूरहून आलेली पूर्वा, दिल्लीचा सुभाष, नाशिकचा जलील, जमशेदपूरची मीनाक्षी व सुवर्णा असे आम्ही होतो. हसत-खिदळत एकेक दिवस कसा गेला आणि पहिले सेमिस्टर कधी संपले त्याचा पत्ता लागला नाही. शहरातून आलेल्या त्या मुलामुलींची इंग्रजी फाडफाड बोलण्याची लकब, त्यांची विचार करण्याची पद्धत मला आकर्षित करत असे. बऱ्याचदा, एवढ्या चांगल्या वातावरणातही मला स्वत:ला एकाकी असल्याचा भास होत असे; मग ती मेजवानी असो वा बाहेर फिरायला जाणे असो. एकाकीपणा व अस्वस्थता नेहमी माझा पाठलाग करत असत. मी स्वत:ला बऱ्याच

गोष्टींपासून अलिप्त ठेवत असे. आयुष्यात मजा, मस्ती, करमणूक या गोष्टी आपल्यासाठी नाहीत असे मला वाटत असे. कधी कधी, अर्ध्या सिनेमामधून मला उठून जावेसे वाटे. अपराध्यासारखे वाटे. मी बऱ्याचदा खर्च करत असलेल्या पैशांचे गणित मांडत असे. मी सिनेमाला जाऊन वीस रुपये खर्च केले, त्याच वीस रुपयांसाठी ताई संपूर्ण दिवसभर दुसऱ्याच्या शेतात राबली असेल - अशा अनेक विचारांनी मी खिन्न होऊन जात असे.

पहिल्या वर्षाच्या सुरुवातीच्या काही दिवसांतच आयुष्याने वेगळे वळण घेतले. अभ्यासात सदासर्वदा व्यस्त असणारा मी अचानक अभ्यासाव्यतिरिक्त एका व्यक्तीचा विचार करू लागलो. मला एक सुंदर मुलगी आवडू लागली. मी वेगळ्याच विश्वात रममाण होऊ लागलो. तिच्याबद्दलचा विचार माझा अधिकाधिक वेळ घेऊ लागला. माझ्या नकळत माझे अभ्यासावरचे लक्ष विचलित झाले. इतर समस्या मला नगण्य वाटू लागल्या. हळूहळू ही बातमी पसरत गेली व मित्रांना खरे काय ते सांगणे भाग पडले. सर्वानुमते, हे रहस्य मनात न ठेवता तिला काय ते सांगावे असे ठरले. शेवटी, चांडाळचौकडीने ओपन कँटिनची जागा निवडली व तिला एका संध्याकाळी मला भेटण्यासाठी आमंत्रित केले.

ती संध्याकाळ मला आठवते. किंबहुना, तो संपूर्ण दिवस मी अस्वस्थतेत घालवला. ती काय म्हणेल? तिला काय वाटेल? तिने अशी सुरुवात केली तर मी कशी सुरुवात करणार? यासंबंधी आराखडे बांधत होतो. हृदय किंचित जड झाल्यासारखे वाटत होते. दिवसाचा एकेक क्षण घालवणे माझ्या जीवावर आले होते. शेवटी, एकदाचा दिवस संपला आणि संध्याकाळी मी ओपन कँटिनच्या मार्गाला लागलो. मी जसा सरळ विचार करतो तसा दुनिया करत नाही याचा प्रत्यय मला तिला भेटल्यावर लगेच आला. तिला सर्व माहीत असूनही ती काही माहीत नसल्याचा आविर्भाव करत होती. शेवटी, मी माझ्या मनातील गोष्ट सांगितली, तेव्हा ती हळूच गालात हसली व 'पोरगा फसला' अशा आविर्भावात 'मी तुझा त्या दृष्टीने कधी विचार केलाच नव्हता, तू तर अजून नोकरीही करत नाहीस, शिवाय आपल्या जाती वेगवेगळ्या आहेत,' अशी उत्तरे ती अगदी न घुटमळता व न अडखळता देऊ लागली, तेव्हा कोणीतरी माझ्या अंगावर जळते निखारे फेकत आहे अशी जाणीव मला होत होती. शेवटी, स्पष्ट काय ते न सांगता तिने माझ्याकडून वेळ मागून घेतला.

त्या दिवसानंतर मला हलके हलके वाटू लागले; परंतु मनात रात्रंदिवस फक्त तिचा विचार चालू असे. खरे तर, तिच्या शब्दांमधून मला खरे काय ते समजून यायला हवे होते; परंतु मी मात्र दिवसा शुक्रतारा बघण्याचा अट्टाहास धरून बसलो होतो. शेवटी, माझे एकतर्फी प्रेम हा विभागात एक हास्यास्पद विषय ठरला. मी मात्र, ती एक दिवस हो म्हणेल, या आशेवर अधीरतेने तिच्या प्रतिसादाची वाटत बघत राहिलो. या घटनांचा माझ्या मानसिक, शारीरिक स्वास्थ्यावर परिणाम होत होता. आमच्या विभागात नोरी नावाच्या एका हुशार मुलाला अशाच एकतर्फी प्रेमामुळे विभागाला व शिष्यवृत्तीला मुकावे लागले होते. मलासुद्धा भविष्यात अंधार दिसू लागला; परंतु प्रत्येक गोष्टीला जशी सीमा असते तसे माझ्या एकतर्फी प्रेमालाही एका परीक्षेला सामोरे जावे लागले.

झाले असे की, मी काही कारणानिमित्त घरी गेलो होतो. घराकडील आबाळ बघून मला स्वत:ची लाज वाटू लागली. आपण एवढे स्वार्थी कसे होऊ शकतो, फक्त स्वत:चा विचार कसा करू शकतो हे बघून हृदयात खड्डा पडला. कोण कुठली ती मुलगी? जिला आपण सहा

महिन्यांपूर्वी कधी भेटलोही नाही आणि तिच्यासाठी आपण आपले भविष्य दावणीला लावत आहोत, आपल्या जबाबदाऱ्या विसरत आहोत. आपल्याकडून जे झाले ते विसरायला हवे अशी मनाची तयारी केली. खूप विचार केला आणि ठरवले की, यापुढे आपण स्वत:वर ताबा ठेवलाच पाहिजे. दोन दिवस घरी जास्त राहिलो व जेव्हा परत गेलो, तेव्हा माझ्यात खूपच बदल झालेला होता. हळूहळू, मी चाकोरीवर आलो. मन रमावे म्हणून खूप अस्वस्थ वाटल्यास मी चतु:शृंगीच्या दर्शनाला जात असे किंवा संग्रामबरोबर वेळ घालवत असे. त्या काळच्या सर्व गोष्टींचा जेव्हा मी विचार करतो तेव्हा माझेच मला हसू येते. ज्या मुलीचा रात्रंदिवस ध्यास घेतलेला होता, तिची कधीही मला क्षणभरसुद्धा आठवण येत नाही, कदाचित तोच जीवनाचा नियम असेल. वेळ हे सर्वात मोठे औषध आहे. वेळेनुसार माणसाचे विचार, त्याच्या प्राथमिकता बदलतात आणि माणूस पुढे चालत राहतो. त्यावेळेस केलेले प्रेम सत्य होते आणि नंतरच्या वाटचालीविषयीही मनात काही साशंकता नाही; परंतु त्या घटनेने माझे संपूर्ण जीवन ढवळून निघाले. तदनंतर मात्र मी खूपच कठोर बनलो, ध्येयनिष्ठ बनलो व माझ्या मनातील चंचलता बऱ्याच अंशी लोप पावली. मला तीव्रतेने जाणीव झाली की, जीवनाला वेगवेगळे आयाम असतात, कोणा एका व्यक्तीसाठी आयुष्य बरबाद करण्यापेक्षा आपले श्रम, प्रेम व सेवा गरजू व्यक्तींच्या कामी लागल्यास जीवनाचे सार्थक झाल्यावाचून राहत नाही. सुरुवातीला मला राग, नंतर तिटकारा व शेवटी आपुलकी वाटत राहिली. तिच्या लग्नाच्या निमंत्रणाबरोबर आमच्या एकतर्फी प्रेमकहाणीला पूर्णविराम मिळाला.

या प्रकरणानंतर आधीच थोडा अंतर्मुख असलेला मी जास्तच अंतर्मुख झालो. कुठेतरी काहीतरी आपल्यात कमी असल्याच्या विचाराने मनात घर केले. आपल्याकडे काही आहे व आपण काहीतरी करून दाखवू शकतो या ईर्षेने मी पेटून उठलो. आपण आता थांबायचे नाही जोपर्यंत आपण आपल्या ध्येयापर्यंत पोहचत नाही. मी मानसिक दृष्ट्या जास्त खंबीर झालो. ध्येयवादी झालो. मनातील चंचलता नाहीशी झाली. इतर सारे काय म्हणतील हा विचार मी सोडून दिला. एका अर्थाने हा प्रेमभंग माझ्यासाठी प्रेरणादायी ठरला.

पुण्यात शिकत असताना, साधारणत: पहिल्या वर्षाच्या अखेरीला मला उषाचे, माझ्या बहिणीचे लग्न जमल्याचे कळले आणि काही दिवसांतच लग्नाची तारीखही ठरली. माझी मधली बहीण उषा प्रेमळ आणि चुणचुणीत आहे. कुणालाही आवडेल असे तिचे रूप व वागणूक होती; परंतु गरिबीच्या ओझ्या-खाली तिचे बालपण व शिक्षण चिरडले गेले. नववीपर्यंत वर्गात पहिल्या नंबरने पास होणाऱ्या उषाला दहावीचे तोंडही बघता आले नाही. लवकर लग्न केल्यास कमी पैशांत होईल या उद्देशाने नातेवाईकांच्या दबावाला बळी पडून ताई-अण्णांनी तिचे लग्न वयाच्या सोळाव्या वर्षीच जमवले. पुढे, सासरच्या अशिक्षित घरात तिच्या आशा-आकांक्षा चिरडल्या गेल्या आणि तिला अकाली प्रौढत्व आले. लग्नाला गेलो तेव्हा कळले, की ताई-अण्णांनी ऐपतीच्या बाहेर हुंडा देऊन तिचे लग्न ठरवले आहे. आधीचेच कर्ज असल्यामुळे त्यांना घर किंवा शेत विकणे भाग होते; परंतु ते घर किंवा शेत विकण्याच्या मनस्थितीत नव्हते. कारण त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून होता. शेवटी घर गहाण ठेवावे असे ठरले. कारण घर गेल्यास कुठेही राहता येईल; शेत गेल्यास मात्र उदरनिर्वाहाचे साधनच जाईल! जवळच्या काही कोल्ह्यांचा डाव वेगळाच होता. त्यांना माहीत होते, की एकदा गहाण ठेवलेली संपत्ती क्वचित कुणाला परत मिळते. त्यामुळे अण्णांची जमीन बळकावयाला ही संधी चांगली चालून आलेली आहे. ते स्वत: घर गहाण करून घेत नव्हते व दुसऱ्यालाही गहाण ठेवून घेऊ देत नव्हते. त्यांना शेतीच हवी होती. शेवटी, एक सावकार घर

गहाण ठेवून पंचवीस हजार द्यायला तयार झाला व अशा प्रकारे तीन वर्षांच्या मुदतीवर घराची खरेदी झाली.

मी या सर्व प्रकारापासून दूर होतो; परंतु मला जेव्हा हे सर्व गौडबंगाल कळाले; तेव्हा खूप वाईट वाटले. आपले रक्त जळून गेल्याचा भास मला झाला. आपण एवढे शिकूनसुद्धा बहिणीसाठी, कुटुंबासाठी काही करू शकत नाही याची मला लाज वाटू लागली. ताई-अण्णा उषाच्या लग्नाआधी मदतीसाठी सर्व नातेवाईकांकडे फिरले; परंतु कुणीही मदतीची भीक घातली नाही. त्यांच्या चेहऱ्यावरील उदासी बघून माझ्या मनात कालवाकालव होत होती. उषाचे लग्न कसेबसे पार पडले व मी जड अंत:करणाने पुणे गाठले.

पुण्यातील पहिले वर्ष प्रचंड उलथापालथीचे गेले. एका बाजूला घरच्या समस्यांनी अंतर्मनाला हतबल केले होते तर दुसऱ्या बाजूला स्वत:ला सिद्ध करून उज्ज्वल भविष्याकडे घेऊन जाणाऱ्या नवनवीन संधी मला आव्हान देत होत्या. मनाची अवस्था विचित्र झाली होती. आपल्याला जीवनात नेमके काय करायचे आहे? ते करण्यासाठी आपण काय करायला पाहिजे व आपण काय करत आहोत? यांसारखे मूलभूत प्रश्न मला भेडसावत होते.

हळूहळू जीवनाला एक दिशा मिळत असल्याची जाणीव झाली. संख्याशास्त्र विभागात संशोधनाची व उच्च शिक्षणाची परंपरा होती, पण माझा एकंदर कल बदलत असल्याचे मला जाणवू लागले. वर्षानुवर्षे एखाद्या विषयावर संशोधन करत राहून देश-विदेशांत 'पेपर' सादर करत बसण्यापेक्षा मला जीवनातील समस्या जास्त आव्हानात्मक वाटू लागल्या. संख्याशास्त्रातील प्रमेये व सिद्धांतांपेक्षा लोकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या गोष्टींमध्ये मला जास्त स्वारस्य वाटू लागले. घरी गेल्यावर दिसत असलेल्या समस्यांचे समाधान मला माझ्या अभ्यासात शोधून सापडत नव्हते. शिवाय, माझ्याशी निगडित प्रत्येक व्यक्ती आपल्याकडे मोठ्या आशेने बघत आहे याची जाणीव डोक्यात आहे.

आजुबाजूची परिस्थिती मात्र वेगळी होती. 'इकॉनॉमिक बूम'चे पडसाद दिसू लागले होते. खाजगी क्षेत्रात आणि खास करून माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात प्रचंड संधी निर्माण झाल्या होत्या. कधी नव्हे त्या मोठ्या पगाराच्या नोकऱ्या मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी खुल्या झाल्या होत्या. सर्वत्र त्याविषयी चर्चा होती. माझे सहकारी व आजूबाजूचे सर्वजण या 'बूम' मध्ये सामील व्हायची तयारी करत होते किंवा कधीच सामील झाले होते! माझा जीव गुदमरायला लागला होता.

माझ्या समस्या फक्त आर्थिक बाबींशी निगडित नव्हत्या. तसे असते तर 'इकॉनॉमिक बूम'मध्ये सामील होऊन त्या सोडवणे खूपच सोपे होते. आर्थिक अडचणी फक्त नजीकच्या भविष्याशी निगडित होत्या तर माझा प्रश्न हा संपूर्ण जीवनाशी निगडित होता. विवेकानंद, फुले, गांधी यांचे विचार मनात खोलवर रुजले होते. त्यामुळे फक्त स्वत:चा विचार होत नव्हता. एखाद्या खाजगी कंपनीत लठ्ठ पगाराची नोकरी करणे किंवा परदेशात जाणे हे मला घाबरून-पळून जाण्यासारखे वाटत होते. आपण ज्या विचारांना घेऊन वाढलो, ज्यांनी आपल्याला बळ दिले ते विचार, एकंदरीत अनुभव व पिंड समाजाशी संलग्न अशा क्षेत्रात काम करण्यासाठी आहे यात शंका राहिलेली नव्हती. फक्त प्रश्न उरला होता तो इतकाच की, हे सर्व कसे साध्य करायचे? हा वैचारिक गोंधळ दूर झाल्यावर मार्ग स्पष्ट दिसू लागला.

लोकांसाठी काम करायला मला तीन मार्ग स्पष्ट दिसत होते! राजकारण, प्रशासन आणि स्वयंसेवी संस्था. राजकारणाचा आढावा घेतल्यावर आपण त्या मार्गाने जाऊ शकू याचा मला

विश्वास वाटत नव्हता. राजकारणात पैशाला, गैरमार्गाला व गुंडगिरीला प्रचंड महत्त्व प्राप्त झाले होते. लोक लहान, अगदी सरपंचाच्या, पदासाठी लाखो रुपये खर्च करताना दिसत होते. पद मिळाल्यावर तोच खर्च दामदुपटीने वसूल करण्याचा त्यांचा आटापिटा चालू होता. नैतिकतेनुसार, सेवाभावाने चालणाऱ्या लोकांची राजकारणात झालेली वाताहत उघड्या डोळ्यांनी बघत होतो. आपल्यासारख्या आर्थिक परिस्थितीतल्या व्यक्तीला उदरनिर्वाहासाठी कोणतेही साधन नसताना नि:स्वार्थीपणे राजकारणात उतरणे अवघड वाटत होते, परंतु समाजाचे सर्वांगीण उत्थान करायचे असल्यास राजकारणाशिवाय काही मार्ग नाही हेही तेवढेच खरे होते.

स्वयंसेवी संस्थांविषयी मला नेहमीच आकर्षण वाटे. स्वयंसेवी संस्था म्हणजे नि:स्वार्थी व सेवाभावी वृत्तीने अखंड लोकसेवा करण्याचा एक सुकर मार्ग असे मला वाटे. माझा स्नेही अशोक पिंगळे अशाच एका सेवाभावी संस्थेत काम करत होता. मी अशा कामाचा करिअरच्या दृष्टीने विचार करू लागलो तेव्हा मला त्यात तुलनात्मक त्रुटी जाणवू लागल्या.

दुसऱ्यांसाठी काम करण्यापूर्वी मला स्वत:च्या कुटुंबाचा उद्धार करणे गरजेचे वाटत होते. स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून ज्या गोष्टी आपण लोकांच्या समोर मांडणार आहोत त्या आधी स्वत:साठी कार्यान्वित करणे गरजेचे होते. शिवाय, स्वयंसेवी संस्थांच्या कार्याला मर्यादा होत्या. बऱ्याच संस्था आणि त्यांतील व्यक्ती फक्त आर्थिक लाभासाठी काम करताना दिसत होत्या. त्यामुळे स्वयंसेवी संस्थेतील कामाचा विचार मागे पडला. तरी मला मनातील एखादी कल्पना कार्यान्वित करण्यासाठी, किंवा एखाद्या समस्येला घेऊन तिचा सेवाभावी वृत्तीने पाठपुरावा करण्यासाठी, सेवाभावी संस्थेशिवाय दुसरा पर्याय नाही याची खात्री झाली होती. त्याबाबतीत अभय बंगच्या 'सर्च'चे प्रभावी उदाहरण डोळ्यांसमोर आहे.

त्यामुळे उरले फक्त प्रशासन. प्रशासकीय नोकरी करण्याबाबत मी बऱ्याच आधीपासून विचार करत होतो, पण वरील दोन क्षेत्रे मला अधिक मोहक वाटत होती. मनाचा पूर्ण निर्धार झाला नव्हता. विभिन्न वाटांची ओळख झालेली नव्हती. मात्र अखेरीस मी इतर अनेक आकर्षक मार्ग सोडून प्रशासनाकडे वळलो.

लहानपणापासून तलाठी, तहसिलदार, बीडीओ यांच्याशी माझा संपर्क आलेला होता. माझ्या आजूबाजूच्या लोकांच्या उद्धाराचा मी जेव्हा जेव्हा विचार करत होतो तेव्हा मला प्रशासकीय यंत्रणेतील योजना राबवण्यातील दोष जाणवत होते. तत्पर व लोकाभिमुख प्रशासनाच्या माध्यमातून लोकांच्या बऱ्याच अडचणी सोडवल्या जाऊ शकतात याची जाणीव होत होती. शिवाय, माझ्या दैनंदिन कामामधून लोकांची विपुल सेवा घडू शकणार होती. शेती, महिला, बालविकास, आरोग्य, शिक्षण इत्यादी विषयांबद्दलचे माझे विचार कार्यान्वित करण्याची संधी मिळणार होती. शेवटी, दारिद्र्य, सामाजिक उपेक्षा यांमुळे गंजलेल्या माझ्या आई-अण्णांना वैभव प्राप्त करून देऊन त्यांच्या डोळ्यांचे पारणे फेडण्याची संधी मिळणार होती. अशा प्रकारे, एकेक जाळे दूर होत अंधारात मला माझी वाट स्पष्ट दिसत होती.

मार्ग जरी दिसत असला तरी ध्येयापर्यंत जाण्याचा आत्मविश्वास व तयारी माझ्याजवळ नव्हती, तरी मी वेड्यासारखा कामाला लागलो; अधाशासारखा माहिती जमा करू लागलो. सुरुवातीला, लवकर काहीतरी नोकरी पकडावी व नंतर ध्येयाकडे वाटचाल करावी अशी खूणगाठ बांधली. त्यामुळे मी जी नोकरी मिळेल त्यासाठी प्रयत्न करू लागलो. माझी संशोधन करण्याचीही मानसिक तयारी झाली. कारण स्वत:चा व कुटुंबाचा उदरनिर्वाह, गहाण ठेवलेल्या

घराला सोडवणे आणि प्रतिभाचे, माझ्या लहान बहिणीचे शिक्षण ही आता माझी जबाबदारी होती. त्यामुळे मला पूर्णवेळ अभ्यास करून भारतीय प्रशासनिक सेवेची परीक्षा देणे शक्य नव्हते; किंबहुना मला शिक्षणक्रम संपल्यावर एक महिनाही पुण्यासारख्या ठिकाणी राहणे शक्य नव्हते.

पदव्युत्तर दुसऱ्या वर्षाच्या सुरुवातीबरोबर नोकरीचे वेध लागले. अभ्यासापेक्षा नोकरीविषयी जास्त विचार करू लागलो. दरम्यान, संशोधनासाठी असलेली शिष्यवृत्ती परीक्षा (NET-GR) दिली, व्याख्याता पात्रतेसाठी असलेली (SET) व सैन्यदलात अधिकारीपदासाठी असलेली (CDS) परीक्षा मी दिल्या. सुदैवाने, मी सर्व ठिकाणी यशस्वी झालो. दुसरे वर्ष संपण्याआधी माझ्याकडे वायुसेनेतील पायलट ऑफिसर, संशोधनासाठी शिष्यवृत्ती व व्याख्याता म्हणून काम करण्याचे निमंत्रण - अशा अनेक संधी होत्या. एकूणच, सर्व काही मनासारखे झाले होते.

लहानपणापासून मला शूरवीरांची, क्रांतिकारकांची चरित्रे, त्यांच्या शौर्यगाथा वाचण्याची खूप आवड होती. त्यामधून मलाही काहीतरी पराक्रम गाजवण्याची स्फूर्ती मिळत राहिली. मी खूप लहानपणी सैन्यदलात भरती होण्याविषयी मनाची तयारी केलेली होती. देशासाठी लढणे व वेळप्रसंगी प्राण देणे याविषयी माझ्या मनात तीव्र इच्छा जागृत झालेली होती. खूप आधीपासून मी त्याविषयी माहिती जमवत होतो, की आपल्याला सैन्यदलात कसे जाता येईल? मी वयाने व ज्ञानाने जसजसा मोठा होत गेलो तसतशी माझी इच्छा वाढत गेली. पुढे, जवान म्हणून सैन्यदलात जाण्यापेक्षा अधिकारी म्हणून गेल्यास जास्त चांगले राहील असे मला वाटू लागले. म्हणून धुळ्याला माझे मित्र डॉक्टर, इंजिनीयर बनण्याचा विचार करत असताना मी मात्र NDA (National Defence Academy) ची परीक्षा देण्याच्या बेतात होतो. मराठी माध्यमात शिकणारा मी; जेव्हा इंग्रजीत पेपर द्यायची वेळ आली तेव्हा माझी भंबेरी उडाली व मी ती परीक्षा नापास झालो. मला त्यावेळेस इंग्रजीवर प्रभुत्व असण्याची तीव्र गरज जाणवली. ती अपूर्ण राहिलेली इच्छा मी परत CDS ची परीक्षा देऊन पूर्ण केली. परंतु मी ज्या तीव्र इच्छाशक्तीने NDAची परीक्षा दिली होती ती नंतर लोप पावली. लष्करी गणवेषाशिवाय, बंदूक-गोळ्यांविषयी असणारे आकर्षण कधीच संपले होते! सीमेवरील शत्रूपेक्षा रोजच्या जीवनात मला जास्त समस्या वाटू लागल्या! खरे युद्ध तर हेच आहे की! याची जाणीव होऊ लागली. जोपर्यंत ती नोकरी मिळाली नव्हती तोपर्यंत त्याविषयी विचार नव्हता. परंतु जेव्हा ती नोकरी पत्करायची की नाही असा प्रश्न उभा राहिला तेव्हा मी मनाला खोदून विचारले.

माझ्याबरोबर फक्त स्वत:चा विचार नव्हता; सर्व घराची जबाबदारी माझ्यावर होती. घरी गेल्यावर, मी ताई-अण्णांशी या विषयावर बोललो. त्यांच्या उत्तराने माझे उर भरून आले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ते जसे आयुष्य जगत होते त्या परिस्थितीत ते काही वर्षे ढकलू शकतात. परंतु त्यांच्यामुळे जर माझ्या इच्छा -आकांक्षा- स्वप्नांवर पाणी फिरत असेल तर मला त्यांचा जास्त विचार करण्याची गरज नाही असे त्यांनी सांगितले. मी त्यांचे हे मोठे, उदात्त स्वरूप पाहून अधिकच गोंधळून गेलो. मला एवढे माहीत होते, की वायुदलात प्रवेश करणे सोपे आहे, परंतु बाहेर निघणे तेवढेच कठीण आहे. जर आपण ही नोकरी पत्करली तर आपल्या प्रशासनात जायच्या व लोकांसाठी काम करायच्या इच्छेला तिलांजली द्यावी लागेल. शेवटी, मी मन घट्ट करून ती नोकरी न पत्करण्याचा निर्णय घेतला व संख्याशास्त्र विभागात शिष्यवृत्ती घेऊन संशोधनासाठी माझे नाव दाखल केले. आयुष्यात काही निर्णय खूप महत्त्वाचे ठरतात. ते जीवनाची दिशा बदलवून टाकतात. मी जेव्हा विचार करतो तेव्हा माझाच माझ्यावर विश्वास बसत नाही की, मी जेव्हा

घरून पुण्याला कॉलेजला जायला निघालो तेव्हा प्रवासखर्चाचे पैसे मिळायचे वांधे होते, राहायचे घर गहाण ठेवलेले होते, अशा परिस्थितीत मी एवढी मोठी नोकरी सोडलीच कशी?

इच्छा असेल तर मार्ग सापडतो म्हणतात. माझीही प्रशासनात जायची तीव्र इच्छा होती. परंतु ध्येयाकडे नेमके कसे जायचे याचा थांगपत्ता लागत नव्हता. कधी कधी खूप भीती वाटे, एवढ्या प्रचंड स्पर्धेत आपला टिकाव लागेल का? आपल्यामध्ये परीक्षा पास होण्याची क्षमता आहे का? आणि समजा, आपण परीक्षा पास झालो तर आपल्याला आय.ए.एस. मिळेल का? किंवा आपल्यामध्ये काम करण्याची क्षमता आहे का? यांसारखे अनेक प्रश्न मला भेडसावू लागले. मी जेव्हा नोकरी सोडून ध्येयाविषयी थोडा सिरिअस झालो तशी माझ्यावरील जबाबदारी वाढली. मित्रमंडळींमध्ये कधी कौतुक तर कधी उपहासपूर्ण मिस्किल हसण्याला मला सामोरे जावे लागले.

खेड्यांतून येणाऱ्या मुलांना सर्वसामान्य स्पर्धेबरोबर विचित्र अवहेलना, उपहास यांना सामोरे जावे लागते. मी घरी गेल्यावर गावातील वयस्कर व टुकार मंडळी खोचून म्हणणार, 'काय भो बापु कधलोक शिकसी मग आते? शिकी शिकी येडा होसी का?' किंवा 'मायबापसना कधलोग आवकाया देखसी? आते काहीतरी नोकरीचाकरी देख.' या वक्तव्यांनी मी नकळत विचलित होत असे. कधी कधी वाटे, त्यांचेच खरे! आपण खरेच घरच्या मंडळींचा विचार करत नाही. माझ्यापेक्षा ताई-अण्णांना जास्त टोमणे मिळत, खास करून पैसे मागितल्यावर, मदत करणारा हातात पैसे ठेवण्याआधी उपदेशमंत्र देत असे, 'आण्णा, ऐपत नाहीत पोरग्याले कसाले शिकाडओ, तेना बरोबरन्या पोरे कितला कमाई करी राहयनात, शिकीसन भराले तुनाफा पैसा त नाहीत' अशा उपदेशांना ताई-अण्णांकडे उत्तर नव्हते.

शेवटी संशोधन करता करता, मी माझा अभ्यास सुरू केला. दोन महिन्यांतच भारतीय सांख्यिकी सेवेची जाहिरात आली. मी इतर मित्रांबरोबर त्यासाठी अर्ज केला व सुदैवाने त्यांची परीक्षा पासही झालो. लेखी परीक्षेनंतर मौखिक परीक्षा झाली व माझे नाव लिस्टमध्ये लागले. अत्यानंद झाला, कारण पहिल्या प्रयत्नात क्लास व नोकरी मिळाली. घरच्यांनाही आनंद झाला; कारण एकदाची मला व्यवस्थित नोकरी मिळाली, जेणेकरून मला पाय ठेवायला जागा मिळाली. त्यामुळेच मी भारतीय प्रशासकीय सेवेच्या परीक्षेशी दोन हात करायला मोकळा झालो होतो. सर्वात महत्त्वाचे असे की, मी आता माझे गहाण ठेवलेले घर परत मिळवू शकणार होतो व त्याचबरोबर ताई-अण्णांचे इतर कर्जही फेडू शकणार होतो. शिवाय, हाताशी एक नोकरी असल्यामुळे मी आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होणार होतो. मला प्रतिभाच्या शिक्षणासाठी हातभार लावता येणार होता. मी पुष्कळदा वाचले होते, की आय.ए.एस. परीक्षा पास होणारे बरेचसे आधी कुठे ना कुठे नोकरीला होते. त्यामुळे मला इतरांच्या तुलनेत खूप गैरफायदा होणार होता.

माझ्या सरकारी नोकरी स्वीकारण्याच्या निर्णयाला विद्यापीठ विभागातील मित्रांकडून व प्राध्यापकांकडून खूपच थंड प्रतिसाद मिळाला, कारण विभागात क्वचितच कोणी सरकारी नोकरी पत्करत असे. त्यामुळे तेथे मिळालेल्या ज्ञानाचा व्यवस्थित उपयोग होत नाही असे कदाचित त्या सर्वांना वाटत असेल, परंतु मला ही नोकरी म्हणजे ध्येयाकडे घेऊन जाणारी सोनेरी शिडी वाटत होती. माझे गाईड राजर्षी सर व देशमुख मॅडम यांनी मात्र माझ्या निर्णयाला पाठिंबा दिलेला होता. मी जड अंत:करणाने पुणे सोडले. मला विद्यापीठाचा संख्याशास्त्र विभाग सोडून जावेसे वाटत नव्हते. तेथील प्राध्यापकांची विद्यार्थ्यांशी वागणूक, त्यांचे वर्तन, विभागात असलेले खेळीमेळीचे व कौटुंबिक वातावरण हवेहवेसे वाटत होते. विभागात पाय ठेवल्यावर माझा

आत्मविश्वास द्विगुणित झालेला होता. आपण कोणतीही गोष्ट साध्य करू शकतो असा विश्वास विभागाने माझ्यात भरून दिलेला होता. माझ्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक कंगोरे विभागामध्ये फुलले होते. माझ्या झेप घेऊ पाहणाऱ्या पंखांना बळ व प्रोत्साहन द्यायचे काम त्या कर्मभूमीवर झाले होते. इतर विभागांमध्ये असलेले जातीयतेचे राजकारण व कुंठित दृष्टिकोन संख्याशास्त्र विभागात पाहायला मिळत नसे. मला पुन्हा पोरके वाटू लागले. दिल्लीला नोकरी स्वीकारायला जाताना आपण अगदी वेगळ्या जगात जात आहोत असा भास मला होत होता.

नोकरी माझ्यासाठी महत्त्वाची नसली तरी माझ्या कुटुंबासाठी व माझ्या गावासाठी खूप महत्त्वाची होती. गावात साधारणत: धारणा होती, की शिकून काही उपयोग नसतो. पैसे आणि वशिला असल्याशिवाय नोकरी मिळूच शकत नाही. त्याला कारणही असेच होते, की गावात आजपर्यंत क्वचित कुणाला बिनपैशाची किंवा बिनवशिल्याची नोकरी मिळालेली होती. त्यामुळे नोकरी लागण्यासाठी पैसे भरणे गरजेचे असते हे सर्वसाधारण गणित होते. त्यामुळे मुलगा शिकलेला असला तर त्याच्या लग्नात हुंड्यातील काही भाग फी भरण्यासाठी काढून ठेवला जात असे किंवा हुंडा देताना किंवा हुंडा घेतानाच त्या बाबतीत बोलणे होत असे. त्याला कारण शिकून बसलेले रिकामटेकडेही होते. ते बऱ्याचदा आपल्या अपयशाचे व अकार्यक्षमतेचे खापर पैशांच्या व वशिला नसण्याच्या कारणावर फोडत असत. त्यामुळेच माझ्या बाबतीत गावकऱ्यांची धारणा होती, की दोन बिघ्यांतला एखादा बिघा माझ्या नोकरीसाठी व उरलेला बहिणीच्या लग्नात जाईल.

मी मात्र सर्व ग्रह खोटे ठरवण्यासाठी पेटून उठलेला होतो. मला खूप लवकर कळले होते की, खालच्या श्रेणीच्या नोकऱ्यांमध्ये जो बाजार चालतो तो प्राय: वरच्या स्तराच्या म्हणजे अधिकारी स्तराच्या नोकऱ्यांमध्ये चालत नाही. त्यामुळे आपल्याला आपले कर्तृत्व सिद्ध करायचे असेल तर वरच्या स्तराच्या नोकऱ्या शोधाव्या लागतील. हा शोध खूप लवकर सुरू झालेला होता. माझ्या निवडीबरोबर गावात आश्चर्याची एक लहर पसरली. तरुण मुलांमध्ये व गरीब शेतकऱ्यांच्या कुटुंबात चर्चा होऊ लागली, की आपण म्हणतो एवढे वातावरण वाईट नाही. अजूनही प्रामाणिकपणाबद्दल व मेहनतीला फळ आहे आणि म्हणून आपल्या मुलांनाही संधी उपलब्ध आहेत!

आणि वाटचाल सुरू झाली...!

गावाकडच्या विद्यार्थ्यांचे जगच वेगळे असते. जोपर्यंत तो वास्तवापासून लांब असतो तोपर्यंत स्वप्नात वावरत असतो. वास्तवाशी गाठ पडते तेव्हा त्याला मोठा धक्का बसतो. शिक्षण हे उद्धाराचे एकमात्र साधन आहे हे जाणून गरीब, अशिक्षित, सधन, सर्व आपापल्या मुलांना शिकवतात. मुलांना शाळेत पाठवले म्हणजे आपले उत्तरदायित्व संपले असा पालकांचा भ्रम असतो. म्हणून आईवडिलांची इच्छा मुलाला कमीत कमी दहावीपर्यंत तरी शिकवण्याची असते. गावातल्या शाळा बऱ्याचदा विद्यार्थ्यांसाठी नसून शिक्षकांसाठी चालतात. शिक्षक दिवसभर टपल्या मारणार, वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करणार. शिक्षकांचा स्वत:चा शिक्षणावर विश्वास नसतो आणि त्यांना शिकवण्याचीही आवड नसते. बऱ्याच शिक्षकांचे आपापले जोडव्यवसाय असतात. बहुधा, त्यांच्या गप्पा या व्यवसायाविषयी चाललेल्या असतात. त्या सर्वातून वेळ मिळालाच तर गावातील भानगडी, तंटे, राजकारण या करमणुकीच्या गोष्टी असतात. अशा एकंदर वातावरणात शिक्षणाचा श्रीगणेशा करणाऱ्या मुलांना काय शिक्षण दिले जाते व ते काय शिकतात हे पाहणे धक्कादायक ठरेल.

साठ-सत्तरच्या दशकात शिक्षणसंस्था सुरू करणे व चालवणे हे एक पवित्र कार्य मानले जायचे. शिक्षणाबद्दल आवड असणारा, जाण असणारा एखादा नेता आपल्या भागाच्या उद्धारासाठी शाळा सुरू करत असे. त्या काळातल्या नेत्यांनी उभ्या केलेल्या काही शिक्षणसंस्था ताठ मानेने अथकपणे विद्यादान करत आहेत. आता मात्र प्रत्येक पुढाऱ्याची स्वत:ची शिक्षणसंस्था आहे. सत्तेत असताना अशातशा प्रकारे शाळेला मंजुरी आणणे व पैसे भरून नोकर भरती करणे हा एक लघुउद्योग झालेला आहे. त्यासाठी कोणतेही गणित लागू होताना दिसत नाही. चुकून मंजुरी मिळण्याआधी सत्ता गेली तर मात्र या पुढाऱ्यांना, शाळेला व तेथील शिक्षकांना परत सत्ता यायची वाट बघावी लागते. अशा शाळांमध्ये हजारोंनी शिकणारी मुले निराधार असतातच, पण शिक्षकवर्गही विनापैशाने अनेक वर्षे चाकरी करत असतो. बऱ्याचदा, मान्यता मिळूनही, त्यांना पगार दिला जात नाही किंवा जास्त पैशांच्या बिलावर सही करून कमी पैसे हातात ठेवले जातात.

अशा सावळ्या गोंधळामुळे माध्यमिक शाळांची परिस्थिती खूपच वाईट झालेली आहे. बिनपगारी शिक्षकांचे आयुष्य वेठबिगार मजुरासारखे असते. बऱ्याचदा, शेतमजुरापेक्षाही कमी पैशांत त्यांना काम करावे लागते. त्या गोंधळात चुकून कुठेतरी एखादा शिक्षक किंवा मुख्याध्यापक आपल्या पेशाला जागतो व त्याचा परिणाम, तो शिकवत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये जाणवत राहतो.

प्राथमिक शाळेतून, विद्यार्थ्यांना या अशा शाळेत प्रवेश घ्यावा लागतो. जेथे शिक्षकच अज्ञानी तेथे विद्यार्थ्यांना ज्ञान कुठून मिळणार? पत्र्याच्या कोंदट खोल्या; प्रयोगशाळा, क्रीडांगण, वाचनालय यांचा अभाव - अशा वातावरणात आधीच अज्ञानी व मागे राहिलेल्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण होत नाही. स्पर्धेच्या युगात टिकाव धरण्यासाठी लागणाऱ्या क्षमतांचा विकास अशा वातावरणात कुंठित राहून जातो. शाळेत असणाऱ्या ज्ञानार्जनाचा अभाव भरून काढण्यासाठी शिकवण्यांचा गृहउद्योग चालू असतो. परंतु शेतात मजुरीने काम करणारी अशिक्षित आई आपल्या पोराला हे महागडे शिक्षण देऊ शकत नाही.

अशा प्रकारे ढकलत, ग्रामीण विद्यार्थ्यांचा शाळेचा प्रवास दहावी-बारावी किंवा पदवी परीक्षेला

येऊन अटकतो. काही कळायच्या आत त्या मुलांच्या हातून बऱ्याच संधी निघून गेलेल्या असतात आणि ज्या संधी समोर दिसतात त्या अप्राप्य वाटतात. मुलांचा प्रवास एका साच्यातून चालू असतो. साच्याबाहेर बघण्याचे धैर्य त्यांच्याकडून होत नाही. शाळा-महाविद्यालयांकडे बघितल्यावर जाणवते, की त्यांचा उद्देश एवढाच आहे, की प्रत्येक वर्षी मुलाला एका वर्गातून दुसऱ्या वर्गात पाठवणे व शेवटी सर्टिफिकेट त्यांच्या हातात टेकवणे!

आर्थिक उदारीकरणाच्या युगात जेव्हा प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा आहे, जेथे नोकरी मिळवण्यासाठी लागणाऱ्या विशिष्ट तांत्रिक ज्ञानाची, कौशल्याची गरज आहे तेथे गावाकडची मुले टिकाव धरू शकत नाहीत. काही अशिक्षित आईवडिलांच्या गैरसमजुती तर या स्तरावरच्या आहेत, की मुलगा शिकला म्हणजे त्याला आपोआप नोकरी मिळते. जेव्हा ही मुले पदवी घेतात तेव्हा त्यांना एकावर एक धक्के बसत जातात. त्यांना आपण एव्हाना बऱ्याच संधी घालवल्या असल्याची जाणीव होते. पुढे कोणी व्यवस्थित मार्गदर्शन करत नाही. दहा दिशांकडून दहा सल्ले मिळतात. आधीच मार्ग न शोधल्याने कोणत्या मार्गाने जावे याबद्दल अनिश्चितता, आत्मविश्वासाचा अभाव व साधनसामग्रीची कमतरता जाणवते.

'मेरिट' म्हणतात ती गुणवत्ताही महागड्या शिकवण्या व विशिष्ट शाळा यांच्या दावणीला बांधलेली असते. सामान्य गरीब, ग्रामीण विद्यार्थ्यांपासून ती शंभर मैल दूर असते. सुरुवातीला चांगले मार्क मिळाले तरच चांगल्या शाळा कॉलेजांमध्ये प्रवेश मिळतो. नाहीतर सुमार शाळेत किंवा प्राध्यापक कधी दर्शन न दाखवणाऱ्या कॉलेजध्ये प्रवेश घ्यावा लागतो. शैक्षणिक गुणवत्तेतील ही तफावत प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयापर्यंत दिसते. अशा निरुत्साही वातावरणात शिक्षण घेतलेल्या ग्रामीण विद्यार्थ्यांची अवस्था इंधन नसलेल्या खटारा गाडीसारखी होते.

ही मुले खूप लवकर एखाद्या गोष्टीकडे आकर्षित होतात. त्यांना स्पर्धा परीक्षा व त्याद्वारे मिळणारी मानाची पदे आकर्षित करतात. उदाहरणार्थ, पोलिस अधिकारी व्हायचे निश्चित झाल्यावर त्यांची वारी नाशिक किंवा पुण्यासारख्या ठिकाणी वळते. त्यांच्या या अज्ञानाचा फायदा क्लासवाले व पुस्तकवाले घेत असतात. सुंदर छपाईत एखाद्या पोलिस अधिकाऱ्याचा फोटो पुस्तकावर असला आणि पास झालेल्या विद्यार्थ्याचे मनोगत दर पाच पानगणिक असले म्हणजे त्या पुस्तकाचे व क्लासचे मार्केटिंग झाले म्हणून समजा. या आकर्षणाला विचारांची किंवा विवेकाची जोड नसते.

नियोजन व आत्मविश्वासाचा अभाव यांमुळे बरेच विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमध्ये अपयशी होतात. घरी बसून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची अवस्था जास्त दयनीय असते. त्यांना अभ्यासाबरोबर शेतीची इतर कामे करावी लागत असल्यामुळे त्यांचे पूर्ण लक्ष अभ्यासावर केंद्रित झालेले नसते. शिवाय, कोणते पुस्तक किती वाचावे याचा काही हिशोब नसतो. यामुळे त्याचा प्रयत्न अंधारात गोळ्या मारल्यासारखा असतो. परीक्षा देण्याआधीच, तो स्वप्नात दंग होतो व त्याचा बराच वेळ स्वप्नरंजनात, स्वत:ला अधिकारी म्हणून बघण्यात जातो. शिवाय गावात एकदा कळले की, अमुक व्यक्ती या प्रकारची परीक्षा देत आहे की, अशा वेळी, सर्व प्रकारच्या लोकांकडून त्याला वेगवेगळ्या प्रतिक्रियांना सामोरे जावे लागते. कुणी त्याच्याकडे उगाच बोटे दाखवून दात विचकवतात तर कुणी त्याला पास होण्याआधीच 'काय तहसिलदार' म्हणून चिडवतात. हे ताशेरे बऱ्याच वेळेला नकोसे होतात, परंतु त्याच्याकडे मार्ग नसतो. तो पूर्वपरीक्षा पास झाला व नंतर

अयशस्वी झाला तर त्याची परिस्थिती अजून बिकट होते, कारण तो काय पास झाला व काय नापास झाला हे घरच्या व आजूबाजूच्या मंडळींना समजावणे म्हणजे एक दिव्य असते. मग सहज वक्तव्य येतात की, 'तुझे काम कशाला होईल? तेथे तर भरपूर पैसे चालतात.' मग 'माझ्या ओळखीतला अमका पैसा देऊन पास झाला, तमका पास झाला' म्हणून ग्वाही दिली जाते. यासारख्या प्रश्नांना व वक्तव्यांना बिचाऱ्याकडे उत्तरे नसतात. बऱ्याचदा, तो स्वत:ही अशा अफवांना बळी पडतो.

अशा अर्धवट अभ्यासाचे फलित एकच निघते की, खूप वाऱ्या केल्यानंतरही ते विद्यार्थी अयशस्वी ठरतात. एव्हाना, इतर संधी त्यांच्या हातून निघून गेलेल्या असतात. मध्यंतरी बहुधा लग्न झालेले असते व वयही वाढलेले असते. अशा परिस्थितीत नवीन काही उपक्रम हाती घेण्याचे धाडस व आत्मविश्वास त्यांच्यात नसतो. बऱ्याचदा, परीक्षेच्या नावावर लग्न होऊन चांगला हुंडाही मिळालेला असतो!

पुणे-नाशिकचा रस्ता धरलेल्या मुलांची परिस्थिती त्या मानाने चांगली असते. त्यांना कमीत कमी स्वत:च्या क्षमता अजमावण्याची संधी तरी मिळते. शहरामध्ये येणाऱ्या प्रत्येकाची आर्थिक क्षमता सारखी नसते. बरेच जण अल्पभूधारक कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्याची मुले असतात. घरून पाहिजे तेवढे आर्थिक व मानसिक पाठबळ नसते. त्यामुळे ते कोंदट खोलीत दाटीवाटीने किंवा शिकत असलेल्या ओळखीच्या विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील खोलीत लाचारी पत्करून राहतात. जेवणाची धड व्यवस्था नसते. त्यांना आंघोळीपासून सर्व आबाळ सहन करावी लागते. आर्थिक अडचणीमुळे पाहिजेत ती पुस्तके ते वेळेवर घेऊ शकत नाहीत. परंतु अधूनमधून त्यांच्यापैकी पास होणारा मुलगा त्यांच्यासाठी आशेचा किरण ठरतो. आपणही त्याच्यासारखे कधीतरी या नरकातून बाहेर पडू या एकाच अंधुक आशेवर ते जिवंत असतात.

या गजबजपुरीमध्ये वेळीअवेळी येणाऱ्या आयोगाच्या जाहिराती, रद्द होणाऱ्या परीक्षा, भ्रष्टाचाराचे आरोप, कोर्ट केसेस यांमुळे लांबणाऱ्या परीक्षा त्यांचा अंत बघत असतात. पेपर लिक, वर्षागणिक पेपरात असलेली तफावत विद्यार्थ्यांना हैराण करत असते. परंतु एकदा नदीत उतरल्यावर पर्याय नसतो. नदी पार करणे भाग असते, कारण एव्हाना आयुष्याची मौल्यवान वर्षे परीक्षेसाठी कामी आलेली असतात. परीक्षेचा विचार करणे व परीक्षा देणे ही एक नशा असते. ती सहसा सुटत नाही. त्याला शेवटी दोन पर्याय असतात. नशेत एकतर परीक्षार्थी यशस्वी होतो किंवा त्याचे वय मर्यादेबाहेर जाते आणि त्याचे प्रयत्न संपतात.

मी पुणे विद्यापीठात असताना लोकसेवा आयोगाच्या परीक्षा देणाऱ्या मुलांचा एक मोठा समुदाय विद्यापीठ आवारात वावरत असलेला पाहिला. विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय त्या उमेदवारांनी व्यापलेले असे. दिवसभर ग्रंथालयात अभ्यास करायचा, रात्री उशिरा वसतिगृहात ओळखीच्या विद्यार्थ्याच्या खोलीत लाचारी पत्करत अंग टाकायचे आणि परत सकाळी ग्रंथालयाची वाट धरायची असा त्यांचा दिनक्रम. ते नेहमी भीतीत वावरत असतात. वसतिगृहात तपासणी करायला येणाऱ्यांची भीती व ग्रंथालयात ओळखपत्रे मागणाऱ्यांची भीती. त्याच्यातले एखादे प्रकरण उद्भवले म्हणजे त्यांचा दिवस वाया गेला म्हणून समजा. लोकसेवा आयोगासाठी अभ्यास करणारा प्रत्येक महाभाग निष्ठेने अभ्यास करत असतो असेही नाही. काही मंडळी बेंचवर पुस्तके रचून, आपली जागा सांभाळून बाहेर गप्पा मारत असलेली दिसतात. काही अर्ध्या अर्ध्या तासाने चहाला जाणार, खूप वाचत आहोत असा आव आणणार. त्यातल्या त्यात पास झालेल्या

उमेदवाराचा रुबाब व वागणे बघण्यासारखे असते. स्वारी आकर्षक कपड्यांमध्ये, सर्वांना दिसेल व ऐकू येईल या उद्देशाने चारचौघांना मार्गदर्शन करत असते. असे विद्यार्थी उभे राहून काही बोलत असले की दहा-वीस जणांचा घोळका सहज त्याच्या आजूबाजूला अचंब्याने उभा राहत असतो. मग तो काय खातो, काय पितो येथपासून चर्चा! मीही त्या गर्दीत बऱ्याचदा सामील होत असे.

काही महाभागांचा तेथे येण्याचा उद्देश वेगळा असे. एक गट असाही होता की, आईवडिलांची इच्छा म्हणून परीक्षा देणारा. त्यांचा दिनक्रम आरामात असायचा. महाशय पुण्याच्या रस्त्यांवरील सौंदर्य मोटारसायकलवरून न्याहाळायचे व वेळ मिळालाच तर 'जयकर'ची वाट धरायचे. साधारणत: मन लावून अभ्यास करणारे व परीक्षेसाठी जीव ओतून देणारे असे खूप कमी, बोटावर मोजण्याइतपत विद्यार्थी होते. उरलेली मंडळी त्यांच्या आजूबाजूला फिरत. ते सांगतील ते वाचायचे, ते खातील ते व तेव्हा खायचे आणि ते म्हणतील त्याला हो म्हणत जायचे. परीक्षेचा निकाल लागल्यावर मात्र दुधातले दूध व पाणी वेगळे व्हायचे. मधूनच, कोणीतरी कोपऱ्यात प्रामाणिकपणे अभ्यास करणारा व कुणाच्या ध्यानीमनी नसणारा मुलगा पास झालेला असायचा व गुडघ्याला बाशिंग बांधलेले इतर, लहान तोंड करून मातम करत बसलेले दिसायचे. निकालानंतर काही दिवस 'जयकर' आवारात शोकाकुल वातावरण असे. मग पास झालेला आपल्या किती जवळचा आहे, आपण त्याच्या किती संपर्कात आहोत आणि त्याला आपण किती मदत केलेली आहे याची चर्चा सुरू झालेली असे. आपण कुठे मागे पडलो हे न बघता यशस्वी विद्यार्थ्यांच्या नोटस्, पुस्तके याबद्दल चर्चा होत असे.

जयकर ग्रंथालयाविषयी आजही कोणता संदर्भ निघाल्यास त्याच्याशी संबधित बऱ्याच गोष्टींना उजाळा मिळतो. पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय विद्यापीठ आवारातील एक महत्वाची वास्तू. ग्रंथालयाला लागून असलेले दोन अभ्यासकक्ष विद्यार्थ्यांनी नेहमी गजबजलेले असत. या अभ्यासकक्षात विद्यापीठातील रेग्युलर विद्यार्थ्यांपेक्षा स्पर्धा परीक्षेसाठी अभ्यास करणाऱ्यांचीच गर्दी जास्त होई. सहसा सकाळी लवकर येऊन उमेदवार आपले टेबल सांभाळत व त्यावर अभ्यासाची सामग्री रचून ठेवत. बऱ्याच जणांचे टेबल ठरलेले होते. त्यावर सहसा कोणी बसत नसे. काही जण दिवसभर टेबलाला चिपकलेले असत, तर काहींची फक्त पुस्तकं त्यांचे टेबल सांभाळीत असत. प्रत्यक्ष अभ्यासकक्ष खूपच शांत राहत असे पण बाहेर नेहमी टोळक्या-टोळक्यांनी गप्पा रंगलेल्या असत.

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्यांच्या व्यक्तिगत समस्यांचे वेगवेगळे किस्से ऐकायला मिळत. मराठवाड्यातील एका लहान गावातील एक तरुण माझ्या परिचयाचा होता. तो चार वर्षांपासून जयकर ग्रंथालयात अभ्यास करीत होता. लहानपणीच वडील वारलेले, मोठ्या बहिणीचे लग्न झालेले, अशा अवस्थेत म्हाताऱ्या आईचा तो एकच आधार होता. आई कोरडवाहू शेतात राबून त्याला थोडेफार पैसे पाठवत होती. तोही जीवतोड मेहनत करीत होता. पण प्रत्येक वर्षी यश त्याला हुलकावणी देत होते. मृदू स्वभावाच्या त्या लढवय्याला बघून कधीकधी त्याच्याबद्दल खूप चिंता वाटे.

समीर म्हणून एक माझ्या परिचयाचा व माझ्याच होस्टेलमध्ये पॅरासाईट म्हणून राहणाऱ्या एका मित्राची कथाही विचार करायला लावणारी होती. वडील वारल्यानंतर मोठ्या भावाने याचे शिक्षण केले. इंजिनिअर झालेल्या समीरच्या डोक्यात डिवाय.एस.पी. होण्याचे खूळ भरले होते. तीनदा परीक्षा देऊन व दोनदा मुलाखत देऊन थोड्यासाठी त्याची बस हुकत होती. त्यांच्या

घरात भांडण सुरू झालं. वहिनी त्याला पैसे पुरवण्याच्या सक्त विरोधात होती. बऱ्याचदा तो चिंतेने डोके धरून बसलेला असे, अशा वेळी त्याला समजावणे दुरापास्त होई.

या उलट उदयचा किस्सा वेगळा होता. देखण्या व तितक्याच नम्र असलेल्या उदयला मीनाक्षीने प्रपोज केले होते. उदयने मात्र नुकतीच स्पर्धा परीक्षेच्या रिंगणात उडी मारली होती व ही कुस्ती संपायला किती वेळ लागेल माहीत नव्हते. त्यालाही ती आवडत होती पण तो कोणताच निर्णय घेऊ शकत नव्हता. अभ्यासावर लक्ष केंद्रित करून ध्येय गाठणे तेवढेच महत्वाचे होते. घरातील अडचणींमुळे त्याला थोडे असुरक्षित वाटत होते. काही दिवस सर्वांच्या चर्चेचा विषय झाल्यावर व ओपन कॅन्टिनचे लठ्ठ बिल भरल्यावर दोघे एकमेकांपासून हळूहळू दूर झाले. पुढे मीनाक्षीने एका सॉफ्टवेअर इंजिनिअरशी लग्न केले. नंतर एका वर्षाने उदयलाही चांगली पोस्ट मिळाली. पण त्या दोघांचा विचार मनात आल्यावर थोडी रुखरुख निश्चित वाटून जाते.

माधुरीचा किस्साही सर्वांना फावल्या वेळात गप्पा मारण्यासाठी खूप दिवसांपर्यंत खुराक देऊन गेला. माधुरी एक सुंदर, स्मार्ट कोकणी मुलगी. पहिल्या नजरेत कुणालाही आवडावी अशी व तिच्या मृदू बोलण्याने बरीच मुले तिच्याभोवती घुटमळत. त्यामुळे तिला कधी पुस्तक वा नोट्सची काळजी नसे. पाहिजे तेव्हा व पाहिजे त्यापासून ती ते मिळवत असे. पुढे दीपक नावाचा स्मार्ट मुलगा तिच्या गळाला लागला. खूपदा ती दीपकबरोबर फ़िरताना दिसत असे. ते एकाच टेबलावर बसून अभ्यास करीत; बरोबरच चहा, जेवण घेत. आता दोघे लग्न करणार असेच सर्वांना वाटे. पुढे मात्र दोघांच्या कहाणीने नाट्यमय वळण घेतले. एम.पी.एस.सी. चा निकाल जाहीर झाला. बिचाऱ्या दीपकला यशाने हुलकावणी दिली. माधुरीचा पहिलाच प्रयत्न असल्यामुळे तिची परीक्षेकडून फारशी अपेक्षा नव्हती. निकालानंतर दीपक एकटाच जयकरमध्ये अभ्यास करताना दिसू लागला. नंतर कळाले की माधुरीने दीपकला रामराम ठोकला होता व परीक्षेतच पास झालेल्या एका उपजिल्हाधिकाऱ्याच्या गळ्यात वरमाला घातली होती. पुणे सोडल्यावर दीपकही यु.पी.एस.सी. मध्ये पास झाल्याची माहिती मिळाली. पण आजही माधुरीने केलेल्या कमालीचा नेहमी अचंबा वाटत राहिला.

परीक्षा देणाऱ्या व प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दिनचर्येकडे व मानसिक ओढाताणीकडे बारकाईने बघितल्यास त्यांच्या एकंदर कठोर कष्टांची जाणीव होते. परीक्षेचा आवाका प्रचंड आहे. इतिहासापासून संख्याशास्त्रापर्यंत अनेक विषयांचे ज्ञान अपेक्षित असते. प्रत्येक वर्षी नवीन परीक्षा. पेपर तयार करणारे वेगळे, तर तपासणारे वेगळे. एकावर्षी ज्या पद्धतीने अभ्यास केलेला आहे व जेवढे गुण संपादन केलेले आहेत तशाच पद्धतीने पुढच्या वर्षी अभ्यास केल्यावर तेवढेच गुण मिळतील याची शाश्वती नाही. प्रत्येक वर्षी काही विषयांना सरासरीपेक्षा जास्त गुण मिळालेले असतात. त्याचाही परिणाम परीक्षार्थीचे भविष्य ठरवण्यावर होतो. शेवटी, एवढ्या दिव्यानंतर जर उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरला तर त्याला संघ लोकसेवा आयोगाच्या विभिन्न पॅनेलना सामोरे जावे लागले. या पॅनेलचे उमेदवाराची क्षमता तपासण्याचे ठोकताळे जरी सारखे असले तरी त्यांच्यात प्रत्यक्षात तफावत असते. एकच उमेदवार दोन पॅनेलसमोर दोन वेगवेगळ्या वर्षी गेला तरी त्याला मिळणाऱ्या गुणांमध्ये तफावत असते. बऱ्याचदा, वैकल्पिक विषयाच्या निवडीवर परीक्षार्थीचे भवितव्य अवलंबून असते. हे सर्व घटक परीक्षार्थीचे संपूर्ण भविष्य ठरवत नसले तरी त्यांचा परिणाम ढोबळमानाने परीक्षार्थींच्या भवितव्यावर झालेला बघता येतो.

या परीक्षेशी संबंधित कारणाबरोबर इतर कारणेही परीक्षेच्या एकंदर निकालावर परिणाम करतात. या परीक्षा विशिष्ट शहरांच्या मक्तेदारी झालेल्या आहेत. स्पर्धा परीक्षेच्या क्लासेसचा मोठा उद्योग चालू आहे. हजारो रुपये फी आकारून क्लासवाले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन पुरवण्याचे दुकान मांडून बसलेले असतात. क्लासवाल्यांकडे हजारो विद्यार्थी, हजारो रुपये खर्चून हजेरी लावत असतात. या जाहिरातींचा वर्षाव होत असल्यामुळे तो क्लासला जायच्या मोहाला बळी पडतो.

खरेच, यशस्वी होण्यासाठी कोचिंग क्लासची गरज असते का? माझे उत्तर 'हो' आहे आणि 'नाही'ही. दिवसेंदिवस रिक्त जागांची संख्या कमी होत आहे व परीक्षार्थींच्या संख्येत वाढ होत आहे. यामुळे स्पर्धा जीवघेणी होत आहे. यामुळे पास होण्याची प्रक्रिया थोडी लांब झालेली आहे. यामुळेच कमी वेळात अभ्यास करण्याची गरज निर्माण झालेली आहे. अशा वेळी क्लासमुळे कमी वेळात, कॅप्सुल फॉर्ममध्ये, एखाद्या विषयाची नेमकी माहिती व अभ्याससाहित्य उपलब्ध होते. शिवाय, परीक्षा देणाऱ्या इतर उमेदवारांचे सान्निध्य लाभल्यामुळे आपण किती पाण्यात आहोत हेही कळते. बरीच महागडी पुस्तके आपण विकत घेऊ शकत नाही. ती मिळूनमिसळून वाचायला मिळतात. देशाच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या व परीक्षेबद्दल फारशी माहिती नसलेल्या मुलांसाठी क्लासची भूमिका महत्त्वाची ठरते.

सर्व क्लास उत्तम दर्जाचे मार्गदर्शन करतात असेही नाही. दिल्ली, पुणे, मुंबई, पाटणा या ठिकाणी असंख्य क्लासवाले फक्त पैसा कमावण्याच्या उद्देशाने मुलांना आकर्षित करून त्यांचे आर्थिक व मानसिक शोषण करत असतात. दिल्ली-मुंबईला राहणे म्हणजे प्रचंड खर्च आला. अशा वेळी सामान्य विद्यार्थी बुचकळ्यात पडतो. बऱ्याचदा, क्लास केला म्हणजे आपण पास होणार असा त्याचा समज होतो. त्यामुळे कसेतरी पैसे जमवून तो क्लासला दाखल होतो, परंतु त्यानंतर जेव्हा त्याच्या पदरी अपयश येते तेव्हा त्याचे भविष्य उद्ध्वस्त झालेले असते!

स्पर्धा परीक्षेच्या बाजारात क्लासवाल्यांची भूमिका खूप महत्वाची असते. स्पर्धा परीक्षांची ओळख आजकाल सर्वांना क्लासेसच्या माध्यमातूनच होते. भडक जाहिराती, अवास्तव आश्वासने, यशस्वी उमेदवारांची खोटी आकडेवारी यामुळे नवखा उमेदवार पुरता भांबावून जातो. यामुळे कोणता क्लास लावावा हा प्रश्न प्रत्येक नवीन उमेदवाराला भेडसावतो. मार्केटमध्ये असलेल्या जवळजवळ प्रत्येक क्लासचे प्रवर्तक स्पर्धा परीक्षेच्या रिंगणात धूळ चाखलेले असतात. यापलीकडे क्लासचा फायदा होत नाही असे नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अभ्यास-साहित्य क्लासमुळे आयते उपलब्ध होते. याशिवाय अभ्यास करणाऱ्या इतरांच्या क्षमतेचा अंदाज येतो. परीक्षेचे इतर बारकावे कळतात. परीक्षेचा पसारा खूप लांबलचक असल्यामुळे त्या संपूर्ण काळात स्वत:चा आत्मविश्वास टिकवणे फार महत्वाचे असते. अशावेळेस क्लासच्या संपर्कातून तयार होणाऱ्या अभ्यासग्रुपचा फायदा होतो. यामुळे एकमेकांच्या संपर्कात राहून परीक्षेच्या वातावरणात तल्लीन होण्यास मदत होते.

परीक्षेचा निकाल लागल्यावर क्लासवाल्यांची लगबग सुरू होते. मेरिटमध्ये येणाऱ्या प्रत्येकावर आपला अधिकार सांगण्याची स्पर्धा सुरू होते. उमेदवार मग त्यांच्याकडे केवळ चौकशीसाठीही आलेला असला तरी त्याला आपला उमेदवार सांगण्यास क्लासवाले कमी करत नाहीत. यानंतर मोठमोठ्या जाहिराती दिल्या जातात. प्रत्येक क्लास यशस्वी उमेदवारांमध्ये आपले उमेदवार जास्त दाखवण्याचा प्रयत्न करतात. असेही ऐकण्यात आहे की काही उमेदवार व

क्लासवाल्यांमध्ये सौदेबाजी होऊन काही रकमेच्या मोबदल्यात उमेदवार आपले नाव वापरण्याची परवानगी देतात. वास्तवात परीक्षेचे स्वरूप व एकंदरीत आवाका बघितल्यास कुणीही फक्तक्लासच्या जोरावर यशस्वी होऊ शकत नाही.

दिवसेंदिवस क्लासेसच्या फी मध्ये कमालीची वाढ होत आहे. त्यामुळे एखाद्या सामान्य घरातील मुलाला मुंबई, पुण्याला किंवा दिल्लीला जाऊन क्लासला प्रवेश घेणे खूप कठीण झाले आहे.

खरे तर, देशाच्या कानाकोपऱ्यात मार्गदर्शक वर्गांची खूप गरज आहे. अशा संस्था - ज्या तरुण मुलामुलींना स्पर्धापरीक्षेबरोबर इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांबद्दल, व्यक्तिमत्त्व विकासाबद्दल, इतर विविध क्षेत्रांतील संस्थांबद्दल शिष्यवृत्त्या व अर्थसाहाय्याबद्दल माहिती देऊ शकतील - अशा संस्था उभारणे हे लोकांच्या कल्याणाच्या व प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे; परंतु दुर्दैवाने अशा संस्था फक्त मोठ्या शहरांमध्ये स्थापन झालेल्या आहेत व त्यांतील बऱ्याच फक्त पैसा कमावण्याच्या उद्देशाने कार्यरत आहेत.

प्रत्येक तरुण-तरुणीला शाळा-महाविद्यालयामध्ये असल्यापासून थोडे चौकस राहण्याची गरज आहे. आपल्याला काय करायचे आहे व कसे करायचे आहे हे निश्चित झाल्यावर जर त्यासाठी आपण हवी ती पूर्वतयारी वेळोवेळी केली तर आपल्याला बाहेरच्या कोणत्याही कृत्रिम टॉनिकची (येथे क्लासेसची) गरज भासणार नाही. विशाल सोळंखी, किरण गीते, अमित तेलंग या महाराष्ट्रीय तरुणांनी व वेगवेगळ्या परीक्षा देणाऱ्या इतर हजारो तरुणांनी हे वेळोवेळी सिद्ध केले आहे.

मी सुरुवातीला खूप गोंधळलेला होतो. संघ लोकसेवा आयोगाची परीक्षा द्यायची म्हणजे नेमके काय करावे लागेल याविषयी मला काही थांगपत्ता नव्हता. बऱ्याचदा मनात स्वत:विषयी शंका यायची. कारण कुठूनतरी ऐकलेले असायचे की आय.ए.एस. व्हायला खूप ज्ञान व बुद्धिमत्ता लागते. एकंदरीत जे चांगल्या शाळा-कॉलेजांमध्ये शिकले आहेत, मेरिटमध्ये आलेले आहेत तेच या परीक्षा पास होतात. त्यांच्या मुलाखती वाचून बऱ्याचदा मनात न्यूनगंड निर्माण होई. आपल्यामध्ये खरेच तेवढी क्षमता आहे का? आपण मेरिटमध्ये आलेलो नाही मग आपण जे स्वप्न बघत आहोत ते आपल्या आवाक्याबाहेरील तर नाही ना? अशा अनेक शंका-कुशंका मनात यायच्या.

परंतु पुस्तकांमध्ये वाचलेले, मोठ्यांनी सांगितलेले असे अनेक दाखले माझ्या डोळ्यांसमोर यायचे. त्यावरून एकंदर वाटायचे की, माणसाने एखादी गोष्ट साध्य करायची ठरवली आणि अथक परिश्रमाने तिचा पाठपुरावा केला तर त्याला निश्चित यश मिळते. अनेक लहानमोठ्या घटनांनी माझ्या मानसिक तयारीला हातभार लागला. त्यात सिनेमांमधील दाखले, खेळाच्या क्षेत्रातील दाखले व स्पर्धा परीक्षा पास झालेल्या माझ्यासारख्या सामाजिक-आर्थिक परिवेशामधून येणाऱ्या विद्यार्थ्यांपासून प्रेरणा मिळत राहिली.

मी पुण्याला शिकत असताना आनंद पाटील म्हणून एका खेडूत विद्यार्थ्याची आय.ए.एस.साठी निवड झालेली होती. कला शाखेतून शिकलेल्या त्या विद्यार्थ्याच्या एकंदर पार्श्वभूमीकडे बघितल्यावर त्याच्यात व माझ्यात खूप फरक नाही याची जाणीव झाली.

विद्यापीठ आवारात त्याला भेटल्यावर, त्याने लिहिलेले काही कागद बघितल्यावर खात्री झाली, की आय.ए.एस. होण्यासाठी काही वेगळ्या ग्रहावरून किंवा तोंडात सोन्याचा चमचा घेऊन

जन्माला यावे लागत नाही. सुरुवातीला, पास झालेल्या प्रत्येक मुलाची तुलना मी स्वत:शी करत असे. त्याने मिळवलेले गुण, त्याचे वय, त्याच्या पदव्या, त्याने केलेले प्रयत्न, त्याची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी इत्यादींची तुलना मी करत असे. मला स्वत:ची तुलना यशस्वी हुशार विद्यार्थ्यांबरोबर करण्याची सवय होती. मला त्यात संकोच वाटत नसे. पुढे पांडुरंग पोळे, विजय पिंगळे, नीळकंठ शेळके, राजेश स्वामी इत्यादी सर्वसामान्य परिस्थितीतील विद्यार्थी यशस्वी झालेले पाहून मलाही हुरूप आला.

सुरुवातीच्या या भावनिक गोंधळानंतर एक गोष्ट स्पष्ट झाली, की आय.ए.एस. व्हायचे असेल, जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर फक्त स्वत:चे प्रामाणिक प्रयत्न, कष्ट, स्वत:वरील विश्वास यांची गरज आहे. त्यासाठी विशिष्ट पार्श्वभूमी लागते असे नाही. फक्त स्वत:चे प्रयत्न आणि प्रयत्नच आपल्याला पुढे नेऊ शकतात! परीक्षार्थी कोणत्या सामाजिक-आर्थिक परिवेशातून आलेला आहे, त्याने काय समस्यांना तोंड दिलेले आहे या गोष्टींचा परीक्षेत पास होण्यावर काही परिणाम होत नाही. त्यामुळे उगाच रडत बसून लोकांच्या सहानुभूतीची अपेक्षा करण्यात काहीच अर्थ नाही. त्यापेक्षा अथक परिश्रम केल्यावर जे मिळेल ते मिळेल अशी माझी धारणा झाली. शिवाय, आपण शून्यापासून आलेलो आहोत, तेव्हा परत शून्याकडे जावे लागले तरी आपले काही खूप नुकसान होणार नाही अशी मनाची समजूत घातली.

जीवनातील माझ्या अनुभवामुळे व आकलनामुळे काही गोष्टी मनात ठाम झाल्या होत्या. माझा देवावरील, भाग्यावरील विश्वास नाहीसा झाला होता. माझ्या मते, देव-परमात्मा वा विशिष्ट अद्भुत शक्ती असे काही नसून सर्व काही माणसाच्या कर्मावर अवलंबून आहे. आपण जे कर्म करत असतो त्याचे फळ आपल्याला मिळत असते. त्यामुळे आपण यशस्वी-अयशस्वी झालोच तर ते आपल्या भाग्यामुळे किंवा देवाच्या कृपेने होत नसून आपल्या प्रयत्नांमुळे होत असते. या प्रकारचा विचार मनात स्थिर व्हायला थोडा वेळ लागला, कारण घरात धार्मिक पार्श्वभूमी असल्यामुळे व मी स्वत: लहानपणी धार्मिक असल्यामुळे मनावरील पगडा जायला व एक निरीश्वरवादी प्रवृत्तीचा नास्तिक दृष्टिकोन तयार व्हायला थोडा वेळ लागला. मला मूर्तिपूजेमध्ये अगर अस्तित्वात नसलेल्या देवदेवतांची आराधना करण्यात स्वारस्य वाटत नसे. माझ्या मते, भगवान म्हणजे चांगुलपणाचे प्रतीक. अनंत काळापासून जे अलौकिक, अद्भुत आहे ते माणसाच्या आवाक्याबाहेरील आहे. त्याच्याकडे माणूस आदराने बघत आला आहे. त्याचप्रमाणे माणसांमध्ये आढळणाऱ्या काही अद्भुत गुणांबद्दलही त्याची त्याच प्रकारची भावना आहे. हे सर्व गुण एकत्रित करून व त्यांना काही एक नाव देऊन मनुष्य अनंतकाळापासून पूजत आला आहे. त्यामुळे माणसामध्ये जेव्हा चांगुलपणाचे हे गुण असतात तेव्हा तो देवाचेच प्रतिनिधित्व करीत असतो. या सर्व विचारांमुळे मला देवासाठी तासन्तास घालवण्यापेक्षा उपेक्षितांच्या समस्या, अडचणी सोडवल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर उतरलेल्या समाधानामध्येच देवाचा अंश असल्याचा भास होत असे. माणसांच्या सेवेमध्ये देव सांगणाऱ्या विवेकानंदांच्या मताशी मी सहमत होतो.

अशा वैचारिक पार्श्वभूमीमुळे अपयश क्वचितच मला माझ्या ध्येयापासून विचलित करत राहिले. मी कधीही माझ्या अपयशाचे खापर दुसऱ्यावर फोडले नाही. माझा स्वत:बद्दल टीकात्मक दृष्टिकोन राहिला. त्यामुळे मी माझ्या सामान्य क्षमता व्यवस्थित कारणी लावू शकलो आणि स्वत:च्या उणिवा योग्य पद्धतीने भरून काढू शकलो. संघ लोकसेवा आयोगाची परीक्षा देतानाही मी वारंवार अपयशी झालो, परंतु प्रत्येक वेळी मला स्वत:च्या अभ्यासपद्धतीत, तयारीत उणिवा

जाणवल्या. मी त्याबाहेरील गोष्टींकडे दुर्लक्ष केले, कारण त्या माझ्या आवाक्याबाहेर होत्या.

संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी माझा प्रवास पुण्याहून सुरू झाला. विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात अभ्यास करणाऱ्या मुलांकडून मला बऱ्याच गोष्टी कळल्या. त्या वेळेस विद्यापीठ आवारात प्रवीण चव्हाण नामक, परीक्षेचा माजी विद्यार्थी खेर वाङ्मय भवनाच्या रिकाम्या वर्गांमध्ये मार्गदर्शन वर्ग चालवत असे. मी जसा वेळ मिळेल तसा त्या वर्गामध्ये जाऊन बसू लागलो. तेथील मुलांची तयारी बघून, त्यांच्याकडील अभ्यासाची सामग्री बघून मला कसेसे होत असे. मी नवखा असल्यामुळे मला सहसा कोणी काही देत नसे. त्या वेळेस माझे एम.एस्सी. होऊन मी नुकतेच जे.आर.एफ. (Junior Research Fellowship) घेऊन एम.फिल.ला दाखल झालो होतो. इतर मुलांना अभ्यास करताना बघून माझी घुसमट होत असे, कारण मला पुरेसा वेळ मिळत नसे. माझे मार्गदर्शक राजर्षीसर माझी द्विधा मनस्थिती जाणत असूनही माझ्यासाठी फार काही करू शकत नव्हते.

आम्ही संशोधन करणारी मंडळी जेव्हा मासिक वेतन मिळण्यासाठी लागणाऱ्या पत्रकावर सही करण्यासाठी आमच्या मार्गदर्शकांकडे जात असू तेव्हा खूप मजा येई. कारण कामात काही प्रगती न झाल्यास मार्गदर्शक सही देत नसत. त्यामुळे महिना समाप्तीच्या पाच दिवस आधी आम्ही कामाला लागत असू व काहीतरी वाचून मार्गदर्शकांपुढे ठेवत असू. त्यांचा मूड बघून हळूच आम्ही सह्या घेत असू. त्या दरम्यान अभ्यासाबरोबर आमचे सर्व उद्योग चालत असत. हसण्याखिदळण्यात व मिस्किलपणे मुलामुलींवर व प्राध्यापकांवर कॉमेंट करण्यात आमचा बराचसा वेळ जात असे. उरलेल्या वेळात पुस्तकाची आवराआवर, झोप व वेळ मिळालाच तर विभागात आयोजित व्याख्यानाला आम्ही बसत असू. विभागात घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा आम्ही मनमुराद आनंद लुटत असू. आम्हा सर्वांना तेव्हा नवीन आलेल्या विद्यार्थ्यांना शिकवावे लागे व त्यांचे मार्गदर्शक म्हणून काम करावे लागे. त्यामुळे नवीन आलेल्यांमध्ये ‘कोण कशी आहे?’ याविषयी चर्चा करण्यात आमचा वेळ जात असे. तासातासाला आम्ही चहाच्या निमित्ताने ओपन कँटीनला बसत असू व संशोधन सोडून, पृथ्वीवरील सर्व गोष्टींवर चर्चा करत असू. मी आय.ए.एस.ची परीक्षा देणार आहे व सध्या मार्गदर्शक वर्गात दाखल झालेलो आहे हे माहीत झाल्यावर मंडळी बऱ्याचदा त्यावरून माझी खिल्ली उडवत. त्यांच्यापैकी मिस्किलपणे बोलणारा जलिल व शब्दाशब्दाला खोड्या करणारा व सर्व प्राध्यापकांची नक्कल करणारा संभाजी शेडाळे अफलातून होते. अशातही मी आतील तांडवामुळे, बऱ्याचदा काही करता येत नाही व आपली वाटचाल योग्य दिशेला होत नाही म्हणून, अस्वस्थ राहत असे.

असेच तीन महिने कुठल्या कुठे निघून गेले, काही कळलेच नाही. मी दिलेल्या भारतीय सांख्यिकी सेवेच्या (ISS) परीक्षेत उत्तीर्ण झालो व माझी मुलाखतीसाठी निवड झाली. मला मुलाखतीसाठी लोकसेवा आयोगामध्ये दिल्लीला जावे लागणार होते. कधी विचारही केलेला नव्हता, की आपल्याला कधीतरी दिल्ली बघायला मिळेल! माझ्याबरोबर माझ्या एका वरिष्ठाचीही मुलाखतीसाठी निवड झालेली होती, त्यामुळे माझी काळजी कमी झाली. नंतर त्याने तिकिट, राहणे याविषयी व्यवस्था केली. मी आयुष्यात पहिल्यांदा आरक्षित डब्यातून प्रवास केला. त्यापूर्वी तेवढी ऐपत नव्हती. आरक्षित व अनारक्षित यांमधील फरकसुद्धा माझ्यासाठी महत्त्वाचा असायचा. बऱ्याचदा, सैन्यदलाच्या मुलाखतींना जाताना ते आरक्षणाचे पैसे देत असूनही मला तिकिट काढायला पुरेसे पैसे नसल्यामुळे अनारक्षित डब्यातून जाणे भाग पडत असे. एकदा बंगलोरहून

मुलाखत देऊन मी हैदराबादमार्गे नागपूरला गेलो होतो. कुणा एका रॅलीमुळे सिकंदराबादच्या स्टेशनवर गर्दीचा महापूर लोटला होता. माझ्याबरोबर हजारोंनी लोक नागपूरला जाणाऱ्या गाडीत चढले. रात्रभर एका पायावर उभे राहून प्रवास केला. त्यावेळेस मोठी बहीण अक्का नागपूरला राहात होती. पुढे नोकरी मिळाल्यानंतरही मला सर्वसामान्य डब्यात प्रवास करायला आवडत असे, कारण तेथेच खऱ्या भारताचे दर्शन होते. प्रशिक्षणानिमित्त वातानुकूलित डब्यात प्रवास करण्याची संधी मिळाली. तेथील नि:शब्दता, एकमेकांबरोबर न बोलणे मला विचित्र वाटत असे. ही व्यवस्था आपल्यासाठी नाही याची जाणीव होत असे. त्यामुळे माझे सर्व सहकारी वातानुकूलित डब्यात प्रवास करत असताना मी सर्वसाधारण डब्यातून प्रवास करत असे.

आम्ही दिल्लीमध्ये एका खासदाराच्या घरी उतरलो होतो. तेथून जवळच संघ लोकसेवा आयोग असल्यामुळे आम्हाला फार अडचणी आल्या नाहीत. तेथे आमच्याबरोबर अनेक जण पडिक होते. खासदारांपेक्षा त्यांची काळजी घ्यायला असलेल्या स्थानिक व्यक्ती तेथे हक्क बजावताना दिसत होत्या. कसातरी मुलाखतीचा दिवस आला. मुलाखत माझ्यासाठी नवीन नसली तरी संघ लोकसेवा आयोगासमोर मी पहिल्यांदा येत होतो. मनामध्ये भीती दाटलेली होती, परंतु त्याच दिवशी मुलाखत द्यायला आलेल्या इतर लोकांकडे बघून व त्यांच्याशी बोलून हलके हलकेसे वाटू लागले. त्यांच्यात तामिळनाडूहून आलेला व लुंगी परिधान केलेला नागाचंद्रनही होता. माझी मुलाखत कशी झाली व संपली ते मलाच कळले नाही. एक महिन्यानंतर निकाल आला व माझी निवड झाली! भरपूर आनंद झाला होता. तूर्त तरी माझ्या समस्यांचे समाधान मला मिळाले. मला सर्व आर्थिक समस्या सोडवता येणार होत्या आणि माझ्या आय.ए.एस. च्या तयारीलाही लागता येणार होते. आईवडिलांना वेगळेच समाधान होते, शिक्षणानंतर कोणाचेही पाय न धरता आपल्या मुलाला एवढी मोठी सरकारी नोकरी मिळाली! गावात चर्चा सुरू झाली. सुरुवातीला प्रत्येकाचा अंदाज होता, की मला कोणाचा तरी वरदहस्त लाभलेला आहे. त्याशिवाय एवढी मोठी नोकरी मिळूच शकत नाही. काही जणांच्या मते, मुलगी देण्याच्या आमिषाने कोणीतरी मला लावून दिले असावे. अशा प्रकारच्या घटना घडत असल्यामुळे असा अंदाज बांधणे साहजिक होते. हळूहळू धूळ जमिनीवर बसली आणि खरे काय ते स्पष्ट होऊ लागले. माझ्या नोकरीमुळे सर्वात मोठे समाधान जर मला कोणते मिळाले असेल तर ते तरुण मुलांमध्ये निर्माण झालेल्या आत्मविश्वासाचे आहे. माझ्या तेव्हाच्या निवडीनंतर व पुढे आय.ए.एस. झाल्यानंतर उत्साहाचे जे वातावरण गावातील व परिसरातील तरुण मुलांमध्ये निर्माण झाले, त्याने मला खूप समाधान लाभले. गावातील बोटांवर मोजण्याएवढ्या का होईनात मुलांचा तरी प्रामाणिक प्रयत्नांवर, मेहनतीवर विश्वास बसला आणि नंतर त्यांना काहीतरी करण्याची प्रेरणा लाभली.

मला प्रशासकीय सेवेत आल्यावर माझ्या गावातील लोकांसाठी खूप काही करता येईल अशी माझी धारणा होती. किंबहुना तसे करता येईल हे माझे क्षेत्र निवडण्यामागे एक मोठे कारण होते, पण नंतर मला कळून चुकले, की लोकांचा उद्धार करणे किंवा त्यांचे विचार बदलणे पाहिजे तेवढे सोपे नाही, मग ते एक लहान गाव का असेना! नंतर हळूहळू मला माझी भूमिका स्पष्ट होत गेली. आपल्याला दूर कुठेही नोकरी करून गावातील तरुण पिढीसाठी काम करता येईल, त्यांना चांगले काम करण्यासाठी - चांगल्या गोष्टी आत्मसात करण्यासाठी प्रोत्साहित करता येईल. सामाजिक क्षेत्रातील नवीन विचार, शेतीसंबंधी नवीन तंत्रज्ञान, नव्या वाटा अंगीकारण्यासाठी मार्गदर्शन करता येईल याची खात्री झाली. शिक्षण, आरोग्य आणि शेती यासंबंधी प्रचलित नवीन

विचार, तंत्रज्ञान लोकांपर्यंत पोचवता येईल असा विश्वास निर्माण झाला.

लोकांच्या अपेक्षांना मात्र काहीही मर्यादा नाहीत. माझ्या निवडीनंतर आपल्या गावातील काही युवकांना तरी नोकरी मिळू शकेल अशी त्यांची अपेक्षा होती. शिवाय, घरातील खाजगी तंट्यांपासून स्थानिक राजकारणातील तंट्यांपर्यंत मी सर्व बाबतींत हस्तक्षेप करू शकतो व सोडवू शकतो असे त्यांना वाटते.

कधी कधी चांगल्या किंवा वाईट घटनांची एक शृंखलाच सुरू होते. एका मागोमाग एक घटना घडत जातात. माझी भारतीय सांख्यिकी सेवेत निवड झाल्यानंतर अवघ्या एका महिन्यात मी आय.ए.एस.ची पूर्वपरीक्षा केवळ जुजबी अभ्यासाने पास झालो. त्याआधी चार महिन्यांपूर्वी वायुदलात निवड झालेली होती आणि कनिष्ठ संशोधन शिष्यवृत्तीही (जे.आर.एफ.) मिळाली होती, पण त्याच्या फक्त एक वर्ष आधी माझी अवस्था वाळवंटातील पाणी शोधणाऱ्या जनावरासारखी होती. मी पूर्वपरीक्षेत पास होईन असे मला वाटत नव्हते, किंबहुना त्यासाठी माझी तयारीही नव्हती. त्यानंतर दहा दिवसांत लगेच मला नोकरीवर रुजू होण्याचे पत्र मिळाले. माझी तारांबळ उडाली. एका बाजूला ह्दयाशी घट्ट बांधून ठेवलेले स्वप्न साकार करण्यासाठी पहिली पायरी मी पार केली होती तर दुसऱ्या बाजूला तोपर्यंतच्या आयुष्यातील सर्व समस्यांचे निवारण करण्यासाठी नोकरीरूपाने संजीवनी मला मिळत होती. घाईघाईने, मी माझ्या शिष्यवृत्तीचा राजीनामा दिला आणि मित्रमंडळींसह विभागाला रामराम ठोकला.

मला मुख्य परीक्षेसाठी संख्याशास्त्राबरोबर अजून एक वैकल्पिक विषय घ्यायचा होता. वाङ्मयाच्या आवडीमुळे व आजूबाजूच्या वातावरणामुळे मी मराठी वाङ्मय हा विषय मुख्य परीक्षेसाठी वैकल्पिक विषय म्हणून निवडला. शेवटच्या काही दिवसांत संग्रामही माझ्याबरोबर विद्यापीठात राहात होता. त्याच्याही डोक्यात आय.ए.एस. व्हायचे खूळ घुसले होते. तो मराठी वाङ्मयाच्या अभ्यासवर्गासाठी जात असे. त्याचाही प्रभाव माझ्या विषय निवडण्यावर झाला. खरेतर त्यावेळेस माझ्याजवळ दुसरा काही पर्याय नव्हता आणि इतर विषयांची चौकशी करणे व अभ्याससामग्री मिळवणे मला शक्य नव्हते. अशा रीतीने निवडक अभ्याससामग्रीसह मी दिल्लीचा रस्ता धरला.

दिल्लीला जायच्या आधी मला कळले की, मी मुख्य परीक्षा लिहिण्यासाठी काही दिवसांचा वेळ मागू शकतो. मला जरा बरे वाटले. माझा चुलतभाऊ, बापूला घेऊन मी जळगावला गेलो व तेथून सांख्यिकी व कार्यान्वयन मंत्रालयात प्रशिक्षण विभागातील अधिकाऱ्यांशी त्यासंबंधी बोललो. सचिव हा त्यांचा हुद्दा कळल्याने मी खूपच आदराने त्यांच्याशी बोलत होतो. ते जे काय म्हणतील त्याला फक्त 'येस सर, येस सर' म्हणत होतो. नंतर नोकरीत दाखल झाल्यानंतर कळाले, की सचिव म्हणजे पाण्यातील सर्वात छोटा मासा असतो. खूपच विनवणी केल्यावर, त्याने मला एका महिन्यानंतर रुजू होण्याची परवानगी दिली. मला मुख्य परीक्षा संपेपर्यंत वेळ पाहिजे होता. मी पुण्याला परतलो व अभ्यासाला लागलो. अभ्यास करता करता मला एकेक नवीन गोष्टी कळत होत्या. अभ्यासक्रमातील सर्व भाग एकदातरी वाचून होईल किंवा नाही, याची शंका येत होती. माझी मलाच लाज वाटत होती. शिवाय, माझ्याजवळ वाचनाची सर्व सामग्री नसल्यामुळे मला अडचणी येत होत्या.

एक महिना कुठे निघून गेला त्याचा पत्ताही लागला नाही. महिन्याच्या शेवटी मी पुण्याहून थेट दिल्लीला जाऊन तेथे नोकरीसाठी दाखल झालो. देशाच्या वेगवेगळ्या भागांतून आलेले यशस्वी उमेदवार मोठ्या ऐटीत वावरत होते. तेथील वातावरण खूपच आरामाचे होते. प्रशिक्षण

नावाला होते. अधूनमधून एखादा जुना अधिकारी येत असे. विषय सोडून भलत्याच विषयावर, वेळेचे भान न ठेवता बोलत असे. बऱ्याचदा, नोकरीविषयी सर्व नकारात्मक गोष्टी सांगत व अशी जाणीव करून देत की, ही नोकरी स्वीकारून तुम्ही स्वत:चे खूप मोठे नुकसान करून घेतले आहे. क्वचितच एखादा चांगला अधिकारी आम्हाला प्रशिक्षणकाळात भेटला.

मला खूपच चुकल्या-चुकल्यासारखे वाटत होते. माझ्या मनात राहून राहून फक्त मुख्य परीक्षेचा विचार घोळत असे. खूपच घुसमट होत होती. काय करावे ते कळेना. माझ्या एका वरिष्ठ सहकाऱ्याने कोणत्यातरी बहाण्याने सुटी घेऊन परीक्षेचा अभ्यास करण्याचा सल्ला दिला. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, मी परीक्षा संपल्यावरच नोकरीत दाखल व्हायचे होते. मी दोन दिवस विचार केला. आय.ए.एस. होणे हेच आता माझ्या आयुष्याचे एकमात्र ध्येय झाले होते. त्यासाठी मी काहीही करायला तयार होतो. शेवटी, काही सहकाऱ्यांच्या सल्ल्यानंतर मी आई आजारी असल्याचा बहाणा करून घरी जावे व तेथून स्वत: आजारी असल्याविषयी कळवावे असे ठरले. ठरल्याप्रमाणे, एक खोटी तार आली. तिचा आधार घेऊन मी दोन दिवसांची सुट्टी मागितली. दरम्यानच्या काळात माझी व अजून माझ्या एका मराठी सहकाऱ्याची, जुनेद फारूकीची राहायची व्यवस्था झाली होती. मराठे म्हणून पुण्यातील एका सज्जन गृहस्थांच्या सरकारी निवासात आम्ही त्यांच्याबरोबर राहू लागलो.

तूर्त तरी अभ्यासाची व्यवस्था झाली होती. परंतु माझे मन स्थिर नव्हते. नेहमी भीती वाटत असे की, आपल्या विरुद्ध कारवाई झाली तर? आपली नोकरी गेली तर काय होईल? या सर्व विचारांनी मी विचलित होत असे. शिवाय, माझ्याजवळ अभ्यासाची पुरेशी सामग्री नव्हती, पैशांची कमतरता होती. तरी मी रात्रंदिवस अभ्यास करत होतो. चुकून मनात शंका येत असे की, या नोकरीमुळे आपल्या आय.ए.एस. बनण्याच्या स्वप्नावर पाणी फिरवावे लागेल, ती परीक्षा पास होणे आपल्याला शक्य नाही. दरम्यान, ऑफिसकडून मला तातडीचे एक पत्र आले व त्यानुसार मला ताबडतोब नोकरीवर रुजू व्हायचे होते. मी घाबरून गेलो. परत फिरणे शक्य नव्हते, कारण नोकरी गेली तर मी दुसरे काहीतरी करेन. परत पुण्याला जाऊन संशोधन करण्यासाठी प्रवेश घेईन. परंतु मी परीक्षा देईन. ऑफिसमधील अधिकाऱ्यांनीही मला वठणीवर आणायचे ठरवले होते. त्यांनी बापूने, माझ्या चुलत भावाने, पाठवलेले मेडिकल सर्टिफिकेट स्वीकारले नाही व त्याऐवजी माझ्यावर शिस्तभंगाची कारवाई सुरू केली होती.

माझी मानसिक स्थिती विचित्र झाली होती. काय करावे ते कळेना. तशाच अवस्थेत मी परीक्षा दिली. जुजबी अभ्यासामुळे परीक्षेत माझे प्रदर्शन जेमतेम ठरले. अजून एक गंमत झाली. परीक्षेसाठी आलेल्या एका वरिष्ठाशी माझे बोलणे झाले. त्याच्या म्हणण्यानुसार परीक्षा देण्याअगोदर आपल्या कार्यालयाला कळवणे गरजेचे असते. तसे न झाल्यास आपला प्रयत्न निरर्थक ठरतो आणि कार्यालय आपली उमेदवारी रद्द करण्याविषयी संघ लोकसेवा आयोगाला कळवू शकते. माझ्या पायाखालची जमीन सरकली. एवढ्या प्रयत्नानंतर मी परीक्षा देत होतो आणि माझा प्रयत्न निरर्थक जाणार हे ऐकून मीही काही क्षणांसाठी स्तब्धच झालो. काय करावे ते सुचेना. माझ्यापुढे पर्यायही नव्हता. तशाच मनस्थितीत मी राहिलेले पेपर दिले.

मी पुन्हा कामावर रुजू झाल्यावर ऑफिसमध्ये लोक एखाद्या चोराशी असावी तशी वर्तणूक माझ्याशी करत. मलाही अपराध्यासारखे वाटत होते, परंतु त्यांनीच मला अपराध करायला भाग पाडले होते. कारण मला परीक्षेनंतर रुजू व्हायची परवानगी देणे त्यांना सहज शक्य होते. परंतु

त्यांनी तसे न केल्याने मला वाकड्या मार्गाने जाणे भाग पडले. माझ्या अनुभवावरून मला दिसले की, कुणी प्रयत्न करत असला व आयुष्यात पुढची पायरी गाठू पाहात असला की त्याच्या आजूबाजूच्या बऱ्याच लोकांना ते सहन होत नाही. किंबहुना, ते मदत करण्याऐवजी त्याला विरोध कसा करता येईल व आडकाठी कशी आणता येईल याचा प्रयत्न करतात. सरकारी चाकऱ्यांमध्ये आय.ए.एस.ला जेवढा मान असतो, अधिकार असतात तेवढा इतर तांत्रिक नोकऱ्यांमध्ये नसतात. बऱ्याचदा, आय.ए.एस. चा संबंध भ्रष्टाचार, मिथ्या अभिमान या गोष्टींशी जोडला जातो. त्यामुळे इतर नोकऱ्यांमधल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांमध्ये त्यांच्याविषयी द्वेषाची भावना असते. माझ्या प्रशिक्षणाधिकाऱ्याचीही तीच समस्या होती. महाशयांनी स्वत: बऱ्याचदा अयशस्वीपणे आपले भविष्य परीक्षेत अजमावलेले होते. त्यामुळे आय.ए.एस. या शब्दाविषयीच त्यांना भयंकर चीड होती. म्हणून मी जेव्हा परीक्षा देण्यासाठी गैरहजर राहिलो हे त्यांनी ऐकले तेव्हा त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला पोचली. याला कोणत्याही परिस्थितीत शिक्षा करायची या उद्देशाने त्यांनी कारवाई सुरू केलेली होती. मी कसाबसा रुजू झालो. माझे वेतन काही दिवसांसाठी बंद झाल्यामुळे मी परत तीन-चार महिने आर्थिक अडचणीत घालवले.

अपेक्षेनुसार, मी मुख्य परीक्षेचा अडथळा पार करू शकलो नाही. मला पास व्हायची फार आशा नव्हती, परंतु मनात कुठेतरी पास होईन असेही वाटत होते. निकाल लागला तेव्हा मी माझ्या ऑफिसमधील पायाभूत अभ्यासक्रमासाठी मसुरीला होतो. आम्हाला प्रशिक्षणासाठी वेगवेगळ्या ठिकाणी जावे लागत असे. दरम्यान, आम्ही मुंबई, भोपाळ, इंदूर, हैदराबाद, कोलकाता इत्यादी ठिकाणी जाऊन आलो. शिवाय, दिल्लीला राहात असताना मी स्वत:च्या हाताने स्वयंपाक करत असे. या सर्व गोष्टींमुळे अभ्यासाची ओढाताण होई. मी जेवढा वेळ मिळेल, जेथे मिळेल तेथे वाचनाचा प्रयत्न करत असे, परंतु समाधानकारक अभ्यास होत नसे. मसुरीला असतानाच मी पूर्वपरीक्षा दिली. मुख्य परीक्षेचा निकाल व पुढच्या वर्षाची पूर्वपरीक्षा यात दोन महिन्यांचा कालावधी असतो. त्यामुळे मुख्य परीक्षेच्या निकालाची वाट न बघता पूर्वपरीक्षेचा अभ्यास करणे गरजेचे होते. माझ्या बाबतीत त्यादरम्यान अभ्यास झाला नाही व अचानक निकाल लागला. प्रशिक्षणकाळात मसुरीला अभ्यासासाठी खूपच कमी वेळ मिळत असे. तशातच मी पूर्वपरीक्षा दिली. पूर्वपरीक्षा मी संख्याशास्त्र या माझ्या विषयात देत असल्यामुळे व आधीच्या वर्षी जुजबी अभ्यासाने पास झाल्यामुळे मला तिची फार काळजी वाटत नसे. परंतु या परीक्षेला पुरेसे महत्त्व न देण्याची जी चूक मी केली, त्यासाठी मला खूप मोठी किंमत मोजावी लागली. माझ्या फाजील आत्मविश्वासामुळे मी पूर्वपरीक्षेत अनुत्तीर्ण झालो. मला प्रचंड दु:ख झाले. आपले स्वप्न, स्वप्नच राहील की काय? अशी भीती वाटू लागली. या परीक्षेचा निकाल लागला तेव्हा आम्ही कोलकात्यात होतो. मी एकटाच व्हिक्टोरिया मेमोरियलला जाऊन स्वत:ची सांत्वना करत बसलो होतो. आपले काय चुकले याचे गणित मांडत होतो. मला कळून चुकले की, आपण पाहिजे तेवढा वेळ देऊ शकलेलो नाही व पाहिजे तेवढा अभ्यास परीक्षेसाठी केलेला नाही. परीक्षेचा बारकाव्याने अभ्यास केलेला नव्हता, कोणत्या विषयाला किती महत्त्व व वेळ द्यायची गरज आहे याचे नियोजन केलेले नव्हते. फक्त आय.ए.एस. व्हायची इच्छा मनात बाळगल्याने मी परीक्षा पास होणार नव्हतो, तर त्यासाठी सूत्रबद्ध प्रयत्नांची आवश्यकता होती.

संघ लोकसेवा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्यांच्या दृष्टीने पूर्वपरीक्षाही खूप महत्त्वाची पायरी असते. स्पर्धात्मकता, बहुपर्यायी प्रश्न असल्यामुळे आणि प्रत्येक वर्षी प्रश्नांचे काठिण्य वाढत

असल्यामुळे ती परीक्षा पास होणे दिवसेंदिवस अवघड होत चालले आहे. परीक्षेत इतिहास, अर्थशास्त्रापासून दैनंदिन विज्ञाना-पर्यंतचा अभ्यास अपेक्षित असतो. मर्यादित वेळ, प्रश्नांचा अवाढव्य आवाका यामुळे परीक्षेत चांगल्या चांगल्यांची भंबेरी उडते. म्हणून बरेच परीक्षार्थी पहिल्या परीक्षेतच तीन-चार वर्षे अडकलेले असतात. शिवाय, लाखोने मुले बसत असल्यामुळे एक-दोन प्रश्न इकडे तिकडे झाले तरी अनुत्तीर्ण होण्याचा संभव असतो. एकेका मार्कावर शंभराने विद्यार्थी गळत जातात. म्हणजे मेरिट एका मार्काने कमी झाले किंवा वाढले तर त्यामुळे असंख्य परीक्षार्थींच्या भवितव्यावर परिणाम होतो.

माझा आत्मविश्वास त्यावेळी डळमळीत झाला. मनात अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले. आपल्यामध्ये खरेच एवढी क्षमता आहे का? आपण पुन्हा परीक्षा पास होऊ का? असे प्रश्न मनात येऊन दोन-तीन दिवस मला झोप आली नाही. मनाला वेगळाच धसका बसलेला होता. तेव्हा माझ्या आजूबाजूच्या मंडळींना, माझ्या सहकाऱ्यांना माझ्या मनस्थितीविषयी काही देणेघेणे नव्हते. ते मिश्किलपणे बोलत व मला परीक्षेचा नाद सोडून देण्याविषयी सल्ला देत. त्यातले बरेच परीक्षेत अयशस्वी झालेले होते. त्यामुळे ते मला सहानुभूती दाखवून परीक्षा किती कठीण आहे व पास होण्यात भाग्याचा किती वाटा आहे, ते सांगत. त्यांनीही खूप प्रयत्न केल्यावरसुद्धा ते अपयशी झाले कसे याविषयी सविस्तर बोलत असत. माझ्या वरिष्ठांमध्येही परीक्षेचा तिटकारा असल्यामुळे त्यांच्याकडून प्रोत्साहनाची अपेक्षा करणे निरर्थक होते. एकंदरीत, कोणत्याही बाजूने माझा आत्मविश्वास वाढेल, लढायची शक्ती येईल असे वातावरण माझ्या आजूबाजूला नव्हते. मी अभ्यास करताना बघून बरेच सहकारी माझी खिल्ली उडवत. किती प्रयत्न झाले व किती राहिले याविषयी उपहासाने चौकशी करत. सर्व बाजूंनी परिस्थिती मला भारतीय सांख्यिकी सेवेत स्थिरावण्यासाठी उद्युक्त करत असल्याची जाणीव तीव्र होत असे. मात्र माझ्यामधील अस्वस्थता व धगधगता निखारा हे मान्य करायला तयार नव्हता. आपले हे शेवटचे स्टेशन नाही याची जाणीव मला प्रत्येक क्षणाला होत असे. दिवसागणिक मी काय करायचे, कसे करायचे याचाच विचार करत होतो.

# जीवघेणी शेवटची लढाई

कोलकात्याहून दिल्लीला परत आल्यावर, माझ्या अभ्यास प्रयत्नांना पुन्हा वेग आला. मी संध्याकाळच्या एका मार्गदर्शन-वर्गात दाखल होण्याचा निर्णय घेतला. माझ्या ऑफिसचे प्रशिक्षण पूर्व दिल्लीतील सी.एम.सी. या संगणक प्रशिक्षण कंपनीत सुरू होते. माझे राहायचे ठिकाण, प्रशिक्षणाचे ठिकाण व मार्गदर्शक वर्गाचे ठिकाण यामध्ये साधारण पस्तीस किलोमीटरचे अंतर होते. रोज एवढा प्रवास करून वेळ मिळालाच तर माझा अभ्यास होत असे. तशात मला पुन्हा पूर्वपरीक्षा नापास व्हायचे नव्हते. जेवढा वेळ मिळेल, जेथे मिळेल तेथे मी वाचन करत असे. बसमध्ये, स्टॅण्डवर, वर्गात थोडा वेळ जरी मिळाला तरी मी सुरू होत असे. बऱ्याचदा थकून घरी गेल्यावर स्वयंपाक करावा लागत असे.

दरम्यान, घरची परिस्थिती बदलत गेली. सुरुवातीच्या काही महिन्यांनंतर मी कुटुंबाचे कर्ज फेडायला सुरुवात केली. सर्वप्रथम गहाण ठेवलेले घर सोडवणे मला भाग होते. कायदेशीर, ते तीन वर्षांसाठी दिलेले होते. त्यामुळे मला तीन वर्षांत ते पैसे चुकते करणे गरजेचे होते. मी माझ्या पगारातील जास्तीत जास्त भाग घरी पाठवत होतो. त्यामुळे मी सहा महिन्यांतच घर सोडवून घेतले. त्यानंतर उरलेले पैसे व इतर कर्जे फेडत राहिलो. अशा प्रकारे, सुरुवातीची तीन वर्षे माझी कर्ज फेडण्यात गेली. आईवडिलांचे ओझे कमी करण्याची आपल्याला संधी मिळत आहे याचे मला समाधान वाटत असे. मला लहानपणापासून बघितलेली लाचारी, असहायता, हतबलता किळसवाणी वाटे. पैसे दिल्यानंतर ताई-अण्णांच्या चेहऱ्यावरील समाधान बघून जीवनाचे सार्थक झाल्याची जाणीव होत असे. दरम्यान, मी प्रतिभाला, माझ्या लहान बहिणीला महाविद्यालयीन शिक्षणासाठी जळगावला पाठवू शकलो. हळूहळू घरात एकेक वस्तू येऊ लागली. गॅस आला, मोटारसायकल आली आणि शेवटी टीव्ही आला. प्रत्येक गोष्टीचे अप्रूप होते. कारण काही वर्षांपूर्वी या वस्तू आपल्याकडे येऊ शकतील असा विचारही मी कधी केला नव्हता. जन्मापासून, ताईला चुलीवर स्वयंपाक करताना बघितलेले होते. दिवसभर शेतात राबराब राबून, थकून घरी आल्यावर तिला चुलीवर डोळे पुसत स्वयंपाक करताना बघून मी लहानाचा मोठा झालो होतो. ती गॅसवर स्वयंपाक करत असण्याची कल्पनाच मला सुखदायी वाटत असे.

मी सर्वस्व पणाला लावून अभ्यास करायचे ठरवले. मी ‘मराठी वाङ्मया’ला तिलांजली देऊन भूगोल विषय मुख्य परीक्षेसाठी निवडला. पूर्वपरीक्षा काळजीपूर्वक दिली. अपेक्षेप्रमाणे, मी पास झालो. आधीच्या माझ्या अनुभवावरून मला एकट्याला अभ्यास करणे जिवावर जात असे. मी मुंबईला असलेल्या एस.आय. ए.सी. या संस्थेचे नाव ऐकून होतो. तेथे भरपूर विद्यार्थी अभ्यास करत. जास्त विद्यार्थ्यांमध्ये राहिल्याने आपल्याला त्यांची अभ्यास करण्याची पद्धत कळेल, आपल्या तयारीची-आपल्या क्षमतेची तुलना करता येईल असे वाटत होते. परंतु ही धारणा संपूर्णत: बरोबर नाही याची जाणीव मला तेथे गेलो तेव्हा झाली. मी पूर्वपरीक्षा पास झाल्या-झाल्या मुंबईचा रस्ता धरला. मुंबईला सीएसटीजवळ, अगदी गजबजलेल्या ठिकाणी मुलांच्या अभ्यासासाठी ही संस्था उभारण्यात आलेली आहे. तेथे मला श्रीकृष्ण जोशी, दामले, गिते, राजमाने, शिंदे, सतीश पाटील, बिपिन अहिरे वगैरे मंडळी भेटली. तेथील अनुभव जगावेगळा होता. प्रत्येकजण रात्रंदिवस अभ्यास करत असे. चोवीस तासांतील प्रत्येक मिनिटाला किमान पाच-सहा जण पुस्तकांत डोके खुपसलेली दिसत. वातावरण स्तब्ध असे. क्वचितच कोणी फालतू वेळ घालवत असे. मार्गदर्शन

केंद्र म्हणून त्या संस्थेची कार्यपद्धत मात्र सुमार होती. जुने विद्यार्थी तेथे अभ्यास करत असल्याने त्यांच्याकडून नवीन मुलांना भरपूर शिकायला मिळत असे. शिवाय, अभ्याससामग्री मिळणे अवघड जात नसे. या सर्व कारणांमुळे महाराष्ट्रात संघ लोकसेवा आयोगाचा अभ्यास करण्यासाठी ही सर्वोत्तम जागा मानली जाते.

एस.आय.ए.सी. मधील माझ्या वास्तव्यात भेटलेल्या काही व्यक्ती माझ्या सदैव लक्षात राहतील. तेथील रंगिले बाका पाटील जगावेगळे होते. ते संस्थेत अधीक्षक होते. संस्थेत काम करणाऱ्या झारापकर बाईवर त्यांची खास मर्जी होती. बाईसाहेब नेहमी बाकांच्या केबिनमध्ये खुसपुस करताना सापडत. त्यांच्यामधील वार्तालाप, हा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दैनंदिनीमधील, चहाबरोबर मन मोकळे करण्यासाठी, एक महत्त्वाचा विषय असे. हुशार मुले झारापकर बाईजवळ बाकांची व बाकांजवळ झारापकरांची स्तुती करत. इतर कर्मचाऱ्यांमध्ये मात्र त्यांच्याबद्दल नेहमी अविश्वास व तिटकाऱ्याची भावना दिसत असे. तेथे काम करणाऱ्या बापटबाई आम्हा सर्वांची स्वत:च्या मुलांप्रमाणे काळजी घेत. त्यांची बोलण्याची पद्धत, वागणे यावरून त्यांची मुलांच्या भविष्याविषयीची काळजी स्पष्ट दिसत असे. त्यांच्याकडून मुलांच्या अडचणींचे निवारण होत असे.

उस्मानाबादहून आलेला अभिजित इंगळे व धुळ्याचा संदिप खैरनार हे त्यातल्या त्यात मजेशीर होते. कॉन्व्हेंट एज्युकेटेड इंगळे बुशपासून वाजपेयींपर्यंत सर्वांच्या बोलण्याची हुबेहूब नक्कल करत असे. तोंडात पानाचा विडा कोंबून, स्वारी इतरांपासून अलिप्त राहून रात्रंदिवस अभ्यासात व्यस्त असे. त्याला भारतीय विदेशी सेवेत (IFS) जायची इच्छा होती. मागच्या दोन वर्षांत कोण मुलगी विदेश सेवेत गेली व ती कशी आहे याबद्दलची त्याची माहिती तोंडपाठ होती. खैरनारही एक वल्ली होता. महाशय परीक्षा पास होण्याच्या आधीच साहेबी तोऱ्यात वागत. चार वर्षे पूर्वपरीक्षा नापास झाल्यानंतर मुख्य परीक्षेचे तिकिट मिळाल्यामुळे स्वारींचे ध्येय फक्त मुख्य परीक्षा पास होणे हे होते. त्याला परीक्षेत कोणतीच गोष्ट असाध्य वाटत नसे. ते दोघे महाभाग माझ्या खोलीत रात्रंदिवस राहत असत. श्रीकृष्ण जोशी कुंभकर्णाची झोप असलेले होते. ते रात्री उशिरा झोपल्यावर दुसऱ्या दिवशी दुपारी एक-दोन वाजता उठत असत. त्या व्यतिरिक्त एकाच जागेवर भरपूर वेळ बसण्याची शक्यता असलेले किरण गिते होते. ते पुण्याला महिंद्रामध्ये नोकरीला होते. तेथून ते अभ्यासासाठी मुंबईला येत. त्यांची बोलण्याची लकब व त्यांनी लिहिलेले निबंध माझ्या नेहमी लक्षात राहतील. पहिल्याच प्रयत्नात मुख्य परीक्षेसाठी आलेल्या आणि प्रचंड अभ्यास करणाऱ्या जितेंद्र दामल्यांच्या चेहऱ्यावर क्वचितच हास्य बघायला मिळे. त्या सर्वांमध्ये अभ्यासात उगवलेला दिवस व मावळलेली रात्र कधी संपे त्याचा थांगपत्ताही लागत नसे.

एस.आय.ए.सी.त भेटलेल्या मित्रमंडळींमध्ये किरण गिते पुढे माझ्या बरोबर यशस्वी झाले व महिंद्रा कंपनी सोडून आय.ए.एस.मध्ये दाखल झाले. मला त्यांच्याबरोबर प्रशिक्षणकाळात एक वर्ष घालवण्याची संधी मिळाली. तीक्ष्ण बुद्धीच्या गित्यांमध्ये कमालीचे व्यवस्थापनकौशल्य व प्रशासकीय चातुर्यगुण आहेत. ते यशस्वी प्रशासक म्हणून नावारूपाला येतील यात शंका नाही.

नागपूरचे जितेंद्र दामले म्हणजे एक गोड व्यक्तिमत्त्व. मृदू स्वभावाच्या या मित्राने बऱ्याचदा खूप जीवतोड मेहनत करून आय.ए.एस.चा किल्ला सर करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पहिल्या प्रयत्नापासून, तो यशस्वी होईल असे वाटत असताना जितेंद्रची घोर निराशा झाली. एवढा मेहनती व गुणी मुलगा जीवनाच्या इतर आघाड्यांवर यशस्वी होईल असा माझा पूर्ण विश्वास

आहे. जितेंद्रने पुढे एका वर्षातच एका आयटी कंपनीत चांगली नोकरी मिळवून माझा तो विश्वास सार्थ ठरवला. त्याच्याशी बोलताना आयएएस परीक्षेत नियतीने त्याच्या बाबत केलेल्या पक्षपाताविषयी नकळत मनात विचार येतो.

श्रीकृष्ण जोशी व संदीप खैरनार या बिनधास्त 'आत्म्यां'विषयी पुन्हा फारसे ऐकायला मिळाले नाही. अभिजीत इंगळेचा जोश मात्र कायम राहिला. त्यांनी विदेश सेवेची गाडी हुकली म्हणून निराश न होता बहाद्दर आपल्या डिग्रीचा उपयोग करून सिव्हील जज्ज म्हणून रुजू झाला.

अमोल राजमानेची अवस्थाही जितेंद्रसारखी झाली. त्याला जीवतोड मेहनत करूनही शेवटी अपयश पदरी मिळाले. परीक्षार्थी खूपच छोटा वाटत असल्याने कितीही अभ्यास केला तरी आपण कुठे तरी कमी पडलो असे वाटून कटुता येत नाही. प्रशासनात नाव कमावून राजकारणात उतरण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट बाळगून असलेले राजमाने सध्या अमेरिकेत उच्च शिक्षण घेत आहेत. लवकरच, भारतात परत येऊन अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करण्याचे त्यांचे मानस आहे.

प्रदीप शिंदे व सतीश पाटील हे लोक स्वप्नाळू असल्याचा भास होत असे. त्यांनीही खूप मेहनत केली, पण त्यांनी शंभर टक्के झोकून दिल्याचे मी कधी बघितले नाही. ते परीक्षा देण्याअगोदर रुजू झालेल्या नोकऱ्यांमध्ये कार्यरत आहेत. याउलट बिपिन अहिरेचे होते. संगणकशास्त्रात इंजिनीयरिंग केलेला हुशार मुलगा नेहमी आमच्या कौतुकाचा विषय ठरत असे. सर्वांगीण ज्ञान, मृदू स्वभाव यामुळे सर्वांनाच तो हवाहवासा वाटे. तो पहिल्या पन्नासामध्ये नक्की येईल असे आम्हाला वाटे, परंतु त्याला यशाने तब्बल तीन वर्षे हुलकावणी दिली. शेवटी, तो भारतीय पोलिस सेवेसाठी पात्र ठरला. ज्यांना त्याने यु.पी.एस.सी.ची ए-बी-सी-डी शिकवली ती मंडळी आज आय.ए.एस.मध्ये आहेत!

महाराष्ट्रीय मुले व परप्रांतीय मुलांच्या आय.ए.एस. व इतर स्पर्धा अभ्यास-क्रमासाठी असलेल्या परीक्षांमधील कामगिरीविषयी काही तथ्ये सांगणे गरजेचे आहे. आय.ए.एस. बरोबर देशपातळीवर होणाऱ्या आय.आय.टी., आय.आय.एम. यांसारख्या परीक्षांमध्ये महाराष्ट्रीय मुलांची बसणाऱ्यांची व यशस्वी होणाऱ्यांची संख्या खूपच कमी आहे. त्या परीक्षांमध्ये उत्तर प्रदेश, बिहार, तमिळनाडू या राज्यांतील बहुसंख्य उमेदवार पास होताना दिसतात.

आपली मुले मागे पडतात व कोणत्या गोष्टीत कमी पडतात हे बघितले पाहिजे. महाराष्ट्रीय लोकांमध्ये घराविषयी व आपल्या प्रांताविषयी खूप लगाव असतो. त्यामुळे ते महाराष्ट्र सोडून बाहेर जायला सहसा धजत नाहीत. 'परीक्षा देऊन बाहेर कोण जाईल, त्यापेक्षा येथे रुखीसुखी जी मिळाली ती चांगली' अशी एकंदर धारणा आहे. या परीक्षांनंतर साधारणत: दोन तृतीयांश उमेदवार बाहेर काम करत असल्याने त्या परीक्षांचे फारसे आकर्षण मुलांना वाटत नाही.

जी महाराष्ट्रीय मुले त्या परीक्षा देतात, त्यांच्यात परीक्षेसाठी झोकून देण्याचा व सातत्याचा अभाव असतो. हजारो मुले दोन-तीन वर्षे सातत्याने सर्व गोष्टींपासून लांबू राहून, दिल्लीत किंवा तत्सम जागी राहून सातत्याने तयारी करतात. देशाच्या कानाकोपऱ्यांतून आलेली ही मुले दोन-दोन वर्षे घराकडेही फिरकत नाहीत. महाराष्ट्रीय मुलांमध्ये पूर्वतयारीचा, माहितीचा अभाव दिसून येतो. त्यामुळे सुरुवातीची काही वर्षे ती चाचपडत असतात व आपला वेळ निरर्थक वाया घालवत असतात. याउलट इतर मुलांच्या योजना पूर्वीपासून स्वच्छ असतात. कोणत्या वर्षाच्या कोणत्या परीक्षेस आपल्याला बसायचे आहे, याचा आराखडा तीन-चार वर्षांपूर्वीच तयार असतो.

अफाट अभ्यासक्रमाच्या या परीक्षांसाठी - जिथे जी माहिती मिळेल तिथे ती - सातत्याने

जमवत राहावे लागते. परप्रांतीय मुलांमध्ये एक साखळी दिसून येते. गत पाच वर्षांतील यशस्वी उमेदवारांची यादी त्यांना तोंडपाठ असते. एवढेच नाही तर मार्गदर्शनाची साखळी तयार झालेली असते. यामुळे एकाचे ज्ञान दुसऱ्यापर्यंत सहज पोचते व त्याला आलेल्या अडचणी त्यानंतर अभ्यास करणाऱ्याला सहसा येत नाहीत. आपल्या मुलांमध्ये या प्रकारचा संवाद होताना दिसत नाही. ज्या वर्षी जी मुले पास झालेली असतात, त्याच वर्षी नवीन उमेदवार त्यांच्या अवतीभवती घुटमळत असतात; परंतु त्यापूर्वी जमलेल्या संचिताचा ते पुरेसा लाभ उठवत नाहीत. एखाद्या विषयामध्ये कुणी पारंगत असेल, त्याला परीक्षेत घवघवीत यश मिळाले असेल तर त्याचा फायदा हजारोंना होऊ शकतो. एस.आय.ए.सी. सारख्या संस्थांनी जुन्या विद्यार्थ्यांशी नाळ जोडून त्यांचा नवीन उमेदवारांसाठी वापर करून घेतला पाहिजे; परंतु तसे होताना दिसत नाही.

आपल्याकडे पालकांमध्येही मुलांच्या भविष्याविषयी फारसा उत्साह जाणवत नाही. पालकांच्या अज्ञानामुळे धाडसाने पाऊल उचलताना मुलांचाही पाय मागे पडतो.

मराठी मुलांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव असतो. त्यांच्या वागण्या-बोलण्यात तो वेळोवेळी प्रतिबिंबित होत असतो. त्याबरोबर योग्य मार्गदर्शनाचा अभाव आपल्या तरुणांना मागे खेचताना दिसतो. आजमितीस मुंबई-पुण्याव्यतिरिक्त इतर ठिकाणी मार्गदर्शनाचा प्रचंड तुटवडा आहे. मुंबई-पुण्यातदेखील परिपूर्ण मार्गदर्शनाचा अभाव आहे. यामुळे शालेय व महाविद्या-लयीन जीवनात या परीक्षांबद्दल काहीच माहिती नसलेल्या मराठी मुलांचे सुरुवातीचे काही महिने माहिती काढण्यामध्येच वाया जातात. त्या दरम्यान, काही हताश होऊन परीक्षेचा नाद सोडतात, तर काही कमी माहितीच्या व अभ्यासाच्या आधारावर परीक्षा देऊन अयशस्वी झाल्यावर निराशेच्या गर्तेत ढकलले जातात.

दिवसेंदिवस फोफावत चाललेल्या चंगळवादी संस्कृतीमुळे जेथे आयुष्याचा जमाखर्च हा सोयी-सुविधा व बँक बॅलन्स या एककांनी मोजला जातो तेथे धकाधकीच्या व प्रचंड दबावाच्या या नोकऱ्यांकडे न जाण्याविषयीचा सल्ला आपल्याला लहानपणापासून दिला जातो. कोथरूडला राहणाऱ्या गृहस्थांना चिंचवडलाही नोकरी करणे जड जाते. त्यापेक्षा दोन पैसे कमी असलेली सिंहगड रोडची नोकरी बरी असा विचार करणाऱ्या आम्हा बापड्यांना, एक-दोन वर्षे खस्ता खाऊन, परीक्षा पास होऊन कुठे तरी लांब, भारताच्या एखाद्या कोपऱ्यात नोकरी करणे कसे मानवेल?

मुख्य परीक्षा दिल्यानंतर जेव्हा मी घरी आलो तेव्हा माझ्या लग्नाबद्दल चर्चा होऊ लागली. मला तर आधी आय.ए.एस. बनायचे होते. त्याआधी लग्न म्हणजे मला विचित्र वाटत होते. शिवाय, राहत्या घराची अवस्था खूपच डळमळीत होती. आमचे घर गावाच्या उतारावर असल्यामुळे घरातील जमीन व भिंती नेहमी पाणावलेल्या असत. शिवाय, धाब्याच्या लाकडांना कीड लागून त्याची पावडर घरात सर्वत्र पसरत होती. घर पाणावल्यामुळे डास व झुरळे यांना चांगलेच फावले होते. अशा परिस्थितीत घराची डागडुजी करणे महत्त्वाचे होते. परंतु संपूर्ण घरच खराब झाल्यामुळे त्याला व्यवस्थित करण्यात बराच पैसा जाणार होता. माझ्याकडे तेवढे पैसेही जमा नव्हते. शेवटी, मी कर्ज काढून संपूर्ण घर नवे बांधण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी मी बँकेकडून कर्ज घ्यायचे असे ठरवले. ताई-अण्णा 'कर्ज' या शब्दालाच घाबरत, कारण आतापर्यंतचे त्यांचे जवळजवळ संपूर्ण आयुष्य कर्ज फेडण्यात गेले होते. कुणाला त्यांनी मुद्दलाच्या चारपट-पाचपट परत केले होते. त्यामुळे कर्जाचा त्यांनी धसका घेतलेला होता. मी त्यांना व्यवस्थित समजावून सांगितले. तेव्हा

त्यांना जाणवले, की इतके पैसे आपल्याजवळ कधीच जमू शकत नाहीत आणि त्यांनी कर्ज घ्यायला परवानगी दिली. मला नवीन घराची कल्पना सुखावह वाटत होती.

कर्ज घेण्याच्या माझ्या प्रयत्नांतून मला बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्या. वर्तमानपत्रांत, टेलिव्हिजनवर, जाहिरातींत ज्याप्रमाणे दर्शवलेले असते तेवढे घरासाठी कर्ज मिळणे सोपे नसते. सर्वात मोठा शोध मला हा लागला की सध्या सुळसुळाट असलेल्या खाजगी बँका फक्त शहरी भागासाठी कर्ज देतात. ग्रामीण भागात सहकारी बँकांची मक्तेदारी असते व संपूर्ण जिल्हा वेगवेगळ्या बँकांमध्ये विभागलेला असतो. त्यामुळे एखाद्या गावातील लोकांच्या गरजा फक्त एक बँक पूर्ण करत असते. त्यामुळे बँकेचा मॅनेजर ही व्यक्ती बी.डी.ओ. किंवा फौजदाराएवढी महत्त्वाची असते. सहसा या लोकांचे परसेंटेज ठरलेले असते. सरकार कितीही मोठ्या योजना आखत असले तरी हे लोक ज्याला कर्ज द्यायचे त्यालाच देतात. स्पर्धेमुळे शहरी भागात ग्राहकांना मिळणारा फायदा अजून पाहिजे तेवढा ग्रामीण भागापर्यंत पोचलेला नाही. मी अशाच दोन-तीन बँकांकडे जाऊन बघितले. सुरुवातीलाच मागणीला नकार दिला होता. माझी घोर निराशा झाली. घरातील कोण्या एकाने जरी कधी कर्ज घेतलेले असले तरी त्याची परतफेड होईतोपर्यंत घरातील दुसऱ्या व्यक्तीला सहसा कर्ज दिले जात नाही.

शेवटी, एका बँक मॅनेजरने मला ओझरते आश्वासन दिले. मी तयारी केली. जुन्या घराचा सर्व भाग पाडून मी बँक मॅनेजरकडे गेलो, तर मॅनेजर मोठ्या सुट्टीवर गेलेला होता! मनात नाना शंका येत होत्या. जर बँक मॅनेजर नाही म्हणाला तर? त्याने काही शर्ती ठेवल्या तर? सुदैवाने, तसे काही झाले नाही. माझ्या प्रामाणिक प्रयत्नांकडे बघून त्याला कदाचित माझी कीव आली असावी. मी मात्र कर्ज मिळाले म्हणून आनंदात होतो. घर बांधायची जबाबदारी मी ताई-अण्णांवर सोपवून दिली. मला ती प्रक्रिया उपभोगण्याचा आनंद त्यांना द्यायचा होता.

माझ्या शाळेतील काळापासून अजून एक जवळचे वास्तव मी बघितले, ते तहसिल कार्यालयातील कामकाजाचे. व्हेंडरपासून तहसिलदारापर्यंत असलेली साखळी प्रत्येक दिवशी अनेकांना लुबाडत असते. प्रत्येक काम व्हेंडरजवळ सुरू होते. त्या कामाला लागणारा वेळ व मोजावे लागणारे पैसे यांचा उर्ध्व संबंध असतो. चुकून या साखळीव्यतिरिक्त कुणी अर्ज केला तर वेगवेगळ्या सबबी सांगून त्याचा अर्ज फेटाळला जातो किंवा त्याला पैसे द्यायला भाग पाडले जाते. रोज आपले काम बुडवून, भाडेखर्च करून येणाऱ्या व्यक्तीला हा कागद नाही, उद्या तो उतारा नाही म्हणून परत पाठवले जाते. शेवटी, सर्व पूर्तता झाली असल्यावरही साहेब ऐनवेळी काहीतरी उणीव दाखवतात. अशा प्रकारे, हैराण झालेली व्यक्ती कानाला खडा लावून घेते व परत काही काम असल्यास व्हेंडरला सांगून ते या जंजाळातून मुक्त होतात. बऱ्याचदा, खालची मंडळी 'साहेब पैसा लेवा मिचून काम करणार नाही' असे म्हणून साहेबाच्या नावावर पैसे झोडपतात. कुण्या काळी चोरून-लपून पैसे घेणारी मंडळी; त्यांचा आजकाल पैसे घेणे हा हक्क होऊन गेला आहे - अशा आविर्भावात ते पैशांची मागणी करतात. कोणी त्याच्याविरुद्ध कुजबुज केली तर त्यांच्या कामाचे बारा वाजले म्हणून समजा! त्याला सर्व प्रकारचे नियम, कायदे दाखवले जातात. त्यामुळे वेळेवर काम करून हवे असलेली कोणतीही व्यक्ती असल्या फंदात पडत नाही. हे सर्व महाभाग सरळ सरळ पैसा घेत नाहीत तर सर्व हिशोब व्हेंडरकडे असतो. दिवसाच्या शेवटी जेवढ्या कागदांवर सह्या झाल्या आहेत त्या हिशोबाने पैशांची गुपचूप वाटणी होते. एखाद्या सामान्य व्यक्तीने याविरुद्ध आवाज उठवायचा ठरवलेच, तर तो कसा उठवू शकतो हे मोठे कोडे

आहे!

माझ्या बऱ्याचशा कामांमध्ये माझा चुलतभाऊ बापू मला मदत करत असल्यामुळे आणि मी रोज रोज या कार्यालयांमध्ये चकरा मारत नसल्याने मला या किडीची झळ कमी बसली आहे. घराच्या कामासाठी माझा संपर्क एकदा रजिस्टर ऑफिसशी आला. माझे कागद आतमध्ये गेल्यावर मला निरोप आला, की काही पैसे द्यावे लागतील. माझे रक्त गरम झाले. प्रामाणिकपणे देशसेवा करण्याची शपथ घेतलेल्या माझ्यासारख्या व्यक्तीला संताप येणे साहजिक होते. मी एक पैसाही द्यायला नकार दिला. त्यानंतर माझ्याबद्दल चौकशी सुरू झाली. कोण आहे? कुठून आला आहे? काय करतो? एवढ्या सर्व रामायणानंतर माझे काम करून देण्यात आले. आजकाल सुरू झालेले सुविधा केंद्र व 'एक खिडकी योजना' या गोष्टी तर या महाभागांसाठी चरायचे कुरण झाले आहे. खूप सुरुवातीपासून, म्हणजे जेव्हापासून मी आय.ए.एस. व्हायचे ठरवले तेव्हापासून, या सर्व गोष्टींना आळा कसा घालता येईल याचा मी विचार करत असतो.

मुख्य परीक्षा संपण्याच्या वेळेपासून तिचा निकाल लागेपर्यंत साधारणत: चार महिन्यांचा काळ असतो. सध्या परीक्षेच्या बऱ्याचशा प्रक्रिया संगणकावर होत असताना एवढा विलंब होता कामा नये. हे चार महिने नेमके काय करावे असा प्रश्न संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षार्थींना नेहमी पडलेला असतो. पेपर चांगले गेले असले तरी आपण नेमके कुठे आहोत हे खूपच थोडे विद्यार्थी छातीठोकपणे सांगू शकतात. त्यामुळे हा काळ कूलिंग पिरियडसारखा असतो. बरेच विद्यार्थी या काळात पुढच्या परीक्षेवर व त्याचबरोबर मुलाखतीच्या तयारीवर लक्ष केंद्रित करत नाहीत. त्यामुळे निकाल लागल्यावर त्यांची तारांबळ उडते. त्या काळात अभ्यास केल्याचा खूप फायदा होतो. कारण शेवटचा निकाल व पुढची पूर्वपरीक्षा यामध्ये कधी कधी जेमतेम दहा दिवसांचेही अंतर नसते.

मी त्या काळात माझ्या कामावर लक्ष केंद्रित केले. आपण पगार घेतो व परीक्षेसाठी सुट्टी घेतो व अभ्यास करतो, त्यामुळे आपल्या कामाला आपण न्याय देत नाही असे मला नेहमी वाटे. म्हणून या अपराधी भावनेने त्या काळात मी ऑफिसचे काम पूर्ण मेहनतीने करत असे. बऱ्याचदा, त्या काळात केलेले काम इतर लोकांच्या वर्षभरातील कामाबरोबरचे असे. त्यामुळे माझ्याबरोबर काम करणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांना व वरिष्ठांना माझ्याविषयी तक्रार करण्यास जागा नसे.

दोन वर्षांच्या माझ्या प्रशिक्षणानंतर माझी वाणिज्य मंत्रालयाच्या पूर्ती व निपटान महानिदेशालयात साहाय्यक निदेशक म्हणून नेमणूक झाली. तेथे रुजू झाल्यानंतर, खऱ्या अर्थाने माझ्या तयारीला सुरुवात झाली. तेथील माझ्या वास्तव्यात आलेल्या काही अनुभवांचा माझ्या भविष्यावर खूप मोठा परिणाम झालेला आहे. प्रशिक्षणानंतर मोठ्या उमेदीने मी जेव्हा त्या कार्यालयात रुजू झालो तेव्हा माझी घोर निराशा झाली. माझ्या इतर सहकाऱ्यांना ठीकठाक कार्यालय असताना माझे कार्यालय मात्र एखाद्या खुराड्यासारखे होते. सुस्त विभागप्रमुख, सरावलेले -कामचुकार - बेशिस्त कर्मचारी यामुळे मला सुरुवातीचे काही दिवस काहीच सुचेना. कामाचा थांगपत्ता लागत नव्हता. आमचे निदेशक अशोककुमार तासन्तास त्यांच्या सुंदर खाजगी सचिवांबरोबर बोलत बसत, पण त्यांना इतर अधिकाऱ्यांबरोबर बोलायला वेळ नसे.

दिल्लीमधील मंत्रालयातील कामकाजाविषयींचे माझे अनुभव खूपच कटू आहेत. तेथे कोणाचे कोणाला काही देणेघेणे नसते. अकरा वाजण्याच्या आत  कोणताच स्थानिक कर्मचारी कार्यालयात येत नाही. प्रत्येक कार्यालयात जरुरीपेक्षा जास्त लोकांचा भरणा आहे. वर्ग तीन व

चारचे कर्मचारी - म्हणजे लिपिक, वरिष्ठ लिपिक, शिपाई - यांच्या जमातीचे राज्य सर्व मंत्रालयांवर आहे. त्यांच्या मर्जीवाचून कोणताही कागद इकडचा तिकडे होत नाही. फाईलींची हालचाल होत नाही. अधिकारी लोकांना प्यायला पाणीही मिळत नाही! त्यामुळे ही मंडळी मनाला येईल त्याप्रमाणे वागत असतात. अकरा वाजता कार्यालयात आल्यावर साडेअकराला त्यांची चहाची वेळ होते. मग साडेबारापर्यंत ही मंडळी ऑफिसमध्ये गप्पा मारत बसतात. मग पुन्हा एक वाजता लंच टाईम. मग अडीच-तीन वाजेपर्यंत टाईमपास चालतो, त्या वेळेपर्यंत कार्यालयात तुम्हाला कोणी भेटेल तर शपथ! चार वाजता पुन्हा परतीचे वेध लागतात. महिला मंडळ तर लवकर घरी जाणे हा त्यांचा जन्मसिद्ध अधिकार आहे अशा आविर्भावाने वागत असतात. पाच वाजता शेकडा दहा टक्केही कर्मचारी कार्यालयात आढळत नाहीत.

सुरुवातीला, लोकांना वठणीवर का आणले जात नाही याचे मला नवल वाटत असे. परंतु कार्यप्रणाली अशी झाली आहे, की बडबड करणारी एखादी व्यक्ती आपोआप शांत रहाते. शेवटी, मांजराच्या गळ्यात घंटा बांधायची कुणी हा प्रश्न पडतो. अधिकाऱ्यांची बजबजपुरी असल्यामुळे व वरिष्ठांचा वरिष्ठ अशा भरपूर पायऱ्या असल्यामुळे प्रत्येकाला वाटते, की आपल्या वरिष्ठाने यावर कारवाई करावी आणि सर्वात वरिष्ठ असलेल्या सचिवांना या सर्व गोष्टींचे सोयरसुतक नसते. खालच्या स्तराला काम करणारी मंडळी खूपच वाकबगार असतात व खातिरदारीसाठी आसुसलेल्या दिल्लीतील अधिकाऱ्यांपैकी कोणा एकाची खातिरदारी जरूर करत असतात. त्यामुळे कुणी काही कारवाई केली तर त्याचा वरिष्ठ त्या कारवाईवर काही निर्णय घेत नाही. अजून एक महत्त्वाची बाब म्हणजे सामान्य प्रशासन हा विभाग मंत्रालयीन सेवेत मोडला जातो. तेथील कर्मचारी दिल्लीतच वेगवेगळ्या मंत्रालयांमध्ये बदलून काम करतात. त्यांच्या एका विशिष्ट कार्यपद्धतीमुळे मोठमोठे अधिकारी हतबल होतात. चुकून कधीतरी फिल्डमधून आलेल्या व दिवसाला पंधरा तास काम केलेल्या एखाद्या अधिकाऱ्याला या गोष्टी खटकतात. त्या व्यतिरिक्त सर्वजण गुपचूप सहन करतात व व्यवस्थेचा भाग बनून राहतात.

बऱ्याच महत्त्वाकांक्षी मंत्रालयात देशभ्रमण, परदेशभ्रमण या गोष्टी कशा ठरवल्या जातात व त्यात भाग घेणाऱ्या अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा दृष्टिकोन कसा असतो हे बघितल्यावर मी हताश झालो होतो. काही कार्यालयात जास्तीच्या कामासाठी ‘ओव्हरटाईम’ भत्ता द्यायची पद्धत असते. अशा ठिकाणी कर्मचारी वर्ग सर्व कामे फक्त ओव्हरटाईममध्ये करतात व कार्यालयीन वेळेत काहीच करत नाहीत! देशाचा सर्व कारभार पाहणारी ही मंत्रालये नेमका कशा प्रकारे देश चालवत असावेत याचे मला नेहमी कोडे पडलेले असे. नाही म्हणायला कामे होत असतात. निदेशकापासून सचिवापर्यंतची मंडळी एक-दोन सहायकांना हाताशी धरून कामे करत असतात आणि इतर कर्मचाऱ्यांपैकी साधारणत: दहा टक्के कर्मचारी इमाने इतबारे कामे करतात. इतर मात्र बिनधास्त रामराज्य उपभोगतात! ही मंडळी घरची सर्व कामे कार्यालयीन वेळेत, परवानगी काढून वा न काढून, करत असतात. वरून हक्काची सुट्टी बुडेल म्हणून डिसेंबर व जून महिन्यांत सुट्टीवर जातात. हे वातावरण बघून दिल्लीत सरकारी कार्यालयात काम करणे मला जिवावर येत असे.

माझ्या कार्यालयातील परिस्थिती याहून भयानक होती. सरकारने ते बंद करण्याचा निर्णय कधीतरी घेतला होता. परंतु ट्रेड युनियनच्या दबावामुळे किंवा अजून कोणत्या तरी कारणाने म्हणा, तो निर्णय बारगळला जात होता. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये कार्यालयाबद्दल कोणत्याही

प्रकारची आस्था नव्हती. जो तो आपले तुंबडे कधी भरेल याचा विचार करत असे. काही वर्षांपूर्वी भ्रष्टाचारी म्हणून ते कार्यालय प्रसिद्ध होते. परंतु अलीकडे, आर्थिक उदारीकरणानंतर खरेदी करण्याचे अधिकार विकेंद्रित झाले आहेत. चांगले कडक महानिदेशक आले तर ते तेवढ्यापुरते गैरकारभारावर आळा घालतात, परंतु तरीही वर्षानुवर्षे एकाच कार्यालयात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी तुंबड्या भरायच्या वेगवेगळ्या पद्धती शोधून काढल्या आहेत. त्या समजायला नवीन महानिदेशकाला सहा महिने निघून जातात. तो समर्थपणे कंट्रोल करायला सुरुवात करतो तोपर्यंत त्याची बदली झालेली असते!

घर बांधल्यानंतर दुसऱ्या वर्षी मी जेव्हा मुख्य परीक्षा देऊन घरी आलो तेव्हा माझ्या लग्नाविषयी घरात माझ्यावर दबाव वाढू लागला. मी सततच्या अपयशाने हैराण झालो होतो. प्रत्येक वर्षी कोणत्यातरी विषयात गाडी गडबडत होती. प्रशिक्षणानंतर दिलेल्या परीक्षेत मला पास व्हायचा आत्मविश्वास वाढत होता. काय करावे ते सुचेना. आजूबाजूला मी परीक्षा देणाऱ्या इतर मुलांना बघत होतो. त्यांतल्या त्यात पास झालेल्यांमध्ये लग्न झालेले बरेच तरुण मला दिसत होते. नीळकंठ आव्हाड, श्रीकर परदेशी ही मंडळी लग्नानंतर पास झालेली होती. त्यावेळी माझी तयारी मुख्य परीक्षा व मुलाखतीपुरती सीमित राहिली होती. कारण पूर्वपरीक्षा पास होण्याचे तंत्र मी अवगत केले होते. अशा परिस्थितीत लग्नामुळे आपल्या अभ्यासक्रमात अडथळा येईल असे अजिबात वाटत नव्हते. उलट, परीक्षेदरम्यान काळजी घ्यायला जवळचे कुणीतरी राहील. पैशांची हाव नसल्यामुळे व आय.ए.एस. झाल्यावर आपल्याला चांगली मुलगी मिळेल याची खात्री नसल्याने मी लग्न करण्यासाठी होकार दिला.

मला मध्यमवर्गीय कुटुंबातील, शिकलेली, चांगल्या स्वभावाची व माझी परिस्थिती समजून घेणारी मुलगी हवी होती. मला नेहमी एका गोष्टीची भीती वाटत असे, की मोठ्या घरातून आलेल्या मुलीने आपल्याला समजून घेतले नाही, आईवडिलांना चांगली वागणूक दिली नाही किंवा बहिणींशी नीट व्यवहार केला नाही तर आपल्या जीवनाला काही अर्थ उरणार नाही. मला काही वेळा वाटे, एखाद्या गरीब घरातल्या किंवा अधू-अपंग मुलीशी लग्न करावे आणि तिला जगातील शक्य असलेल्या सर्व गोष्टी उपलब्ध करून द्याव्यात. हे सर्व विचार शेवटी मनातच राहिले. हळूहळू, लग्नासाठी प्रस्ताव येऊ लागले. माझ्यावर आजुबाजूच्या बऱ्याच लोकांना नजरा होत्या. ते सर्व माझ्यावर लक्ष ठेवून होते, की मी कधी येतो व लग्न करायला होकार देतो. गावाकडे लग्ने ओळखीपाळखीतून होतात. कुठूनतरी दोघांचे धागेदोरे जुळणे गरजेचे असते. शिवाय, विशिष्ट गावे, विशिष्ट कुळे लग्नासाठी वर्ज्य असतात. आमच्या गावातल्या गावात तर अस्तित्वात असलेली चार कुळे एकमेकांना हलकी समजत व म्हणून लग्नसंबंध जुळवायला अयोग्य ठरत.

शेवटी, दिल्लीला जाण्यापूर्वी एक प्रस्ताव नजरेपुढे आला. मुलीचे नाव स्मिता होते. चेहऱ्यावरील भाव काहीतरी सुचवत आहेत अशी जाणीव होत होती. तो प्रस्ताव माझी मधली बहीण, उषाकडून आलेला होता. का कुणास ठाऊक? मला त्या मुलीला बघावेसे वाटले, दोन दिवसांतच त्या मुलीला बघायला जायचा निर्णय झाला. माझ्याबरोबर बापू येणार होता. तो दिवस मला स्पष्ट आठवतो. मुलगी चाळीसगावला राहात होती. सकाळी सकाळी तेथे पोचलो. त्यांच्या घरात शिरल्यावर आपलेसे वाटू लागले. शेवटी, मुलगी बघण्याचा औपचारिक, नाट्यमय कार्यक्रम झाला. स्मिता साडीत बळजबरीचे स्मित करत आमच्यापासून काही अंतरावर येऊन बसली. मला

ती स्पष्ट दिसत होती. सर्वांचे लक्ष आम्हा दोघांकडे होते. मला सारखे जाणवत होते, की आजूबाजूला बसलेले सर्वजण माझ्याकडे बघत आहेत आणि मी मुलीकडे किती वेळ व कसा बघतो याचे निरीक्षण करत आहेत. बापूने संभाषण सुरू करण्यासाठी म्हणून तिचे नाव विचारले व पुढची जबाबदारी माझ्यावर सोपवली. मी जुजबी काही प्रश्न विचारले व तिलाही मला विचारण्याविषयी सुचवले.

एकंदरीत, वडील नसलेल्या त्या घरातील लोकांचे वागणे-बोलणे मला भावले. स्मिताचे व्यक्तिमत्त्व, तिचा सरळ स्वभाव व स्पष्टोक्ती मला आवडली, मी मनातून खूपच आनंदी झालो असे नाही, परंतु नाव ठेवायलाही आम्हाला काही सापडले नाही. नंतर, लगेच मी दिल्लीला निघून गेलो. पुढच्या प्रक्रिया आपोआप सुरू झाल्या. बऱ्याच मंडळींना मी कधी आलो-कधी मुलगी बघितली व कधी होकार दिला याचा थांगपत्ताही लागला नाही. पुढे संभाषणातून व ई-मेलने मी स्मिताला माझ्या भूत, भविष्य व वर्तमानकाळाविषयी कळवत राहिलो. माझ्या आय.ए.एस.च्या स्वप्नाविषयी व एकंदरीत आर्थिक अडचणीं-विषयी आणि पुढे भविष्यातील माझी अर्धांगिनी म्हणून तोंड द्याव्या लागणाऱ्या समस्यांविषयी मी तिला पूर्ण कल्पना दिली आणि नंतरचा निर्णय तिच्यावर सोपवला. हुंड्याची मला चीड असल्यामुळे आमच्या लग्नात हुंड्याचा प्रश्नच उद्भवला नाही. माझा शेवटचा निकाल लागल्यानंतर जून महिन्यात लग्न करण्याचे ठरले.

अशा पद्धतीने, मी जीवनाच्या एका विशिष्ट वळणावर येऊन पोचलो.

माझी अस्वस्थता कमी होत नव्हती. मी जे काम करत होतो त्यातून मला समाधान मिळत नव्हते. आपला वेळ निरर्थक जात आहे याची राहून राहून जाणीव होत होती. परंतु सध्यातरी माझ्यापुढे पर्याय नव्हता. माझे लक्ष मार्चमधील मुख्य परीक्षेच्या निकालावर लागले होते. दिल्लीत माझ्याबरोबर भारतीय माहिती सेवेतील (India Information Service) विजय पिंगळे व भारतीय व्यापार सेवेतील (Indian Trade Service) मधील रवी पाटील ही मंडळी होती. आम्ही रोज संध्याकाळी व सुट्टीच्या दिवशी मुलाखतीसाठी तयारी सुरू केली. विजयची बायको सुषमाही आम्हाला मदत करत असे. आम्ही एकमेकांना अनेक प्रश्न विचारून मुलाखती घेत असू. मनात जे येईल ते एकमेकांना विचारत होतो. आम्हाला त्या सरावाचा खूप फायदा झाला. व्यवस्थित उत्तरांपासून, कमी शब्दांत, कमी वेळेत उत्तर कसे द्यायचे यांविषयी अंदाज आला. शिवाय, आम्ही एकमेकांची उत्तरे टेप करून बघितली, तेव्हा अनेक चुका बाहेर आल्या. मुलाखत देणे व यशस्वी होणे ही एक कला आहे. जोपर्यंत तुम्ही तुमच्या उत्तरांमधून मुलाखत घेणाऱ्यांशी संवाद साधत नाही तोपर्यंत त्यांना तुमच्याबद्दल पूर्ण कल्पना येऊ शकत नाही.

आमचे स्नेही नीळकंठ शेळके यांनी ही कला चांगलीच अवगत केलेली होती. तुमचे शिक्षण, मूळ जागा, नोकरी पत्करण्यामागील कारणे, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी व तुमचा शिक्षणाचा विषय यांभोवती मुलाखतीतील संदर्भ फिरत असतात. तत्परता, निर्णय घेण्याची क्षमता, अधिकाऱ्यासाठी लागणारी सहिष्णुता, लोकांसाठी काम करण्याची तयारी, त्यांच्या समस्या सोडवण्याची इच्छाशक्ती या व इतर गोष्टींचे प्रदर्शन मुलाखतीत अपेक्षित असते. शेळक्यांच्या मते, मुलाखतीत त्यांना जे व जेवढे पाहिजे असते तेवढे आपण दाखवले पाहिजे. यामुळे ते त्यांना जे बोलायचे आहे ते न बोलता, जे मुलाखतकारांना बरोबर आहे असे वाटते ते नेहमी बोलत असत. एखाद्या गोष्टीशी ते सहमत नसले तरी ती असहमती मुलाखतीमध्ये ते दाखवत नसत. या आणि इतर गोष्टींची ओळख मला मुलाखतीची तयारी करताना झाली.

शेळक्यांची वेळोवेळी मदत आणि विजय-रवीबरोबरची तयारी यामुळे आत्मविश्वास द्विगुणित झाला. आपण कोणत्याही प्रश्नाचे उत्तर व्यवस्थित देऊ शकतो याबद्दल मला खात्री झाली. मी गावातून आलेला लाजरा, अडखळणारा मुलगा राहिलेला नव्हतो. तीन-चार वर्षांपासूनच्या माझ्या भटकंतीने व वेळोवेळी सामोऱ्या आलेल्या अपयशाने मला खंबीर बनवले होते. आत्मकेंद्री असणारा मी आता खुललो होतो. प्रसंगानुरूप भावनिक होणारा मी आता तटस्थ व व्यावहारिक झालो होतो. मी ज्या वातावरणात राहत होतो ते वातावरणही त्या बदलांना जबाबदार होते. मला कळून चुकले होते की, लोकांमध्ये, लोकांसाठी काम करायचे म्हणजे एक विशिष्ट दृष्टिकोन व मानसिक व्यावहारिक जडणघडण गरजेची आहे.

मी आतुरतेने निकालाची वाट पाहात होतो. शेवटी, तो दिवस उगवला. कुणीतरी यावे आणि आपल्या कानात पास झाल्याची बातमी द्यावी असे वाटत होते. परंतु तसे काही झाले नाही. ऑफिसमध्ये असतानाच, दुपारी रवीचा फोन आला व त्याने तो पास झाल्याची बातमी दिली. मी तसाच संघ लोकसेवा आयोगाच्या कार्यालयात गेलो. गेटजवळच्या नोटिसबोर्डाजवळ निकाल लावलेला होता. बरीच मुले मधमाश्यांसारखी त्याजवळ लटकलेली होती. त्यातून शोधताना शेवटी एकदाचा माझा नंबर दिसला. आपण अजून एक पायरी पार केल्याचे समाधान झाले. मी आणि माझे ध्येय यात फक्त मुलाखत हा टप्पा राहिला होता. आम्ही तिघांनी मुलाखतीची तयारी सुरू केली. आमच्यामध्ये रवी पाटील नेहमी जास्त आत्मविश्वासात राही. कधी कधी तर, आम्हालाच त्याची भीती वाटत असे. आय.ए.एस. व्हायच्या आधी ईमेलच्या पत्त्यात तसे लिहिणारी ही वल्ली होती!

मला कोणत्याही परिस्थितीत ही संधी घालवायची नव्हती. मी माहिती जुळवायला सुरुवात केली. नोकरी, जिल्हा, अभ्यासाचे विषय यांवर विचारल्या जाऊ शकणाऱ्या प्रश्नांची उजळणी केली. मुख्य परीक्षेच्या निकालानंतर, दिल्लीत मुलाखतीसाठी मार्गदर्शक वर्गांचा बाजार भरलेला असतो. मुलाखतीसाठी पात्र ठरलेला उमेदवार आपले उत्कृष्ट प्रदर्शन होण्यासाठी काहीही करायला तयार असतो. त्याच्या त्या मन:स्थितीचा क्लासवाल्यांना फायदा होतो. ही मंडळी मोठमोठी आश्वासने देऊन आठ दिवसांसाठी हजारो रुपये उकळत असतात. त्यांचा खूप काही फायदा होत नाही हे माहीत असूनही बरेचजण त्यांच्याकडे जात असतात. कारण हेच, की अपयशी झाल्यावर वाटायला नको की, क्लास केला नाही म्हणून अपयशी झालो! आम्ही या क्लासला ‘कोंबडा कापण्याची’ उपमा देत असू.

मुलाखतींबद्दल वेगवेगळ्या अफवा, किस्से वाऱ्यावर असतात. दरवर्षी चार ते पाच मेंबर मुलाखती घेतात. कोणते बोर्ड कसे याविषयी चर्चा चालू असते. कोण-किती गुण देत आहेत? कसे प्रश्न विचारत आहेत? यावर्षी प्रश्नांचा ओघ कोणत्या दिशेने आहे? याबद्दल खुसपुस चालू असते. एकदाच्या आमच्या मुलाखती व्यवस्थित पार पडल्या.

मुलाखत देऊन आलेल्या मुलांचे अनुभव ऐकणे मजेशीर असे. त्यासाठी मी महाराष्ट्रीय मुले येथे त्या दरम्यान राहायला असतात त्या महाराष्ट्र भवनमध्ये जात असे. मुलाखती महिनाभर चालतात, त्यानंतर तीन-चार दिवसांत निकाल लागतो. दरम्यान स्मिताच्या भावाचे, उमेशचे लग्न असल्यामुळे मी त्यासाठी दोन दिवस घरी गेलो होतो. मी मे महिन्यातील खानदेशाच्या उन्हात चांगलाच होरपळलो, स्मिताची भेट झाली, पण माझी प्रकृती खालावल्याची जाणीव होत होती. शेवटी, मला तसेच दिल्लीला परतावे लागले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी आमचा शेवटचा

निकाल लागला.

परीक्षेचे गणित एवढे विचित्र असते की, शेवटचा निकाल लागल्यावर लगेच आठ दिवसांत पुढची पूर्वपरीक्षा असते. मी मुख्य परीक्षेत व मुलाखतीस यावेळेस जीव ओतलेला होता. नोकरी, अभ्यास व त्याबरोबर घरसंसार - ही कसरत थांबावी असे वाटत होते. लग्नाआधी आपण पास झाल्यास बोहल्या-बरोबर आयुष्यात एका वेगळ्या प्रवासाला सुरुवात होईल असे वाटत होते. परंतु नियतीच्या मनात काही वेगळेच होते. रेल्वेचा प्रवास करून सकाळीच दिल्लीला उतरलो तेव्हा प्रचंड थकवा आलेला होता. तब्येतीत बिघाड झाल्याचे स्पष्ट जाणवत होते. गेल्या दोन दिवसांपासून अन्न पचत नव्हते. त्यादिवशी, मी ऑफिसमध्ये उशिराच गेलो. येणारा-जाणारा माझ्या पडलेल्या चेहऱ्याकडे बघून विचारपूस करत होता. तुमचे डोळे एवढे पिवळे का म्हणून चौकशी करत होता. मला शंका आली, मला कावीळ तर झाली नाही ना? मी पुन:पुन्हा आरशात बघून, खात्री करून घेत होतो. दुपारी कँटीनमध्ये खाण्याचा प्रयत्न केला, पण खाली काहीच उतरले नाही. दुपारनंतर विजयचा फोन आला. त्याने आपला निकाल लागत आहे म्हणून मला कळवले. मी तसाच शहाजहान रोडला निघालो. विजय डॉक्टर असल्यामुळे माझ्याकडे बघून त्याने तत्काळ निदान केले की मला कावीळ झाली आहे. माझ्या पायाखालची जमीन सरकल्याचा भास झाला. जणू निकालात आपण नापास होऊ व लगेच होणारी रविवारची परीक्षा आपल्याला देता येणार नाही, अशी शंकेची पाल माझ्या मनात चुकचुकली.

निकालासारख्या महत्त्वाच्या वेळेस मला अस्वस्थता जाणवू लागली, अंगाला प्रचंड घाम फुटू लागला. निकाल जाहीर होण्यापूर्वी यु.पी.एस.सी. भवनातून सर्वांना बाहेर काढले जाते आणि नंतर भवनात चार-पाच ठिकाणी निकाल चिकटवल्यानंतर गेट उघडले जाते. गेट उघडल्यानंतर, जमलेली मंडळी सिनेमात दिसणाऱ्या युद्धाप्रमाणे जोरात नोटिस बोर्डावर तुटून पडतात. मला एवढी धावपळ करण्याचे त्राण उरलेले नव्हते. मी सर्व मंडळी गेल्यावर हळूच त्यांच्यामागून गेटमध्ये शिरलो. तोपर्यंत नोटिस बोर्डांवर पाहून यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांची आरडाओरड सुरू झाली होती. मी गर्दीत जागा करून माझे नाव तालिकेत शोधू लागलो. विजयचे नाव सापडले. रवीचे नाव सापडले, पण माझे नाव सापडेना. शेवटी राजेश सापडला, पाटील सापडला, परंतु राजेश पाटील असे एकत्र नाव कुठे दिसेना! मी समजायचे ते समजलो.

विजयचे नाव खूप वर होते, नाव न सापडल्याचा धक्का मला लगेच जाणवला नाही. मी सरळ घरी आलो. घरी आल्यावर निकाल लागला आहे व आपले नाव त्यात नाही याची जाणीव झाल्यावर मनात तीव्र आक्रोश सुरू झाला. एवढ्या मेहनतीनंतरही आपण अपयशी झालो याचे प्रचंड दु:ख झाले. स्मिताला व ताई-अण्णांना तसे कळवले. सर्वांनी मला धीर देण्याचा प्रयत्न केला. मला भविष्य धूसर दिसू लागले. यापूर्वी प्रत्येक परीक्षेच्या वेळी, माझी येणाऱ्या पुढच्या परीक्षेसाठी तयारी चालू असे. या परीक्षेत बऱ्याच जणांना दोन-तीन गचके खावे लागतात. ते अपेक्षित असते. परंतु यावेळेस लग्नाच्या गडबडीमुळे व पास होण्याच्या खात्रीमुळे मी थोडा निश्चिंत होतो आणि वर आता, काविळीचे आजारपण! खूप वर्षांपासून ह्दयाशी जपून ठेवलेले स्वप्न चकणाचूर होणार असे वाटू लागले. मी आय.ए.एस. व्हायचे ठरवले तेव्हापासून मी फक्त परीक्षेचा व नंतर करायच्या कामाचा विचार करत असे. खूप वर्षांपासून, मी ताईला 'कलेक्टरची आई' म्हणत असे आणि तिला वेळोवेळी आश्वासन देऊन ते स्वप्न साकार करणार याची खात्री देत असे. मला ते सर्व आठवू लागले.

त्यादिवशी शेळके माझे सांत्वन करण्यासाठी म्हणून खास आला होता, पण माझे सांत्वन कुणीही करू शकत नव्हते. त्या रात्री मी झोपू शकलो नाही, रात्रभर वेगवेगळे विचार माझ्या मनात येऊ लागले. सद्यस्थितीत माझ्यापुढचे महत्त्वाचे आव्हान म्हणजे सात दिवसांवर येऊन ठेपलेली, पुन्हा प्रयत्नाचा पहिला टप्पा, म्हणजे पूर्वपरीक्षा होती. डॉक्टरांनी मला दहा दिवस संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला. घरच्या मंडळींना माझी खूप काळजी लागली होती. ताईला माझ्याजवळ यावेसे वाटत होते. बऱ्याच जणांनी मला, त्यावर्षी परीक्षा न देण्याविषयी सल्ला दिला. परंतु मला खात्री होती की, आपण जर यावेळी विश्रांती घेतली तर आपणास आपल्या स्वप्नांवर कायमचे पाणी फिरवावे लागेल. कोणत्याही परिस्थितीत याच वर्षी व रविवारची परीक्षा द्यायचे असे मी ठरवले आणि वाचण्याची सर्व सामग्री पुन्हा बाहेर काढली.

पुढे सात दिवस मी अंथरुणावर पडून, ग्लुकोजचे पाणी पीत-पीत वाचत राहिलो. ते सात दिवस मला सात वर्षांसारखे वाटले. रात्री झोप नाही, एकटेपणा व निराशेने मी पुरता ग्रासला गेलो होतो. परंतु मला सर्व समस्यांचे निवारण परीक्षेत दिसत होते. मी पुन्हा एकदा संपूर्ण जोर लावून अभ्यास करण्याचे ठरवले. झालेल्या चुका, उणिवा दूर करून परत प्रयत्नांना लागण्याचे ठरवले. मधूनमधून येणारे स्मिता, बापू व विजय यांचे फोन मला धीर देत आणि माझा उत्साह वाढवत. परीक्षेच्या दिवशी, मी ग्लुकोजच्या तीन बाटल्या बरोबर घेतल्या. परीक्षा केंद्रावर माझ्यात त्राण राहिले नव्हते; बसल्यावर उठायचीही इच्छा होत नव्हती. मी परीक्षा सुरू व्हायच्या आधी घटघट एक बाटली पिऊन टाकली आणि नंतर दिवसभर घोट घोट ग्लुकोज पीत पेपर दिला. सुदैवाने, ती परीक्षा आतापर्यंत झालेल्या माझ्या सर्व परीक्षांपेक्षा चांगली झाली. परीक्षा देऊन आल्यावर एक नवा उत्साह अंगात संचारला.

## ताई, मी कलेक्टर व्हयनू

काविळीतून पूर्णपणे बरा होण्यासाठी मला दोन महिने लागले. जून महिन्याच्या शेवटी माझे लग्न झाले. वैवाहिक जीवनाची सुरुवात महालक्ष्मीच्या, कुलदैवताच्या दर्शनाने झाली. मी लग्नाबद्दल कधीही फार विचार केलेला नव्हता किंवा खूप उत्साहीदेखील नव्हतो. त्या काळात माझे पूर्ण लक्ष परीक्षेकडे होते. जोपर्यंत पास होत नाही तोपर्यंत मला अपूर्णता वाटत राहिली. लग्नाबद्दल मनामध्ये नेहमी भीती वाटत राहायची. येणारी मुलगी आपल्याबरोबर सर्व बाबतीत तडजोड करेल का? आपल्या अडचणी समजून घेईल का? असे वाटत राही. परंतु माझ्या सर्व शंका स्मिताच्या येण्याने फिटून झाल्या. साखरेचा खडा पाण्यात टाकल्यावर जसा विरघळून जातो व आपला गोडवा संपूर्ण पाण्याला देतो, तशी ती माझ्या कुटुंबात विरघळून गेली आणि आम्हा सर्वांशी एकरूप झाली.

मला दिल्लीत 'प्रगती विहार' या, अधिकाऱ्यांसाठी असलेल्या, घरांच्या समूहात पाचव्या मजल्यावर छोटेसे घर मिळाले आणि आमचा संसार सुरू झाला. येणारा प्रत्येक दिवस खूप आनंदात जात होता. परंतु दिल्लीला येऊन दहा दिवस होत नाहीत तोपर्यंत पूर्वपरीक्षेचा निकाल लागला. यावेळेस घरची मंडळी सोडली तर मी कुणालाही पास झाल्याचे कळवले नाही. बऱ्याच मंडळींचा, मी कोणती परीक्षा पास झालो व कोणती देणार आहे, याचाच गोंधळ होत असे. काही महाभाग फुकटचा सल्ला देत. काही 'आता भरपूर झाले, कितीदा परीक्षा देतोय, चांगली नोकरी आहे व वर, आता लग्न झाले आहे' असा टोमणा द्यायला कमी करत नसत.

स्मिताच्या सहकार्याने मी मुख्य परीक्षेचा अभ्यास पुन्हा एकदा सुरू केला. मागील परीक्षेच्या मार्कांवरून मला काही गोष्टींचा अंदाज आला होता. माझे निबंधात गुण वाढत नव्हते! शिवाय, सामान्य अध्ययन चांगले असूनही त्यात पाहिजे तेवढे गुण येत नव्हते. मी या गोष्टींचा बारकाईने अभ्यास केला. यशस्वी झालेल्या काही मित्रांचा सल्ला घेतला. मला निबंध चांगला लिहूनही कमी गुण का मिळतात याचे कारण हळूहळू उमगले. मी कामाला लागलो. मी सर्व चूक स्वत:मध्ये शोधत होतो. कारण माझ्या मते, माझी कामगिरी उंचावण्याचा तोच मार्ग होता.

दुसरी महत्त्वाची गोष्ट माझ्या लक्षात आली, की मी त्या आधी परीक्षा खूप दडपणाखाली देत असे. स्वत:पासून खूप अपेक्षा ठेवत असे, त्याचा प्रत्यक्ष परिणाम माझ्या प्रदर्शनावर होत असे. दडपणामुळे माझ्यातील संपूर्ण क्षमतेचा वापर होत नसे. स्मितामुळे म्हणा किंवा अजून कोणत्या गोष्टीमुळे म्हणा, मला यशापयशाचे दडपण वाटेनासे झाले. आपल्याकडून जेवढे व्यवस्थित प्रयत्न व्हावे तेवढे केल्यानंतर त्याच्या परिणामाविषयी विचार न करण्याचे मी स्वच्छ भावनेने ठरवले. त्यामुळे मला पराकोटीची मनाची शांतता मिळाली. त्यापूर्वी माझी अवस्था दडपणामुळे एखादा बोजा घेऊन वावरल्यासारखी होत असे.

परीक्षेची तयारी सुरू केल्यावर आपण पहिल्या किंवा दुसऱ्या प्रयत्नात यशस्वी होऊ असे वाटत होते. परंतु पहिली परीक्षा दिल्यावर एका झटक्यात मी जमिनीवर आदळलो. परीक्षा अपेक्षेपेक्षा खूपच कठीण होती. आपण परीक्षेच्या गणितात खूप मागे आहोत याची तीव्रतेने जाणीव झाली. पुढे जसाजसा मी अपयशी होत गेलो तशी माझी अपयशाकडे बघण्याची दृष्टी बदलत गेली. सुरुवातिला हृदयाने विचार करणारा मी नंतर डोक्याने विचार करू लागलो.

अपयशाची कारणे इतर कुठेही न शोधता मी त्यांची कारणमीमांसा करायला शिकलो.

कोणत्याही ध्येयपूर्तीसाठी व कार्यसिद्धीसाठी काही प्रमाणात अनिश्चितता सोडल्यास मूलबद्ध नियोजनाबरोबर आवश्यक असतात ते सातत्यपूर्ण प्रयत्न. याला जोडून त्या कामासाठी वा कार्यासाठी लागणारे गुण अंगीकारणे तेवढेच महत्वाचे असते. बऱ्याचदा प्रयत्नांबरोबर कार्यसिद्धीसाठी उपलब्ध असलेली योग्य साधनसामुग्री व त्याची क्वालिटीही तितकीच महत्त्वाची असते. अपयश हे सहसा या सर्व गोष्टींच्या अयोग्य जुळवाजुळवीमुळे उद्भवते असे म्हणावे लागेल.

स्पर्धा परीक्षेच्या बाबतीत म्हणायचे झाल्यास परीक्षेला लागणारी मानसिकता, नियोजन व परीक्षेच्या अपेक्षित असलेल्या घटकांची परीक्षाकेंद्रात झालेली पूर्तता उमेदवाराचे यशापयश ठरवत असते. यामुळे एखादा उमेदवार अयशस्वी झाला म्हणजे तो परीक्षेला अपेक्षित असलेल्या साच्यात त्या सर्व घटकांची परीक्षाकेंद्रात पूर्तता करू शकला नाही असे म्हणता येईल. परंतु तोच उमेदवार इतर परीक्षेत व जीवनात सर्व क्षेत्रांमध्ये अयशस्वीच होईल असे नाही. किंबहुना परीक्षा देतादेता उमेदवाराच्या व्यक्तिमत्त्वाला वेगवेगळे पैलू पडत असतात. अयशस्वी उमेदवार मानसिकदृष्ट्या अधिक खंबीर व जबाबदार होतात. माझ्या मते जे सर्व उमेदवार अपयशानंतर यशस्वी होतात ते जास्त मॅच्युअर व मानसिकरीत्या जास्त कणखर असतात. भारतीय सनदी सेवेची परीक्षा देताना प्रत्येक उमेदवाराला भारतीय संविधानापासून राज्यव्यवस्था, नागरिकशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, इतिहास व चालू घडामोडी यांचा कसून अभ्यास करावा लागतो. यामुळे त्याच्या सर्वांगीण ज्ञानात तर भर पडतेच परंतु त्याची विचार करण्याची कक्षा रुंदावते. तो परीक्षेत अयशस्वी झाला तरी देशाचा एक सुजाण व जबाबदार नागरिक म्हणून निश्चितच बाहेर पडतो.

माझ्या माहितीतले असे बरेच उमेदवार आहेत ज्यांनी स्पर्धा परीक्षेत अपयशी झाल्यानंतही जीवनाच्या इतर क्षेत्रांमध्ये डोळे दिपवणारी प्रगती केली आहे. काही यशस्वी पत्रकार आहेत, तर काही व्यावसायिक तर काहींनी सॉफ्टवेअर, बायोटेक अशा उदयोन्मुख क्षेत्रात अमाप नाव व पैसा कमावलेला आहे. त्यामुळे आपण अयशस्वी जरी झालो तरी जीवनात आपल्याला करण्यासारखे काहीच नसेल असे कधीच वाटले नाही. किंबहुना ज्या दिवसापासून मी अपयशाचा असा विस्तारित अर्थ लावायला सुरुवात केली तेव्हा मन थोडे हलके राहू लागले.

जीवनातील काही मौल्यवान वर्षे व त्याचबरोबरच अनेक मौल्यवान क्षण परीक्षेला अर्पण केल्यानंतही जर अपयश पदरी पडत असेल तर त्या उमेदवाराची अवस्था खूपच केविलवाणी होते. बऱ्याचदा परीक्षेच्या या झंझावातात जुजबी अभ्यास करणारे व साधारण कुवत असलेले काही उमेदवार परीक्षा पास होतात. अशा वेळेस अपयशाचा फटका जास्तच जिव्हारी लागतो. माझ्या माहितीतले असे अनेक जण आहेत, ज्यांनी परिक्षेची एबीसीडी इतरांना शिकवली व ते मागे राहिले व इतर परीक्षेच्या यादीत जाऊन बसले. अशा परिस्थितीत अपयश पचवणे थोडे कठिण जाते. आय.ए.एस. व आय.पी.एस. न मिळाल्यास जीवन काही संपत नाही. आजच्या परिस्थितीत खूप नवीन वाटा पुढे आल्या आहेत. प्रशासनाबरोबर इतर अनेक माध्यमातून भरीव काम करता येऊ शकते. शेतीपासून सुरुवात केल्यास फूड प्रोसेसिंग, अॅग्री मार्केटिंग, बायोटेक्नॉलॉजी यात आव्हानात्मक संधी उपलब्ध होत आहेत. याशिवाय मोठ्या शहरांमध्ये आयटी, हॉटेलिंग, रिअल इस्टेट व इतर सर्व्हिस क्षेत्रात खूप चांगल्या संधी तरुणांची वाट बघत आहेत. शेवटी राजकारणही आहेच. गल्लीपासून दिल्लीपर्यंत प्रामाणिक, सचोटीच्या व लोकांसाठी काम करणाऱ्या, दूरदर्शी विचारांच्या तरुणांची देशाला गरज आहे. अशा परिस्थितीत प्रशासनामध्ये शिरण्यास अपयश आले म्हणून रडत न बसता नवनवीन क्षितिजे पादाक्रांत करण्यासाठी नव्या दमाने तयारीला लागणे

यातच खरी मर्दुमकी आहे.

स्मिताच्या हातचे व्यवस्थित व वेळेवर खाणे, व्यवस्थित झोपणे आणि भरपूर अभ्यास करणे असा माझा दिनक्रम सुरू झाला. तिला मात्र काही वेळा खूप कंटाळा येत असावा, कारण लग्नाच्या दहा दिवसांनंतर लगेच माझे अभ्यासाचे रामायण सुरू झाले होते.

मी परीक्षेला एक महिना असताना सुट्टी घ्यायचे ठरवले. परंतु मला नेहमी मदत करणाऱ्या वरिष्ठ मिढाबाईंनी मला सुट्टी द्यायला स्पष्ट नकार दिला. माझी तर झोपच उडाली! कारण सुट्टीविना अभ्यास करणे अवघड होते. मी नाईलाजाने ऑफिसमध्ये जात होतो, पण सर्व लक्ष अभ्यासाकडे होते. त्या दरम्यान, माझ्या सहकाऱ्यांनी मला बरीच मदत केली. माझे ऑफीस म्हणजे मासळी बाजार होता, त्यामुळे मधेच कुणीतरी येणार, उगाच बोलत बसणार. मलाही ऑफिसमध्ये असताना कोणाला नकार देणे जिवावर जात असे. आपले पहिले कर्तव्य आपले काम आहे अशी बोचणी सतत होत राही. त्यामुळे माझी घुसमट होई. घरी आल्यावर मर्यादित अभ्यास होत असे. जसजसा एकेक दिवस जाऊ लागला तशी माझी अस्वस्थता व हतबलता वाढू लागली. लवकर काहीतरी करणे गरजेचे होते. मला स्पष्ट दिसत होते की, जर आपण यावेळी परीक्षा देऊ शकलो नाही तर कधीही देऊ शकणार नाही. शेवटी, परीक्षेला एक महिना राहिला असताना मी आजारच्या नावावर खोटी सुट्टी घेतली, माझ्याजवळ दुसरा कोणताही मार्ग नव्हता. दोन दिवस खूप त्रास झाला, परंतु मला आय.ए.एस. बनायचे होते आणि त्यासाठी मी कोणत्याही प्रकारचा धोका पत्करायला तयार होतो.

मला सुटी न देण्यामागचे कारण काही वेगळे होते. मी रुजू झाल्यानंतर विभागामध्ये बऱ्याच गोष्टी कार्यान्वित केल्या होत्या. विभागाची प्रकाशने सीडी-रॉमच्या माध्यमात उपलब्ध करून दिली. बंद पडलेले रिपार्ट सुरू करण्यात, संगणकीकरणात माझा पुढाकार होता. यावेळीही महत्त्वाची सर्व कामे मी आधीच करून ठेवलेली होती. परंतु वरिष्ठांपैकी कुणालाही मी पास व्हावे व पुढे जावे असे मनापासून वाटत नसे. त्यावेळची त्यांची प्रतिक्रिया मला अनपेक्षित होती.

दिल्लीत भेटलेले मूळचे खानदेशातलेच विनायक चव्हाण या गुप्तचर खात्यातल्या माझ्या मित्राने त्या काळात मला खूप धीर दिला. कार्यालयात काम करतानाही अभ्यास कसा साधता येऊ शकतो, याविषयी त्यांनी मला छान टिप्स दिल्या होत्या. त्यांच्या मजेशीर व विनोदी स्वभावापासून मी भरपूर शिकलो. त्यांच्याशी स्वत:ची तुलना केल्यावर जाणवले की, मी जीवनाचा आनंद उपभोगत नाही, माझे लक्ष फक्त शिखरावर किंवा समस्येकडे असते, तिचे निवारण करण्यात किंवा गाठण्यात माझी संपूर्ण शक्ती खर्च होत राहिली. शिवाय, दरम्यान मी स्वत:वर एवढा दबाव टाकतो व स्वत:चे एवढे शोषण करतो की, माझी यात्रा खूपच कष्टमय व त्रासदायक होते. मी विनायककडून जीवनातील समस्यांकडे खेळकर दृष्टीने बघायला शिकलो.

अखेर, शेवटची लढाई सुरू झाली. जसजशी परीक्षा जवळ येऊ लागली तसतसा माझा आत्मविश्वास वाढू लागला. सर्व काही सुरळीत चालले होते. परीक्षा संपल्या संपल्या आमच्याकडे पाहुण्यांचा लोंढा सुरू झाला. एकानंतर एक असे आलटून पालटून पाहुणे येत होते. आम्हीही यजमानाची भूमिका आनंदाने पार पाडत होतो. कुण्या एके काळी मला लग्नाविषयी व त्यानंतरच्या आयुष्याविषयी भीतीयुक्त शंका येत असे. आपले घर कसे चालेल, आपण मिळालेल्या पैशांत व्यवस्थित घर चालवू शकू किंवा नाही? आई-वडिलांच्या गरजा, त्यांच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करू किंवा नाही? यांसारख्या विचारांनी मी वेढला जात असे. परंतु सर्व काही सुरळीत होत

गेले. अडचणी येत होत्या; कोणत्यातरी प्रकारे त्यांचे निवारण होत होते.

दिल्लीत जीवनमानाचा दर्जा एकदम उंचावून गेला. सरकारी निवासस्थानात, शहराच्या केंद्रीय भागात राहिल्यामुळे सर्व महत्त्वाच्या इमारती, प्रेक्षणीय स्थळे बघता आली. आम्ही वाटेल तेव्हा इंडिया गेट, राजघाट व इतर स्थळांना भेटी देत असू. सांस्कृतिक कार्यक्रम, वेगवेगळी शास्त्रीय नृत्ये, फिल्म फेस्टिवल्स, नाटके यांची दिल्लीत वर्षभर रेलचेल असते. आयुष्यात पहिल्यांदा या सर्व गोष्टींचा मनमुराद आस्वाद घेता आला. समाधानाची घटना म्हणजे ताई व अण्णांना मी दिल्ली दाखवली. त्यांनी आयुष्यात कधी दिल्लीपर्यंत पोचण्याचा विचारही केला नव्हता. आईने आमच्याबरोबर प्रजासत्ताक दिनाची परेड बघितली, राजपथावरचे ते शाही वैभव बघून तिचे डोळे पाणावले.

एके दिवशी अचानक स्मिताला वेगळा त्रास होऊ लागला व आम्हाला येणाऱ्या नवीन पाहुण्याची चाहूल लागली. दिवस कसे वेगाने पालटत होते! परीक्षेनंतरचे तीन महिने खूप वेगाने निघून गेले. निकालाचे वेध लागले. मुलाखतीची तयारी सुरू झाली. त्यावर्षी मुलाखतीच्या तयारीला मी एकटा होतो. आधीच्या वर्षी रवी व विजयमुळे तयारीला खूप फायदा झाला होता. मी माझा सर्व अनुभव पणाला लावून व्यवस्थित तयारी आरंभली. पूर्वी झालेल्या चुका, नवीन संदर्भ यांचे व्यवस्थित विश्लेषण केले. एवढे असूनही मी जेव्हा सरावासाठी म्हणून एक-दोन ठिकाणी मुलाखती दिल्या तेव्हा मुलाखत घेणाऱ्यांच्या प्रतिक्रिया माझ्याबाबतीत तेवढ्या चांगल्या नव्हत्या, परंतु मी माझ्या तयारीवर खूश होतो. कधी नव्हे एवढा आत्मविश्वास मला वाटत होता.

बघता बघता, मुख्य परीक्षेच्या निकालाचा दिवस जवळ आला. यु.पी.एस.सी.च्या कोणत्याही परीक्षेबद्दल नेहमी अनिश्चितता असते. परीक्षा कितीही चांगली झाली तरी आपले नाव यु.पी.एस.सी.च्या नोटिस बोर्डावर जोपर्यंत कुणी बघत नाही तोपर्यंत तो सुटकेचा नि:श्वास सोडू शकत नाही. नेहमीप्रमाणे त्या दिवशी मी ऑफिसमध्ये होतो; वरिष्ठांबरोबर एका मीटिंगमध्ये बसलो होतो. शरीराने मी त्यांच्याबरोबर असलो तरी माझे मन यु.पी.एस.सी. बिल्डिंगभोवती घिरट्या घालत होते. क्षणाक्षणात वेगवेगळे विचार माझ्या मनाला शिवून जात होते.अयशस्वी होण्याची कल्पनादेखील माझा घसा कोरडा करत होती. मध्येच, कुणीतरी मला उद्देशून प्रश्न केला. विचारणाऱ्याचा लांबलचक प्रश्न संपला तरी मी शून्य भावनेने त्याच्याकडे बघत राहिलो. शेवटी, न राहून माझ्या वरिष्ठांनी माझ्या तब्येतीबद्दल चौकशी केली. निकाल लागावा व लागू नये असे एकाच वेळी वाटत होते. दुपारी मी इंटरनेटवर यु.पी.एस.सी.ची साईट उघडून पाहात होतो, तेव्हा ती उघडत नव्हती. मी काय समजायचे ते समजलो व जड अंत:करणाने यु.पी.एस.सी.च्या मार्गाला लागलो. परीक्षेत केलेल्या प्रदर्शनाच्या आत्मविश्वासापेक्षा माझ्या सततच्या अपयशाच्या भुताने माझ्या मनाचा ताबा घेतला होता. नोटिसबोर्ड दूर अंतरावर दिसल्यापासून माझा नंबर पाहीपर्यंत माझ्या तोंडून अनपेक्षितपणे काहीतरी शब्द बाहेर आले. मी दीर्घ श्वास घेतला. खिशातून हॉल तिकिटाची प्रत काढून नंबर पडताळून घेतला व वेड्यासारखा त्याकडे काही काळ बघत राहिलो!

निकालानंतर लगेच थोड्याच दिवसांत मुलाखतीच्या तारखा बाहेर आल्या. नव्या लढाईचे रणशिंग फुंकले गेले. शेवटची, परंतु निर्णायक लढाई वर्षानुवर्षे चाललेल्या माझ्या युद्धाला समाप्त करणार होती.

मुलाखतीच्या आदल्या दिवशी, स्मिताने माझा चेहरा ताजातवाना दिसावा म्हणून त्याला

मालिश केले. त्या दिवशी मी कसलाच विचार न करता शांतपणे झोपलो व तयारी करून दुसऱ्या दिवशी यु.पी.एस.सी. मध्ये दाखल झालो. त्यावेळी मन खूप हलके वाटत होते. निकालाचा विचार माझ्या मनातून निघून गेला होता. मुलाखतीला घाबरण्यापेक्षा मी माझी मुलाखत कधी होते व मुलाखत घेणाऱ्यांशी कधी दोन हात करतो असे झाले होते.

भारतीय सनदी सेवेच्या संपूर्ण परिक्षा प्रक्रियेमध्ये मुलाखत हा सर्वात महत्वाचा टप्पा असतो. साधारणत: लेखी परीक्षेच्या गुणांमध्ये खूप तफावत नसते. त्यामुळे उमेदवाराचे यादीमधील स्थान मुलाखत निर्धारित करते. मुलाखतीच्या तयारी दरम्यान माझ्याशी व समाजाशी निगडित अशा अनेक समस्यांचे चिंतन केले. परीक्षा द्यायला सुरुवात केली तेव्हापासून स्वत:ला प्रशासनाचा भाग समजून वेगवेगळ्या समस्या कशा मार्गी लावता येतील असा मी विचार करीत असे. मुलाखती दरम्यान माझ्या त्याच अस्ताव्यस्त विचारांनाच थोडे सूत्रबद्ध करण्याचा प्रयत्न केला.

प्रशासनातील भ्रष्टाचार याविषयी मुलाखतीत बऱ्याचदा प्रश्न विचारले जातात. भ्रष्टाचार आजकाल सामाजिक जीवनाचा अविभाज्य अंग झालेले आहे. कुठे सर्व्हिस चार्ज, कुठे फॅसिलेटेशन फी, तर कुठे बक्षिस स्वरूपात - अशा माध्यमातून सरकारी, निमसरकारी, खाजगी सर्व क्षेत्रात भ्रष्टाचार वाढला आहे. मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये भ्रष्टाचाराला जास्तच प्रोत्साहन दिलेले दिसते. कुमार्गाने संपत्ति कमावणाऱ्याला सामाजिक प्रतिष्ठा मिळताना दिसते. त्याला प्रगतीच्या मुलाम्याखाली वाहवा मिळते. खाजगी कंपन्यांमध्येही भ्रष्टाचार कमालीचा वाढलेला आहे. सरकारी क्षेत्रात फक्त तो स्पष्ट दिसतो, जाणवतो; खाजगी क्षेत्रात मात्र तो छुप्या स्वरूपात आढळतो. याशिवाय डॉक्टरी व्यवसाय, वकिली व्यवसाय, सैन्यदल व इतरही अनेक क्षेत्रात तो प्रचंड प्रमाणात फैलावलेला आढळतो.

त्यामुळे भ्रष्टाचाराशी मुकाबला करायचा असल्यास सर्व स्थरांवर प्रत्येकाला लढ्यात सामील व्हावे लागेल. माझ्या मते प्रत्येक व्यक्ती आपल्या परीने योगदान करू शकते. स्वत:च्या बाबतीत मी ठरविले होते, की याबाबतीत आपण झीरो टॉलरन्स ठेवला व आपल्या कार्यालयीन कामामध्ये सूत्रबद्धता व पारदर्शकता आणल्यास भ्रष्टाचाराला निश्चित आळा बसवता येऊ शकतो. कार्यालयाद्वारे देण्यात येणाऱ्या प्रत्येक सेवेचे सर्व टप्पे जर सर्व लोकांना ज्ञात असतील व प्रत्येक टप्पात किती वेळ व कोणत्या गोष्टींची पूर्तता आवश्यक असते, हे माहीत झाल्यास निश्चितच लोकांना बिना तक्रार सेवा मिळू शकते व भ्रष्टाचारालाही कमी वाव मिळू शकतो. प्रशासनाच्या बाबतीत जी लपवेगिरी आहे, गुप्तता आहे, लोकांकडे जो माहितीचा अभाव आहे - त्यामुळे भ्रष्टाचार जास्त फोफावत आहे.

प्रशासनातील राजकीय हस्तक्षेपाचाही खूप बाऊ केला जातो. सुरुवातीपासून याविषयी खूप वेगवेगळ्या गोष्टी ऐकायला मिळतात. माझ्या मते अधिकारी व राजकारणी यांच्यातील बरेच वाद तिढेपोटी व इगोमुळे उद्भवलेले असतात. जर लोकांचे हित हा एकच मापदंड धरला तर बरेच प्रश्न खेळीमेळीच्या माध्यमातून मार्गी लावता येऊ शकतात. बरेच राजकारणी हे मुरलेले असतात. त्यांना लोकांच्या समस्यांची चांगली जाण असते. त्यामुळे त्यांच्याबरोबर योग्य संवाद साधल्यास निश्चितच आपल्याला फायदाच होईल असे वाटते. काही मूल्ये ठरल्यावर त्यांच्याशी संवाद साधताना आपण लक्ष्मणरेषा घालू शकतो. सुरुवातीपासूनच आपल्याविषयी अंदाज आल्यावर व आपण काय करू शकतो व काय करू शकत नाही हे निश्चित झाल्यावर निरर्थक दबाव आपोआप कमी होईल असा आत्मविश्वास होता. एकंदरीत कामाच्या नव्वद टक्के कामामध्ये

कुणाचा हस्तक्षेप होत असावा असे वाटत नाही. शिवाय शिक्षण, आरोग्य, शेती, स्त्रिया व दलितांच्या-आदिवासींच्या समस्या इत्यादी दुर्लक्षित क्षेत्रांमध्ये सहसा कुणाच्या हितसंबंधांना ठेच पोहोचत नाही. या क्षेत्रांमध्ये भरीव काम करायला भरपूर संधी आहे यात अजिबात शंका नाही.

मुलाखतीच्या निमित्ताने शेती व त्याच्याविषयी निगडित समस्यांचा बराच ऊहापोह केला. लहानपणापासून जे वास्तव मी पाहत आलो होतो, अनुभवत होतो व त्याचबरोबर अभ्यास करताना अवगत झालेल्या काही आर्थिक व आंतरराष्ट्रीय शेतीविषयक तथ्यामुळे बऱ्याच समस्यांमागील कारणे स्पष्ट होत गेली.

शेतकऱ्यांच्या सर्व समस्यांचे मूळ त्यांच्या असंघटित असण्यामध्ये आहे असा मी निष्कर्ष काढला. वरवर शेतकरी संघटित वाटत असला तरी व्यवसायाच्या पातळीवर असंघटित आहे. लहान शेतकरी, मध्यम व मोठा शेतकरी यांच्या समस्या व हितसंबंध विभागलेले व कधीकधी परस्पर विरोधी आहेत. यामुळे त्यांच्या जिवावर पोसणाऱ्या वर्गांचे - म्हणजे दलाल, व्यापारी व कृषीकेंद्रवाल्यांचे - चांगलेच फावते. शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळे व असंघटितपणामुळे ही मंडळी पुरेपूर फायदा घेताना दिसतात. यामुळे पहिल्या वर्षी पायी फिरणारी ही मंडळी दुसऱ्या वर्षी मोटर सायकलवर तर तिसऱ्या वर्षी चारचाकीवर फिरताना दिसतात. शेतकरी मात्र घासलेली चप्पल चांभाराकडून शिवून परत दोन वर्षे कशी टिकेल या संभ्रमात पुढच्या हंगामाची वाट पाहात बसतो.

गावातील शेतकरी बचतगटाच्या किंवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून संघटित झाल्यास, त्यांच्यातील काही शेतमालाच्या बाजाराची जबाबदारी सांभाळतील; काही वेळेवर प्रत्येक शेतकऱ्याला बी बियाणे पोहोचवतील तर काही जण नवनवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोहोचवतील. अशा पद्धतीने त्यांची बार्गेनिंग पॉवर वाढल्यास शेतकऱ्यालाच त्याचा फायदा होईल. शेतीसाठी लागणाऱ्या सर्व घटकांची वेळेवर पूर्तता झाल्यास व शेतकरी बाजाराबद्दल व शेतमालाच्या भावाबद्दल आश्वस्त झाल्यास शेतकरी अजून दुप्पट जोमाने उत्पन्न काढू शकतो.

आर्थिक उदारीकरणानंतर उद्योगाला जरा झुकते माप मिळालेले दिसते. परंतु जास्तीत जास्त लोकांशी निगडित असलेल्या शेती व्यवसायाकडे पाहिजे तेवढे लक्ष दिलेले दिसत नाही. बऱ्याचदा आकर्षक अशा योजना आकर्षक आकड्यांमध्ये जाहीर होतात. परंतु शेतकऱ्यापर्यंत पोहचण्यासाठी आवश्यक असलेल्या संस्थात्मक ढाच्याच्या अभावामुळे या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्यापूर्वी गुडूप होतात. बऱ्याचदा शेतीक्षेत्राला लागलेल्या रोगावर हातोडा न मारता त्याच्या परिणामांवर बाम लावण्याचा प्रयत्न होताना दिसतो. जागातिक व्यापारी संघटनेच्या निषेधानंतर सरकारचे शेतकऱ्यांशी संबधित असलेल्या गोष्टीवरील नियंत्रण कमी होत आहे व सामान्य शेतकऱ्यांची हतबलता, शोषण वाढते आहे. बजेटच्या आधी सर्व क्षेत्रातील लोकांना आमंत्रण देऊन अर्थमंत्री चर्चा करतात परंतु सामान्य शेतकऱ्यांच्या गटांशी चर्चा केल्याचे कधी ऐकवत नाही. यामुळेच कदाचित कापसावर वीस टक्के तर सेकंड हॅन्ड मोटारीवर एकशेतीस टक्के आयात कर आहे..

राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार व अनागोंदी कारभार हा समाजातील सूज्ञ व सज्जन नागरिकांसमोरची महत्त्वाची समस्या आहे. दिवसेंदिवस पैसा व गुंडगिरीचे प्रस्थ राजकारणात वाढत असल्यामुळे समाजातील सूज्ञ वर्ग स्वत:ला राजकारणा-पासून दूर ठेवत आहे. यामुळे देशातील नावाजलेल्या महाविद्यालयातील व इतर तंत्रज्ञान व व्यवस्थापन संस्थांमधून बाहेर पडणारा वर्ग एकतर देशातून पसार झाला आहे किंवा मोठ्या कंपन्यांमध्ये आपली बुध्दी खर्चत

आहे. अशा परिस्थितीत वडिलोपार्जित राजकीय वारसा वा संपत्ती असलेल्या वा बदनाम व गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींचाच सर्व ठिकाणी ससेमिरा असतो. सरपंचापासून ते संसदेच्या निवडणुकांपर्यंत अमाप पैसा खर्च होतो. पुढे तो दामदुपटीने वसूल करण्यासाठी सरकारी यंत्रणेला वापरले जाते. रक्षकच भक्षक झाल्यामुळे नोकरशाहीला आयतीच संधी मिळते व भ्रष्टाचार सर्व सीमा उल्लंघतो. लोकशाहीच्या या सर्व विकृत दर्शनामुळेच नक्षलवाद, दहशतवाद व इतर फुटीर कारवायांना पाठबळ मिळते.

प्रशासनात प्रवेश करण्यापूर्वी या मूलभूत प्रश्नांचे वास्तव आ वासून उभे होते. या मूलभूत प्रश्नांबरोबर इतर अनेक समस्यांचा मी खोलवर जाऊन प्रामाणिक विचार करण्याचा प्रयत्न केला. यामुळे मनातील भीती नाहीशी झाली. प्रत्येक समस्येची सर्वांगीण स्पष्टता आल्यामुळे त्यावर विचारलेल्या प्रश्नांसाठी मी तयार होतो. स्वत:विषयी घेतलेल्या निर्णयाबद्दलही मनात स्पष्टता होती. या सर्व कारणांमुळे मुलाखतीला जाताना आत्मविश्वास वाढला होता.

माझी मुलाखत सुरळीत पार पडली. सुरुवातीला, त्यांनी खूप वरवरचे प्रश्न विचारले. मी त्यांची उत्तरे शांतपणे दिली. मला जाणीव होत होती की काही विशिष्ट प्रश्न का विचारले जात आहेत व मी त्यांची उत्तरे काय दिली पाहिजेत? मुलाखतीत मुलाखत घेणारे सहसा त्यांच्या मनात काय चालू असते व त्यांची उमेदवाराबद्दल काय प्रतिक्रिया आहे याविषयी त्याला कळू देत नाहीत. आधीच्या वर्षीच्या अनुभवावरून मी शहाणा झालो होतो आणि मुलाखत व पूर्वपरीक्षा या दोघांचा अभ्यास नियोजनपूर्वक बरोबर करत होतो.

मुलाखतीनंतरचे दिवस भराभर गेले आणि निकालाचा दिवस उगवला. अक्षय तृतीया म्हणजे खानदेशी लोकांचा महत्त्वाचा सण. सासरी गेलेल्या मुली अक्षय तृतीयेला म्हणजे आखाजीला माहेरी येतात. नवे कपडे शिवले जातात. आखाजीच्या दरम्यान घरोघरी झाडांना, घरात झोके बांधले जातात. सालदारांसाठी आखाजीला नवीन वर्ष सुरू होते. आखाजी अजून एका गोष्टीसाठी प्रसिद्ध आहे आणि ती म्हणजे पत्ते खेळण्यासाठी. लहानमोठे सर्वजण त्या दिवशी पत्त्यांचा जुगार खेळतात. मीसुद्धा बऱ्याचदा रात्र रात्र जागून पत्ते खेळलेलो आहे. अशा शुभ दिवशी माझा निकाल येणार होता. स्मिताने मला आवडणाऱ्या पुरणपोळ्या केल्या होत्या. सकाळपासून मन थोडे अस्थिर झाले होते, परंतु भीती किंवा असुरक्षिततेची भावना नव्हती. मनामध्ये तालिकेत येण्याबाबत खात्री वाटत होती. निकालाचा विचार करत करत आमचे जेवण झाले. त्यानंतर मात्र माझे चित्त कशात लागेना. मला असे अस्वस्थ बघून स्मिताने मला यु.पी.एस.सी.भवनाला जायला सांगितले. तेथील माझ्या दोन तासांच्या प्रतीक्षेदरम्यान मला आधीच्या वर्षाचा तसाच अनुभव आठवत होता. मनात थोडा चरकलो पण परत मनात आत्मविश्वासाची लहर संचारली.

नेहमीप्रमाणे प्रतीक्षा करणाऱ्या आम्हा सर्वांना गेटच्या बाहेर काढण्यात आले. निकाल चार-पाच नोटिस बोर्डवर चिपकावल्यानंतर गेट उघडण्यात आले. मोठा कोलाहल झाला व निकालासाठी ताटकळत बसलेले सर्व नोटिस बोर्डावर मधमाशांसारखे जाऊन चिपकले. मी मागे राहिलो होतो, पण सर्वजण बाजूला होईपर्यंत मला धीर धरवेना. शेवटी, उभ्या असलेल्या मुलांच्या कंबरांमधून जागा करून मी माझे मुंडके मध्ये घुसवले आणि मान वर करून तालिकेकडे बघू लागलो. तालिकेत बघितल्यावर माझा माझ्याच डोळ्यांवर विश्वास बसला नाही. माझ्या हृदयाचे ठोके काही सेकंदांसाठी बंद झाल्याची जाणीव मला झाली. तालिकेत मला फक्त माझे नाव दिसत होते! बाकी मला काही दिसत नव्हते. माझ्या रँकवरून मला आय.ए.एस. मिळणार हे निश्चित

झाले होते. जे मी अनुभवत होतो त्याच्यावर माझा विश्वास बसत नव्हता. घरी आतुरतेने वाट बघत असलेल्या स्मिताला आनंदाची बातमी कळवली. तिचाही विश्वास बसत नव्हता. मी आनंदाची बातमी माझ्या माऊलीला, ताईला कळवण्यासाठी उतावीळ झालो होतो. तिला फोन करेपर्यंत माझा कंठ दाटला होता व डोळ्यांतून आनंदाश्रू वाहायला लागले होते. ताईने फोन उचलताच मी जोराने ओरडलो "ताई, मी कलेक्टर व्हयनू!" तिचाही आपल्या कानावर विश्वास बसत नव्हता. मी परत रडत रडत तिला तीच बातमी ऐकवली. ताईचे हुंदके मला ऐकू येऊ लागले. मला काय बोलावे ते कळेना. मी तिला लहानपणापासून 'कलेक्टरची आई' म्हणत असे. ते स्वप्न आज साकार झाले होते! मला मनोमन प्रचंड समाधान वाटले. नंतर मी भाऊ, बापू यांना ती खबर कळवली.

घरी, स्मिता माझी अधीरतेने वाट पाहात होती. मी कधी घरी येतो व कधी नाही असे तिला झाले होते. मी घराचे पाच मजले एका दमात चढलो. दार उघडल्यावर आपल्या तब्येतीची काळजी न करता गरोदर स्मिताने जोरात उडी मारून मला घट्ट मिठी मारली. मी निकाल बघायला गेल्यावर ती देवाजवळ दिवा लावून शिवलीलामृत वाचत बसलेली होती. नंतर आम्ही राहिलेल्या लोकांना फोनने बातमी कळवली.

त्यानंतरचे काही दिवस माझ्या आयुष्यातील खूप महत्त्वाचे दिवस ठरले. आम्ही पंधरा दिवसांची सुट्टी घेऊन घरी गेलो. दरम्यान, जळगाव-धुळ्याच्या स्थानिक वर्तमानपत्रांत माझ्या यशाविषयी भरभरून छापून आले. माझी मुलाखत, ताई-अण्णांच्या मुलाखती वर्तमानपत्रांत झळकल्या. कोणालाही माहीत नसलेले माझे गाव संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय बनले. गावात उत्साहाचे वातावरण तयार झाले. गावातील गरीबांच्या चेहऱ्यांवर मला एका वेगळ्या आनंदाची छटा बघायला मिळाली. त्यांना कुणीतरी त्यांच्या खूप जवळची व्यक्ती मोठी झाल्याचा आनंद वाटत असावा. मला सर्व थरांतून, खास करून उपेक्षित वर्गातल्या बऱ्याच लोकांची अभिनंदनात्मक पत्रे मिळाली. जीवन धन्य झाल्यासारखे वाटले. आपल्यामुळे आपल्यासारख्या परिस्थितीत झगडणाऱ्या निदान काही मुलांना जरी आपण प्रेरणा देऊ शकलो, त्यांच्यामध्ये मेहनतीबद्दल-प्रामाणिकपणाबद्दल व त्यामुळे मिळणाऱ्या फळाबद्दल आदर निर्माण करू शकलो तरी आपले जीवन सार्थक होईल असे वाटले.

मी लहानपणी अण्णांबरोबर माहिजी या गावातील आठवडे बाजाराला भाजीपाला विकायला जात असे. तेथे एका हॉटेलात आम्ही शेव-चिवडा, चहा घेत असू. हॉटेलमालक माझी कौतुकाने चौकशी करत असे. शाळेत जाणारा मुलगा बापाबरोबर एवढे ओझे घेऊन, पायपीट करून एवढ्या लांब येतो याचे त्याला नवल वाटे. त्याने माझ्या यशाविषयी जेव्हा पेपरात वाचले तेव्हा आनंदी होऊन, एक संपूर्ण दिवस येणाऱ्या-जाणाऱ्यांना विनामूल्य चहा पाजला. अशाच प्रकारे, पेढे बनवून शहरात नेऊन विकणाऱ्या दिनकर या गावकऱ्याने आनंदाच्या भरात पेटीभर पेढे येणाऱ्या-जाणाऱ्यांना वाटले.

दिल्लीहून घरी आल्यावर माझी गावातून मिरवणूक काढण्यात आली. पुढे बँड, त्यामागे प्रचंड लवाजमा अशी मिरवणूक निघाली. प्रत्येक घरापुढे थांबवून सुवासिनी मला ओवाळत होत्या. मी त्यांना नमस्कार करत पाणावलेल्या डोळ्यांनी त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करत होतो. मला खूपच बुजल्यासारखे झाले. एक क्षण, आपण या सर्वासाठी पात्र आहोत का? लोकांच्या एवढ्या अपेक्षांचे ओझे आपल्या खांद्यावर वाहू शकू का, याची शंका आली.

पूर्वी कधीतरी, जेव्हा पास होण्याविषयी माझ्या मनात विचार येत असे तेव्हा आपल्याबद्दल लोकांना माहिती होईल, वर्तमानपत्रांत आपल्याबद्दल चर्चा होईल, परंतु उच्चनीच भावनेने विभागलेले माझे गाव सर्व विसरून आपला सत्कार करील असे स्वप्नातही कधी वाटले नव्हते. शेवटी, शिखर सर केल्याचे आणि मनासारखी नोकरी मिळाल्याची, काम करण्याची संधी मिळाल्याचे समाधान झाले. त्या आधीच्या तीन-चार वर्षांपासून मी अस्वस्थतेचे, असंतुष्ट जीवन जगलो होतो. ती अस्वस्थता संपलेली होती.

मी जेव्हा माझ्या तोपर्यंतच्या संपूर्ण जीवनप्रवासाविषयी विचार केला तेव्हा जाणवले, की आपले यश हे आपले नसून आपल्याभोवती ज्या अनेक व्यक्ती आहेत, ज्यांनी वेळोवेळी आपल्या गरजा जाणून घेतल्या-आपल्या खांद्यावर हात ठेवला - आपल्यावर कधी विश्वासाची, कधी वास्तवतेची तर कधी मायेची चादर पांघरून आपल्या मार्गातील काटे दूर केले त्या साऱ्यांचे आहे. इतिहासातील काही व्यक्तिमत्त्वे, खास करून चंद्रगुप्त, हर्षवर्धन, शिवाजी महाराज, राणा प्रताप, भगतसिंग या लोकांनी मला नेहमीच स्फूर्ती दिली. तसे काहीतरी करण्याविषयी माझ्य शरीरात एका वेगळ्या प्रेरणेचा अंतर्भाव होण्यास कारणीभूत ठरले. जेव्हा केव्हा मी नैराश्याने ग्रासलो अशा वेळी त्या व्यक्तींच्या जीवनचरित्राने, कर्तृत्वाने माझ्यासाठी संजीवनीचे काम केले. त्या व्यक्तिमत्वां-विषयी वाचताना मी अंत:प्रेरणेने ओतप्रोत भरून जात असे व म्हणून त्यांच्याविषयी पुन्हापुन्हा वाचत असे.

लहानपणापासून हातात जे पडेल ते वाचण्याची सवय लागली. अगदी जिलेबी घेतलेल्या पेपरापासून ते काही नावाजलेल्या ग्रंथांपर्यंत सर्व वाचले. रोजच्या खडतर आयुष्यात पुस्तकांमुळेच थोडा विरंगुळा मिळे, कधी स्वप्न बघायचे माध्यम उपलब्ध होई. कधीकधी मोठ्या गोष्टी, विचार डोक्यात घुसत ते कधी विचार करायला लावत, कधी अश्रू ढाळायला लावत तर कधीकधी रक्त तापवत.

शाळेत असताना सुरुवातीला वर्तमानपत्रे, मासिके यावर वाचनाची भूक भागत होती. शिवाजी, राणा प्रताप, रामायण, महाभारत व इतर अनेक शौर्याच्या गोष्टी वाचनात मी रमून जात असे. सुरुवातीपासूनच शिवाजी महाराज व राणा प्रताप माझे हिरो होते. शिवाजीच्या साहसाबरोबर त्यांच्या दिलेर व पराक्रमी स्वभावाचा मला जास्तच ओढा होता. त्यांचे धार्मिक उदार धोरण त्यांना इतर तत्कालीन राजांपेक्षा वेगळा दर्जा देई. शिवाजीबरोबर राणा प्रतापचेही मला खूप आकर्षण होते. पुढे या दोघांबरोबर इतर अनेक वीरांच्या जीवनावर आधारित खूप पुस्तके मी वाचली.

बालपणाचा काळ सोडल्यास किशोरवयीन काळात शाळेतील इतिहासाबरोबर फुले, गांधी, आंबेडकर यांच्यावरील लिखाण मला वाचायला मिळाले. त्याचबरोबर सावरकर, भगतसिंग या लोकांनीही मला खूप प्रभावित केले. गांधींचे सत्य,अहिंसेचे विचार मनात खोलवर रुजले. त्यांचे सत्याचे प्रयोग व इतर लिखाणातून त्यांच्या विचारातील व आचरणामधील शुद्धता प्रभावित करणारी ठरली. त्यांचा सत्याशी असलेला आग्रह,धार्मिक सहिष्णु विचार, मानवतावादी दृष्टीकोन मनात घर करू लागले. त्याचवेळेस सावरकर, भगतसिंग या प्रभृतींचे कार्यही आकर्षित करत होते. या सर्वांच्या विचारातील गाभा, म्हणजे मातृभूमीवरील व देशवासीयांविषयीचे नि:स्वार्थ प्रेम व त्यासाठी केलेले बलिदान त्या वयात वेड लावणारे होते. या महान व्यक्तींविषयी मी खूप वाचले असे नाही पण त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या एकंदरीत आकर्षणामुळे त्यांच्या विचारांची छाप कायम मनात राहिली. त्यांच्या विचारातील सर्व भारतीय व सर्वधर्मीय सहिष्णुतेचा विचार रुजत गेला. या

महान व्यक्तींच्या प्रभावामुळे संकुचित असे धार्मिक व प्रांतिक विचार पुढेही कधी मला शिवले नाहीत. भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, राजगुरू महतींच्या राजकीय विचारांपेक्षा त्यांच्या निस्सीम देशप्रेमाविषयी व देशासाठी दिलेल्या बलिदानाविषयी जास्त आदर वाटे. यांमुळे त्यांच्याविषयी आकर्षण वाटत असले तरी हिंसेच्या मार्गाशी माझी नाळ एकंदरीत जास्त जुळली नाही.

तरूण वयात प्रभावित करणाऱ्या व्यक्तिंमध्ये महात्मा फुले व विवेकानंद अग्रणी होते. फुलेंच्या परखड धार्मिक व सामाजिक विश्लेषणांमुळे व त्यांच्या 'शेतकऱ्यांचे बंड' व 'सत्यशोधक समाज' वाचून माझे धार्मिक जीवन ढवळून निघाले. विवेकानंदांमुळे विचाराला एक आध्यात्मिक दृष्टी मिळण्यास मदत झाली. त्यांनी मानवसेवेला दिलेले महत्व मला समाजसेवेची प्रेरणा देऊन गेले. एकंदरीत या दोघांमुळे माझ्या मनावरील धर्माचा पगडा लुप्त झाला व सामाजिक समस्यांकडे बघण्याची दृष्टीही बदलली.

या साऱ्या महान व्यक्तींबरोबरच इतर अनेकांच्या लेखनामधून माझी जगाकडे बघण्याची दृष्टी व्यापक बनली व भावविश्व समृद्ध झाले. त्यात प्रामुख्याने नारायण सुर्वे, कुसुमाग्रजांच्या कविता, बाबुराव बागुलांच्या कथा, लक्ष्मण माने, आनंद यादव, दया पवार असे अनेकांची आत्मचरित्रे; पु ल देशपांडे, चित्रे, फडके, नेमाडे अशा अनेकांचे लेखन नेहमी जगण्याला नवीन अर्थ देत गेले आणि माझा मार्ग कितीही खडतर असला तरी पुढे चालण्याची प्रेरणा देत गेले.

एवढेच नाही तर कधी-कधी मला सिनेमातील काही व्यक्तिरेखा, खेळाच्या मैदानावर अद्वितीय कामगिरी करणाऱ्या, लॉन्स आर्मस्ट्रॉंग सारख्या कॅन्सरग्रस्त परंतु तरीही 'टूर दी फ्रान्स' जिंकणाऱ्या सायकलपटूंनी माझ्या क्षमतेवर विश्वास ठेवायला मदत केली. आयुष्यात अशक्य असे काही नसून शिखर गाठण्यासाठी स्वत:च्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून योग्य मार्गाने, अथकपणे प्रयत्न करणे गरजेचे असते असा माझा ठाम विश्वास झाला.

ज्या इमारतीवर मी उभा होतो तिचा पाया आई-वडिलांनी तयार केला व तिला अनेकांनी विटा दिल्या आहेत. माझ्या एकंदरीत जडणघडणीत माझा चुलतभाऊ, बापूचे स्थान अग्रगण्य आहे. मी अगदी लहान असल्यापासून त्याने माझ्या पाठीवर जो हात ठेवला तो कायम आहे. लहानपणी, मला समजून घ्यायचे व नंतर माझ्या पंखांना बळ द्यायचे काम बापूने केले. मला आठवते तसे, मी सर्व छोट्यामोठ्या गरजांसाठी बापूकडे जात असे. जेव्हा कधी कधी माझाच माझ्यावरील विश्वास नाहीसा होण्याची वेळ येई अशा वेळीही तो माझ्यावर विश्वास दाखवत असे. त्यामुळे मी बऱ्याचदा त्याच्याशी मित्राप्रमाणे मनसोक्त गप्पा मारी. त्याच्या माझ्याकडून असलेल्या वाजवी अपेक्षांचे मला दडपण न वाटता त्या पूर्ण करण्यासाठी जीव ओतून टाकावासा वाटे. अडचणीच्या वेळी नेहमी तो माझ्या पाठीशी उभा राहात असे. मला बऱ्याचदा वाटे, की बापू स्वत:चे अपूर्ण राहिलेले स्वप्न माझ्या रूपाने पूर्णत्वास नेताना बघत आहे. मी ते आनंदाने पूर्ण करण्याचा प्रयत्न करी.

माझे मोठे भाऊजी बापू पाटील व आक्का यांच्या छत्रछायेत माझे शाळेचे व कॉलेजचे दिवस गेले. आक्का तिचा फाटका संसार चालवताना, दमडी दमडी बांधून आम्हा भावंडांना मदत करत असे. कधी कधी परिस्थिती एवढी वाईट असे, की आक्काकडे जाण्यासाठीही आमच्याजवळ पैसे राहत नसत. परंतु ती स्वत: मन मारून दिवसाला जेवढे रुपये-दोन रुपये बाजूला ठेवत असे ते मला किंवा घरातल्या कुणाला मदत म्हणून देई. पावसाळ्याच्या तोंडावर बी-बियाण्यांना, खतांना पैसे नसत, अशा वेळी अण्णा आक्काकडे जाऊन पैसे घेऊन येत व जमलेच तर ते हंगामाला परत करत. माझ्याशी भाऊजींचा व्यवहार लहान भावाप्रमाणे असे. अधीक्षकसाहेबांच्या गाडीवर

ड्रायव्हर म्हणून असलेल्या भाऊंनी माझ्याविषयी त्यांच्या प्रत्येक साहेबाजवळ कौतुकाचे शब्द काढले आहेत. त्या कारणाने बऱ्याच साहेबलोकांशी माझी ओळख झाली होती. ते माझ्यावरील प्रेमापोटी दोन पावले पुढे जाऊन बऱ्याचदा माझ्यासाठी जेवढे शक्य असेल तेवढे करत असत. आम्हाला छोट्यामोठ्या अडचणींना आक्का व भाऊजींशिवाय पर्याय नव्हता. त्यांनी अनेक नाजूक वेळांना मदतीचा हात दिला नसता तर आमची अवस्था काय झाली असती याचा विचार करवत नाही.

संग्राम व त्याची बायको नुपूर ही दोघे माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. संग्राम लहानपणापासून माझ्या प्रत्येक यशापयशाचा साक्षीदार आहे. सुरुवातीला, मला स्वप्न बघण्यास प्रवृत्त करण्यापासून, स्वत:वर विश्वास ठेवणे शिकवण्यापासून तर स्वप्न साकार होण्यापर्यंत त्याने दिलेले मानसिक पाठबळ, चिकित्सक व सेवाभावी वृत्ती, समाज व देशासाठी त्याची असलेली तळमळ मी कधी अंगीकृत केली व त्याच्याशी वैचारिक एकरूपता साधली ते माझे मला कळलेच नाही. आंतरजातीय विवाहामुळे उद्भवलेल्या वादळामुळे त्याचे आयुष्य काही काळ दोलायमान झाले होते. अशा वेळी माझा त्याला व त्याचा मला मिळालेला आधार आमच्यासाठी महत्त्वाचा ठरला. ग्रामीण भागात दवाखाना थाटायचा विचार असो किंवा सामाजिक बदलासाठी जनजागृती करण्याविषयी प्रयत्न असोत, आमचे विचार परस्परपूरक असतात. त्याचे नि:स्वार्थी प्रेम मला त्याच प्रकारची भावना स्वत:मध्ये जागृत करायला कारणीभूत ठरली. संग्राम माझ्या आयुष्यात आला नसता तर माझ्या जीवनाला कोणत्या प्रकारचे वळण लागले असते याची कल्पना करवत नाही.

माझ्या इतर मित्रांनीही माझ्या आयुष्याला समृद्ध केले व जीवनाला अर्थ दिला. वामन व हिंमत हे माझे बालमित्रही संग्रामप्रमाणे नेहमी माझ्या सुखदु:खाचे वाटेकरी झाले आहेत. हिंमत गावाला शेती करतो तर वामन प्राथमिक शिक्षक आहे. मी जेव्हा जेव्हा सुटीवर घरी जात असे तेव्हा रात्री आम्ही गावापासून लांब अशा स्मशानभूमीत जाऊन मनसोक्त गप्पा मारत असू. हिंमत मला गावात घडणाऱ्या सर्व घटनांची इत्थंभूत बातमी देत असे. मीही मन मोकळे करून त्यांना माझा परीक्षा, अभ्यास, समस्या यांविषयी सांगत असे. त्यांच्या प्रतिक्रिया, माझ्यावरील विश्वास यामुळे मला हुरूप येत असे. त्यांना काही गोष्टी आकलन होत नसल्या तरी त्यांच्या प्रोत्साहनाने मी हुरळून जात असे. हिंमतला माझ्याविषयीच्या सर्व बाबींची खबर राहात असे. माझ्यामुळे त्याचे यु.पी.एस.सी. व तत्सम परीक्षांविषयीचे ज्ञान एवढे वाढले आहे, की तो आता इतरांना सहज मार्गदर्शन करू शकेल. गावात माझी वाट पाहणारी आई-वडिलांव्यतिरिक्त ती एकटी व्यक्ती आहे. त्याशिवाय सेवाभावी संस्थेत काम करणारा अशोक पिंगळे, प्राध्यापक असलेला अशोक भावले, खाजगी कंपनीत असलेला जलिल व कस्टम डिपार्टमेंटला असलेला नीळकंठ शेळके यांनी तुफानात गटांगळ्या खाणाऱ्या माझ्या नौकेला नेहमी आधार दिलेला आहे. माझा चुलतभाऊ, दादामुळे मला स्पर्धा परीक्षांची माहिती झाली. तो स्पर्धा परीक्षा देत असल्यामुळे त्याच्या वाचनात असलेली पुस्तके मी खूप आधीपासून म्हणजे सातवी-आठवीत असल्यापासून वाचत असे. त्यामुळे आपले यश हे आपले नसून ते एका समुदायाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एकाचे आहे; त्याचे अस्तित्व फक्त त्या वातावरणाच्या संदर्भात विचारात घेतले जाऊ शकते असे मला वाटते.

अखेर, हळूहळू प्रसिद्धीची उठलेली धूळ बसली. निकालानंतर काही दिवसांत नेमके काय घडले याची जाणीव होऊ लागली. आपण आय.ए.एस. झालो आहोत हे मला स्वत:ला खरे

वाटण्याला काही दिवस लागले. मला त्या तीन सोनेरी अक्षरांची जादू जाणवू लागली. त्या आधीही मी ग्रुप - ए अधिकारी होतो, पण आय.ए.एस. नव्हतो. गावातील एकूण एक मला रामराम ठोकू लागले. कुठेही गेल्यावर लोक माझ्याकडे बोट दाखवू लागले. आजुबाजूच्या गावांतील छोटे-मोठे पुढारीही येऊन माझ्याबरोबर फोटो काढून घेऊ लागले.

माझ्या अडाणी गावकऱ्यांना कलेक्टर म्हणजे काय ते माहीत नसल्यामुळे मी नेमका कोणत्या समस्या सोडवू शकतो व कोणत्या सोडवू शकत नाही याबद्दल त्यांना कुतूहल होते. मी पायी चालू शकणार नाही, दुसऱ्याच दिवशी माझ्या दाराला सरकारी गाडी लागेल असे त्यांना वाटे. माझ्या पगाराविषयी विचारपूस होई. एक मात्र खरे की, माझ्या पास होण्याने गावातील सर्वांच्या माना गर्वाने ताठ झाल्या. गावातील लग्न होऊन गेलेल्या मुलीही आपापल्या सासरी माझ्याविषयी गर्वाने अभिमानाने सांगू लागल्या. बऱ्याचदा, बऱ्याच समारंभांमध्ये मला काही बोलायची गरज राहत नसे. इतर मंडळीच माझ्याविषयी बोलत बसत. जिल्ह्यातील सर्व स्तरांतून माझ्या यशाला दाद मिळाली. त्या दरम्यान लोकांनी जातीपातीचे राजकारणही केले. जातीवर आधारित काही संघटनांनी घरी येऊन माझे अभिनंदन केले आणि जातीविषयी कधीही विचार न करणाऱ्या माझ्यासारख्याला त्यांनी काही तत्त्वे मांडून जातीविषयी डोस पाजण्याचा प्रयत्न केला.

त्या दरम्यान काही मजेशीर गोष्टीही घडत गेल्या. घरासमोर राहणारे गृहस्थ माझ्याकडे फिर्याद घेऊन आले. त्यांचा मुलगा घरातील इतर लोकांना त्रास देत होता. त्यांनी मला तोडगा सुचवण्याविषयी विनंती केली. हळूहळू, एकेक नातेवाईक त्यांच्या तरुण मुलांना घेऊन माझ्याकडे नोकरी लावण्यासाठी विनंती करू लागले. अशा लोकांना कसे समजावावे हाच मला मोठा प्रश्न आहे.

लहानपणापासून लाजराबुजरा असा मी, कुठेतरी ठोकरा खात चार पैशांची नोकरी मिळेल, शिकून आपल्या कुटुंबाचा उद्धार होईल या आशेने गावाबाहेर पडलो, तो भारतातील प्रतिष्ठित अशा आय.ए.एस. ग्रुपला जाऊन मिळालो होतो. जीवनातील प्रत्येक टप्प्यावर जीवघेण्या समस्यांनी मला हैराण केले होते. माणसातील चांगुलपणावर व नैतिक मूल्यांवर माझा पूर्ण भरवसा होता. पास झाल्यावर मला सर्वात जास्त आनंद या गोष्टीचा होत होता की, आपल्याला यापुढे लोकांसाठी प्रत्यक्ष काम करता येईल. त्यांच्या समस्या, अडचणी सोडवणे हाच आपला दिनक्रम राहील. त्या पलीकडे मला काही नको होते. मला भीती फक्त एका गोष्टीची वाटत होती आणि ती म्हणजे आपल्यात काम करण्याची जी भूक आहे, काम करण्यासाठी लागणारी नम्रता या गोष्टी सदैव राहतील वा नाही?

जीवनाच्या एका नवीन अध्यायाला सुरुवात झालेली होती. समोर मनासारखे काम करण्याची संधी मला आव्हान देत होती आणि ते आव्हान मी नम्रपणे स्वीकारले होते!

परीक्षेचे एकंदरीत स्वरूप बघितल्यावर जाणवते की, फक्त अभ्यास करणे गरजेचे नसून यशस्वी होण्यासाठी अभ्यास करणे गरजेचे आहे. म्हणून यशस्वी होण्यासाठी परीक्षेला समजून घेणे महत्त्वाचे आहे. म्हणजे थोडक्यात असे म्हणता येईल, की एखादी व्यक्ती हुशार असण्याबरोबर किती चांगली परीक्षार्थी आहे, यावर तिचे परीक्षेतील भवितव्य अवलंबून असते. परीक्षेत एखादी व्यक्ती अयशस्वी होते म्हणजे ज्या प्रकारच्या पद्धतीने उमेदवारामधील क्षमता तपासली जाते, त्या पद्धतीच्या अनुषंगाने ती व्यक्ती अयशस्वी होते, असे म्हटले पाहिजे. त्यामुळे अयशस्वी होणे ही त्याच्या सर्वांगीण असमर्थतेबद्दल निदर्शक नसून उमेदवाराच्या त्या विशिष्ट क्षमतेबद्दलची

असमर्थता असते, असे म्हणता येईल.

या प्रकारचे विश्लेषण मला अपयशानंतर सावरायला मदत करत असे आणि आय.ए.एस. नंतरही जीवन आहे याची शाश्वती देत असे.

मी जसजसा मोठा होत गेलो, तशी महात्मा फुले, आंबेडकर, विवेकानंद, महात्मा गांधी आणि आगरकर यांच्या विचारांची जादू माझ्या मनावर परिणाम करू लागली. फुले आणि आगरकरांचे निरीश्वरवादी व बुद्धिप्रामाण्यवादी विचार, मला अस्तित्वात असलेल्या प्रत्येक गोष्टीविषयी प्रश्न विचारायला भाग पाडू लागते. त्यांच्या तर्कशुद्ध विश्लेषणामुळे माझा वैचारिक गोंधळ दूर होत राहिला. बुद्धिप्रामाण्यवादाच्या कसोट्या वापरल्यावर बऱ्याच साध्या साध्या गोष्टींची उत्तरे मिळू लागली. त्या विचारांना विवेकानंदांच्या मनुष्यकेंद्रित विचारांचे पाठबळ मिळाले. त्यामुळे मी निरीश्वरवादी व तेवढाच माणसाच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवणारा होत गेलो. सर्वेसर्वा भगवान, गॉड किंवा अल्ला म्हणजे मानवाची फक्त श्रद्धा असून, पृथ्वीवरील प्रत्येक प्राणिमात्रात त्याचा अंश आढळतो. त्यामुळे दीनदलितांच्या चरणी अर्पण केलेली सेवा ही खरी आराधना होय, असा माझा विश्वास झाला. तासन्तास आराधना, पूजाअर्चा वा जपतप करण्यापेक्षा गरजू लोकांसाठी काम केल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान मला महत्त्वाचे वाटू लागले. त्यापेक्षा अजून कोणत्या मार्गाने देवाचे अस्तित्व अनुभवता येईल असे मला वाटत नाही.

पुढे चालून, बुद्धिप्रामाण्यवादावर आधारलेला कर्मवाद माझ्या विचारांचा कणा बनला. जीवनात आपल्या वाट्याला आलेल्या प्रत्येक गोष्टीशी आपले कर्म निगडित असते असे मला वाटते. त्यामुळे आपल्याला एखादे ध्येय गाठायचे असेल तर योग्य दिशेने केलेले प्रयत्न तेथे आपल्याला नेऊ शकतात असा माझा ठाम विश्वास आहे. लोक म्हणतात तसे प्रारब्ध, भाग्य यांचा आपल्या जीवनावर काही काही प्रभाव असतो असे मला वाटत नाही. किंबहुना त्याचा विचारही करणे निरर्थक आहे. आपण आपल्या अपयशाचे खापर भाग्यावर फोडून आपल्या उणिवांकडे दुर्लक्ष करतो. त्यापेक्षा आपण आपल्या कर्मावर विश्वास ठेवला व प्रयत्न करत राहिलो तर निश्चितच कधीतरी सर्व गोष्टी जुळून येतात. म्हणजेच, भाग्य आपल्या बाजूने येते आणि आपले इप्सित ध्येय साध्य होते. महात्मा गांधींच्या लिखाणाचे वाचन केल्यानंतर माझी सत्य, अहिंसा या तत्त्वांवर श्रद्धा वाढली. त्यांच्या सकारात्मक आणि स्वच्छ विचारांतून मला चालत राहण्याची प्रेरणा मिळाली. गांधीजींनी प्रतिकूल परिस्थितीत ज्या प्रकारे जनमानसाला एकत्रित केले होते, त्यावरून जीवनात कोणत्याही प्रकारचे सामाजिक कार्य पूर्णत्वास नेता येऊ शकते असा आत्मविश्वास जागृत झाला. शिवाय, मी जातपात, धर्म-प्रांत यांसारख्या संकुचित विचारांपासून फार लांब गेलो.

लहानपणापासून, राष्ट्रवाद व राष्ट्र याची संकल्पना माझ्या हृदयात कोरली गेली. त्यामुळे देशसेवा व लोककल्याण यासाठीच आपले जीवन आहे असा विचार मनात दृढ झाला. वयानुरूप त्या विचारात बदल होत गेला; परंतु लोकसेवेचे जे वेड सुरुवातीपासून लागले ते चंगळवादी संस्कृतीची ओळख झाल्यावरही कायम राहिले. एवढेच नाही तर स्वत:साठी जगणे किंवा एखादे काम फक्त पैशासाठी करणे किळसवाणे वाटू लागले. हे विचार रुजत असताना धार्मिक, क्षेत्रीय किंवा प्रांतीय कट्टरवाद मला शिवू शकला नाही व त्यामुळे राष्ट्रनिष्ठा कामाच्या पातळीवर, लोकोद्धाराच्या पातळीवर राहिली.

मी खूप आधीपासून, म्हणजे दहा-बारा वर्षांचा असल्यापासून, खूप वाचत असे. आमचे गाव लहान असले तरी तेथे एक छोटे वाचनालय आहे. मला तेथील पेपर चाळायची सवय लहानपणीच

लागली. पुढे एरंडोलला असताना बस स्टॅण्डच्या बाजूला एक स्मृती वाचनालय होते. मी तेथे फावल्या वेळात जाऊन सर्व मराठी व हिंदी पेपर चाळत असे. सुरुवातीला मी खासकरून सिनेमे, खेळ यांबाबतच्या कथा इत्यादी आवडीने वाची. पुढे, मी जवळजवळ सर्व मजकूर वाचायला लागलो.

पुढे पुढे, वाचनाच्या वेडाने नशेचे स्वरूप धारण केले. त्यामुळे एखाद्या दिवशी जर मी वाचू शकलो नाही तर माझी अवस्था दारू न मिळालेल्या दारुड्यासारखी होई.

पुढे, माझे वाचन दोन स्तरांवर झाले. काहीतरी अद्भुत करण्यासाठी निघालेला मी अधाश्यासारखा जे हातात येईल ते वाचत असे व आपल्याला काय काय करता येईल - कसे करता येईल या विवंचनेत प्रत्येक गोष्ट चाचपत असे. या अधाशीपणामुळे पेपरांपासून, जुन्या मासिकांपासून, शेवचिवडा बांधून आणलेल्या पेपरापर्यंत मी सारे काही वाचत असे. पुढे पुढे जसजसे माझे उद्देश बदलत गेले तसे माझे वाचनही माझ्या ध्येयाभोवती केंद्रित होत गेले. पुढे या वाचनाला अजून संकुचितपणा येऊन मी सनदी सेवेच्या परीक्षेशी निगडित जास्त वाचू लागलो.

माझ्या वाचनाचा दुसरा स्तर म्हणजे माझी बौद्धिक भूक भागवणारे व माझ्या व्यथावेदनांचे विरेचन करून देणारे वाचन होय. या स्तरावरचे वाचन हे साहित्यिक स्वरूपाचे होते. वीरपुरुषांची चरित्रे व वैचारिक ग्रंथ यांपासून सुरुवात झाल्यावर वास्तववादी दलित, ग्रामीण व उपेक्षित वर्गाच्या व्यथांवर आधारलेले साहित्य हा माझ्या वाचनाचा विषय झाला. अशा प्रकारच्या वाचनाने मला चालत राहण्याची प्रेरणा, पेटून उठण्यासाठीची शक्ती व अपयशावर मात करण्याची स्फूर्ती मिळत राहिली. नारायण सुर्वे, कुसुमाग्रज, बाबुराव बागूल व आनंद यादव इत्यादी लेखकांच्या लेखणीने मला भुरळ पाडली होती. त्याबरोबर मी गांधी, आंबेडकर, फुले, विवेकानंद वाचत राहिलो. अशा रीतीने जेव्हा एका बाजूला काहीतरी करण्यासाठी माझ्या अंतर्मनात निखारा पेट घेत होता त्याच वेळेला कोणत्या मार्गाने व कसे काय करता येईल याचीही कार्यप्रणाली तयार होत होती. या एकंदरीत चर्वणाने आयुष्याला वेगळीच दिशा मिळत राहिली.

मला कोणत्याही प्रकारचे शौर्य, पराक्रम आकर्षित करत असे. त्यामुळे जगावेगळे काहीतरी करण्याची उर्मी माझ्या मनात सदैव राहिली. मनातील भित्रेपणा, संकुचितपणा नाहीसा झाला. आश्चर्य म्हणजे, कधी कधी तर मला असे वाटत असे की, आपला जन्म काही तरी अद्भुत, अद्वितीय करण्यासाठी झाला आहे आणि म्हणून असे काही आपल्या हातून झाल्याशिवाय आपण या विश्वातून जाणार नाही. या वेड्या विचारामुळे माझ्या मनातील, काही विपरीत घडण्याची, भीती नाहीशी झाली. मनातील भित्रेपणा जाऊन निडरपणा आला. मला आठवते, मी बारा वर्षांचा असताना एकदा काही महत्त्वाच्या कामानिमित्त मला नाशिकहून घरी येत असताना उशीर झाला व मी रात्री नऊला माहिजी या गावापर्यंत येऊन पोचलो. तेथून माझ्या गावाला जाण्यासाठी काहीच साधन नव्हते. रस्त्यात गिरणा नदी व चिखलाने भरलेले दोन नाले ओलांडावे लागत. सर्वांत भयावह म्हणजे रस्त्यात येणाऱ्या एका पुलाजवळ भुते असतात असे मी लहानपणापासून ऐकलेले होते. शेवटी, मी धाडस केले व निघालो. माझ्या दुर्दैवाने त्या दिवशी अमावस्या होती व सगळीकडे काळाकुट्ट अंधार पसरला होता. रस्त्यावर एरवीही रहदारी नसते आणि रात्री तर कुणी फिरकण्याची शक्यता नव्हती. मी अंधारात चाचपडत एकेक पाऊल टाकत होतो. नदीजवळ आल्यावर मी बघितले की, नदीच्या दुसऱ्या थडीवर एक प्रेत जळत आहे. मी नदीत पाय टाकताच तेथील शांतता चिरत 'डुबुक्' असा आवाज झाला. फक्त माझ्या पायांचा आवाज येत होता. माझ्या

मनात भीतीचा थरकाप उडेल असे एकंदर वातावरण होते; पण कुठून तरी 'आपल्याला काही होऊ शकत नाही' असा विचार माझ्या मनात पक्का होत गेला आणि माझ्या मनातील भीती नाहीशी झाली. त्या दिवसापासून आठवते तसे मी कोणत्याही गोष्टीला कधी घाबरलो नाही.

साधारणत: बारावी व पदवीचा अभ्यास करताना मला जाणीव झाली की, आपल्याला खूप मोठा पल्ला गाठायचा आहे आणि एकाच वेळेस आपणास खूप गोष्टी करणे गरजेचे आहे. पुढे गेलेल्या ज्या ज्या व्यक्तींबद्दल मी वाचत होतो, त्यांनी त्यांच्या जीवनात शिस्तीला दिलेले महत्त्व मला जाणवत होते. यामुळे आपल्यालाही जीवनात काही करायचे असल्यास शिस्त व वक्तशीरपणा अंगीकारणे खूप गरजेचे आहे अशी माझी खात्री झाली. पुढे, मी हे गुण आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. व्यायाम, अभ्यास, अवांतर वाचन यांमधील नियमितपणा टिकून राहिला व त्याचा मला फायदा झाला.

आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येक क्षेत्रात कमालीची जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली आहे. चांगल्या शाळा, महाविद्यालये असोत किंवा डॉक्टर, इंजिनीयरसारखे कोर्सेस असोत, दाखल होण्यासाठी पूर्वतयारी, अभ्यास व चांगले गुण जोपासणे गरजेचे झाले आहे. शिवाय आय.आय.टी., आय.आय.एम. व तत्सम कोर्सेस, एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी. या सर्व परीक्षांमध्ये तर स्पर्धा अजून उच्च कोटीची झाली आहे.

सर्वसाधारणपणे असा एक गैरसमज आहे की, काही विशिष्ट शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील मुले फक्त या स्पर्धांमध्ये यशस्वी होतात. ते बऱ्याच अंशी सत्य असले तरी ते संपूर्ण सत्य नाही. माझ्या मते, एखाद्या तरुणाच्या प्रगतीला आर्थिक पार्श्वभूमी सुरुवातीची काही वर्षे सोडली तर तितकीशी बाधक ठरत नाही. आपण गरीब आहोत, आपल्याजवळ पैसे नाहीत, त्यामुळे आपण विशिष्ट ध्येय साध्य करू शकत नाही, असे कुणी म्हणत असेल तर तो त्याचा आळस वा त्याच्यातील आत्मविश्वासाचा अभाव आहे असे म्हणता येईल. बऱ्याचदा, गरिबीमुळे लाचारीची वा असहायतेची भावना तरुणांमध्ये रुजते. त्यामुळेच ते चाकोरीबाहेरचा विचार करत नाहीत; परंतु ज्या पद्धतीने आपले सामाजिक व आर्थिक वातावरण बदलत आहे त्यात मेहनत करण्याला, धाडस दाखवणाऱ्या व आत्मविश्वासू व्यक्तींना दिवसेंदिवस जास्त वाव मिळत आहे. त्यामुळे तरुणांच्या प्रगतीमधील आर्थिक पार्श्वभूमीचे महत्त्व कमी होत आहे. सुरुवातीच्या काही वर्षांत, म्हणजे शाळा व महाविद्यालयीन शिक्षण घेताना, गरीब घरातील तरुणांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. बऱ्याचशा तरुणांची तेथेच दमछाक होते व ते परिस्थितीला दोष देऊन सर्वांत सोपा पर्याय निवडतात व माघार घेतात. तेथे सर्वांत मोठी मानसिक लढाई असते. एकदा त्या अडचणीतून मार्ग काढल्यावर पुढची वाटचाल काळजीपूर्वक करण्याची गरज असते. बऱ्याचदा, माहितीच्या अभावामुळे म्हणा किंवा समाजात पसरलेल्या अपप्रचारामुळे म्हणा, त्यांना योग्य मार्ग सापडत नाही. अशा परिस्थितीत त्यांना जो तोकडा अनुभव येतो, त्यावरून त्यांचा समज होतो की, 'सर्वत्र भ्रष्टाचार, अनीती, वशिला चालत असतो, आपल्याला काही वाव नाही' असे अनुमान काढून ते नैराश्याच्या खाईत ढकलले जातात.

अशा वेळी सावधगिरीने मार्गक्रमण करणे गरजेचे असते. तरुणांनी खरे काय, खोटे काय याची व्यवस्थित पडताळणी केली पाहिजे. ढोबळमानाने काही ठोकताळे बांधून, परिस्थितीला दोष देऊन माघार घेण्यापेक्षा थोडे चिकित्सक होणे गरजेचे असते. तरुणांच्या यशापयशाचा परिणाम त्यांच्या आजूबाजूला असलेल्या असंख्य तरुणांवर होत असतो. एखाद्या अशिक्षित गावातून

एखाद्या तरुणाने उच्चशिक्षण घेतले व तो त्यानंतर अयशस्वी झाला तर त्या गावातील इतर कनिष्ठ तरुणांवर त्याचा विपरीत परिणाम होतो.

कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वत:वर विश्वास असणे गरजेचे असते. एखादी गोष्ट साध्य करण्यासाठी लागणारी क्षमता आपल्यामध्ये आहे व ती गोष्ट आपण साध्य करू शकतो, असा विश्वास जागृत होणे म्हणजे यशस्वी होण्याच्या दृष्टीने टाकलेले यशस्वी व महत्त्वाचे पाऊल असते. अशा विश्वासाअभावी जेव्हा आपण एखाद्या कार्यसिद्धीसाठी प्रयत्न करत असतो तेव्हा आत्मविश्वासाचा अभाव नकारात्मकदृष्ट्या आपल्यासाठी काय करत असतो? स्वत:वरील विश्वास अपयशावर मात करण्यासाठी मदत करतो व पुन्हा कार्यरत होण्यास भाग पाडतो.

स्वत:वरील विश्वासाबरोबर योग्य दिशेने केलेले परिश्रम यश मिळवण्यासाठी गरजेचे असतात. बऱ्याचदा तरुणांना मार्ग सापडतातही, परंतु ज्या दिशेने प्रयत्न व्हायला हवेत त्या दिशेने ते होत नाहीत. अशा वेळी कितीही गाढवमेहनत केली तरी ईप्सित साध्य होत नाही. प्रयत्न किती केले गेले हे गौण राहून कसे केले गेले हे महत्त्वाचे ठरते. स्पर्धेच्या युगात, वस्तुत: कोणत्याही कामात- किती वेळेत- काय लाभ झाला हे जास्त महत्त्वाचे ठरते. त्यामुळे फक्त कष्ट महत्त्वाचे न ठरता कोणत्या प्रतीचे कष्ट झाले, यावर यश अवलंबून राहते.

कोणत्याही उद्दिष्टात यशस्वी होण्यासाठी सरळ असे काही सूत्र नसते. प्रत्येक व्यक्तीसाठी त्याची सुरुवात, पार्श्वभूमी वेगवेगळी असते. त्यामुळे दोन व्यक्ती सारख्या प्रमाणात प्रयत्न करत असल्या तरी त्यांना सारखी फळे मिळतील असे नाही. मला एका शिक्षकाचे वाक्य आठवते - ‘‘यश फक्त त्याला मिळते ज्याला त्याची प्रचंड गरज असते आणि ही गरज त्याच्या प्रयत्नांतून प्रतिबिंबित होत असते.’’

यशस्वी होऊ पाहणाऱ्या प्रत्येक तरुणाला त्याच्या उद्दिष्टांकडे व्यावसायिकतेने बघणे गरजेचे असते. कसाई ज्याप्रमाणे बकरा कापताना बकऱ्याबद्दल भावनिक न होता त्याचे काम चोखपणे करत असतो, त्याप्रमाणे उद्दिष्टांकडे भावनिक न होता ते मिळण्यासाठी सर्वांगीण प्रयत्न व विचार गरजेचा असतो. भावनिक गुंता आणि फाजील आत्मविश्वास आपल्याला, उद्दिष्टांचा सर्वांगीण विचार करण्यापासून वंचित करत असतात आणि पर्यायाने अपयशाच्या जवळ नेत असतात.

धाडस व समयसूचकता हे गुण उमेदवारामध्ये असल्यास तो निश्चित इतरांपेक्षा वरचढ ठरतो. योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची समयसूचकता व तो पूर्णत्वास नेण्याचे धाडस खूप महत्त्वाचे असते. आय.ए.एस. परीक्षेबद्दल म्हणायचे झाल्यास; निर्णय योग्य वेळी परीक्षा देण्याबद्दल असो, वैकल्पिक विषयांसंबंधी असो वा मार्गदर्शन वर्गात दाखल होण्याबद्दल असो, हे निर्णय योग्य वेळी घेतले गेले नाहीत तर त्यांचा परिणाम उमेदवाराच्या यशापयशावर होतो.

त्यापुढे जाऊन, एखादे व्यावसायिक क्षेत्र निवडल्यावर त्या क्षेत्रासाठी लागणारी मानसिकता अंगीकारणे, त्या क्षेत्रात अत्युच्च शिखर गाठण्यासाठी खूप गरजेचे असते; नाही तर, एखादे क्षेत्र निवडल्यावरही व पुरेशी क्षमता असूनही पाहिजे तेवढे यश प्राप्त होत नाही. त्यामुळे नैराश्य पदरी येऊन त्याचा प्रभाव कामावर पडतो व दुष्टचक्र तयार होते. खासगी कंपन्यांमध्ये काम करण्यासाठी वेगळी मानसिकता लागते, लोकाभिमुख नोकरीसाठी वेगळी मानसिकता लागते; तर स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी वेगळेच गुण जोपासणे गरजेचे असते.

## पुढची दिशा

जर मी कलेक्टर झालो नसतो तर कुणाचे काही बिघडले असते? खचितच नाही. दोन पुस्तकं शिकून मास्तर किंवा पोलिस होईल, अशी छोटीशी अपेक्षा असलेल्या ताई-अण्णांसाठी तर माझी सांख्यिकी सेवेतील नोकरीही भरपूर होती. मित्रमंडळींसाठी माझे आय.ए.एस. बनण्याचे स्वप्न वाळवंटातील हिमवर्षावाएवढे अशक्यप्राय होते आणि अभ्यास करणाऱ्या इतर सहकाऱ्यांसाठी तर परीक्षेच्या 'कॅज्युल्टी'त अजून एकाची भर पडली असती. मात्र, माझ्यासाठी यामुळे जीवनाचे गणितच बदलले असते.

ज्या दिवसापासून मी आय.ए.एस. व्हायचे ठरवले, त्या दिवसापासून माझे आचार-विचार बदलायला लागले. मी प्रत्येक गोष्टीचा त्या अनुषंगाने विचार करू लागलो. मला आय.ए.एस. का व्हायचे आहे? या प्रश्नाविषयी खोलवर आत्मचिंतन केल्यावर जाणीव झाली की, आतापर्यंत आपण जे अनुभवले आहे. ते इतरांसाठी थोडे बदलावे, अशी एक अतृप्त इच्छा आपल्या मनात रुजली आहे. मग अजून खोलवर गेल्यावर प्रश्न पडला की, हे सर्व आपण फक्त आय.ए.एस. झाल्यावर करू शकतो का? या प्रश्नाचे नकारात्मक उत्तर मिळाल्यावर मी जरा शुद्धीवर आलो. कारण मी या दरम्यान आयुष्यातील मौल्यवान दिवस वाया घालवले होते. मला कळून चुकले की, आपण काही तरी करण्यासाठी काही तरी होण्याची वाट बघत आहोत, ती चुकीची आहे.

परीक्षेची अनिश्चितता, जीवघेणी स्पर्धा मला सर्व प्रकारचा विचार करायला भाग पाडत होती. मला कळून चुकले होते की, मी क्षितिजाला गवसणी घालण्याच्या प्रयत्नात क्षितिजापर्यंत फक्त पोचू शकलो असतो किंवा रस्त्याच्या मध्येसुद्धा पोचलो असतो. या सर्व वास्तविक शक्यतांमुळे माझ्या विचारात आमूलाग्र बदल झाला. यामुळे मी आय.ए.एस.चा भावनिक पातळीवर विचार न करता व्यावहारिक पातळीवर विचार करत होतो. या विचारसरणीमुळे माझ्यावरील मानसिक दबाव कमी झाला. मला कळून चुकले की, आपण आय.ए.एस. झालो नाही तरी एक चांगली व्यक्ती खचित होऊ शकतो व आपल्यापरीने समाजासाठी आणि कुटुंबासाठी योगदान देऊ शकतो. डोळसपणे बघितल्यावर जाणवले की, अशी अनेक क्षेत्रे व पर्याय आहेत की, ज्याद्वारे आपण समाजाच्या कामी येऊ शकतो. त्या सर्व पर्यायांसाठी मला आय.ए.एस. होणे गरजेचे नव्हते.

या विचारांनी माझा आत्मविश्वास वाढण्यास उपयोग झाला. यापूर्वी मी स्वत:ला असहाय, हतबल व शक्तिहीन समजत होतो; परंतु ती मानसिकता बदलली. एकदा असाच दिल्लीच्या स्टेशनवर एका सामान्य प्रवाशाकडून पाचशेची नोट घेऊन सुटे नसल्याच्या बहाण्याने तिकिट मास्तरने तिकिट द्यायला नकार दिला. गाडी निघण्याची वेळ झाल्याने ती व्यक्ती तिकिट मास्तरच्या विनवण्या करत होती. मी त्वरित त्यांच्या भांडणात पडून तिकिट मास्तरला तिकिट द्यायला भाग पाडले. त्या छोट्याशा घटनेने माझ्या बदललेल्या मानसिकतेची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर मी वेगवेगळ्या विषयांवर वर्तमानपत्रांत लिहू लागलो. छोट्या-मोठ्या अन्यायकारक बाबींवर आवाज उठवू लागलो; आपले मत प्रखरपणे मांडू लागलो.

परीक्षेत पूर्णत: अयशस्वी झालेल्या काही उमेदवारांकडे बघितल्यावर कळले की, ते आपले अपयश मागे सारून जीवनात परत नव्या उमेदीने वेगळ्या आव्हानांना सामोरे जात आहेत. काही तर या प्रयत्नात चांगलेच यशस्वी झाले होते. त्या सर्वांना 'आपण एक मोठं स्वप्न तर बघितलं.' याचा सार्थ अभिमान आहे. माणसाच्या कर्तृत्वावर माझा प्रचंड विश्वास असल्यामुळे आपण

यशस्वी झालो - न झालो तरी जीवन नीरस होईल असे कधी वाटले नाही.

एकदा आय.ए.एस. झाल्यावर हृदयात जड जड वाटू लागले. लोकांच्या अपेक्षांचे ओझे जाणवू लागले. मी लहानपणापासून लोकांमध्ये असलेली सरकारी अधिकाऱ्यांची प्रतिमा बघितलेली होती. त्यांच्याशी देणे-घेणे असल्यामुळे व त्यांच्याबाबत सतत वाईट अनुभव आलेले असल्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या मते, सर्वच सरकारी अधिकारी म्हणजे दोन नंबरचा पैसा घेणारे हपापलेले अजगर असतात. वेळेवर, मेलेल्याच्या टाळूवरचे लोणीही खायला ते कमी करत नाहीत, त्यांचे हृदय दगडाचे असते. त्यांचा सामान्य लोकांच्या अडीअडचणींशी काही संबंध नसतो, इत्यादी. यामुळे आपण अधिकारी होऊन प्रामाणिकपणे काम करू असे म्हणणेही भीतीदायक वाटे. चारचौघांत असा काही सूर काढल्यास एक तर ते वेड्यात काढत किंवा असल्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत.

आपण कोणत्या प्रकारच्या वातावरणात काम करणार आहोत, याची जाणीव हळूहळू मला होऊ लागली. दिवसेंदिवस प्रशासनात वाढत चाललेल्या भ्रष्टाचारामुळे, खरेच आपण लोकांसाठी काम करू शकू का असा प्रश्न होता. प्रशासनाच्या अगदी खालच्या पातळीवर चालणारा भ्रष्टाचार व लुबाडणूक मी जवळून बघितली होती. शिवाय, पंचायतराज व्यवस्थेमुळे तात्पुरत्या निर्माण झालेल्या गोंधळात राजकारण्यांची पातळी तळाला पोचलेली दिसत होती. सरपंचापासून झेडपी अध्यक्षापर्यंत सर्वजण, कोणतेही मार्ग स्वीकारून, राजकीय वजन वापरून, अधिकाऱ्यांना हैराण करताना दिसत होते. काही प्रामाणिक अधिकारी हताश होऊन नोकरी सोडताना दिसत होते किंवा ते कमी महत्त्वाच्या किंवा क्षुल्लक विभागात फेकले गेलेले दिसत होते. याविषयी कुणाबरोबरही चर्चा केली तरी निराशेचा सूर बाहेर निघत होता. त्यामुळे आपण आपल्या मनासारखे काम करू शकू का, हा प्रश्न मला भेडसावत होता.

पण जसजशी प्रशासनाबद्दल मला अधिक माहिती मिळू लागली, तसतशा माझ्या मनातील शंका-कुशंका दूर होत गेल्या. आधी धूसर असलेला रस्ता मला स्पष्ट दिसू लागला. एका गोष्टीबद्दल खात्री झाली की, मी कुणी देवदूत नाही किंवा जादूगार नाही की, जो क्षणार्धात परिस्थिती बदलवून टाकेल; किंबहुना तशी अपेक्षा करणेही मूर्खपणाचे होते. मी फक्त एक कार्यकर्ता म्हणून नोकरीत रुजू होणार होतो की, जो आपल्यापरीने काही तरी सकारात्मक करत राहील व लोकांच्या मनात प्रशासनाबद्दल असलेला अविश्वास, भय, तिटकारा काही अंशी दूर करील.

मी एका बाबतीत स्पष्ट होतो की, मी भ्रष्टाचार निर्मूलनासाठी नोकरीत शिरत नाही. भ्रष्टाचार ही तर एक सामाजिक कीड आहे. तिला समोरील बाजूने वार करून पाहिजे तेवढा परिणाम होणे शक्य नव्हते. त्यासाठी सामाजिक नीतिमूल्यांमध्ये आमूलाग्र बदल होणे गरजेचे आहे. चाणक्याने म्हटले आहे - ''प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून भ्रष्टाचार न करणे एवढे अवघड आहे, जेवढे एका व्यक्तीच्या जिभेवर मधाचा गोळा ठेवून त्याला ते न चाखण्याविषयी अपेक्षा करणे.'' सामान्य लोकांकडूनही भ्रष्टाचाराला पाठबळ मिळत असते. कुणीही छातीठोकपणे म्हणत नाही की, 'माझ्या कामाला नियमानुसार जेवढा वेळ लागेल तेवढा मी थांबायला तयार आहे. मी माझे काम पैसे देऊन मुळीच करणार नाही.' आपण दोन दिवसांत होणारे काम पैसे देऊन एका दिवसात करायला बघतो आणि वरून आपल्या सोयीनुसार भ्रष्टाचारावर भाषण देत असतो. खरे बघितले तर माझ्या अनुभवाप्रमाणे, सामाजिक जीवनात ज्याला संधी मिळते तेवढा तो

लुबाडत असतो, दुर्नीती करत असतो. एखाद्या गरीब माणसालाही खोटे बोलून एखादी गोष्ट मिळत असली तर तो ती करतो. हा भ्रष्टाचार नाही काय?

माझी याबाबतीतील मते पूर्वीपासून स्पष्ट आहेत. माझ्या मते, संपूर्ण संस्था कधीच बेइमान किंवा भ्रष्टाचारी नसते. फक्त माणसे तशी असतात. त्यांच्या प्रवृत्ती तशा असतात. त्यामुळे चांगल्या व वाईट दोन्ही प्रकारचे लोक सर्व क्षेत्रांत वावरत असतात. प्रशासनाच्या बाबतीत जी लपवेगिरी आहे, गुप्तता आहे, लोकांकडे जो माहितीचा अभाव आहे, त्यामुळे भ्रष्टाचार जास्त फोफावत आहे. जर प्रत्येक कार्यालयांच्या प्रत्येक कामाचे टप्पे, त्याला लागणारा वेळ व कागदपत्रे वगैरे लोकांना स्पष्टपणे माहीत झाले व त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत संवाद साधता आला; प्रत्येक कामाची पडताळणी, चौकशी, फेरतपासणी, लोकांची प्रतिक्रिया या गोष्टी जर प्रशासनाच्या सर्व कामांमध्ये अंगीकारल्यागेल्या व कायदेशीर झाल्या तर निश्चितच भ्रष्टाचार कमी होऊ शकतो. कमीत कमी तो दिसू शकतो. मी खूप आधीपासून ठरवले की, मी स्वत: स्वच्छ राहून व याबाबतीत 'झिरो टॉलरन्स' वापरून, माझे कार्यालय स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करत, जास्तीत जास्त वेळ लोकांमध्ये फिरून त्यांच्या अडचणी जाणून घेईन. प्रत्येक छोट्या-मोठ्या तक्रारीचे ठरलेल्या वेळात निवारण करण्यासाठी संगणकावर आधारित सिस्टिम तयार करीन, गावागावामध्ये होणाऱ्या प्रत्येक कामासाठी पारदर्शक खांब उभे करीन, जेणेकरून प्रत्येकाला किती लाखांचे काम झाले आहे व किती लोकांना त्यासाठी काम केले आहे याची पडताळणी करता येईल. वेळोवेळी, जिल्ह्याच्या विभिन्न ठिकाणी 'तक्रार निवारण शिबिरे' घेऊन लोकांच्या अडचणी जाणून घेता येतील. या बाबतीत व्यवस्था सुधारणे खूप गरजेचे आहे; कारण या प्रकारचे बरेच उपक्रम ती व्यक्ती जोपर्यंत त्या जागी असते तोपर्यंत चालतात, परंतु जर आपल्याला काही बदल निश्चित घडवायचा असेल तर मूलभूत व्यवस्थेत बदल घडवणे गरजेचे आहे.

सुरुवातीची आदर्शवादी विचारांची काही वर्षे सोडल्यास मला पुढे जाणीव झाली की, मी अफाट समुद्रातील फक्त एक लहानसा मासा आहे. त्यामुळे आपण संपूर्ण समुद्र प्रभावित होईल असे काही करू शकू, हे शक्य नाही. मात्र, दैनंदिन जीवनात जरी फक्त आपण स्वत:चे कर्तव्य पार पाडले व कुठलीही अपेक्षा न करता चालत राहिलो तरी ते खूप मोठे योगदान ठरेल.

नोकरीतील राजकीय दबावाबाबतही खूप बोलले जाते. बऱ्याच लोकांशी चर्चेतून व एकंदरीत वेगवेगळ्या उदाहरणांवरून आपल्याला खूप दबावामध्ये काम करावे लागेल असे वाटणे साहजिक होते. काही महाभाग हा विषय घेऊन घाबरवण्याचा मुद्दाम प्रयत्न करत; परंतु मला त्याबाबतीत फार विचार करणे कधी भाग पडले नाही. माझ्या मते, राजकीय प्रतिनिधी व नोकरशहा यांची एक विशिष्ट भूमिका आहे. ती जर आपण नीट ओळखली तर आपल्याला अडचण येणार नाही. दैनंदिन कामात शेकडा 95 टक्के कामे अशी आहेत की, त्यात तुम्हाला कुणीही दबाव आणणार नाही किंवा तुमच्याशी दोन हात करणार नाही. अशा कामांमधून तुम्ही निश्चितच बदल घडवू शकता.

शेवटी, राजकारणीसुद्धा लोकांचे प्रतिनिधी असल्यामुळे व त्यांच्यातील बऱ्याच जणांना लोकांच्या समस्यांची व त्यांच्या निवारणाची चांगली जाण असल्यामुळे त्यांच्याशी योग्य संवाद असल्यास आपल्याला फायदा होईल असे वाटे. ते घेऊन येत असलेल्या कामांमध्ये साठ-सत्तर टक्के कामे ही समाजाच्या महत्त्वाच्या बाबींविषयी असतात, यात मला शंका नव्हती. त्यानंतर काही मूल्ये ठरल्यावर त्यांच्याशी संवाद साधताना आपण लक्ष्मणरेषा घालू शकतो. त्यांना

सुरुवातीपासूनच जेव्हा जाणीव होईल की, आपण काय करू शकतो व काय करू शकत नाही, तेव्हा कुणी आपल्या वाट्याला जाईल असे वाटत नाही. शेवटी, समस्या खूपच निर्माण झाली तर जास्तीत जास्त आपली बदली होईल, आपल्याला डावलले जाईल; परंतु त्या गोष्टी माझ्यासाठी नगण्य होत्या. बऱ्याचदा, या बाबतीत उद्भवणारे वाद हे खूप वैयक्तिक व 'इगो'शी संबंधित असतात - हे जाणून घेतले तर तत्त्वासाठी व जनसामान्यांच्या एकंदरीत हितासाठी चुकवावी लागणारी किंमत माफक वाटण्याची शक्यता आहे. यामुळे एक उत्तम प्रशासक होण्यासाठी माणसांना समजून घेण्याची व सर्व प्रकारच्या लोकांशी व्यावहारिक पातळीवर जुळवून घेण्याची क्षमता, कला आत्मसात करणे खूप गरजेचे आहे.

दरम्यान, अनेक प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या मोलाच्या योगदानाने स्फूर्ती मिळत राहिली. मुख्य निवडणूक आयुक्त टी.एन.शेषन यांनी केलेल्या क्रांतिकारक बदलांमुळे भारताच्या निवडणूक प्रक्रियेवर दूरगामी परिणाम झाला आणि भारतीय गणतंत्र व लोकशाही सुदृढ होण्याला मदत झाली. त्यांच्या निडर वृत्तीने मी खूपच प्रभावित झालो होतो. सुरतचे कमिशनर चंद्रशेखर राव यांच्या अथक परिश्रमाने व कार्यकौशल्याने शहराचा झालेला कायापालट तर सर्वांच्या कौतुकाचा विषय झाला होता. त्याचप्रमाणे ठाणे व नागपूर शहराचे कमिशनर होऊन गेलेले चंद्रशेखर यांच्या कार्यामुळेही त्या शहरांचा चेहरा बदललेला होता. त्या शिवाय अरुण भाटीया, गो. रा. खैरनार, शरद काळे, किरण बेदी व इतर अनेक अधिकाऱ्यांनी मला प्रभावित केले. किरण बेदींना तर प्रत्यक्ष बघण्याची व त्यांचे मनोगत ऐकण्याची संधी मला नाशिकमध्ये लाभली होती. या लोकपरिचित अधिकाऱ्यांबरोबरच शांतपणे आपले कर्तव्य बजावणाऱ्या, कुणाच्या ध्यानीमनी नसलेल्या, परंतु समाजासाठी मोठे योगदान देणाऱ्या काही अधिकाऱ्यांशी हितगूज करण्याची संधी मिळाली. त्यामुळे मी तरी आय.ए.एस. बद्दल नकारात्मक विचाराने वेढला गेलो नाही.

परीक्षा पास व्हायच्या कित्येक वर्षे आधीपासून माझे समाजाविषयी मंथन चालू होते. उठता-बसता, झोपता-जागता, बऱ्याचदा सामाजिक समस्यांविषयी, लोकांच्या दैनंदिन जीवनातील अडीअडचणींविषयी मी विचार करत असे. याचे कारण, एकतर त्या माझ्याशीही संबंधित होत्या व दुसरे म्हणजे माझ्या भविष्यातील नोकरीच्या अनुषंगाने होत्या. सामान्य शेतकरी व तळागाळातील कामकरी वर्ग यांच्या समस्यांबद्दल मी जरा जास्तच जागरूक होतो.

महाराष्ट्रातील शेकडा साठ टक्के शेतकरी हा कोरडवाहू जमिनीवर म्हणजे पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहतो. असलीच परिस्थिती देशातील इतर सर्व राज्यांमध्ये आहे. साधारणत: शेकडा सत्तर टक्के लोकांचा चरितार्थ आजमितीला शेतीवर अवलंबून आहे. देशातील सर्व शेतकऱ्यांच्या समस्या समान आहेत. त्या सोडवण्यासाठी दोन्ही - म्हणजे सरकारी पातळीवर व शेतकऱ्यांच्या - बाजूने व्यवस्थित प्रयत्न झाले पाहिजेत. त्या कामात मला सर्वांत मोठा अभाव जाणवतो, तो शेतकऱ्यांच्या संघटित न होण्याचा. शेतकरी संघटित वाटत असला तरी व्यवसायाच्या पातळीवर संघटित नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जिवावर पोसणाऱ्या वर्गाचे - म्हणजे दलाल, व्यापारी, औषध दुकानदार, बियाणे दुकानदार - यांचे फावते. शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळे व संघटनांच्या अभावामुळे ती मंडळी त्यांच्या असहायतेचा, अज्ञानाचा भरपूर फायदा घेतात आणि वर्षानुवर्षे त्याला लुबाडतात. त्यामुळे या वर्षी पायी फिरणारा दलाल किंवा दुकानदार पुढच्या वर्षी फटफटीवर, तर त्याच्या पुढच्या वर्षी चारचाकीवर फिरताना दिसतो. शेतकरी मात्र घासलेली चप्पल चांभाराकडून शिवून परत दोन वर्षे कशी टिकेल या संभ्रमात पुढच्या हंगामाची

वाट पाहत असतो. गावागावांतील शेतकरी संस्थांच्या माध्यमातून संघटित झाल्यास, त्यांच्यातील काही शेतमाल विकण्याची जबाबदारी सांभाळतील, काही नवीन तंत्रज्ञान-पीकपद्धती आत्मसात करतील. यामुळे एकत्रित काही निर्णय घेऊन तो सर्वांना राबवता येईल. अशा प्रकारे, त्यांची तडजोड करण्याची क्षमता वाढेल. त्यांना ज्या पिकाला मागणी आहे व जेथे आहे ते पीक पिकवता येईल व जेथे पाहिजे तेथे पाठवता येईल.

संघटित झाल्याने त्यांना ठकवणे सहसा कोणाला शक्य होणार नाही. यामुळे सरकारी यंत्रणेलाही शेतकऱ्यांपर्यंत पोचणे सोपे होईल. या संस्था जिल्ह्याच्या ठिकाणावर एका फेडरेशनमध्ये रूपांतरित होऊ शकतात. प्रतिनिधींना काही विशिष्ट गोष्टींचे प्रशिक्षण जिल्हा पातळीवर देऊन ते प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोचवता येईल. राज्य व देशपातळीवर या प्रकारचा सेटअप एक दबावगट म्हणून काम करू शकतो. सध्या शेतकऱ्यांचा वाली कुणी नाही. त्यांनीच त्यांची व्यवस्था करणे गरजेचे आहे.

आर्थिक उदारीकरणाने उद्योगाला जरा झुकते माप दिले गेले आहे. त्यामुळे सरकारच्या प्रत्येक 'पॉलिसी डॉक्युमेंट'मध्ये त्यासंबंधित बारीकसारीक गोष्टींकडे जरा जास्त लक्ष दिलेले दिसते; परंतु सर्वांत जास्त लोकांशी निगडित असलेल्या शेती व्यवसायाकडे पाहिजे तेवढे लक्ष दिले जात नाही. किंबहुना, बऱ्याचदा आकर्षक अशा योजना आकर्षक आकड्यांमध्ये जाहीर होतात, परंतु प्रत्यक्षात सर्व योजना लोकांपर्यंत पोचवण्यासाठी जो संस्थात्मक ढाचा गरजेचा असतो, त्याच्या अभावामुळे योजना शेतकऱ्यांपर्यंत पोचण्यापूर्वी गुडूप होतात. बऱ्याचदा, त्या रोगाच्या मुळाशी घाव न घालता त्याच्या परिणामांवर बाम लावण्याचा प्रयत्न केला जातो. दिवसेंदिवस वाढत चाललेल्या उदारीकरणामुळे सरकारचे शेतकऱ्यांशी संबंधित असलेल्या गोष्टीवरील नियंत्रण कमी होत आहे व सामान्य शेतकऱ्यांची हतबलता, शोषण वाढत आहे. बजेटच्या आधी सर्व क्षेत्रांतील लोकांशी अर्थमंत्री आमंत्रण देऊन चर्चा करतात, परंतु सामान्य शेतकऱ्यांच्या गटाशी चर्चा केली आहे असे ऐकण्यात नाही. त्यामुळेच कापसावर तीस टक्के आयातकर आहे, तर सेकंड हॅण्ड मोटारींवर एकशेतेहतीस टक्के आहे. म्हणजे सरकारला विदर्भ-तेलंगणात आत्महत्या करत असलेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांपेक्षा मोटारी तयार करणाऱ्या कारखानदारांची जास्त काळजी आहे!

शेकडा सत्तर टक्के लोकांशी शेती निगडित असतानासुद्धा शेतीविषयी जिल्हापातळीवर जिल्हाधिकाऱ्यांनी कधी सत्तर टक्के नाही, परंतु दहा टक्के वेळ देऊन चौकशीवजा रिव्ह्यू केला असे ऐकण्यात नाही किंवा शेतकऱ्यांसाठी कुण्या जिल्हाधिकाऱ्याने 'शेतकरी तक्रारनिवारण शिबिर' घेतले असेही ऐकण्यात नाही. मी काम करत असताना शेतीविषयक समस्यांवर व एकंदरीतच, 'लाईव्हलीहूड सिक्युरिटी' वर जास्त भर असेल. कारण माझ्या मते, फक्त लोकांना घरकुल वाटून किंवा विशिष्ट दिवसांचा रोजगार उपलब्ध करून उपयोग नाही; तर त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी, ते राहत असलेल्या परिवेशामध्ये, त्यांच्या भौगोलिक संसाधनांचा उपयोग करून त्यांना आर्थिक लाभ होईल हे बघणे गरजेचे आहे.

प्रशासनाबरोबर समाजाला दिशा देणारा दुसरा घटक म्हणजे राजकारण किंवा राजकीय नेतेमंडळी. चौऱ्याहत्तराव्या घटनादुरुस्तीनंतर व सत्तेच्या विकेंद्रीकरणानंतर गावपातळीपासून संसदेपर्यंत लोकप्रतिनिधींच्या संस्था उभ्या राहिल्या. त्या सुरुवातीपासून 'अधिकार केंद्र' म्हणून काम करू लागल्या. लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वानुसार त्यांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी, म्हणजे

निवडून येण्यासाठी, कोणत्याही प्रमाणपत्राची गरज भासत नाही. साधारणत: सर्व थरांवर अधिकांश व्यक्ती अशा आहेत की, ज्या इतर कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकल्या नाहीत व त्यांच्याकडे वडिलोपार्जित राजकीय वारसा वा वडिलोपार्जित संपत्ती आहे किंवा त्या दादागिरी, गुंडगिरी करणाऱ्या ठग आहेत. साधारणत: शाळेतील उनाड, बदनाम व गुंड प्रवृत्तीची व्यक्ती पक्षाच्या युवा मोर्चाची नेता बनते व पुढे एमएलए/एमपीच्या निवडणुका लढवते.

पाच वर्षांसाठी निवडून आल्यावर, आपण खर्च केलेल्या पैशांमुळे आपल्याला त्याच्या दामदुप्पट पैसे वसूल करण्याचा अधिकार आहे या आविर्भावात मग हप्ते सुरू होतात. मतदारसंघात होणाऱ्या प्रत्येक कामासाठी विशिष्ट 'पर्सेंटेज' साहेबांच्या बंगल्यावर पोचते. शिवाय बदल्या, शिफारशी, ब्लॅकमेलिंग या मार्गांचे रेटही ठरलेले असतात. ती सर्व कामे करून आपण लोकसेवा करत आहोत, असा त्यांचा युक्तिवाद असतो! अशा प्रकारे 'तुंबडी भरणे' हा एकच उद्देश असल्यामुळे लोकांच्या कल्याणासाठी दूरदर्शीपणे विचार करण्याकरता या लोकांना वेळ नसतो. पैसा व गुन्हेगारी यांचे प्रस्थ इतके वाढले आहे की, साधारण माणूस आपल्या स्वत:च्या पैशांतून सरपंचापासून पुढे कोणतीही निवडणूक लढवेल अशी शक्यता मावळली आहे.

आदर्श समाज पद्धतीमध्ये पंचायत समिती, जिल्हा परिषदेत बसलेल्या लोकप्रतिनिधींनी चर्चा करून, लोकांच्या समस्यांचा आणि आर्थिक-सामाजिक परिवेशाचा विचार करून काही क्षेत्रे योजनेसाठी सुचवली पाहिजेत. त्यानंतर तो प्रश्न कसा हाताळायचा हे प्रशासकीय व तांत्रिक यंत्रणेवर सोपवणे गरजेचे आहे. कारण लोकप्रतिनिधी हे तांत्रिक बाबींबद्दल तज्ज्ञ नसल्यामुळे तसे निर्णय ते घेऊ शकत नाहीत व घेतले तरी त्यांचा पाहिजे तसा परिणाम होत नाही.

प्रत्यक्षात घडते उलटे. ही मंडळी एखादी समस्या सोडवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या योजनेमध्ये हस्तक्षेप करतात. ती कोणत्या भागात राबवली जावी याबद्दल हस्तक्षेप करतात व ती कुणी राबवावी याविषयीही हस्तक्षेप होतो. यामुळे संपूर्ण कामाचे केंद्र सर्वसामान्य लोक न राहता राजकीय पुढारी बनतात. आपल्याला लोकशाहीचा फक्त दुरुपयोग बघायला मिळतो. पुढे वीस-तीस वर्षांपर्यंत यात काही बदल होईल असे वाटत नाही. जेव्हा सर्व जनता जागृत होईल, प्रत्येक जण आपल्या हक्काबद्दल साशंक होईल व तो काळजीपूर्वक वापरायला सुरुवात करेल, तेव्हा कदाचित ही परिस्थिती बदलेल. सद्यपरिस्थितीत समाजातील सुजाण व भद्र लोकांनी राजकारणाकडे वळणे खूप गरजेचे आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे निवडणुकीनंतर प्रत्येक स्तरातील लोकप्रतिनिधींना त्यांच्या कामाबद्दल, कर्तव्याबद्दल प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. निवडणुकीचा खर्च सरकारने दिल्यास मतदानात उमेदवाराचा होणारा अफाट खर्च वाचवता येईल व भ्रष्टाचार निर्मूलनासाठी थोडा हातभार लागेल.

समाजापुढे अजून एक महत्त्वाची समस्या आ वासून उभी आहे, ती म्हणजे 'तरुणांच्या शक्तीचा' व्यवस्थित वापर. जगाच्या पाठीवर भारतात तुलनेने बहुतांश लोकसंख्या तरुण आहे; परंतु आपण आपल्या असंख्य तरुणांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी व देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी योग्य मार्ग दाखवू शकत नाही. देशाच्या एकंदर शिक्षणव्यवस्थेकडे बघितल्यावर जाणवते की, काही विशिष्ट शिक्षणसंस्थांतून शिक्षण घेतल्यावर पुढे प्रगतीच्या वाटा मोकळ्या होतात. या शिक्षणसंस्थांची संख्या मर्यादित आहे. तेथील प्रवेशप्रक्रिया परीक्षेवर अवलंबून असली तरी त्या प्रवेशपरीक्षेला लागणारी तयारी सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेरची आहे. अशा शिक्षणसंस्थांमधून उत्तीर्ण होऊन लठ्ठ सहा आकडी पगार मिळवणाऱ्यांची एक वेगळी जात निर्माण

होत आहे. प्रत्येक शहरात अशा लोकांची जमात एका वेगळ्या विश्वात राहताना दिसते.

ग्रामीण आणि निमशहरी भागांतील शाळा-कॉलेजांमधील शिक्षणाची पातळी दिवसेंदिवस घसरत आहे. प्रत्येक वर्षागणिक हजारो मुले डिग्री घेऊन बाहेर पडत आहेत. जोपर्यंत या प्रवाहातून बाहेर निघणाऱ्या तरुणाला आपण योग्य दिशा दाखवू शकत नाही, तोपर्यंत तो त्याची शक्ती देशविघातक व समाजविघातक गोष्टींमध्ये खर्च करत राहील. त्यासाठी आपल्या शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल होणे गरजेचे आहे. प्रत्येकाला उच्च शिक्षणाची आस आहे, ती संकल्पना बदलली पाहिजे. साधारणत: बारावीनंतरचे शिक्षण व्यवसायाभिमुख झाले पाहिजे. त्या अनुषंगाने संस्थांची निर्मिती अपेक्षित आहे. शेतीसारख्या व्यवसायाला कमी प्रतीचे समजले जाते. शिक्षणानंतर शेतीत काम करण्यास बरेच तरुण धजावत नाहीत. या पार्श्वभूमीवर शेतीवर आधारित उद्योग व त्याला प्रतिष्ठा मिळवून देणे गरजेचे आहे. त्याबरोबर प्राथमिक शिक्षणाची व माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता समान करण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. त्यामुळे सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीवर आधारित शैक्षणिक सोयीसुविधांचे लोकशाहीकरण व्हायला मदत होईल.

प्रत्येक तालुक्याच्या गावाला किंवा परिसरातील मोठ्या गावाला असलेल्या महाविद्यालयाला जोडून मानवी संपदा व्यवस्थापन व प्रशिक्षण केंद्र (Human Resource Management & Training Centre) सुरू झाले पाहिजे, जेणेकरून तरुणांच्या सर्व गरजा व सर्वांगीण विकास यांना चालना मिळेल.